HISTORICAL RESEARCH ON THE LATE MEDIEVAL KAMTHA PARGANA

[1751-1818 A.D.]

# वीर राजे



# चिमणा बहादूर


इतिहासकार

प्राचार्य ओ.सी. पटले

एम.ए.(इतिहास), एम.ए.(राज्यशास्त्र), एम.एड्

# वीर राजे चिमणा बहादूर

## Veer Raje Chimna Bahaddur

[HISTORICAL RESEARCH ON THE LATE MEDIEVAL KAMTHA PARGANA (1751-1818A.D.)]


- **प्रथम आवृत्ती :** १८ फेब्रुवारी २०१७, राजे चिमणा बहादूर जयंती, युगाब्द ५११८
- ISBN : 978-93-5258-490-1


- © **लेखक**
  प्राचार्य ओ.सी.पटले
  विद्यानगरी, आमगाव (महाराष्ट्र)
  भ्रमणध्वनी क्र. ९४२२३४८६१२
  (या ग्रंथाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित आहेत.)


- **प्रकाशक**
  वीर राजे चिमणा बहादूर फाऊंडेशन, गोंदिया (महाराष्ट्र)
- **मुखपृष्ठ सजावट**
  संतोष पुंडकर, उपाध्यक्ष, भवभूति रिसर्च अकॅडमि, आमगाव
- **अक्षरजुळवणी**
  महेश कॉम्प्युटर सेंटर, आमगाव
- **मुद्रण स्थळ**
  नचिकेत प्रकाशन, नागपूर
  भ्रः ९२२५२१०१३० **email : nachiketprakashan@gmail.com**


- © **सर्व हक्क लेखकास्वाधीन**


- **मूल्य ₹ ५००/–**

THE PUBLICATION OF THIS BOOK HAS BEEN FINANCIALLY SUPPORTED BY THE INDIAN COUNCIL OFHISTORICAL RESEARCH. THE RESPONSIBILITY FOR. THE FACTS STATED OR OPINIONS EXPRESSED IS ENTIRELY OF THE AUTHOR AND NOT OF THE COUNCIL

# ❍ अनुक्रमणिका ❍

पृष्ठ क्रमांक

**लेखकाचे मनोगत** ८
**स्वप्नपूर्तीचे समाधान** ११
**संशोधकाची ओळख** १४
**प्रकरण १ ले : विषय प्रवेश** १६ ते २८
१. हा चिमणा बहादूर कोण? २. संशोधनाची आवश्यकता व स्वरुप ३. ग्रंथाचे प्रारुप ४. पारिभाषिक शब्दांची व्याख्या ४.१ स्वातंत्र्य लढा ४.२ परगणा ४.३ रेसिडेंसी (Residency) ४.४ कमाविसदार ४.५ शिकमी जमीनदारी (Shikmi Zamindari) ४.६ उत्तर-मध्ययुग ५. इतिहासाचे प्रमुख स्त्रोत ५.१ रेसिडेंटचा अहवाल ५.२ व्हॅलेंटाइनच्या आठवणी ५.३ बंदोबस्त अहवाल (इ.स.१८६७) ५.४ भंडारा जिल्हा गॅझेटिअर ५.५ दिवाणी दावा व वंशावली ५.६ आमगाव जमीनदारीची सनद (इ.स.१७९६) ५.७ किरणापूर जमीनदारीची सनद (इ.स.१८४६) ५.८ मौजा आमगावच्या मालकीसंबंधी दावा (इ.स.१८६६) ५.९ लिंगा जमीनदारीची सनद (इ.स.१८६७)-६. संशोधनाचे महत्त्व.
**प्रकरण २ रे : परगणे कामठा आणि कामठ्याचा परिचय** २९ ते ३८
१. कामठ्यामधला चिमणा बहादूर २. परगण्याचे स्थान व विस्तार ३. राजकारणाचे केंद्र 'कामठा' ४. शेती व उद्योग ५. निसर्गाचे वरदान ६. प्रदेशाचा पूर्वेतिहास ७. परगण्याची चतुर्सिमा ८. बहेकार घराण्याचा उदय ९. रघुजी करांडेचे वरदहस्त १०. भोसले राजवंशाशी संबंध ११. कवायती फौज १२. जमीनदारांचा क्षात्रतेज १३. बहेकार राजवटीचे महत्त्व.
**प्रकरण ३ रे : कटक विजय आणि कामठ्याचा भाग्योदय** ३९ ते ५०
१. जमीनदारीचा उदय केव्हा झाला? २. दशवार्षिक युद्ध (इ.स.१७४२-१७५१) ३. शिवभट साठेचे बंड (इ.स.१७६१-६४) ४. इंग्रजांविरुध्द अभियान (इ.स.१७७९) ५. हा वेगळा चिमणा बहादूर! ६. कामठा जमीनदारीसंबंधी लॉरेन्सचे वर्णन ७. मि. लॉरेन्सच्या वर्णनावरील आक्षेप ७.१ कालनिर्देशाकडे दुर्लक्ष ७.२ बेफिकिरवृत्तीचे दर्शन ७.३ चुकीच्या नावाची नोंद ७.४ ऐतिहासिक तथ्यांशी विसंगत ७.५ ऐकीव माहितीचा आधार ७.६ फंदफितुरीला झुकते माप ७.७ हे क्षणभंगूर स्वप्न नव्हे! ८. कामठा जमीनदारीसंबंधी प्रचलित मान्यता ९. कोलुबापूंच्या वंशावलीवर दृष्टिक्षेप १०. ऐतिहासिक घटनांचा मागोवा ११. निष्कर्ष (Conclusion).

**प्रकरण ४ थे : कोलुबापू : एक कर्तबगार जमीनदार** ५३ ते ६२
१. कामठा जमीनदारीचे संस्थापक २. जन्म आणि बालपण ३. व्यक्तिमत्त्वाची घडवणूक ४. दशवार्षिक युद्धात सहभाग ५. नागपूरला विजयोत्सवाचे आयोजन ६. सत्कार समारंभ ७. कामठा जमीनदारीची प्राप्ती (इ.स. १७५१) ८. जमीनदारवाडा गजबजला ९. अधिकार आणि कर्तव्याचे स्वरूप १०. आमगाव जमीनदारीची प्राप्ती (इ.स. १७५६) ११. कामठा जमीनदारीची क्षेत्रवाढ १२. शिकमी जमीनदारींचा उदय १३. वन्यप्रदेशाचा कायापालट १४. कामगिरीची तुलना १५. कामगिरीचे मूल्यमापन

**प्रकरण ५ वे : गोंदिबापू : एक सामर्थ्यशाली जमीनदार** ६३ ते ७२
१. नवा शासक २. सत्ताप्राप्तीचा निकष ३. त्रिवेणी संगमाचे मनोहारी दृश्य ४. प्रशासनाचे पुनर्संघटन ५. कामठ्याला किल्ल्याची निर्मिती ६. प्रसिद्ध 'तीन वास्तु' ७. लागवडीखालील क्षेत्रात वाढ ८. राजकीय स्वायत्तता ९. अर्थव्यवस्थेत सुधारणा १०. सीमा विवादात मध्यस्थी ११. उपकाराची परतफेड १२. बारा गावचा 'बारसा' १३. गोंदिबापूंचा 'गोंदिया' १४. गोंदियाच्या उत्कर्षाचा इतिहास १५. हाच खरा सुवर्णकाळ!

**प्रकरण ६ वे : चिमणा बहादूर : समग्र जीवन–चरित्र** ७३ ते ९३
१. ध्येयवादी चिमणा बहादूर २. जन्म आणि बालपण ३. कुशाग्र बुद्धीची चाहूल ४. स्वातंत्र्याचे मोल ५. शिवभक्तीचे संस्कार ६. आदर्शांचे बीजारोपण ७. शौर्यशाली खेळांचा अभ्यास ८. युद्धा विषयी आकर्षण ९. नागपूर दरबारात ओळख १०. चिमणा बहादूरचा उत्कर्ष ११. राजकीय प्रभावात वाढ १२. राज्यकारभार आणि विकासात सहभाग १३. चिमणा बहादूरचे व्यक्तिमत्व १४. वेशांतराचे कसब १५. वाघाशी झुंज १६. एक परिपूर्ण जमीनदार १७. राजकीय प्रगल्भता १८. प्रखर राजकीय निष्ठा १९. रेसिडेन्ट विरूद्ध चिमणा बहादूर २०. जमीनदार पदावर नियुक्ती २१. कामठा व यादवगडचे जमीनदार २२. किरणापूर जमीनदारीचा विषय? २३. पुढचा काळ आव्हानांचा!

**प्रकरण ७ वे: भारत आणि इंग्रजांचा साम्राज्यवाद** ९४ ते १०५
(इ.स. १७५१–१८१८)
१. भारतातील राजकारण २. मराठा साम्राज्याचे स्वरुप ३. इंग्रजांचा साम्राज्यवाद ४. भारताविषयी इंग्रजांचे धोरण ५. प्लासीची लढाई (इ.स.१७५७) ६. बक्सारची लढाई (इ.स.१७६४) ७. जानोजींचे चुकीचे धोरण ८.पानिपतचे तिसरे युद्ध (इ.स.१७६१) ९. इंग्रजांचे

पुण्यावर आक्रमण (इ.स.१७७९) १०. नाना फडणीसांची दूरदृष्टी ११. हेस्टिंग्जचे कारस्थान १२. इंग्रज–म्हैसूर संघर्ष १३. इंग्रजांचा राजकीय उत्कर्ष १४. भारतीय राजकारणात इंग्रजांचा हस्तक्षेप १५. मराठ्यांतील शत्रुत्व १६. दुसरे इंग्रज–मराठा युद्ध (इ.स.१८०३) १७. कटकवर इंग्रजांचा ताबा १८. भारताची राजकीय अवनती १९. तृतीय इंग्रज–मराठा युद्ध (इ.स.१८१७) २०. प्रथम स्वातंत्र्य युद्ध (इ.स.१८१८–१९) २१. युद्ध आणि स्वातंत्र्य युद्ध : भेद २२. राजकीय जागृतीची सुरुवात.

**प्रकरण ८ वे : नागपूर राज्यातील राजकीय घडामोडी** (इ.स.१८१६–१८१७) **१०६ ते १२२**

१. राजवाड्यातील सत्तासंघर्ष २. तैनाती फौजेचा तह (दि.२८ मे १८१६) ३. परसोजीचा मृत्यू (दि.१ फेब्रुवारी १८१७) ४.खडकीची लढाई (दि. ५ नोव्हें. १८१७) ५. वस्त्रग्रहण समारंभ (दि.२४ नोव्हेंबर १८१७) ६. नागपूरचे युद्ध (२५ नोव्हेंबर ते ३० डिसेंबर १८१७) ७. राजवाड्यावर युनियन जॅक (दि.३० डिसेंबर १८१७) ८. इंग्रज सरकारची दक्षता ९. नागपूरचा अपमानजनक तह (दि.६ जानेवारी १८१८) १०. राजवाड्यावर इंग्रजांचा पहारा ११. इंग्रजांविरुद्ध स्थानिक संघर्ष ११.१ नर्मदेकडील संघर्ष ११.२ श्रीनगरसाठी संघर्ष ११.३ शिवणी आणि वैरागडचा संघर्ष ११.४ भिरुडची लढाई ११.५ वऱ्हाडवर इंग्रजांचा अधिकार ११.६ मंडल्याकरिता संघर्ष ११.७ इंग्रजांचा चौरागडवर अधिकार ११.८ चंद्रपूरचा लढा ११.९ लांजीवर इंग्रजाचे अधिपत्य १२. पेशवा बाजीराव आणि आप्पासाहेब १३. स्वातंत्र्यासाठी आप्पासाहेबांची धडपड १४. कामठावासियांना 'संकटाची चाहूल'.

**प्रकरण ९ वे : इ.स.१८१८ चे प्रथम स्वातंत्र्य युद्ध** **१२३ ते १३४**

१.स्वातंत्र्य युद्धाचे स्वरुप २. स्वातंत्र्य युद्धाची कारणे २.१ नागपूरचे युद्ध २.२ सहकाऱ्यांची प्रेरणा २.३ गुलामगिरीविरुद्ध आक्रोश २.४ मराठ्यांची शौर्यशाली परंपरा २.५ आप्पासाहेबांचा स्वाभिमान २.६ प्रबळ इच्छाशक्ती ३. स्वातंत्र्य युद्धासाठी लष्करभरती ४. स्वातंत्र्य युद्धातील प्रमुख घटना ४.१ कर्नल स्पार्कवर विजय ४.२ इंग्रजविरोधी लाट ४.३ वैनगंगेचा पाणी खवळला ४.४ चिमणा बहादूरचे वराडवर आक्रमण ५. रक्तपाताला पुन: प्रारंभ.

**प्रकरण १० वे : स्वातंत्र्ययुद्धात चिमणा बहादूरची भूमिका** **१३५ ते १५१**

१. युद्धाची दुसरी आघाडी २. चिमणा बहादूरचे नेतृत्व ३. दुसऱ्या आघाडीकडील प्रमुख घटना ३.१ लांजी गदर (Lanji Revolt)

३.२ कॅप्टन गॉर्डनची नागपूरहून रवानगी ३.३ वैनगंगेकाठचा संघर्ष ३.४ नवरगावचे युद्ध ३.५ झिलमिलीची लढाई ३.६ कामठ्याचा रणसंग्राम ३.७ अंबागडवर इंग्रजांचा ताबा ३.८ पवनीचा लढा ३.९ स्वातंत्र्य लढा कोसळला ४. चिमणा बहादूरची हुलकावणी ५. चिमणा बहादूरची निर्भयता ६. चिमणा बहादूर: एक कर्मठ योद्धा ७. पराभवाची कारणे ८. कल्पनेपलिकडील साहस.

**प्रकरण ११ वे : युद्धोपरांत चिमणा बहादूर** **१५२ ते १६६**

१.कामठ्यात इंग्रजांची दहशत २. तलवारीच्या छायेत चिमणा बहादूर ३. 'पॅरोल' वर सुटका ४. इंग्रजांसमोरील तीन पर्याय ५. कॅप्टन विल्सनचा प्रस्ताव ६. परस्परविरोधी माहिती व तिचे परीक्षण ७. इंग्रजांची कूटनीती ८. कर्मठ योद्ध्याचा करुण अंत ९. 'उजेड' हरपला १०. कधी न विझणारी आग ११. 'त्यांच्या' इतिहासाचे मोल.

**प्रकरण १२ वे: भारतीय स्वातंत्र्यासाठी आप्पासाहेबांचे प्रयत्न** **१६७ ते १७५**

(इ.स.१८१९-४०)

१.आप्पासाहेबांना पकडण्यासाठी मोहीम २. आप्पासाहेबांचे उत्तरेकडे प्रयाण ३. इंग्रज विरुद्ध चैनशहाचा संघर्ष ४. चित्तु पेंढाऱ्याचा शेवट ५. अशिरगडला इंग्रजांचा वेढा ६. राष्ट्रोद्धारासाठी आप्पासाहेबांचे प्रयास ७. इ.स. १८१८ च्या युद्धामागील मनोभाव ८. अभिमानास्पद वारसा ९. विचारांचे बीजारोपण १०. दोन स्वातंत्र्ययुद्धांची तुलना १०.०१ स्वातंत्र्य युद्धातील साम्य १०.०२ स्वातंत्र्य युद्धातील भेद (अ) वेगवेगळे धोरण कारणीभूत (ब) तात्कालीक कारणासंबंधी भेद (क), नेतृत्वाच्या बाबतीत भिन्नता (ड) व्याप्तीसंबंधी तफावत (इ) लोकसहभागाविषयी अंतर ११. आप्पासाहेबांच्या प्रयत्नाचे मोल.

**प्रकरण १३ वे : चिमणा बहादूर : इतिहासात स्थान व महत्त्व** **१७६ ते १८१**

१. संशोधनाची फलश्रुती २. अद्वितीय जमीनदारी ३. लढ्याचा निर्णय पूर्णत: योग्य! ४. नियती जिंकली ५. चिमणा बहादूरचे वेगळेपण ६. पहिल्या प्रयत्नाचे मोल ७. वैनगंगेचा खरा सुपुत्र ८. 'त्यांच्या' शिवाय इतिहास अपूर्ण.

**प्रकरण १४ वे : परगणे कामठा : घटनाक्रम** **१८२ ते १८४**

**संदर्भ ग्रंथ (Reference Books)** **१८५**

**परिशिष्ट (Appendix)** **१८६**

१. आलेख : नागपूरकर भोसले आणि त्यांचा शासनकाळ

२. बहेकार घराण्याची मूळ वंशावली

३. गोंदिया, बालाघाट व भंडारा जिल्ह्याचा नकाशा
४. आधुनिक महाराष्ट्र व मध्यप्रदेशाचा नकाशा
५. प्रस्तुत इतिहासाशी संबंधित किल्ले आणि अन्य वास्तू
६. चिमणा बहादूरवरील एक जुनी दुर्मिळ कविता
   -भवानीशंकर पंडीत.
७. Extract from map of 1788 A.D.- Showing
   Coomtha (Kamtha) and surrounding villages.
८. बहेकार घराणे- रिसामा (आमगाव) शाखेची अलीकडील
   वंशावली

**महत्त्व इतिहासलेखनाचे**

**यु**ध्दाची कारणे पुढील पिढीला माहित व्हावीत हे इतिहासलेखनाचे उद्दिष्ट आहे. गतकालीन घटनांची नोंद पुढील पिढ्यांसाठी करुन ठेवणे हे इतिहासाचे कार्य आहे. इतिहासलेखन करतांना गतकालीन संपूर्ण मानवी जीवनाची रुपरेखा प्रस्तुत करणे हे इतिहासकाराचे प्रमुख कर्तव्य होय.

....... हेरोडोटस
(इ.स.पूर्व४८४-४३०)

**ग**तकाळात घडलेल्या महत्त्वाच्या घटनांची माहिती पुढील पिढीला व्हावी व मुत्सद्यांना मार्गदर्शन मिळावे, हे इतिहासलेखनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. मानवी स्वभाव फारसा बदलत नाही, त्यामुळे भविष्यकाळाविषयी अंदाज वर्तविण्यासाठी गतकाळाची माहिती निश्चितच उपयोगी पडते.

.......थ्यूसिडाईड्स
(इ.स.पूर्व ४६०-३९६)

**इ**तिहासाला शैक्षणिक मूल्य असते. इतिहास नीतिमूल्यांची शिकवण देतो. गतकाळाच्या ज्ञानातून माणसाला वर्तमानाची योग्य दिशा मिळते. इतिहासातून राजकीय जीवनासाठी निर्दोष प्रशिक्षण प्राप्त होते.

.......पॉलीबियस
(इ.स.पूर्व २०८-१२६)

## लेखकाचे मनोगत

इतिहास हा प्रेरणांचा विषय आहे. प्रत्येक समाज व राष्ट्र हा आपल्या गौरवशाली इतिहासातून प्रेरणा घेवून, स्वर्णिम भविष्य घडविण्यासाठी सातत्याने धडपडत असतो. जो समाज आपला गौरवशाली इतिहास विसरतो, तो आपले भविष्य घडवू शकत नाही. याची जाणीव प्रत्येक सुशिक्षित समाजाला असल्यामुळे तो आपला इतिहास जीवंत करण्याचा, उपलब्ध इतिहासाचे जतन करण्याचा आणि नव्या पिढीला इतिहासाचा परिचय घडवून देण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करीत असतो. यातून मानवी जीवनात असलेले इतिहासाचे महत्त्व अधोरेखित होते.

कार्लाइल म्हणतो की, ''जगाचा इतिहास म्हणजे कर्तबगार पुरुषांची चरित्रेच असतात.'' या दृष्टीने विचार केला तर बखरींत आणि सनावळीत अनेक चरित्रे बिचारे मूक आणि निर्वासित जीवन जगत असतात. त्यातूनच कुठल्या तरी नव्या पिढीच्या जीवनांना सहसंवेदना लाभून पुनःर्जन्म मिळू शकतो. यासाठी ती चरित्रे जीवंत करावी लागतात. माणसे जीवंत झाली की, इतिहास जीवंत होतो आणि मानवी जीवनाच्या मर्यादा स्वच्छ व स्पष्ट होतात. मनुष्य स्वार्थासाठी एखादी गोष्ट करतो, तेव्हा त्याच्या वागण्यावर काही मर्यादा आपोआपच पडतात. परंतु एकदा का देशप्रेमाची, समाजहिताची, त्यागाची वगैरे भूमिका स्वीकारली की त्याच्या कृतीचे मूल्यमापन करणे अवघड होवू लागते. देशभक्त म्हणवणारा अथवा राजकीय परिवर्तनासाठी तत्पर झालेला मानव जेव्हा अहिंसक वा हिंसक मार्गाने कार्यप्रवण होतो, तेव्हा त्याच्या परिणामांना पारावार राहत नाही. अठराशे अठरा मध्ये इंग्रजांच्या गुलामीविरुध्द लढा उभारुन, प्रत्यक्ष आपल्या कृतीतून भारतीय समाजाला, स्वातंत्र्याचा महामंत्र देणारा चिमणा बहादूर हा असाच एक ऐतिहासिक पुरुष आहे.

चिमणा बहादूरसंबंधी माहिती समकालीन इंग्रज अधिकाऱ्यांनी लिहून ठेवलेल्या कागदपत्रात बंदिस्त असून ही माहिती अत्यंत त्रोटक, तुटक व अगम्य स्वरुपात उपलब्ध असल्यामुळे त्यातून चिमणा बहादूरला जाणून घेण्याची जिज्ञासा असणाऱ्यांना संतुष्टी लाभत नाही. त्यांच्यासंबंधी माहिती उपलब्ध होवू शकेल असे अस्सल कागदपत्रही क्वचितच शिल्लक असून तेही कालप्रवाहात नाहीसे होतील. काळ असाच पुढे सरकत गेला तर इतिहासाच्या या अमूल्य वारशापासून,

त्यातून मिळणाऱ्या संभाव्य प्रेरणा व गौरवापासून नवी पिढी वंचित राहील, याची प्रस्तुत लेखकाला प्रकर्षाने जाणीव झाली. त्यातून, चिमणा बहादूरविषयक संशोधनाची सुरुवात झाली व फलश्रुती स्वरुपात प्रस्तुत ग्रंथ साकारले आहे.

चिमणा बहादूर विषयी माहिती इंग्रज अधिकाऱ्यांनी लिहून ठेवलेल्या नोंदीत उपलब्ध आहे. पण त्याकाळी इंग्रजांमध्ये वंशश्रेष्ठत्वाचा भाव व्याप्त असल्यामुळे त्यांच्या लिखाणात व्यक्तिनिष्ठता असणे स्वाभाविक आहे. ही बाब लक्षात घेवून, त्यांनी लिहून ठेवलेल्या माहितीचे टीकात्मक परीक्षण करुन, लेखकाने चिमणा बहादूरसंबंधी घटनांचे स्वयंप्रज्ञेने विश्लेषण केलेले आहे. त्यामुळे या ग्रंथाला समीक्षात्मक ग्रंथाचे स्वरुप प्राप्त झालेले आहे.

वर्तमान महाराष्ट्रातील अतिपूर्वेकडील, सातपुडा पर्वतराजींनी नटलेल्या परिसरात असलेल्या कामठा येथील मराठाकालीन प्रसिद्ध जमीनदार 'राजे चिमणा बहादूर' यांचा इतिहास अंधारातून प्रकाशात आणणे, हे या ग्रंथाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. परंतु या ग्रंथात मध्ययुगीन भारत, परगणे कामठा आणि १८१८ च्या पहिल्या स्वातंत्र्य लढ्याचे विस्तृत चित्रण, चिमणा बहादूरच्या कृतीचा उलगडा होण्यासाठी प्रस्तुत केले आहे.

हे ग्रंथ राष्ट्रप्रेमामुळे माझ्या लेखणीतून साकारले आहे. या ग्रंथाच्या माध्यमाने १८१८ च्या स्वातंत्र्य लढ्याचे कर्णधार चिमणा बहादूर यांचा, काळाच्या पडद्याआड मूक व निर्वासीत झालेला इतिहास समाजासमोर नव्या जोमाने उभा झालेला आहे, असे मला वाटत असून यातून चिमणा बहादूरचे चरित्र, अद्‌भुत साहस आणि त्यांच्या दूरदृष्टीची समग्र जाणीव वाचकांना होईल, असा विश्वास आहे. चिमणा बहादूरचा इतिहास म्हणजे मराठ्यांच्या इतिहासातील एक धगधगते पर्व असून काळाच्या ओघात विलुप्त होत चाललेल्या या पर्वाला उजाळा देण्याचे अभूतपूर्व कार्य या ग्रंथाच्या माध्यमातून झालेले आहे. प्रस्तुत ग्रंथ म्हणजे समग्र भारताच्या इतिहासातील एक सोनेरी पान असून भारतवर्षाच्या इतिहासाला एक मौलिक योगदान आहे.

चिमणा बहादूर आणि कामठा परगण्यावरील संशोधनासाठी प्रदत्त (Data) संकलन करतांना श्री. विजय बाहेकर, संयोजक-वीर राजे चिमणा बहादूर फाऊंडेशन, गोंदिया यांचे फार सहकार्य लाभले. ते स्वयं चिमणा बहादूर यांच्या वंशावलीतील असून प्रदत्त संकलनाच्या कार्यात त्यांनी उत्स्फूर्त सहकार्य दिले. श्री. मदनभाऊ बहेकार (मार्तंडराव जमीनदार यांची पत्नी सरस्वतीबाई बहेकार यांचे उत्तराधिकारी)

हेही चिमणा बहादूर यांच्या घराण्यातील असून त्यांनी आमगाव जमीनदार वाड्यातील सर्व जुने कागदपत्र अवलोकनासाठी मनमोकळेपणाने उपलब्ध करुन दिले. या कागदपत्रातून बहेकार राजवंश व कामठा परगण्याचा समग्र इतिहास समजण्यास मोलाची मदत झाली. प्राचार्य कमलबापू बहेकार, विद्या निकेतन ज्युनि. कॉलेज, आमगाव आणि श्री. के.बी.चव्हाण माजी नगराध्यक्ष, गोंदिया यांनी तथ्य संकलनासाठी लांजी, कामठा, हट्टा, लिंगा, किरणापूर, सानगडी, रामटेक इ. गावांच्या घडलेल्या प्रवाशाच्या काळात, आपल्या व्यस्त जीवनातून वेळ काढून पूर्ण साथ दिली. माहिती संकलनात कु. रीना बघेले (युपीएससी स्कॉलर) पुणे, यांनी केलेल्या अमूल्य सहकार्याचाही आवर्जून उल्लेख करणे आवश्यक आहे. माझ्या घनिष्ठ संबंधातील डॉ. प्रभाकर गद्रे (डी.लिट्), डॉ. हरिश्चंद्र बोरकर (पीएच.डी.), डॉ. भाग्येश्वर बघेले (एम.बी.बी.एस.), लखनसिंह कटरे (पूर्व डी.डी.आर.), प्राचार्य श्यामराव बहेकार आणि संतोष पुंडकर यांच्या या ग्रंथाविषयीच्या सकारात्मक प्रतिक्रियेतून मिळालेली उर्जाही, उत्स्फूर्तपणे ग्रंथ प्रकाशित करण्यास साहाय्यक ठरली. याप्रसंगी माझी आई स्व. हिरकनबाई आणि ज्येष्ठ बंधू स्व.लिखीरामजी पटले, ज्यांनी मला घडविण्यासाठी अपार कष्ट घेतले त्यांची आठवण मनात दाटून येणे स्वाभाविक आहे. माझी पत्नी सूर्यवती उर्फ पामेश्वरी ही स्वत: कष्ट सोसून मला लेखनकार्याची संधी उपलब्ध करुन देते. तिचा समर्पणभाव हीच माझी ताकद असून तिच्याप्रतीदेखील मी कृतज्ञ आहे.

संशोधनासाठी माहिती संकलित करण्याच्या कार्यात ज्यांचे-ज्यांचे हार्दिक सहकार्य लाभले त्या सर्वांचे, प्रस्तुत लेखक मन:पूर्वक अभिनंदन करतो व सर्वांप्रती कृतज्ञ आहे. या कार्यात प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष सहकार्य करुनही ज्यांचा नामोल्लेख या ठिकाणी झालेला नाही, त्यासाठी क्षमस्व.

**इतिहासकार/लेखक- प्राचार्य ओ. सी. पटले**

**गुरुवार २९.५.२०१४**
**विद्यानगरी, आमगाव (महाराष्ट्र)**
**संपर्क- ९४२२३४८६१२**

## स्वप्नपूर्तीचे समाधान

स्वातंत्र्य, स्वाभिमान व स्वराज्य या बाबींना मानवी जीवनात मोलाचे स्थान आहे. म्हणून इंग्रजांनी भारतावर गुलामगिरी लादण्याचा प्रयत्न सुरु करताच, त्यांच्याविरुध्द येथे संघर्ष सुरु झाला. या संघर्षाचा इतिहास अद्वितीय साहस करणाऱ्या शूरवीरांच्या पराक्रमाने व्याप्त आहे. चिमणा बहादूर हे अशाच एका शूरवीराचे नाव आहे. इंग्रजांनी नागपूर राज्यावर अधिपत्य प्रस्थापित केल्यामुळे इ.स. १८१८ मध्ये आप्पासाहेब भोसले यांनी पचमढीला केंद्र बनवून स्वातंत्र्य लढा उभारला. त्याच प्रसंगी चिमणा बहादूरने वैनगंगेकडील प्रदेशात स्वातंत्र्य लढा उभारुन, इंग्रजांविरुध्द युध्द केले. यावेळी इंग्रजांविरुध्द लढण्याचे असामान्य साहस करुन चिमणा बहादूर यांनी ''भारत हा सध्या विखंडित व निद्रावस्थेत असला, तरी त्याने सत्त्व गमावलेले नाही, त्याच्यात अजूनही प्राण शिल्लक आहे.'' ही बाब इंग्रजांच्या निदर्शनात आणून दिली व भारतीय शूरवीरांच्या परंपरेत आपले नाव कोरले आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात पराक्रमी पूर्वजांच्या इतिहासाला उजाळा देण्याच्या कार्याला सुरुवात झाली. पण या श्रृंखलेत चिमणा बहादूरसारख्या अनेक शूरवीरांचा इतिहास दुर्लक्षितच राहिला. अलीकडे काही वर्षापूर्वी घनश्याम मेहता, मोरगाव अर्जुनी यांनी वर्तमानपत्रांच्या माध्यमातून त्यांच्या इतिहासाला समोर आणण्याच्या दिशेने थोडेफार कार्य केले. नंतर डॉ. प्रभाकर गद्रे (डी.लिट्.), आमगाव यांनी देखील कामठा जमीनदारी व चिमणा बहादूर संबंधी लेखन केले. पण हे सर्व प्रयत्न जुजबी स्वरुपाचे होते. डॉ. गद्रे यांच्या हाताशी संशोधनात्मक अनेक विषय आहेत. त्यामुळे ते या विषयाच्या संशोधनाकडे लक्ष केंद्रित करु शकले नाही, याची आम्हाला जाणीव आहे. तथापि, हे सर्व घडत असतांना, ''स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाचे बलिदान करणाऱ्या चिमणा बहादूरसारख्या शौर्यशाली व्यक्तीचा इतिहास समर्थपणे समाजासमोर मांडणे, ही इतिहासाचे अभ्यासक या नात्याने आपली नैतिक जबाबदारी आहे'', ही बाब प्राचार्य ओ.सी. पटले यांनी ओळखली व या विषयात संशोधन करण्याचे मानस बनविले. त्यांनी अत्यंत कष्टाने, कामठा परगण्याच्या इतिहासविषयक दस्तऐवजांचा शोध घेत त्यांचा आणि समकालीन इंग्रज अधिकाऱ्यांनी लिहून ठेवलेल्या बाबींचा तुलनात्मक व चिकित्सकपणे अभ्यास करुन, तर्कशुध्दपद्धतीने खंडन-मंडन करीत विषयाची मांडणी करुन

मध्ययुगीन परगणे कामठा व चिमणा बहादूरचा खरा इतिहास उजेडात आणलेला आहे. त्यातून, सरांचा संशोधनविषयक प्रदीर्घ अनुभव प्रभावीपणे झळकतो. त्यांनी आपले उभे आयुष्य शिक्षण, महाकवी भवभूति आणि भवभूतींचे जन्मस्थान पद्मपूर याविषयीच्या संशोधनात घालविले असून त्यांचे संशोधनात्मक लेख, प्राचीन तीर्थ जीर्णोध्दार (मासिक पत्रिका, जैन महासभा, लखनौ), जैन बालादर्श (मासिक पत्रिका, अलाहाबाद), अमर जगत् (साप्ताहिक, आगरा), शिक्षण संक्रमण (मासिक, पुणे), शिक्षण समीक्षा (त्रैमासिक, नागपूर) आणि नागपूर येथून प्रकाशित होणाऱ्या सर्व महत्त्वपूर्ण वर्तमानपत्रांमध्ये प्रकाशित होत आलेले आहेत. त्यांच्या या तपश्येचा तेज चिमणा बहादूरसंबंधीच्या या ग्रंथात जागोजागी जाणवतो.

प्रस्तुत ग्रंथाची निर्मिती करण्यासाठी प्राचार्य ओ.सी. पटले यांनी सातत्याने सहा वर्षे संशोधन, चिंतन व मनन केले. त्यांनी या कालावधीत इतिहासाचे विपुल दाखले जमा केले. चिमणा बहादूरच्या घराण्यातील आणि त्यांच्या कर्मभूमीच्या परिसरातील अनेक प्रबुध्द लोकांच्या व सामान्य व्यक्तींच्या मुलाखती घेतल्या. संबंधित अनेक ग्रंथांचा अभ्यास केला. अनेक मान्यवर अभ्यासक आणि इतिहास संशोधकांशी याविषयी चर्चा केली. अंतत: त्यांच्या स्वयंप्रज्ञेतून व अथक परिश्रमातून या ग्रंथाची निर्मिती झालेली आहे. ग्रंथ निर्मितीचे श्रेय सर्वस्वी त्यांनाच आहे. त्यांच्या या सर्व प्रयत्नांचा मी साक्षी असून, या निमित्ताने त्यांच्यासोबत घडलेला प्रवास हा माझ्या जीवनातील एक विलक्षण अनुभव होता. वीर राजे चिमणा बहादूर फाऊंडेशनने इ.स.२००७ पासून या वीर पुरुषाची जयंती व बलिदान दिन संपन्न करणे प्रारंभ केले आहे. त्यावेळेपासूनच या संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी चिमणा बहादूरवरील ग्रंथ साकार व्हावे, असे स्वप्न पाहिले होते. आदरणीय श्री. ओ.सी.पटले यांच्या अदम्य इच्छाशक्तीतून हे स्वप्न आज या महान ग्रंथाच्या स्वरुपात साकारले आहे.

या सुमारे दोनशे पानांच्या ग्रंथामध्ये इ.स. १८१८ च्या स्वातंत्र्य लढ्याचे समग्र चित्र आणि चरित्र स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच, यात चिमणा बहादूर यांच्या जीवनाचा संपूर्ण आलेख मांडण्यात आलेला आहे. शिवाय, परगणे कामठ्याचे संस्थापक कोलुबापू आणि मराठाकालीन सुप्रसिध्द जमीनदार गोंदिबापू यांच्या समग्र कार्याचा, आणि अनेक बारकावे मांडत बहेकार राजवंशाचा परिपूर्ण इतिहास या ग्रंथातून समोर आणला आहे. बालाघाट व भंडारा जिल्हा गॅझेटिअरमध्ये

उपलब्ध असलेला त्यांचा त्रोटक इतिहास वाचून, मनामध्ये त्याविषयी अतृप्तीचा भाव उत्पन्न होत असे. लिखीत स्वरुपातील वर्णन आणि मौखिक स्वरुपात उपलब्ध माहिती यात तारतम्य जाणवत नसल्यामुळे मन क्षुधाक्रांत होत असे आणि ते एका अनाकलनीय असंतोषाने व्यापून जात असे. मनाच्या अशा विषन्न अवस्थेत, जिज्ञासापूर्तीसाठी तळमळ उत्पन्न होत असे. प्रस्तुत ग्रंथ हे दर्जेदार, राष्ट्राचा अभिमान निर्माण करणारे आणि चिमणा बहादूरच्या इतिहासाविषयी मनात उत्पन्न होणाऱ्या जिज्ञासेचे पूर्ण समाधान करणारे असून, गमावलेली अमूल्य संपदा पुन्हा गवसल्यासारखी संतुष्टी देणारे आहे. समाजापासून हरपलेला एक अभिमानास्पद वारसा या ग्रंथाने आज सर्वांना मिळवून दिलेला आहे. हे ग्रंथ निश्चितपणे गौरवास्पद आहे, याचा याठिकाणी मी आवर्जून उल्लेख करीत आहे. तद्वतच, या विषयावर आणखी संशोधन करण्यासाठी पुढे कोणी प्रयत्न केले तर आमची संस्था त्यांचे स्वागत करेल हेही मी या ठिकाणी विनम्रपणे नमूद करीत आहे.

**विजय बाहेकर**
संयोजक
वीर राजे चिमणा बहादूर फाऊंडेशन, गोंदिया
अध्यक्ष
श्री गणेश ग्रामीण विकास शिक्षण संस्था, गोंदिया

■ ■ ■

## संशोधकाची ओळख

| | | |
|---|---|---|
| १. नाव | – | ओंकारलाल चैतराम पटले |
| २. जन्मदिनांक | – | १० फेब्रुवारी १९४६ |
| ३. जन्मगाव | – | मोहाडी, ता. गोरेगाव, जि. गोंदिया (महाराष्ट्र) |
| ४. कर्मभूमी | – | आमगाव, ता. आमगाव, जि. गोंदिया (महाराष्ट्र) |
| ५. शैक्षणिक योग्यता | – | राज्यशास्त्र, इतिहास व शिक्षण या विषयात क्रमशः १९७१,१९७३, १९७५ मध्ये नागपूर विद्यापीठाद्वारे पदव्युत्तर पदवी प्राप्त. आक्टोबर १९८९ मध्ये नागपूर विद्यापीठातून दुसऱ्यांदा दिलेल्या राज्यशास्त्र या विषयाच्या पदव्युत्तर परीक्षेत गुणानुक्रमे प्रथम स्थान (युनिव्हर्सिटी टॉपर) प्राप्त. |
| ६. व्यावसायिक अनुभव | – | कला व शिक्षण महाविद्यालयात अध्यापनाचा प्रदीर्घ अनुभव, शिक्षण महाविद्यालयात प्राचार्य या नात्याने निरंतर आठ वर्षे व्यवस्थापनाचा अनुभव. |
| ७. प्रकाशित ग्रंथ | – | भवभूति, प्रतिबिंब आणि मध्ययुगीन कामठा परगण्यावरील ऐतिहासिक संशोधन–वीर राजे चिमणा बहादूर असे एकूण तीन ग्रंथ. |
| ८. अनुवादित ग्रंथ | – | महर्षी जैमिनी रचित आणि रामगोपालजी 'बेदिल' यांच्याद्वार प्रकाशित 'अग्रभागवत्' या प्राचीन संस्कृत ग्रंथाचे मराठीत भाषांतर. |
| ९. संशोधनात्मक लेख | – | प्राचीन तीर्थ संरक्षिणी, जैन बालादर्श आणि अमर जगत् या क्रमशः लखनौ, अलाहाबाद व आगरा येथील पत्र–पत्रिकेत महाकवी भवभूतीवरील लेखांचे प्रकाशन. पुणे आणि नागपूर येथून प्रकाशित होणाऱ्या क्रमशः शिक्षण संक्रमण व शिक्षण समीक्षा या मासिकांत शिक्षणावरील लेखांचे प्रकाशन. |
| १०. गीत रचना | – | कविकुलगुरु कालिदास आणि करुणरसाचे आचार्य महाकवी भवभूतीवरील ऐतिहासिक गीतांच्या ऑडिओ सीडींचे प्रकाशन. विवेकानंद आणि रामकृष्ण परमहंस यांच्यावरील गीतांचे केंद्र भारती (जोधपूर) आणि विवेक–ज्योति (रायपूर) या मासिकांतून प्रकाशन. |
| ११. दूरदर्शनवरील मुलाखती | – | इ.टी.व्ही.वरील सह्यांद्री उपवाहिनी आणि रायपूर दूरदर्शनवरुन महाकवी भवभूति संदर्भात मुलाखतींचे प्रसारण. |

१२. सामाजिक कार्य – भवभूति रिसर्च अकॅडमि, आमगावच्या अध्यक्ष पदावर कार्यरत रजि. क्र. महा.एफ ५०५/२०११(गों), वीर राजे चिमणा बहादूर फाऊंडेशन,गोंदियाचे सक्रिय सदस्य

१३. सन्मान – स्वामी विवेकानंद बहुउद्देशीय शिक्षण संस्था, गोरठा (आमगाव) द्वारे 'इतिहास रत्न' पुरस्काराने सन्मानित.

१४. आगामी प्रकाशन – **दिग्विजय** (स्वामी विवेकानंद यांच्या समग्र जीवन चरित्रावर आधारित अभूतपूर्व महाकाव्य, हिन्दी भाषेत).

– **मानव-निर्माण गीत**(Man-making inspiration songs) (रामकृष्ण परमहंस, करुणामयी माँ सारदा, स्वामी विवेकानंद आणि भगिनी निवेदिता यांच्यावर आधारित सुरेख, सारगर्भित आणि दर्जेदार अशा पन्नास गीतांचा संग्रह, हिन्दी भाषेत).

– सम्राट विक्रमादित्य प्रथम व महाराजा भोज यांच्या विशेष संदर्भात मालव्याहूत गोंडवानाकडे झालेल्या पवार समाजाच्या स्थानांतरणावर (Migration from 11th to 18th century) आधारित संशोधनात्मक ग्रंथ ''**महाराजा भोज**'' (हिन्दी भाषेत)

**हे ग्रंथ राष्ट्रप्रेमामुळे माझ्या लेखणीतून साकारले आहे.**
**या ग्रंथाच्या माध्यमाने**
**१८१८ च्या स्वातंत्र्य लढ्याचे कर्णधार चिमणा बहादूर यांचा, काळाच्या पडद्याआड मूक व निर्वासित झालेला इतिहास समाजासमोर नव्या जोमाने उभा झालेला आहे.**

**■ संशोधक – ओ. सी. पटले**

■ ■ ■

## १. विषय प्रवेश

### १. हा चिमणा बहादूर कोण ?

**म**ध्ययुगीन भारतातील मराठ्यांचा, राजपुतांचा आणि शिक्खांचा इतिहास हा तेजस्वी, ओजस्वी आणि पुरुषार्थपूर्ण असा आहे. शिवाजी महाराजांचा पराक्रम, महाराणा प्रताप यांनी आपल्या अंतिम श्वासापर्यंत मेवाळच्या स्वातंत्र्यासाठी केलेले पुरुषार्थपूर्ण प्रयत्न आणि गुरु गोविंदसिंग यांनी स्वधर्माच्या रक्षणासाठी केलेले त्याग आणि बलिदान यांना जगाच्या इतिहासात तोड नाही. भारतातील हा संपूर्ण इतिहास चैतन्यप्रदायक, स्फूर्तिदायक आणि प्रेरणास्पद असा आहे. परगणा कामठ्याचे जमीनदार वीर राजे चिमणा बहादूर हे याच तेजस्वी परंपरेचे पाईक होते.

इंग्रज हे भारतात साम्राज्यविस्तारासाठी उत्साहाने प्रयत्नशील असतांना चिमणा बहादूरच्या नेतृत्वाखाली वर्तमान मध्यप्रदेशातील लांजी येथे इ.स. १८१८ मध्ये विद्रोह घडून आला. हा विद्रोह लांजी गदर (Lanji Revolt) म्हणून प्रसिध्द आहे. या विद्रोहाच्या वेळी चिमणा बहादूरने लांजीच्या कमाविसदाराला बंदी बनविले, त्याच्या चमूतील काही लोकांना धराशाही केले व आप्पासाहेबांनी इंग्रजांविरुध्द सुरु केलेल्या स्वातंत्र्य लढयात महत्त्वपूर्ण योगदान दिले. पण, इतिहासाचा हा एक महत्त्वपूर्ण पैलू फार कमी लोकांना माहित असून इतिहासात नमूद होण्यापासून वंचित राहिलेला आहे. इ.स. १८५७ मध्ये इंग्रजी शासनाविरुध्द पहिल्यांदा बंड पुकारणाऱ्या मंगल पांडे यांची अवज्ञा तर इतिहासात नमूद आहे. पण त्यांच्याही अनेक वर्षापूर्वी इ.स. १८१८ मध्ये चिमणा बहादूर यांनी इंग्रजी शासनाची खुलेआम अवज्ञा करुन त्यांच्या विरुध्द स्वातंत्र्य लढा पुकारला होता याची नोंद भारताच्या इतिहासविषयक ग्रंथात कुठेही न आढळणे, ही बाब प्रत्येक सूज्ञ भारतीय व्यक्तीच्या मनाला व्यथित करणारी अशी आहे.

### २. संशोधनाची आवश्यकता व स्वरुप

चिमणा बहादूरला पूर्वेकडील लांजीच्या डोंगरी भागापासून पश्चिमेकडील वैनगंगानदीपर्यंत सुमारे ५० मैल रुंद आणि उत्तरेकडील शिवणी-छपाऱ्याच्या कटंगी परगण्यापासून दक्षिणेकडील प्रतापगडपर्यंत सुमारे ८० मैल लांब एवढ्या व्यापक प्रदेशातील सर्व जमीनदार आपला प्रमुख मानत असत, आणि ते सर्व

जमीनदार इ.स.१८१८ च्या स्वातंत्र्य लढ्याच्या प्रसंगी चिमणा बहादूरच्या नेतृत्वाखाली संघटित झालेले होते. त्यांचा हा लढा, यावर्षी आप्पासाहेब भोसले यांनी पचमढीच्या डोंगरी भागात आश्रय घेवून इंग्रजांविरुध्द उभारलेल्या स्वातंत्र्य लढ्याचाच अभिन्न अंग असून या लढ्याच्या प्रसंगी चिमणा बहादूर यांनी आपले सर्वस्व पणाला लावले. असे असूनही चिमणा बहादूरसारख्या शौर्यशाली व्यक्तीचा संपूर्ण इतिहास आजपर्यंत दुर्लक्षित व उपेक्षित राहिलेला आहे, ही बाब इतिहासकार व संशोधकांच्या जागरुकतेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी अशी आहे. अलीकडे आप्पासाहेबांच्या इतिहासावर काही संशोधकांनी काम केलेले आहे. त्यामुळे काळाच्या पडद्याआड अदृश्य झालेला आप्पासाहेबांचा खरा इतिहास उजेडात आलेला आहे. पण, या संशोधकांनी आपल्या प्रबंधात चिमणा बहादूरच्या इतिहासालाच नव्हे तर त्यांच्या नावालाही स्पर्श केलेला नाही. त्यामुळे चिमणा बहादूरचा खरा इतिहास काळाच्या पडद्याआड दडलेलाच राहिला. याची खंत मनात वाटू लागली आणि त्यातून प्रस्तुत लेखकाच्या मनात चिमणा बहादूरसंबंधी संशोधनाचा विचार उद्‌भवू लागला.

चिमणा बहादूर हे इ.स. १८१८ च्या स्वातंत्र्य लढ्यात आप्पासाहेबांचे सर्वात प्रबळ सहकारी असून ते या लढ्याचे एक प्रमुख कर्णधार होते. आप्पासाहेबांनी पचमढीचे डोंगर आणि लांजी हे लढ्याचे दोन केंद्र बनविले होते. पचमढीकडील भागात स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्व स्वयं आप्पासाहेब भोसले यांनी केले. पचमढीच्या दक्षिण-पूर्वेकडील लांजी-कामठा या भागात स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्व चिमणा बहादूर यांनी केले. अत: इंग्रज विरुध्द चिमणा बहादूरचा लढा हा प्रामुख्याने गोंदिया, भंडारा व बालाघाट जिल्ह्यातील भूमीत लढला गेला. म्हणून या जिल्ह्यातील लोक चिमणा बहादूरच्या पावन स्मृतीने आपल्या अंतर्मनात गौरव अनुभव करतात. या तिन्ही जिल्ह्यात प्रचलित असलेल्या वृत्तपत्रांमध्ये यदा-कदा चिमणा बहादूरवर लिहिलेले लेख प्रकाशित होतात. पण, हे लेख संशोधनात्मक अथवा स्वतंत्र चिंतन-मनन यातून साकारलेले नसतात. हे सर्व लेख भंडारा व बालाघाट जिल्हा गॅझेटिअरमध्ये इंग्रज विरुध्द चिमणा बहादूरच्या लढ्यासंबंधी उपलब्ध माहितीपुरते मर्यादित असतात. काही असो, पण या धडपडीतून चिमणा बहादूरच्या इतिहासाचा प्रचार-प्रसार व्हावा, त्यांचा इतिहास जनतेला कळावा आणि त्यांच्या पावन स्मृती जनमानसात जोपासल्या जाव्यात हा भाव समाजातील प्रबुध्द लोकांत व्याप्त आहे, याची प्रकर्षाने अनुभूती होते. बालाघाट येथील

बिपिन बिहारी शांडिल्य यांनी तर ''वीर चिमनाजी कब मिलेगी मुकम्मल पहचान''[1] असा एक लेख लिहून या शीर्षकातून जनमानसात व्यापून असलेला हा भाव फारच मार्मिकपणे अभिव्यक्त केला होता. मागील पाच-सात वर्षापासून वारंवार अभिव्यक्त होणाऱ्या अशा जनभावनेतून चिमणा बहादूरच्या इतिहासासंबंधी संशोधन होणे ही वर्तमान काळाची एक महत्त्वपूर्ण गरज आहे, याची सुस्पष्ट जाणीव होते. ही अनुभूती अथवा जाणीवदेखील प्रस्तुत संशोधनाला आणि इतिहास ग्रंथ साकारण्यास कारणीभूत आहे.

इंग्रज विरुध्द आप्पासाहेब यांच्यात घडून आलेल्या युध्दासंबंधी रियासतकार गो.स.सरदेसाई (रियासत, उत्तर विभाग ३) म्हणतात- ''त्या धामधुमीच्या काळाचा सगळा इतिहास आपणास नवीन बनवायचा आहे. तो लिहिला जाईल तेव्हा आप्पासाहेबांसारख्या कित्येक बाणेदार व्यक्ती आपणास सापडतील, मात्र हे त्यांचे अद्भुत चरित्र बारीक तपशिलांनी सजवून राष्ट्रप्रेमाच्या उठावदार वृत्तीने लिहिले गेले पाहिजे.'' रियासतकारांच्या या विधानाने प्रस्तुत संशोधकाच्या डोळ्यात जळजळीत अंजन घातल्यासारखे झाले, विधान हृदयात कोरले गेले आणि त्याच क्षणी स्पष्टपणे कर्तव्यबोध घडून आले.

उपरोक्त विविध कारणांमुळे चिमणा बहादूर हे ज्या क्षेत्रात होवून गेले तीच आपली कर्मभूमी असल्यामुळे त्यांच्याविषयक संशोधनाची जबाबदारी समर्थपणे पेलणे हे आपले सामाजिक आणि राष्ट्रीय दायित्व आहे, असे प्रस्तुत लेखकाला वाटू लागले. सुरुवात केलेल्या संशोधनात गती येताच संशोधन विषयाचा शीर्षक मनात सुस्पष्ट आकार घेवू लागला. चिमणा बहादूरचा उदय कसा झाला, हे वाचकांना सहजपणे समजावे यासाठी त्यांच्या उदयाच्या पार्श्वभूमीचा किंबहुना परगणा कामठ्याचा इतिहास देखील संशोधनाच्या आवाक्यात अंतर्भूत करणे आवश्यक झाले. त्यामुळे प्रस्तुत ग्रंथासाठी- ''उत्तर-मध्ययुगीन कामठा परगण्यावरील ऐतिहासिक संशोधन (१७५१-१८१८)- वीर राजे चिमणा बहादूर'' (Historical Research on the late Medieval Kamtha Pargana(1751-1818)-Veer Raje Chimna Bahaddur) असे शीर्षक स्वीकारण्यात आले.

## ३. ग्रंथाचे प्रारुप

चिमणा बहादूरने इंग्रजांविरुध्द सुरु केलेला स्वातंत्र्य लढा हा आप्पासाहेबांनी पचमढीत आश्रय घेवून सुरु केलेल्या स्वातंत्र्य लढयाचाच एक अभिन्न अंग

1. दै.ब्लिटज् मीमांसा, बालाघाट-सिवनी, दि. १८.०२.२०१४

होता. अत: ''आप्पासाहेबांच्या स्वातंत्र्य लढ्याला वगळून फक्त चिमणा बहादूरच्या स्वातंत्र्य लढ्याचे वर्णन केले तर ते अपूर्ण ठरते, आणि चिमणा बहादूरच्या स्वातंत्र्य लढ्याला दुर्लक्षून फक्त आप्पासाहेबांच्या स्वातंत्र्य लढ्याचे वर्णन प्रस्तुत केले तर ते एकांगी ठरते.'' पण सामान्य लेखकांपासून नामवंत लेखकांपर्यंत सर्वच, या स्वातंत्र्य लढ्याचे अपूर्ण वा एकांगी वर्णन करण्यातच मग्न असलेले व त्यातच धन्यता मानून घेतांना दिसून येतात. त्यामुळे इ.स.१८१८-१९ च्या या स्वातंत्र्य लढ्याचे समग्र चित्र वाचकांच्या डोळ्यांसमोर स्पष्ट होत नाही. ही स्थिती या स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासासाठी हानीकारक असून अंसतोषजनक आहे. अत: या ग्रंथात मराठ्यांच्या या स्वातंत्र्य लढ्याचे समग्र वर्णन प्रस्तुत केलेले आहे. म्हणून या ग्रंथाचा व्याप वाढलेला आहे. तसेच, या ग्रंथाचे शीर्षक इतिहासदर्शक असून, शीर्षकाने सूचित केलेला संपूर्ण आशय या ग्रंथात समाविष्ट केल्यामुळे ग्रंथाचा व्याप वाढलेला आहे. परंतु यामुळेच या ग्रंथात चिमणा बहादूरचा समग्र इतिहास प्रभावीपणे स्पष्ट झालेला आहे.

## ४. पारिभाषिक शब्दांची व्याख्या

विशिष्ट अर्थ प्राप्त असलेल्या अथवा विशिष्ट अर्थाने प्रयुक्त केलेल्या शब्दांना पारिभाषिक शब्द असे म्हणतात. ग्रंथात प्रयुक्त झालेल्या पारिभाषिक शब्दांचा (Technical terms) अर्थ वाचकांना सुरुवातीलाच कळला, तर मग त्या ग्रंथातील विषय-वस्तु समजण्यास मदत होते. म्हणून या ग्रंथात प्रयुक्त झालेल्या महत्त्वपूर्ण पारिभाषिक शब्दांची व्याख्या वा अर्थ खाली देत आहे.

### ४.१ स्वातंत्र्य लढा

''परकियांच्या राजवटीतून वा गुलामगिरीतून मायभूमीला मुक्त करण्यासाठी अहिंसात्मक, क्रांतिकारी अथवा सशस्त्र संघर्षाच्या मार्गाने दिलेला लढा म्हणजे स्वातंत्र्य लढा होय.'' अशी आम्ही स्वातंत्र्य लढ्याची व्याख्या स्वीकारली आहे. या व्याख्येच्या कसोटीवर कसून चिमणा बहादूर आणि आप्पासाहेब यांनी इ.स.१८१८ मध्ये इंग्रजाविरुध्द पुकारलेल्या लढ्याला प्रस्तुत ग्रंथात सर्वत्र 'स्वातंत्र्य लढा' असे संबोधित केले आहे.

नागपूरचे राजा आप्पासाहेब भोसले यांनी इंग्रजांविरुध्द दोन युध्द लढले. पहिले, नागपूरचे युध्द (इ.स.१८१७) व दुसरे, पचमढीच्या डोंगरी भागात आश्रय घेवून लढलेले युध्द (इ.स.१८१८-१९). पहिले युध्द हे त्यांनी सत्तेत असतांना व दुसरे युध्द सत्ता गमावल्यानंतर, इंग्रजांच्या प्रस्थापित राजवटीविरुध्द वा त्यांच्या गुलामगिरीविरुध्द लढले.

आप्पासाहेब भोसले हे नागपूरच्या युध्दात परास्त झाल्यामुळे दि. ३० डिसेंबर १८१७ ला नागपूरच्या महाल येथील राजवाड्यावर इंग्रजांनी आपला युनियन जॅक फडकविला. त्यांनी आप्पासाहेबांना कैद केले. आप्पासाहेबांना कैद करुन नागपूरात ठेवणे धोक्याचे आहे, असे इंग्रजांना वाटल्यामुळे त्यांनी प्रयागच्या किल्ल्यात कैद करुन ठेवण्याचे ठरविले. यासाठी त्यांनी त्यांची रवानगी प्रयागकडे केली. वाटेत जबलपूर जवळील रायचूर येथे मुक्काम असतांना दि. १३ मे १८१८ रोजी रात्री २-३ वाजताच्या सुमारास आप्पासाहेबांनी इंग्रजांच्या कैदेतून रहस्यमयरित्या आपली सुटका केली. महादेवाच्या डोंगरात आश्रय घेवून लष्कर भरती सुरु केली. आप्पासाहेबांप्रती निष्ठावान असलेले चिमणा बहादूरसारखे अनेक मनसबदारही येथे त्यांना येवून मिळाले. यानंतर आप्पासाहेबांनी इंग्रजांची प्रस्थापित सत्ता व गुलामगिरी झुगारुन देण्यासाठी त्यांच्याविरुध्द लढा प्रारंभ केला. चिमणा बहादूर हे या लढ्याचे एक प्रमुख कर्णधार होते.

उपरोक्त दोन्ही लढ्यांना तत्कालीन इंग्रज अधिकाऱ्यांनी बंड, विद्रोह, अथवा उठाव (Rebellion, Insurrection or Revolt) असे संबोधित केले आहे. भारतीय लेखक देखील क्रमशः इ.स.१८१७ व इ.स.१८१८ मध्ये लढल्या गेलेल्या या दोन्ही युध्दातील मौलिक भेद दुर्लक्षून, या दोन्ही घटनांना सरसकट 'युध्द' असे संबोधित करतांना दिसून येतात. पण, आप्पासाहेबांनी पचमढीच्या डोंगरात आश्रय घेवून आपल्या सहकाऱ्यांच्या बळावर इंग्रजाविरुध्द जो लढा उभारला त्या लढ्याला उपरोक्त व्याख्येनुसार स्वातंत्र्य लढा संबोधित करणे न्यायोचित आहे. म्हणून प्रस्तुत ग्रंथात या लढ्याला बंड, विद्रोह, उठाव अथवा युध्द असे संबोधित न करता त्याला 'स्वातंत्र्य लढा' असे संबोधित केले आहे. चिमणा बहादूर हे या स्वातंत्र्य लढ्याचे एक सेनापती होते. त्यांनी हा लढा वर्तमान बालाघाट, गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील भूमीत लढला. या परिसरातील प्रबुध्द लोक या लढ्याला स्वातंत्र्य लढा असेच संबोधतात व या लढ्याचा उल्लेख भारतातील इंग्रजांविरुध्दचा 'पहिला स्वातंत्र्य लढा' असाच करतात. हा लढा ब्रिटिश इस्ट इंडिया कंपनीच्या भारतातील वाढत्या साम्राज्यवादाविरुध्द आणि कंपनी सरकारच्या गुलामगिरीतून मायभूमीच्या मुक्तीसाठी होता. या लढ्याचे नेतृत्व आप्पासाहेब भोसले व चिमणा बहादूरसारख्या मराठा शूरवीरांनी केले होते.

### ४.२ परगणा

'परगणा' हा शब्द गोंड राजवंशाच्या शासनकाळातील आहे. गोंड राजा हे

आपल्या राज्यातील वेगवेगळया प्रशासकीय क्षेत्राला परगणा असे संबोधित असत. यानंतर अस्तित्वात आलेल्या मराठा शासनकाळातही परगणा हा शब्द स्वीकारण्यात आला. नागपूरच्या मराठा राज्यात राज्यकारभाराच्या दृष्टीने वेगवेगळे प्रांत बनविण्यात आले होते. या प्रातांना 'सुभा' व त्यांच्या अधिकाऱ्याला सुभेदार असे म्हणत. प्रत्येक सुभ्याच्या अंतर्गत अनेक परगणे असत. किमान पाचपेक्षा जास्त जमीनदाऱ्या मिळून एक परगणा बनत असे. त्याकाळी लांजी व कामठा हे स्वतंत्र परगणे होते.

परगणा कामठ्यात कामठा या मुख्य जमीनदारीसह हट्टा, लिंगा, किरणापूर, फुलचूर इ. उप-जमीनदाऱ्या आणि बिंजली, धनसुआ, केशोरी (देवरी) इ. शिकमी जमीनदारींचा समावेश होता. कामठ्याचे जमीनदार हे एकमात्र कामठा जमीनदारीचेच जमीनदार नव्हते, तर ते परगणा कामठ्यात समाविष्ट सर्व जमीनदारींचे सर्वोच्च जमीनदार अथवा मनसबदार होते. या विशाल परगण्यात समाविष्ट सर्व जमीनदार हे त्यांच्या अधीन होते. चिमणा बहादूरला उत्तराधिकारात या सर्व जमीनदाऱ्या प्राप्त झाल्यामुळे, ते संपूर्ण नागपूर राज्यातील सर्वात मोठे जमीनदार होते व त्यांची स्थिती जवळपास 'राजा' सारखी होती. कामठा जमीनदारीचे संस्थापक कोलुबापू यांनी आपल्या शासनकाळातच प्रशासनाचे हे नवे स्वरुप विकसित केले होते.

### ४.३ रेसिडेन्सी (Residency)

ब्रिटिश इस्ट इंडिया कंपनीची भारतावर राजकीय सत्ता प्रस्थापित करण्याची इच्छा बळावल्यानंतर तिने भारतीय राज्यांवर आपले राजकीय वर्चस्व वाढविण्यासाठी वेगवेगळ्या राज्यांच्या राजधानीत एक-एक अधिकारी ठेवणे सुरु केले. या अधिकाऱ्याला रेसिडेंट (Residency) असे म्हणत आणि हा इंग्रज अधिकारी ज्याठिकाणी राहत असे त्या जागेला रेसिडेन्सी (Residency) असे संबोधिले जात असे.

आजच्या नागपूर महाविद्यालयाच्या जागेवर इंग्रजांची रेसिडेन्सी होती. इंग्रजी लष्कर तेलंगखेडी येथे होते. आजच्या रिझर्व्ह बँकेच्या जागेवर इंग्रजांचा खजिना होता.

दुसऱ्या इंग्रज-मराठा युध्दानंतर झालेल्या देवगावच्या तहानुसार (इ.स.१८०३) इंग्रजांच्या वतीने रेसिडेंट नावाचा अधिकारी नागपूरात राहू लागला. एलफिन्स्टन हा नागपूर राज्यातील पहिला रेसिडेंट होय. तो इ.स.१८०७ मध्ये बदली होवून पुण्याला गेला. पुण्याच्या दरबारी पुढे तो फार प्रसिध्दीस आला. शिंद्यांच्या

दरबारी असलेला जेन्किन्स हा त्याच्या जागी नागपूरला आला. रेसिडेंट जेन्किन्सचा जन्म १८ फेब्रुवारी १७८५ मध्ये झाला होता. तो बॉम्बे सिव्हिल सर्व्हिसच्या माध्यमातून रेसिडेंटच्या पदावर नियुक्त झाला होता. इ.स. १८०७ पासून इ.स. १८२६ पर्यंत नागपूरला होता. चिमणा बहादूरसह नागपूर राज्यातील प्रत्येक महत्त्वपूर्ण व्यक्तीला तो ओळखत होता. त्यानेच नागपूरात खऱ्या अर्थाने इंग्रजी सत्तेचा पाया घातला. रेसिडेंट जेन्किन्स हा दि. २९ डिसेंबर १८२६ ला स्वदेश जाण्यासाठी निघाला. त्याच्यानंतर मि. वाइल्डर हा नागपूरचा रेसिडेंट बनला. रेसिडेंट जेन्किन्सच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे त्याला इ.स. १८३२ मध्ये इस्ट इंडिया कंपनीचा डायरेक्टर बनविण्यात आले. तो इ.स.१८३२ ते इ.स.१८५३ पर्यंत या पदावर राहिला.

**४.४ कमाविसदार**

नागपूरच्या भोसल्यांनी गोंडांकडून राज्य मिळविले होते. गोंडांच्या काळात पूर्णपणे जमीनदारी पद्धती होती. ही जमीनदारी पद्धती भोसल्यांनी देखील स्वीकारली. पण त्यांनी महसूलविषयक पद्धतीत बदल केले. गोंड राजांच्या काळात सर्व जमीनदार, परगण्याचा महसूल देशपांडे व देशमुखांच्या माध्यमातून वसूल करवित होते. भोसल्यांनी मात्र देशमुख व देशपांड्यांकडून ही कामे काढून घेतली आणि ती कामे कमाविसदारांना दिली. कमाविसदार हा महसूल खात्याचा उप-विभागीय अधिकारी (Sub-Divisional Officer) होता. हा निरनिराळ्या खेड्यातील जमीनदार, पटेल व पटवाऱ्यांना बोलावून परगण्याचा महसूल किती वसूल झाला पाहिजे ही गोष्ट ठरवित असे. पटवारी, पटेल व देशपांड्यांच्या माध्यमातून तो महसूल वसूल करवीत असे. फडनवीस व वऱ्हाडपांडे हे लोक शेतसाऱ्याचा हिशेब ठेवण्यास कमाविसदाराला मदत करीत. कमाविसदार हा पैशाचा हिशेब ठेवीत असल्यामुळे त्याला शासकीय खजिन्यातून पगार मिळत होता.

कमाविसदाराचे आपल्या अधिकारक्षेत्राखालील जमीनदारांवर नियंत्रण राहत असे. नवीन जमीनदारांची नियुक्ती करतांना नागपूरचे राजा कमाविसदाराचा सल्ला विचारात घेत असत. कमाविसदाराकडे एकापेक्षा जास्त परगण्यांची महसूलविषयक जबाबदारी असे. लांजीला ज्या कमाविसदाराचे मुख्यालय होते त्याच्याकडेच परगणा कामठ्याची महसूलविषयक जबाबदारी होती.

**४.५ शिकमी जमीनदारी** (Shikmi Zamindari)

परगणा कामठ्यात अनेक उप-जमीनदारींचा आणि शिकमी जमीनदारींचा समावेश होता. या सर्व जमीनदाऱ्या कामठ्याच्या जमीनदारांनी आपल्या

कर्तबगारीच्या बळावर निर्माण केल्या होत्या. यापैकी ज्या जमीनदारीचे शासन कामठा येथील बहेकार राजवंशाचा एखादा व्यक्ती, जमीनदार अथवा व्यवस्थापक या नात्याने सांभाळत असे तेव्हा त्या जमीनदारीला कामठ्याची उप–जमीनदारी (Subordinate Zamindari) असे म्हणत. उदा. हट्टा, लिंगा व किरणापूर. परंतु कामठ्याचे जमीनदार जेव्हा एखादी नवीन जमीनदारी निर्मित करुन तिच्यात जातीपाती अथवा धर्माचा विचार न करता कोणत्याही योग्य व्यक्तीस संयुक्त भागीदार बनवीत असत तेव्हा त्या व्यक्तीला शिकमी जमीनदार, आणि याप्रकारच्या जमीनदारीला शिकमी जमीनदारी असे संबोधित केले जात असे. शिकमी जमीनदारीला गावखेड्यात शिक्का जमीनदारी असे म्हटले जात असे. उदा. बिंजली, धनसुआ, केशोरी (देवरी).

कामठ्याचे जमीनदार कोलुबापू, गोंदिबापू आणि चिमणा बहादूर यांनी व्यापक प्रदेशात जंगल कटाई करवून भूमी लागवडीखाली आणली आणि मोठ्या प्रमाणात नवीन गावे वसविली. या गावांपैकी काही गावे त्यांनी प्रत्यक्ष आपल्या अधिकाराखाली ठेवली व बाकीची गावे त्यांनी प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने जातीपातीचा विचार न करता अन्य (Kolu and his vigorous son and grandson, Gondi and Chimna, in the course of a few years, cut the Jungle, planted villages and sowed the seeds of a fine estate. Some villages they held in their own hands, to others they called in any likely man of whatever race or tribe. Here they delegated their authority to others who they put up as Shikmi Zamindars (Joint proprietors), they themselves retaining the superior title of zamindars )[1] योग्य व्यक्तींच्या अखत्यारीत दिली. यातून शिकमी जमीनदारींचा उदय घडून आला.

### ४.६ उत्तर–मध्ययुग (Late Medieval)

इतिहासाचे प्राचीन युग, मध्य युग आणि आधुनिक युग असे तीन कालखंड मानले जातात. सुरुवातीपासून आठव्या शतकाच्या शेवटपर्यंतच्या काळाला प्राचीन युग, नवव्या शतकापासून अठराव्या शतकाच्या शेवटपर्यंतच्या काळाला मध्ययुग आणि एकोणिसाव्या शतकापासून त्यानंतरच्या काळाला आधुनिक युग असे संबोधण्यात येते.

नवव्या शतकापासून बाराव्या शतकाच्या शेवटपर्यंतच्या काळाला प्रारंभिक मध्ययुग (Early Medieval) आणि तेराव्या शतकापासून अठराव्या शतकाच्या शेवटपर्यंतच्या काळाला उत्तर–मध्ययुग असे म्हटले जाते. एकोणिसाव्या शतकापासून

**1**. Settlement Report (1867), Mr. Lawrence's description, pp. 92-96

आधुनिक युगाची सुरुवात झालेली आहे. प्रस्तुत संशोधन हे उत्तर-मध्ययुग (Late Medieval)- प्रारंभिक आधुनिक युग (Early Modern Period) या काळातील कामठा परगण्यावर अधिष्ठित आहे.

## ५. इतिहासाचे प्रमुख स्त्रोत

चिमणा बहादूर आणि कामठा जमीनदारीच्या इतिहाससंबंधी संशोधन करण्यासाठी खालील प्रमुख साधने उपयुक्त आहेत-

### ५.१ रेसिडेंटचा अहवाल

रेसिडेंट जेन्किन्स हा नागपूर राज्यातील प्रत्येक घडामोडीचा अहवाल कंपनी सरकारकडे पाठवित असे. चिमणा बहादूरच्या नेतृत्वाखाली घडून आलेल्या लांजी गदर (Lanji Revolt) ची माहिती त्याच्या अहवालात उपलब्ध आहे. अत: चिमणा बहादूरच्या इतिहासाचे हे एक महत्त्वपूर्ण स्त्रोत आहे.

### ५.२ व्हॅलेंटाइनच्या आठवणी

इंग्रज विरुद्ध चिमणा बहादूर यांच्यात नवरगाव व कामठा येथे झालेल्या युध्दाची माहिती जाणून घेण्यास कर्नल व्हलेन्टाइन ब्लॅकर लिखित Memoir of the Maratha War of 1817-1819 हा ग्रंथ उपयुक्त आहे. कामठ्याच्या पराभवानंतर झालेल्या पवनी व अंबागडच्या लढ्याचे वर्णनही यात उपलब्ध आहे.

### ५.३ बंदोबस्त अहवाल (इ.स.१८६७)

भारतात इ.स. १८५७ च्या स्वातंत्र्यलढ्यानंतर ब्रिटिश इस्ट इंडिया कंपनीचे शासन संपुष्टात येवून येथे ब्रिटिश सरकारची राजवट सुरु झाली. ब्रिटिश सरकारने भारतीय शेतीविषयक उद्‌भवणारे वाद सोडविता यावे यासाठी शेतीविषयक नवीन अभिलेख तयार करण्याचे ठरविले. यासाठी शासनाने मि. लॉरेन्सच्या नेतृत्वाखाली आपल्या अधीनस्थ संपूर्ण प्रदेशातील शेतजमीनीचे मोजमाप करण्याची मोहीम राबविली. त्यावेळी त्याने शासनाला सादर केलेला अहवाल हा इ.स. १८६७ चा बंदोबस्त अहवाल (Settlement Report of 1867) म्हणून प्रसिद्ध असून तयार करण्यात आलेल्या शेतीविषयक अभिलेखाला बंदोबस्त अभिलेख (Record of Settlement) असे म्हणतात. भारतातील हा पहिला बंदोबस्त असून भारतीय शेतकऱ्यांना बंदोबस्त हा शब्द परिचित आहे.

बंदोबस्त अहवालात मि. लॉरेन्सने कामठा जमीनदारीचा उदय कसा झाला, याचे वर्णन केलेले आहे. म्हणून चिमणा बहादूरविषयक संशोधन करणाऱ्यांसाठी बंदोबस्त अहवाल हे एक उपयुक्त स्त्रोत आहे.

**५.४ भंडारा जिल्हा गॅझेटिअर**

मध्ययुगीन नागपूर राज्याचा, उदयापासून अस्तापर्यंत समग्र इतिहास भंडारा जिल्हा गॅझेटिअर (इ.स.१९७८) मध्ये संक्षिप्त स्वरुपात उपलब्ध आहे. यात इंग्रज विरुध्द चिमणा बहादूर व आप्पासाहेबांच्या युध्दाचे वर्णनही दिलेले आहे. त्यामुळे चिमणा बहादूरच्या स्वातंत्र्य लढ्याचे स्वरुप जाणून घेण्यासाठी भंडारा जिल्हा गॅझेटिअर हे एक उत्तम स्त्रोत आहे.

या गॅझेटिअरमध्ये रेसिडेंट जेन्किन्स, कर्नल व्हॅलेन्टाइन ब्लॅकर आणि बंदोबस्त अधिकारी मि. लॉरेन्स यांनी लिहून ठेवलेल्या माहितीचे संदर्भ (References) दिलेले आहेत. त्यामुळे चिमणा बहादूर व कामठा जमीनदारीचा इतिहास जाणून घेण्यासाठी हे एक सर्वसमावेशक असे स्त्रोत आहे.

**५.५ दिवाणी दावा व वंशावली**

आमगाव हे गोंदिया जिल्ह्यातील तालुक्याचे ठिकाण असून मुंबई–कोलकाता रेल्वेमार्गावर वसलेले आहे. हे स्थान कामठ्याच्या दक्षिण–पूर्वेला सुमारे तीस कि.मी. अंतरावर आहे. मराठ्यांच्या व इंग्रजांच्या काळात आमगाव हे जमीनदारीचे ठिकाण होते. त्याकाळी आमगाव हे एक खेडेगाव होते. पण स्वातंत्र्योत्तर काळात ते एक चांगले विकसित, सांस्कृतिक व व्यापारिक नगर म्हणून प्रसिध्दीस आलेले आहे. येथे पूर्वीपासूनच बहेकार वंशाचे किंबहुना चिमणा बहादूरच्या वंशावलीतील लोकांचे शासन होते. इ.स.१८१८ च्या स्वातंत्र्य लढ्यानंतर तान्याबापू (इ.स.१८१९–३८) हे आमगावचे जमीनदार झाले. त्यांची ख्याती सर्वदूर पसरल्यामुळे आमगावला तान्याबापूचा आमगाव अशी ओळख प्राप्त आहे.

बहेकार घराण्यातील मल्हारराव विरुद्ध मार्तंडराव यांच्यात वारसा हक्काबाबत 'म्यूटेशन ऑफ आमगाव जमीनदारी' असा एक दिवाणी दावा इ.स. १९१६–१७ मध्ये गोंदियाच्या एस.डी.ओ.कोर्टात आणि इ.स.१९१८ मध्ये दिवाणी न्यायालयात सुरु होता. या दाव्यात ॲड. पंडित आणि ॲड. जकातदार यांनी कामठा जमीनदारीचे संस्थापक कोलुबापू बहेकार यांची वंशावली सादर केली होती. या दाव्याचे कागदपत्र व वंशावली आमगावच्या जमीनदार वाड्यातून उपलब्ध झालेले आहेत. या वंशावलीत सुरुवातीपासून शेवटपर्यंत बहेकार घराण्यातील सर्व जमीनदारांची नावे नमूद असून त्यात कोणत्या जमीनदाराच्या अखत्यारीत केव्हा कोणती जमीनदारी होती, हेही बहुतेक सर्वांच्या नावाखाली नमूद केलेले आहे.

इतिहासविषयक संशोधनात वंशावलीला विश्वसनीय स्त्रोत मानले जात

नाही. कारण ज्या व्यक्तीचा इतिहास लिहिला जातो त्या व्यक्तीच्या तीन-चार पिढ्यानंतरच्या लोकांनी वंशावली तयार केलेली असते. पण दिवाणी दाव्यात महसूल विभागाच्या रेकॉर्डच्या आधारावर तयार केलेली वंशावली विश्वसनीय (Authentic) मानली जाते, हेही तितकेच खरे आहे. उपरोक्त विद्वान वकीलांनी बंदोबस्त अहवालात नमूद असलेला कामठा जमीनदारीच्या उदयाचा इतिहास आणि महसूल खात्याचा रेकॉर्ड यांचा तुलनात्मक अध्ययन करुन कोलुबापू बहेकार यांची वंशावली तयार केलेली आहे. त्यामुळे प्रस्तुत लेखकाने डोळसपणे या वंशावलीला विश्वसनीय व प्रमाणित (Authenticated) मानून व तिला आधारशिला बनवून संशोधन कार्य संपन्न केलेले आहे.

संशोधन करतांना अन्य जुन्या दस्तऐवजांच्या आधारावर या वंशावलीला चिकित्सकपणे तपासून घेण्याची खबरदारीदेखील लेखकाने घेतलेली आहे. हे कर्तव्य पार पाडतांना, वंशावलीच्या पृष्ठ क्र. ४ वर एका ठिकाणी चुकीची नोंद आढळून आली. ही चुकीची नोंद व त्यावरील दुरुस्ती परिशिष्टात समाविष्ट केलेल्या वंशावलीतून वाचकांच्या सहज लक्षात येईल. किरणापूर जमीनदारीच्या सनदेच्या (इ.स.१८४६) आधारावर वंशावलीत ही दुरुस्ती केलेली असून त्या आधारावर चिमणा बहादूरच्या युध्दोपरांत इतिहासाचे विश्लेषण लेखकाने केले आहे. अत: या दुरुस्तीसह कोलुबापू बहेकार यांची वंशावली, हे कामठा परगणा व चिमणा बहादूरच्या इतिहासविषयक संशोधनासाठी एक उपयुक्त साधन आहे.

### ५.६ आमगाव जमीनदारीची सनद (इ.स.१७९६)

कामठ्याचे जमीनदार चिमणा बहादूर आणि आमगावचे जमीनदार सोनाबापू हे समकालीन शासक होते. आमगाव जमीनदारी ही इ.स. १७५६ पासून कोलुबापूंचा मोठा मुलगा पांडुबापू यांच्या अखत्यारीत होती. आमगाव जमीनदारी इ.स.१७९६ मध्ये काही काळ लांजीच्या परदेसी (राजपूत) जमीनदाराकडे सोपविण्यात आली होती. सोनाबापू हे इ.स १७९६ पासून इ.स. १८१९ पर्यंत आमगावचे जमीनदार होते.

इ.स.१७९६ च्या सुमारास नागपूरला रघूजी द्वितीय यांचे शासन होते. रघूजी द्वितीय हे चिमणा बहादूरला मानसपुत्र मानत होते. हे संबंध आमगाव जमीनदारीच्या पुनर्प्राप्तीसाठी साहाय्यक ठरले. आमगावची जमीनदारी चिमणा बहादूरच्या प्रयत्नामुळे सोनाबापूला दिली जात आहे, असा स्पष्ट उल्लेख इ.स.१७९६ च्या या सनदेत असून ही सनद आमगावच्या जमीनदार वाड्यात उपलब्ध आहे.

कोलुबापूंच्या वंशावलीत सोनाबापूच्या नावाजवळ जी नोंद आहे तिच्यात

आणि उपरोक्त सनदेत सुसंगती आहे. लेखकाने या वंशावलीला विश्वसनीय मानण्यात ही सुसंगतीदेखील कारणीभूत आहे. आमगाव जमीनदारीची ही सनद हे चिमणा बहादूर व कामठा जमीनदारीच्या इतिहासाचे एक मौलिक स्त्रोत (original source) आहे.

### ५.७ किरणापूर जमीनदारीची सनद (इ.स.१८४६)

किरणापूर जमीनदारी ही इ.स.१८१८ पूर्वी चिमणा बहादूर यांच्या अधिकारक्षेत्रात होती. पण, या जमीनदारीचा राज्यकारभार त्यांचे मोठे भाऊ पुनाबापू हे सांभाळत होते. इ.स. १८१८ नंतर ही जमीनदारी इंग्रजांनी पुन्हा पुनाबापू यांना बहाल केली. कोंडुबापू हे पुनाबापूंना या जमीनदारींच्या राज्यकारभारात सहकार्य करीत असत. पुढे पुनाबापू यांनी ही जमीनदारी त्यांचा लहान भाऊ कोंडुबापू याला देण्यात यावी, असा अर्ज इंग्रज अधिकाऱ्यांना केला. अत: पुनाबापूंच्या विनंतीनुसार ही जमीनदारी इंग्रज सरकारने कोंडुबापू यांना प्रदान केली. यासंबंधीची सनद तीन आणे (Three Annas) किंमतीच्या स्टँम्प पेपरवर असून ती आजही आमगावच्या जमीनदार वाड्यात उपलब्ध आहे. ही सनद किरणापूर जमीनदारीचा इतिहास जाणून घेण्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे.

### ५.८ मौजा आमगावच्या मालकीसंबंधी दावा (इ.स.१८६६)

आमगावचे जमीनदार माधवरावबापू बहेकार (इ.स.१८६४-इ.स.१९१७) यांच्या कारकिर्दीत मौजा आमगावच्या मालकीसंबंधी एक दावा (The Milkiyat case of Mouza Amgaon) उप-आयुक्त भंडारा यांच्या न्यायालयात इ.स.१८६६ मध्ये दाखल करण्यात आला. हा दावा आमगाव जमीनदाराच्यावतीने गोपालपंतद्वारे दर्ज करण्यात आला होता. या दाव्याचा निकाल दि. ७ जुलै १८६६ ला लागलेला असून हा निकाल स्टॅम्प पेपरवर नमूद आहे. निकालपत्राच्या शेवटी बंदोबस्त अधिकारी ए.जे.लॉरेन्स याची सही व शिक्का आहे.

उपरोक्त निकाल पत्रात एका ठिकाणी नमूद आहे की, ''आमगाव जमीनदारी ही लांजीच्या कमाविसदाराद्वारे कामठा जमीनदाराच्या एका मुलाला देवून ही जमीनदारी त्याच्या देखरेखीखाली सोपविण्यात आली होती.'' (This Talooqua was given in Zamindari by the Kamavisdar of Lanjee to one of the son of Kamtha Zamindar and put under his supervision) अत: हा निकालपत्र कामठा व आमगाव जमीनदारींचा इतिहास व त्यांतील अन्योन्य संबंध जाणून घेण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

**५.९ लिंगा जमीनदारीची सनद (इ.स.१८६७)**

बंदोबस्त अधिकारी (Settlement Officer) च्या वतीने केंद्रीय प्रांताच्या मुख्य आयुक्ताद्वारे (Chief Commissioner of the Central Provinces) लिंगा जमीनदारीची सनद इ.स.१८६७ मध्ये चिमणा बहादूरचा नातू पांडुबापू द्वितीय याला बहाल करण्यात आली. ही सनद लिंग्याच्या जमीनदार वाड्यात उपलब्ध आहे.

इ.स.१८१८ च्या युध्दानंतर किरणापूरची जमीनदारी चिमणा बहादूरला दिली गेली, अशी माहिती बंदोबस्त अहवालात नमूद आहे. प्रस्तुत लेखकाने या माहितीचे खंडन ज्या पुराव्यांच्या आधारावर ''युध्दोपरांत चिमणा बहादूर'' या प्रकरणामध्ये ''परस्परविरुध्द माहिती व तिचे परीक्षण'' या मुद्यातंर्गत केलेले आहे त्या पुराव्यात लिंगा जमीनदारीच्या या सनदेला महत्त्वाचे स्थान आहे. चिमणा बहादूरचा खरा इतिहास प्रकाशमान करण्यासाठी ही सनद हे एक मौलिक स्त्रोत आहे.

कोलुबापूंची वंशावली, आमगाव, किरणापूर व लिंगा या जमीनदारींच्या सनदा तसेच म्यूटेशन ऑफ आमगाव जमीनदारी आणि मिल्कियत केस ऑफ मौजा आमगाव या दाव्यांचे दस्तऐवज असे एकूण सहा मौलिक ऐतिहासिक स्त्रोत प्रस्तुत लेखकाला उपलब्ध झाल्यामुळे कामठा परगण्यावरील अथवा वैनगंगा वीर चिमणा बहादूरवरील हे ग्रंथ प्रामाणिक (Authentic) असे झालेले असून या ग्रंथाला विशेष मोल प्राप्त झाले आहे.

## ६. संशोधनाचे महत्त्व

चिमणा बहादूर यांनी इ.स.१८१८ मध्ये इंग्रजांविरुध्द स्वातंत्र्य लढा पुकारण्याचे अद्‌भुत साहस केले. एखाद्या व्यक्तीच्या हातून श्रेष्ठ कृती घडते, ती अकस्मात घडून येत नाही. तिच्या मागे संस्कारांचा एक व्यापक इतिहास दडलेला असतो. या दडलेल्या इतिहासाचे खरे स्वरुप सकळ समाजासमोर आले तर तो इतिहास त्या समाजासाठी एक अमूल्य ठेवा असतो. तसेच, प्रेरक प्रसंगांनी परिपूर्ण असलेल्या संस्कारक्षम इतिहासातून नव्या पिढीला उर्जा व प्रेरणा मिळते, आणि समाज व राष्ट्र घडत असते. हा दृष्टिकोन समोर ठेवून, कालप्रवाहात विलुप्त होत चाललेला चिमणा बहादूरचा इतिहास व त्याची पार्श्वभूमी सकळ समाजासमोर यावी, यासाठी हे संशोधन कार्य केलेले असून त्यातून हे चिमणा बहादूरवरील इतिहास ग्रंथ साकारले आहे.

■ ■ ■

# २. परगणे कामठा आणि कामठ्याचा परिचय

## १. कामठ्यामधला चिमणा बहादूर

**चि**मणा बहादूर यांनी इ.स. १८१८ मध्ये इंग्रजांविरुध्द स्वातंत्र्य लढा उभारला. त्यातून इंग्रजांना व संपूर्ण भारतीय समाजाला त्यांच्या अद्‌भुत साहस आणि पराक्रमाची प्रचिती आली. त्यामुळे चिमणा बहादूरचे नाव मराठ्यांच्या इतिहासात कायमचे कोरले गेले. ''त्यांना वैनगंगा नदीपासून लांजीपर्यंतच्या सुमारे पन्नास मैल लांब आणि शिवणी-छपाऱ्याला लागून असलेल्या कटंगी परगण्यापासून दक्षिणेकडील प्रतापगडपर्यंतच्या सुमारे ऐंशी मैल लांब एवढ्या व्यापक प्रदेशातील लहान-मोठे सर्व जमीनदार (Petty Zamindars) आपला प्रमुख मानत असत''.[1] यातून त्यांच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाची जाणीव होते.

चिमणा बहादूरचे व्यक्तिमत्त्व प्रभावी असून नेतृत्व क्षमता, कोणत्याही संकटाला सामोरे जाण्याएवढे साहस आणि परिणामाची चिंता न करता न्यायासाठी लढण्याची वृत्ती हे त्यांचे अंगभूत गुण होते. त्यामुळे त्यांना मराठाकालीन नागपूर राज्यात प्रचंड लोकप्रियता प्राप्त होती. ते स्वयं नागपूर राज्याच्या देवगड सुभ्यातील परगणा कामठ्यात अंतर्भूत असलेल्या अनेक जमीनदारांचे सर्वोच्च जमीनदार होते. लोक त्यांना मोठ्या आदराने 'सरकार' असे संबोधित असत. चिमणा बहादूरच्या विशेष संदर्भात मध्ययुगीन कामठा परगण्याचा इतिहास, हा या ग्रंथाचा मुख्य विषय असल्यामुळे कामठा व कामठा परगण्याचा विशेष परिचय ग्रंथाच्या सुरुवातीलाच वाचकांना घडवून देणे अगत्याचे आहे.

## २. परगण्याचे स्थान व विस्तार

भारताच्या केंद्रस्थानी असलेल्या विदर्भाच्या पूर्वेकडील भागात कामठा हे गाव वसलेले असून ते मुंबई-कोलकाता रेल्वेमार्गावरील गोंदिया या नगराच्या उत्तर-पूर्व दिशेत सुमारे पंधरा कि.मी.अंतरावर आहे. कामठ्याच्या उत्तर-पश्चिमेला थोड्याच अंतरावर बिरसी विमानतळ असून येथे आंतरराष्ट्रीय दर्ज्याचे वैमानिकांचे प्रशिक्षण केंद्र आहे. काळाच्या ओघात आज कामठ्याला गौण स्थान प्राप्त झाले असले तरी मराठ्यांच्या शासनकाळात ते एक प्रसिद्ध नगर होते.

''कामठा जमीनदारीच्या अधिकारक्षेत्रात उत्तरेकडील लांजीच्या डोंगरी

---

1. Bhandara District Gazetteer, Revised Edition 1978, P.136

भागापासून दक्षिणेकडील वाघनदी ज्या ठिकाणी पूर्वेकडे जाणाऱ्या महामार्गाला ओलांडते त्या स्थानापर्यंतचा सुमारे एक हजार चौरस मैलाचा प्रदेश समाविष्ट होता.''[1] येथील जमीनदाराच्या अधिसत्तेखाली कामठ्याशिवाय वर्तमान मध्यप्रदेशातील हट्टा, लिंगा, किरणापूर, धनसुआ आणि वर्तमान महाराष्ट्रातील फुलचूर, बिंजली, केशोरी (देवरी) इ.अनेक जमीनदाऱ्या होत्या. या सर्व जमीनदारींचा समावेश कामठा परगण्यात होत असे. मराठा शासनकाळात कामठ्याचा किल्ला, हट्टयाची बावली आणि लिंग्याची हवेली या तीन वास्तु प्रसिद्ध होत्या.

## ३. राजकारणाचे केंद्र 'कामठा'

मराठा शासनकाळात कामठा हे फक्त जमीनदारीचे स्थान नसून परगणे कामठाच्या राजधारीचे ठिकाण व राजकारणाचे एक केंद्र होते. नागपूर राज्यावर इंग्रजांची सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर त्यांनी १८२०-२१ मध्ये जिल्ह्याचे मुख्यालय लांजीवरुन भंडारा येथे स्थानांतरित केले. याच सुमारास त्यांनी कामठ्याला तालुक्याचा दर्जा दिला असे दिसते. इंग्रजांनी पांडुबापूला इ.स. १८६७ मध्ये लिंगा जमीनदारीची जी सनद दिली तिच्यात तहसिल- कामठा, जिल्हा-भंडारा असे नमूद आहे. कामठ्याला बंदोबस्त अहवालात नगर (Town) असे संबोधित केले आहे.

कंपनी सरकारच्या काळात सानगडी व तिरोड्याला तालुक्याचा दर्जा प्राप्त होता. ब्रिटिश सरकारने इ.स. १८६७ मध्ये सानगडीहून साकोली येथे तहसिलीचे मुख्यालय आणले. इ.स. १९१४ मध्ये कामठा व तिरोडा तहसिलीचे मुख्यालय बदलून ते गोंदिया करण्यात आले. हा इतिहास नजरेखालून घातला की मग पूर्वीच्या काळी कामठा, लांजी, सानगडी व तिरोड्याला असलेले महत्त्व लक्षात येते.

## ४. शेती व उद्योग

बहेकार जमीनदारीच्या काळात कामठ्याला अडकित्ते बनविण्याचा आणि चामड्याचा उद्योग प्रगत अवस्थेत होता. गावात शेतकरी, ब्राम्हण, सुतार, लोहार, स्वर्णकार, गवंडी, शिंपी, चांभार, न्हावी, वरठी इ. व्यवसाय करणारे लोक राहत असून शेतीला प्रतिष्ठित स्थान प्राप्त होते. शेतीतून मुख्यत: धानाचे पिक घेतले जात असे. कामठ्याच्या दक्षिण भागात एक कि.मी. अंतरावर

---

1. पूर्वोक्त, Bhandara District Gazetteer, P.138

पूर्ववाहिनी पांगोली नदी असून उत्तर- पश्चिमेत दोन कि.मी. अंतरावर झिलमिली तलाव आहे. या तलावापासून काढलेल्या कालव्याने कामठ्याच्या शेतीला पाणीपुरवठा होत असे.

त्याकाळी भोसले शासनाने पाडलेले चांदीचे रुपये आणि तांब्याची नाणी प्रचलित होती. नागपूरकर भोसल्यांनी पाडलेली नाणी ही बहुतेक मोगल बादशहाच्याच नावाने पाडलेली असत. चांदीच्या रुपयाचे वजन ८५ रत्ती अथवा ११.०५ ग्रॅम राहत असे. चिमणा बहादूरच्या शासनकाळात कामठा जमीनदारीचे एकूण उत्पन्न ७२,०००/- रु. होते. परगणा कामठ्यातील अन्य जमीनदाऱ्यांपासून मिळणारे उत्पन्न हे त्यांच्या उत्पन्नाचे दुसरे प्रमुख स्त्रोत होते.

## ५. निसर्गाचे वरदान

कामठा परगण्याचा परिसर घनदाट जंगलांनी व्याप्त, सातपुडा पर्वतराजींनी नटलेला आणि विविध वन्य पशुपक्षी व हिंस्त्र श्वापदांनी परिपूर्ण होता. वैनगंगा आणि वाघ या परगणा कामठ्यातील दोन प्रमुख नद्या होत. कचारगड ही ऐतिहासिक गुफा, कुआँढास नदीवरल 'हाजरा फॉल' या नावाने पुढे प्रसिध्दीस आलेला धबधबा, मिरजागड हा प्राचीन तलाव आणि अलीकडे 'नागझिरा अभयारण्य' म्हणून प्रसिध्दीस आलेला संपूर्ण जंगल व्याप्त प्रदेश परगणा कामठ्यामध्ये समाविष्ट होता. प्राचीन संस्कृत महाकवी भवभूतीचे जन्मस्थान असलेल्या पद्मपूरच्या सभोवताली असलेला कमलपुष्पव्याप्त शेकडो तलावांनी सुशोभित परिसरही परगणा कामठ्यात अंतर्निहित होता.

कामठा परगण्याचे स्थान दख्खनच्या पठारी भागात असल्यामुळे या प्रदेशात डोंगरमालांच्या जोडीला सपाट मैदानही भरपूर प्रमाणात आहेत. बहेकार जमीनदारांनी काटी-बिरसोला परिसरातील सपाट मैदानाचा उपयोग लष्करी छावणी उभारण्यासाठी केला होता. निसर्गाचे वरदान कामठा परगण्याला लाभलेले होते.

## ६. प्रदेशाचा पूर्वेतिहास

कामठा परगण्याचा संपूर्ण क्षेत्र पूर्वी प्रसिद्ध गोंड राजा बख्तबुलंदच्या देवगड संस्थानात समाविष्ट होता. वर्तमान छिंदवाडा जिल्ह्यात देवगड या नावाने प्रसिद्ध असलेला एक डोंगरी किल्ला आहे. हेच बख्तबुलंदच्या राजधानीचे ठिकाण होते. म्हणून त्याचे राज्य देवगड संस्थान म्हणून ओळखले जात होते. रघूजी प्रथम यांनी इ.स. १७३४ च्या सुमारास देवगड संस्थान संपादित केले. यानंतर त्यांनी येथे नवीन सुभा पुनर्गठित केला. हा सुभा देवगडचा सुभा म्हणून प्रसिद्धीस आला.

''देवगडच्या सुभ्यात रघूजी प्रथम यांनी देवगडच्या गोंड राजाकडून मिळविलेला वर्तमान छिंदवाडा, बालाघाट, नागपूर, भंडारा व गोंदिया या जिल्ह्यातील सर्व प्रदेशाचा तर समावेश होताच, पण याशिवाय त्यात शिवणी, खैरागड, राजनांदगाव व छुईखदान या प्रदेशांनाही समाविष्ट करण्यात आले होते''[1] शिवणीला पठाण जहागीरदाराचे तर खैरागड, राजनांदगाव व छुईखदान येथे मराठ्यांच्या अधीनस्थ राजपूतवंशीय मांडलिक राजांचे शासन होते. रघूजी प्रथम यांच्या कारकिर्दीत देवगडच्या सुभ्यामध्ये कामठा जमीनदारीचा उदय घडून आला.

मराठा शासनकाळात सुभ्याच्या राज्यकारभाराची संपूर्ण जबाबदारी 'सुभेदार' नावाच्या अधिकाऱ्याकडे राहत असे. रघूजी करांडे हे देवगडच्या सुभ्याचे प्रथम सुभेदार होत. कामठा जमीनदारीच्या उदयात त्यांचे फार मोठे योगदान होते. सुभ्यातील सर्व जमीनदार, जहागीरदार आणि मांडलिक राजांवर नियंत्रण राहावे यासाठी लांजी येथे अमीन व कमाविसदार हे अधिकारी राहत असत. कामठा हे प्रशासकीय दृष्टीने लांजीशी निगडीत होते.

## ७. परगण्याची चतुर्सिमा

कामठा परगण्यात वर्तमान बालाघाट व गोंदिया या जिल्ह्यातील व्यापक प्रदेशाचा समावेश होता. कामठा परगण्याला लागून पूर्व दिशेत लांजी जमीनदारीची सीमा, पश्चिमेस वराड (Warad) जमीनदारीची सीमा, उत्तरेस गढा-मंडला सुभ्याची आणि दक्षिणेत चिचगड या हलबी जमीनदारीची सीमा होती. कामठा जमीनदारीच्या उत्तर-पश्चिम दिशेत कटंगी परगणा व शिवणी जहागीर आणि दक्षिण-पूर्व दिशेत राजनांदगावच्या मांडलिक राजाची सीमा होती. लांजी जमीनदारी ही खैरागडच्या मांडलिक राजाच्या अधिकारक्षेत्रात होती.

नागपूरच्या पश्चिमेकडील प्रदेशाला वऱ्हाड (Berar) म्हणतात. अत: वराड आणि वऱ्हाड या दोन शब्दांच्या बाबतीत संभ्रम निर्माण होवू नये, यासाठी वराड जमीनदारी कुठे होती, हे लक्षात घेणें आवश्यक आहे. वर्तमान काळात ''उत्तरेकडे खळबंदा (अथवा खैरबंदा) आणि दक्षिणेकडे बोदलकसा व चोरखमारा हे जलाशय आहेत. त्या भागात जी डोंगरमाला दक्षिणोत्तर पसरलेली आहे, तिला गायखुरी डोंगरमाला (Gaikhuri Range)असे म्हणतात. या डोंगरमालेच्या उत्तरेकडील गंगाझरी खळबंदा-दवनीवाडा या परिसरात मराठाकालीन वराड जमीनदारी (Warad Zamindari) अस्तित्वात होती''[2]

---

**1.** नागपूर राज्याचा अर्वाचीन इतिहास, डॉ.कोलारकर आणि पुरंदरे, पृष्ठ क्र.१६०

**2**. पूर्वोक्त, Bhandara District Gazetteer, P.13

## ८. बहेकार घराण्याचा उदय

कोलुबापू (कोयलबापू) हे कामठा जमीनदारीचे संस्थापक होत. त्यांचे आडनाव बाहेकर होते. बाहेकर घराण्याचे गोत्र-वशिष्ट, वंश-सूर्यवंश, कुलदैवत-तुळजा भवानी आणि ध्वज (निशाण वा पताका)-भगवा असून या वंशात काळे वस्त्र परिधान करणे वर्जित आहे.

बाहेकर घराण्याचे मूळ स्थान कर्नाटकातील चित्रदुर्ग हे असून हटेसिंग चव्हाण हा या घराण्याचा मूळ पुरुष होय. त्याचे वास्तव्य चित्रदुर्गला असून त्याच्या मुलाचे नाव बेनीसिंग चव्हाण असे होते. बेनीसिंगला राहोसिंग व जयसिंग अशी दोन मुले होती. यापैकी राहोसिंग हा चित्रदुर्ग येथेच राहिला. त्याचा लहान भाऊ जयसिंग हा चित्रदुर्ग सोडून मराठवाड्यामध्ये जालना (जि.जालना) येथे आला.

जयसिंग चव्हाणाला कृपालसिंग व मोहनसिंग अशी दोन मुले होती. मोठा भाऊ कृपालसिंग हा जालना येथेच राहिला. लहान भाऊ मोहनसिंग हा जालन्याहून बहापूर (जि. यवतमाळ) येथे आला. कालांतराने तो झाडीपट्टीत सौंदड येथे आला. बहापूरवरुन सौंदडला आल्यामुळे त्याने बाहेकर हे आडनाव धारण केले. तसेच झाडीपट्टीतील वास्तव्यामुळे त्याच्या घराण्याला 'झाडे कुणबी' अशी नवीन ओळख प्राप्त झाली.

नागपूरचे राजे रघूजी प्रथम यांची राजधानी इ.स.१७३७ पूर्वी यवतमाळ जिल्ह्यातील 'भाम' येथे असतांना मोहनसिंग हा त्यांच्या संपर्कात आला असावा व त्यांनीच त्याला बहापूरहून आणून सौंदडला सेनापती रघुजी करांडे यांची शेतीवाडी सांभाळण्यासाठी पाठविले असावे असे दिसते. कारण ''रघूजी प्रथम यांनी कर्नाटक, बंगाल व पश्चिम महाराष्ट्रातून अनेकांना नागपूर राज्यात आणून त्यांच्याकडे वेगवेगळ्या जबाबदाऱ्या सोपविल्या, याचे भरपूर दाखले भोसल्यांच्या इतिहासात उपलब्ध आहेत. इ.स. १८०३ च्या गाविलगडच्या लढाईत बेनिसिंग या राजपूत किल्लेदाराने खूप पराक्रम गाजविला. या बेनिसिंगचा मूळ पुरुष झामसिंग यालादेखील रघूजी प्रथम यांनी बंगालहून आणले होते. या बेनिसिंगाचे वंशज सध्या भैसदेही (बैतुल) येथे राहतात.[1] लक्षणीय बाब एवढीच की मोहनसिंगचा मुलगा कोलुबापू यांनी इ.स.१७५१ मध्ये कामठा जमीनदारीची स्थापना केली. येथून बाहेकर वंशाचे लोक चहुंकडे पसरले आणि लोक त्यांना बहेकार असे संबोधित करु लागले.

---

1. पूर्वोक्त, डॉ. कोलारकर आणि पुरंदरे, पृष्ठ क्र.१७५

बहेकार घराण्याचे लोक हे मूलत: कर्नाटकातील चित्रदुर्ग येथील आहेत. कुनबी समाजाचे अनेक लोक लढाईच्या निमित्ताने अथवा उदरनिर्वाहासाठी इ.स.६०० ते १८०० या काळात कर्नाटक व पश्चिम महाराष्ट्ररतूल झाडीपट्टीत येऊन स्थिर झाले. झाडीपट्टीतील त्यांच्या वास्तव्यामुळे त्यांना झाडे कुनबी म्हणतात. झाडीपट्टीत आल्यानंतर ते माहुरच्या रेणुका मातालाही कुलदैवत मानू लागले. येथे आल्यानंतर कुनबी समाजाच्या लोकांनी वेगवेगळ्या कारणांनी आपले मूळ आडनाव बदलून नवीन आडनाव धारण केल्यामुळे त्यांच्यात अनेक नवीन आडनाव निर्माण झाले. या सर्वांना झाडे कुनबी म्हणण्याचा प्रघात पडल्यामुळे झाडे कुनबीत अनेक आडनाव आढळून येतात.

## ९. रघुजी करांडेचे वरद्हस्त

रघुजी करांडे हे नागपूर राज्यातील अव्वल दर्ज्याचे सरदार होते. ''मराठ्यांच्या बखरीत राजे रघूजी प्रथमच्या मराठा, ब्राम्हण आणि प्रभू जातीच्या सरदारांची नावे नमूद आहेत. त्यात रघुजी करांडे यांचे नाव अग्रस्थानी आहे.''[1] रघूजी प्रथम आणि जानोजी या सुरुवातीच्या दोन्ही राजांची कारकीर्द ही त्यांच्या पराक्रमाने आणि मुत्सद्देगिरीने नटलेली आहे. रघुजी करांडे हे मराठा सरदार असून कोलुबापूंना कामठ्याची जमीनदारी प्राप्त झाली, त्यात त्यांचे फार मोठे योगदान आहे. रघुजी करांडेच्या हयातीत कामठा जमीनदारीवर त्यांचे वरद्हस्त होते.

मराठा शासनकाळात सरदारपद हे बहुतेक राजघराण्यातील नातेवाईकांच्या अथवा फार मोठ्या पराक्रमी व निष्ठावान व्यक्तीच्या वाटयाला येत असे. मध्ययुगात ही पद्धती देशविदेशात सर्वत्र रुढ होती. या लोकांना जहागिरी प्रदान केलेल्या होत्या अथवा त्यांना मामुली शेतसारा (खंडणी) घेवून जमिनी दिल्या जात. भोसलेशाहीत यांना 'मानकरी' म्हणत. या लोकांचा एक श्रेष्ठ गट असून तो फक्त राजालाच जबाबदार होता. त्याच्याकडे एखाद्या सुभ्याची जबाबदारी सोपविणे, त्याच्या हातून जुनी जबाबदारी काढून त्याला कोणतीही नवीन जबाबदारी सोपविणे अथवा त्याला जागेवरुन काढणे हे सर्वस्वी राजाच्या मर्जीवर अवलंबून होते. या लोकांना राजाकडून वेतन दिले जात असे. सुभेदाराच्या हाताखालच्या कर्मचाऱ्यांना पगार देण्याची जबाबदारी राजाची नसून सुभेदाराची होती.

नागपूरच्या राज्यात देवगड, गढामंडला, चंद्रपूर, वऱ्हाड, छत्तीसगड आणि कटक (ओडिशा) हे सुभे असून कामठा जमीनदारी ही देवगडच्या सुभ्यात होती.

1. पूर्वोक्त, डॉ. कोलारकर आणि पुरंदरे, पृष्ठ क्र.४७-४८

रघूजी प्रथम यांच्या काळात रघुजी करांडे हे देवगडचे सुभेदार असून त्यावेळी त्यांची जहागीर सौंदडला होती. जानोजींच्या शासनकाळात रघुजी करांडे यांना वऱ्हाडच्या रक्षणाची जबाबदारी सोपविण्यात आली. कोलुबापू बहेकार हे रघुजी करांडे यांचे दिवाण होते. ते सौंदडला रघुजी करांडे यांचा संपूर्ण कारभार सांभाळत असत. कोलुबापूंना कामठ्याची जमीनदारी कशी प्राप्त झाली, याची ही पार्श्वभूमी आहे. या पार्श्वभूमीमुळेच पुढे त्यांचा कामठा जमीनदारीचे संस्थापक म्हणून उदय घडून आला.

बंदोबस्त अहवालात कामठा जमीनदारीच्या उदयाचे वर्णन करतांना ''मि. लॉरेन्सने रघुजी करांडे यांचे नाव Raghuji Karundah असे नमूद केलेले असून त्यांना an officer about the Maratha court in Nagpur असे संबोधित केले आहे.''(The founder of the greatness of this family was originally an agent of Raghuji Karundah, an officer about the Maratha court in Nagpur whose estate of Sondar, lying about 30 miles east of Bhandara, and 70 miles from Nagpur he managed. This village is situated on the military road to Chhattisgarh.) अति विद्वत्तेचे हे लक्षण आहे अथवा परकियांच्या हातून असे घडणे स्वाभाविक होते, हे समजणे कठीण आहे. तथापि मराठ्यांच्या बखरीत ज्याचा उल्लेख रघुजी करांडे (Raghuji Karande) असा आहे त्यालाच मि. लॉरेन्सने बंदोबस्त अहवालात रघुजी करुंदा (Raghuji Karundah) असे संबोधित केले आहे, हे सुनिश्चित करण्यासाठी खूप परिश्रम घ्यावे लागले हे मात्र खरे आहे.

## १०. भोसले राजवंशाशी संबंध

कामठा जमीनदारी ही राजे रघूजी प्रथम यांची कृपा, जानोजींची पत्नी दर्याबाई हिचे वात्सल्य आणि रघूजी द्वितीय यांच्या स्नेहामुळे पूर्ण उमेदीने वाढली, बहरली आणि तिची ख्याती चहुंकडे दरवळली. ही बाब जाणून घेण्यासाठी नागपूरच्या राजांचा कालखंड आणि भोसले राजवंशाशी असलेले बहेकार घराण्याचे संबंध लक्षात घेणे आवश्यक आहे.

रघूजी प्रथम हे भोसले राजवंशातील सर्वश्रेष्ठ राजा होत. त्यांनीच नागपूर राज्याची स्थापना केली. देवगडची राणी रतनकुंवर ही त्यांना मानसपुत्र मानत होती. तिने नागपूर-भंडाऱ्याकडील सपाटीचा प्रदेश रघूजी प्रथमला दिल्यानंतर त्यांनी इ.स.१७३७ मध्ये नागपूरला आपली राजधानी बनविले. इ.स.१७२३ ते १७५५ हा त्यांचा शासनकाळ होय. त्यांच्यानंतर त्यांचा मुलगा जानोजी हा

सत्तेवर आला. इ.स.१७५५ ते १७७२ हा त्यांचा शासनकाळ होय. जानोजी नंतर त्यांचा पुतण्या रघूजी द्वितीय हा गादीवर आला. इ.स.१७७२ पासून १८१६ पर्यंत ते नागपूरचे राजा होते.

रघूजी द्वितीय यांच्या मुलाचे नाव परसोजी (इ.स.१७७८-१८१७) असून तो अपंग व मंदबुद्धीचा होता. दि. १४ एप्रिल १८१६ ते दि. १ फेब्रुवारी १८१७ पर्यंत तो नागपूरचा नाममात्र राजा होता. या काळात रघूजी द्वितीय यांचा पुतण्या आप्पासाहेब हा राज्यकारभार सांभाळत होता. यानंतर आप्पासाहेबांनी (इ.स.१७९६-१८४०) नागपूरचे राजपद बळकावले. आप्पासाहेब भोसले हे दि. २४ नोव्हेंबर १८१७ ते दि. ३० डिसेंबर १८१७ पर्यंत नागपूरचे राजा होते.

राजे रघूजी प्रथम यांनी इ.स.१७५१ मध्ये कोलुबापू बहेकार यांना कामठ्याची जमीनदारी बहाल केली. त्यानंतर होवून गेलेले राजे जानोजी यांना पुत्रोत्पत्ती न झाल्यामुळे त्यांची पत्नी राणी दर्याबाई ही कोलुबापूंचा मुलगा गोंदिबापू यास मानसपुत्र मानत असे. नागपूरचे तिसरे राजा रघूजी द्वितीय यांचा परसोजी नावाचा मुलगा अपंग होता. रघूजी द्वितीय यांचे परसोजीवर खूप प्रेम होते. पण, गोंदिबापूंचा मुलगा चिमणा बहादूर याच्या अंगभूत गुणामुळे रघूजी द्वितीय हे त्याला मानसपुत्र मानू लागले. अशाप्रकारे रघूजी प्रथम यांच्या काळात बहेकार घराण्याशी प्रस्थापित झालेले मधुर संबंध हे पुढेही तसेच कायम राहिले. इ.स.१८१८ च्या स्वातंत्र्य लढ्यात चिमणा बहादूर हे आप्पासाहेबांच्या खांद्याला खांदा लावून लढले, याच्या मुळाशी दोन राजघराण्यातील हे पारंपारिक संबंधदेखील कारणीभूत होते.

रेसिडेंट जेन्किन्सने एका अहवालात नमूद केले आहे की, चिमणा बहादूर हा नागपूरच्या राजाला माफक दराने खंडणी देत होता आणि त्याचे वडील गोंदिबापू यांच्याकडूनही पूर्वीचे राजा सक्तीने खंडणी वसूल करीत नसत. (He possessed a fertile territory of considerable extent, out of which he only paid a moderate quit rent to the Government; he had consequently amassed considerable treasure, besides having the reputation of possessing more left him by his father Gondi Patel, from whom the former Rajas could never extort it.)[1] नागपूरच्या सर्व राजांनी कामठ्याच्या जमीनदारांकडून शेतसारा वसूल करण्याच्या बाबतीत स्वीकारलेले हे उदार धोरण, दोन राजघराण्यातील मधुर संबंधांना प्रमाणित करते.

देवगडची राणी रतनकुंवर हिने प्रथम रघूजी यांना आपला तिसरा पुत्र मानून

---

**1.** Despatch No.38 of 10th January, 1819, Resident Jenkins

देवगड संस्थानातील एक तृतीयांश प्रदेश त्यांना स्वखुशीने दिला होता. हे उदाहरणदेखील मध्ययुगात मानसपुत्र मानण्याची पद्धती सामान्य होती याची साक्ष देते.

## ११. कवायती फौज

भोसलेशाहीत नागपूरचे राजा हे कोणत्याही व्यक्तीला जमीनदारीची सनद प्रदान करतांना त्याने आपल्या पदरी लष्कर बाळगणे आणि युद्धाच्या प्रसंगी राजाला लष्करी मदत पाठविणे अथवा लष्करासह युद्धात सामील होणे आवश्यक राहील, अशी अट सनदेत नमूद करीत असत. जमीनदाराने स्वत:जवळ स्वखर्चाने किती लष्कर बाळगावे, हे देखील त्या सनदेत नमूद असे. अत: मराठा शासनकाळात, युद्ध कौशल्य प्रत्येक जमीनदाराला अवगत असणे अपरिहार्य होते. म्हणून कामठ्याचे जमीनदार स्वत:जवळ लष्करफाटा, तोफा, दारुगोळा, हत्ती-घोडे व कवायती फौज बाळगत असत.

कामठ्याच्या उत्तर-पश्चिमेत वीस कि.मी. अंतरावर आज ज्या ठिकाणी भूयारटोला (काटी) हे गाव वसलेले आहे तेथील सपाट मैदानावर कामठा जमीनदारीची लष्करी छावणी होती. येथून उत्तर-पूर्वेस हट्टा, लिंगा व किरणापूर या जमीनदाऱ्या, आणि दक्षिण-पूर्वेस कामठा जमीनदारी होती. अत: या सर्वांच्या सुरक्षेच्या दृष्टीने लष्करी छावणीसाठी हे स्थान निवडण्यात आले होते. या ठिकाणी अजूनही लालसर दगडांनी बांधलेले एक मोठे भुयार (सुरुंग) जीर्णावस्थेत असून त्याच्या जवळच पश्चिम भागात एक मोठी बावली (विहीर) बुजलेल्या स्थितीत आहे. येथील भुयार, बावली आणि कामठ्याचा किल्ला हे तिन्ही एकाच प्रकारच्या आयाताकृती दगडांनी बांधलेले असून जुन्या वैभवशाली इतिहासाची साक्ष देतात.

## १२. जमीनदारांचा क्षात्रतेज

मराठा शासनकाळाचा संपूर्ण इतिहास हा निरंतर चालत राहणाऱ्या वेगवेगळ्या प्रकारच्या युद्धांनी व्याप्त आहे. त्यामुळे तत्कालीन जमीनदारांमध्ये क्षात्रतेज असणे आणि स्वसंरक्षणासाठी व आवश्यकतेच्या वेळी राजाला लष्करी मदत करण्यासाठी स्वत: जवळ खाजगी लष्कर बाळगणे आवश्यक होते. पण, ब्रिटिश काळात संपूर्ण संरक्षण व्यवस्था इंग्रजांच्या हाती केंद्रीत झाली. भारतातील जमीनदार वर्ग लष्करी जबाबदारीतून पूर्णपणे मुक्त व इंग्रजांवर निर्भर झाला. म्हणून मराठाकालीन जमीनदारांमध्ये जे युद्धकौशल्य व क्षात्रतेज राहत असे, ते

पुढे तसेच कायम राहिले नाही. कामठा जमीनदारीचे वैभव, सामर्थ्य व पराक्रम यांचे खरे स्वरुप लक्षात येण्यासाठी मराठाकालीन व ब्रिटिशकालीन जमीनदारांतील हा ठळक भेद लक्षात घेणे आवश्यक आहे.

## १३. बहेकार राजवटीचे महत्त्व

कामठा जमीनदारीचा इतिहास हा एका प्रभावशाली, वैभवशाली आणि दर्जेदार जमीनदारीचा इतिहास असून तो बहेकार राजवटीचा इतिहास आहे. इतिहास म्हटला की, त्यातून आपल्या पूर्वजांची जीवनपद्धती कळते. त्यांच्या जीवनातील सहयोग व संघर्षाचे स्वरुप कळते. विविधांगी विकासासाठी आणि संस्कृती व अस्मितेच्या रक्षणासाठी त्यांना किती संकटांचा सामना करावा लागला, विनाशकारी युद्ध आणि संकटातून समाजाची नौका त्यांनी कशाप्रकारे पुढे आणली, आणि नव्या पिढीच्या हाती ती कशा स्वरुपात सोपविली, या सर्व प्रयत्नात त्यांनी कोणत्या चुका केल्या आणि कोणते गौरवास्पद कार्य केले, याची माहिती मिळते आणि ती नव्या काळाच्या संदर्भातही पथप्रदर्शक ठरते. मध्ययुगीन कामठा जमीनदारी अथवा बहेकार राजवटीचा इतिहासदेखील या सर्व दृष्टिकोनातून जाणून घेण्यासारखा आहे.

■ ■ ■

# ३. कटक विजय आणि कामठ्याचा भाग्योदय

## १. जमीनदारीचा उदय केव्हा झाला ?

**म**हाराष्ट्राच्या पूर्व दिशेत असलेल्या ओडिशाला मराठा शासनकाळात 'कटक' असे संबोधित असत. मराठ्यांचे कटकशी जुने संबंध होते आणि त्यांनी येथे अनेक लढाया लढल्या. अशाच एका लढाईच्या वेळी सौंदडनिवासी कोलुबापू हे कटकला गेले आणि तेथून परत आल्यानंतर त्यांना नागपूरच्या राजाकडून कामठा जमीनदारी बहाल करण्यात आली, अशा स्वरुपात कामठा जमीनदारीच्या उदयाचा इतिहास उपलब्ध आहे. पण, ही जमीनदारी त्यांना नागपूरच्या कोणत्या राजाकडून, कोणत्या वर्षी उपलब्ध झाली, याची सुस्पष्ट नोंद कुठेच उपलब्ध नाही. अत: या प्रश्नाचे खरे उत्तर शोधण्यासाठी मराठ्यांच्या कटकवरील मोहिमा लक्षात घेणे आवश्यक आहे.

## २. दशवार्षिक युद्ध (१७४२–१७५१)

मराठा शासक रघूजी प्रथम यांनी १७३७ मध्ये नागपूरला राजधानी बनविली. त्या काळात बंगालच्या सुभ्यात बंगाल, बिहार व कटक असे तीन प्रांत असून अलिवर्दीखान हा बंगालचा सुभेदार होता. मोगल सम्राटाच्या वतीने बंगालच्या सुभ्यात त्याचे शासन होते. पण या सुभ्यातून चौथाई आणि सरदेशमुखी वसुल करण्याचा अधिकार दिल्लीच्या मोगल सम्राटाकडून छत्रपती शाहूला (सातारा) प्राप्त होता. त्याने तो अधिकार रघूजी प्रथमकडे सोपविला होता. यानुसार बंगालमधील एकूण महसुलीच्या रकमेतून २५ टक्के रक्कम चौथाईच्या स्वरुपात, आणि १० टक्के रक्कम सरदेशमुखीच्या स्वरुपात बंगालच्या नवाबाने रघूजी प्रथम यांच्याकडे पोहचते करणे आवशयक होते. पण तो ती रक्कम (१२ लाख रुपये) मराठ्यांना स्वखुशीने पाठवित नसे. म्हणून मराठ्यांना वारंवार कटकवर स्वारी करावी लागत असे. यामुळे १७४२ ते १७५१ या दहा वर्षांच्या काळात मराठ्यांचे अलिवर्दीखानाशी निरंतर युद्ध सुरु होते. या युद्धाला दशवार्षिक युद्ध म्हणतात.

मराठ्यांचे लष्करी सामर्थ्य जास्त असल्यामुळे अमोरासमोरच्या लढाईत त्यांना परास्त करणें अशक्य आहे, ही बाब लक्षात घेवून अलिवर्दीखानने १७४४ मध्ये षड्यंत्र करुन एकवीस मराठा सरदारांची हत्या करविली आणि बंगालमध्ये मोठा उत्सव (जश्न) संपन्न केला. सरदारांच्या हत्येमुळे व्यथित होवून स्वयं रघूजी

प्रथम यांनी १७४५ मध्ये चौदा हजार सैन्यासह बंगालवर आक्रमण केले. मराठ्यांची बंगालवरील ही चौथी व निर्णायक स्वारी होती. या स्वारीच्या वेळी बंगालचा नवाब परास्त झाला व त्याने १७५१ च्या तहानुसार संपूर्ण कटक प्रांत मराठ्यांना दिला. बंगाल व बिहार मधील चौथाई व सरदेशमुखीचा मराठ्यांचा अधिकार पूर्ववत् कामम राहिला.

बंगालमध्ये ज्या २१ मराठा सरदारांची हत्या झाली त्यात मराठ्यांचे सरसेनापती भास्करपंत कोल्हटकर यांचाही समावेश होता. भास्करपंताने १७४४ मधील बंगालच्या तिसऱ्या स्वारीच्या वेळी तिकडे जातांना छत्तीसगड जिंकून फार मोठे कार्य केले होते. यामुळे नागपूर व बंगाल यामधील दुवा जोडला गेला व पुढील स्वारीच्या वेळी त्याचा फार उपयोग झाला. कटक विजयानंतर रघूजी प्रथम यांनी १७५१ मध्ये नागपूरला एका भव्य विजयोत्सवाचे व सत्कार समारंभाचे आयोजन केले आणि नवाबने १७४४ मध्ये बंगाल येथे संपन्न केलेल्या भव्य उत्सवाला आपल्या धीरोदात्त शैलीने प्रत्युत्तर दिले. या समारंभात रघूजी प्रथम यांनी वऱ्हाडचा सुभा भास्करपंताची पत्नी ताराबाई यांना बहाल केला. तसेच त्यांनी भास्करपंताचे बंधु कोन्हेरराम यांना उदरनिर्वाहासाठी वंशपरंपरागत अशी दरसाल पंचवीस हजार रुपयांची व्यवस्था करुन दिली. असा मराठ्यांचा इतिहास उपलब्ध आहे.

## ३. शिवभट साठेचे बंड (इ.स.१७६१–६३)

रघूजी प्रथम यांच्यानंतर त्यांचा मुलगा जानोजी यांना नागपूरचे राजपद (१७५५–१७७२) प्राप्त झाले. रघूजी प्रथम यांच्या कटक विजयानंतर या प्रांताला नागपूर राज्याचा एक सुभा, अशी नवीन ओळख प्राप्त झाली होती. तेथील राज्यकारभार नागपूरच्या राजाद्वारे नियुक्त केलेला सुभेदार सांभाळत असे. जानोजी भोसले यांच्या काळात शिवभट साठे हा तेथील सुभेदार होता.

जानोजी हे नागपूरचे राजा झाल्यानंतर राज्यात जानोजी व मुधोजी या दोन भावात गृहयुद्ध सुरु झाले. या गृहयुद्धाला शस्त्रसंघर्षाचे स्वरुप प्राप्त झाले. हे गृहयुध्द १७५५ पासून थेट १७६१ पर्यंत सुरु होते. गृहयुद्धाच्या वेळी नागपूरचे सरदार, जानोजी समर्थक व मुधोजी समर्थक अशा दोन गटात विभक्त झाले होते. मराठा सरदार रघुजी करांडे हे जानोजींच्या पाठीशी खंबीरपणें उभे राहिले आणि त्यांच्यासाठी प्राणपणाला लावून अनेक लढाया लढले. दोन भावात सुरु झालेले हे युद्ध संपुष्टात यावे, यासाठी त्यांनी मध्यस्थ म्हणून महत्त्वाची भूमिकादेखील पार पाडली. या युद्धाची परिणती नागपूर राज्याच्या विभाजनात झाली. छत्तीसगड

आणि चंद्रपूरचे शासनविषयक अधिकार मुधोजीला प्राप्त होवून बाकीचे देवगड, गढामंडला, कटक व बरार हे सुभे जानोजींच्या अधिकार क्षेत्रात राहिले. या सर्व घटनांमुळे जानोजींचे कटककडे दुर्लक्ष होणे स्वाभाविक होते. याचा फायदा सुभेदार शिवभट साठे याने उठविला व १७६१मध्ये त्याने मराठा शासनाविरुद्ध बंड पुकारला. राजाची सत्ता झुगारुन त्याने स्वत:च्या मर्जीने कटकचा राज्यकारभार करणे सुरु केले.

कटकमधील बंड दडपून काढण्यासाठी जानोजीने स्वत:चा पुतण्या (मुधोजीचा मुलगा) खंडोजी उर्फ चिमणाजी भोसले यास कटकचा सुभेदार घोषित केले. चिमणाजी हा यावेळी बाल्यावस्थेत असल्यामुळे भवानीपंत काळू या सेनापतीला कटकचे बंड मोडून काढण्यासाठी तातडीने रवाना केले. भवानीपंताने शिवभट साठेचा हा बंड दडपून टाकला. गणेश संभाजी खांडेकर याला १७६४ मध्ये कटकचा सुभेदार बनविण्यात आले. भवानीपंत काळू हा इ.स.१७६८ मध्ये नागपूरला परत आला.

चिमणाजी भोसले हा यावेळेपासूनच कटकचा सुभदार होता. पण तेथील कारभार मात्र प्रत्यक्षात दुसऱ्या व्यक्तीला सुभेदार बनवून त्याच्या मार्फत चालविला जात असे. मध्ययुगात शासनाच्या बाबतीत असा प्रकारही प्रचलित होता.

## ४. इंग्रजांविरुद्ध अभियान (इ.स.१७७९)

जानोजी नंतर नागपूरला रघूजी द्वितीय हा सत्तेवर आला. त्यांचा शासनकाळ १७७२ ते १८१६ असा आहे. रघूजी द्वितीय हा मुधोजीचा मुलगा असून जानोजीने त्यास दत्तक घेतले होते. म्हणून जानोजी नंतर नागपूरचे राजपद त्याला प्राप्त झाले. तो राजा झाला त्यावेळी त्याचे वय अवघे बारा वर्षाचे होते. अत: त्यावेळी अज्ञानपालनकर्ता म्हणून नागपूरचा राज्यकारभार मुधोजी सांभाळत होते. रघूजी द्वितीय यांच्या शासनकाळातील महत्त्वपूर्ण घटनांपैकी, १७७९ मधील भारतीय शासकांचे इंग्रजांविरुद्ध अभियान ही एक होय.

जानोजींच्या काळातच भारतात इंग्रजांचा राजकीय उत्कर्ष सुरु झाला होता. इ.स.१७५७ च्या प्लासीच्या लढाईत फ्रेंच लोकांना पराभूत करुन त्यांनी संपूर्ण मद्रास प्रांतावर आपले अधिपत्य प्रस्थापित केले होते. इ.स.१७६४ च्या बक्सारच्या लढाईत त्यांनी बंगालचा नवाब सिराजउद्दौला, दिल्लीचा बादशहा शाहआलम आणि अवधचा नवाब शुजाउद्दौला यांच्या त्रिगुट सेनेचा पराभव करुन बंगाल व बिहार या दोन प्रांतावर आपले अधिपत्य प्रस्थापित केले होते. यानंतर मराठा

साम्राज्य व म्हैसूरचा हैदरअली हे त्यांचे प्रमुख लक्ष्य होते. त्यांनी इ.स.१७७९ मध्ये पेशव्यांची राजधानी पुण्यावर आक्रमण केले.

पुण्याच्या पेशवा दरबारातील प्रसिद्ध मुत्सद्दी नानासाहेब फडणीस यांनी इ.स. १७७९ मध्येच इंग्रजांविरुद्ध एक महान योजना आखली. या योजनेनुसार पुण्याचे पेशवा, नागपूरचे भोसले, ग्वाल्हेरचे शिंदे, हैदराबादचा निजाम आणि म्हैसूरचा हैदरअली या पाचही भारतीय शासकांनी एकाच वेळी आपआपल्या प्रदेशाकडे इंग्रजांच्या विरुद्ध युद्ध सुरु करावे व इंग्रजांच्या विस्तारवादाला आळा घालावा असे ठरले होते. या योजनेला सर्वांनी मान्यता दिली होती. योजनेनुसार इंग्रजांच्या विरुद्ध बंगालवर स्वारी करण्याची जबाबदारी नागपूर राज्याकडे आली होती.

मुधोजीने आपला मुलगा चिमणाजी भोसले यास नवेगावबांध येथे विधिवत् 'सेनाबहाद्दर' ही उपाधी प्रदान केली. त्यानंतर त्याने या चिमणा बहादूरला, भवानीपंत हा कुशल सेनापती सोबत देवून बंगालच्या स्वारीवर रवाना केले. मुधोजी हा इंग्रजधार्जिणी वृत्तीचा असल्यामुळे त्याने चिमणाजीला इंग्रजांविरुद्ध युद्ध न करण्याचे निर्देशही दिले होते. त्यामुळे चिमणाजी हा कटकला गेला, पण तिथे जावून त्याने इंग्रजांशी मैत्री केली.

इंग्रजांना बंगालमधील सैन्य हैदरअलीच्या कर्नाटकवर, आक्रमणाच्या उद्देशाने पाठविण्यासाठी कटकशिवाय अन्य मार्ग नव्हता. कारण बंगाल व कर्नाटकच्या मध्यभागी कटक आहे. कटक प्रांत हा मराठ्यांच्या अधिपत्याखाली होता. चिमणाजी भोसलेने एकतर योजनेनुसार इंग्रजांविरुद्ध युद्ध केले नाही, एवढेच नव्हे तर त्याने इंग्रजांच्या बंगालमधील लष्कराला हैदरअलीवर आक्रमण करण्यासाठी कटकमधून जाण्यास मदत केली. अशाप्रकारे चिमणाजी भोसलेने युतीशी विश्वासघात केला. हैदरअली मात्र शेवटपर्यंत इंग्रजांविरुद्ध लढला. त्याच्या मृत्युनंतर त्याचा पुत्र टिपू सुलतान याने देखील इंग्रजांविरुद्ध निकराने लढा दिला.

## ५. हा वेगळा चिमणा बहादूर!

मराठा शासनकाळात दोन चिमणा बहादूर होवून गेले. प्रथम, भोसले घराण्याचा अथवा नागपूरचा चिमणा बहादूर आणि दुसरा, बहेकार घराण्याचा अथवा कामठ्याचा चिमणा बहादूर. भोसले घराण्यातील चिमणा बहादूरच्या नावाने पूर्वी कटकची व नंतर गढा-मंडल्याची सुभेदारी होती. हा पराक्रमी असून याचे निधन इ.स.१७८९ मध्ये अल्पशा आजाराने झाले.

बहेकार घराण्यातील चिमणा बहादूरचा जन्म इ.स.१७८२ चा असून, हा

नागपूरच्या चिमणा बहादूरपेक्षा वयाने खूप लहान होता. राजकीय रंगमंचावर पहिल्या चिमणा बहादूरचा अस्त झाल्यानंतर, दुसऱ्या चिमणा बहादूरचा उदय घडून आला. यापैकी पहिल्या बहादूर कडून इ.स. १७७९ मध्ये देशद्रोहीपणाची वागणूक घडली होती. दुसऱ्या चिमणा बहादूरने इ.स.१८१८ मध्ये इंग्रजांविरुद्ध स्वातंत्र्य लढा पुकारला. स्वातंत्र्याचे उपासक असलेल्या चिमणा बहादूरचा इतिहास, हा या ग्रंथाचा विषय आहे.

## ६. कामठा जमीनदारीसंबंधी लॉरेन्सचे वर्णन

मि. लॉरेन्सने कामठा जमीनदारीच्या उदयासंबंधी बंदोबस्त अहवालात केलेले वर्णन खालीलप्रमाणे आहे -

''चिमणाजी भोसले हा कोलुबापूला घेवून कटकला गेला. राजा परत आल्यानंतर जेव्हा त्याने अनेक पोवार जातीच्या लोकांना राबण्यासाठी शेती बहाल केली तेव्हा त्याने कामठ्याकडील, त्यावेळी घनदाट अरण्याने व्याप्त असलेला, संपूर्ण प्रदेश कोलुबापूंच्या अधिकारात दिला.'' (Chimnaji Bhonsla took this Kunbi agent, by name Kolu, with him to Cuttuk. On the Rajas return, while he gave to many of the Powars lands to cultivate, to Kolu, he gave general authority over the whole of Kamtha, which at that time, was an uninhabited Jungle---)[1]

## ७. मि. लॉरेन्सच्या वर्णनावरील आक्षेप

बंदोबस्त अधिकारी मि. लॉरेन्सने कामठा जमीनदारीच्या उदयासंबंधी केलेले वर्णन पूर्णत: विश्वसनीय नाही. त्याची प्रमुख कारणे खाली देत आहे-

### ७.१ कालनिर्देशाकडे दुर्लक्ष

चिमणाजी भोसले हा कोलुबापूंना सोबत घेवून कटकला केव्हा गेला होता, याचा स्पष्ट उल्लेख लॉरेन्सने आपल्या वर्णनात केलेला नाही. त्यामुळे कामठा जमीनदारीचा उदय नेमका कोणत्या वर्षी झाला याचे समाधानकारक उत्तर या वर्णनावरुन कळत नाही.

### ७.२ बेफिकिरवृत्तीचे दर्षन

लॉरेन्सने ''चिमणाजी भोसले हा कोलुबापूंना सोबत घेवून कटकला गेला होता. राजाच्या परतीनंतर on the Rajas return त्याने कोलुबापूंना कामठ्याकडील प्रदेश बहाल केला.'' असे वर्णन केलेले आहे. या विधानात त्याने चिमणाजी

---

**1.** Settlement Report (1867), PP. 92-96.

भोसले आणि राजा हे दोन शब्द अगदी जवळजवळ वापरलेले आहेत. चिमणाजी भोसले हा केव्हाच नागपूरचा राजा नव्हता. त्याच्या नावाने कटकची सुभेदारी होती. अत: लॉरेन्सच्या या विधानावरुन त्याने यातील चिमणाजी भोसले आणि राजा यापैकी कोणता शब्द चुकीने वापरला आहे, हे सांगणे कठीण आहे. यामुळे सुविज्ञ वाचकांत संभ्रम निर्माण होणें स्वाभाविक आहे. लॉरेन्सने या विधानामुळे कामठा जमीनदारीच्या उदयासंबंधी स्वत:च्या विवेचनात स्वत:च शंकेचे बी पेरले आहे. यातून, त्याने कामठ्याच्या उदयाचे वर्णन करतांना ते बेफिकिरवृत्तीने अथवा निष्काळजीपणाने केलेले आहे हे उघडकीस येते. जो लेखक अथवा अधिकारी ग्रंथातील एखाद्या बाबतीत बेफिकिरवृत्तीने विधान करतो तेव्हा त्याच्या, निदान त्या विधानाची विश्वसनीयता संपुष्टात येते. लॉरेन्सने चिमणाजी भोसले आणि राजा यापैकी कोणता तरी एक शब्द चुकीने लिहून, कामठा जमीनदारीच्या उदयासंबंधी वर्णनात स्वत:ची विश्वसनीयता गमावली असून, याबाबत संशोधन करण्याचा मार्ग मोकळा करुन ठेवलेला आहे.

### ७.३ चुकीच्या नावाची नोंद

बहेकार घराण्याच्या वंशावलीत, कोलुबापूंचा मुलगा पांडुबापू हा इ.स.१७५६ च्या सुमारास आमगावचा जमीनदार होता, अशी स्पष्ट नोंद आहे. 'द मिल्कियत केस ऑफ मौजा आमगाव' या दाव्याच्या दि. ७ जुलै १८६६ च्या आदेशावरही आमगाव जमीनदारी ही लांजीच्या कमाविसदाराद्वारे कामठा जमीनदाराच्या मुलाला देवून ही जमीनदारी त्याच्या देखरेखीखाली सोपविण्यात आली होती, असे स्पष्टपणे नमूद असून या आदेशपत्रावर स्वत: ए.जे.लॉरेन्सची सही व शिक्का आहे. या आधारावर कामठ्याची जमीनदारी ही आमगाव जमीनदारीच्या पूर्वीच, रघूजी प्रथम यांच्या शासनकाळातच (इ.स.१७२३-१७५५) कोलुबापूंना मिळाली असा संकेत मिळतो. प्रस्तुत संशोधकाने कामठा, आमगाव, सालेकसा, पलखेडा, हट्टा, लिंगा, किरणापूर इ. ठिकाणी सध्या राहत असलेल्या कोलुबापूंच्या वंशावलीतील अनेक प्रबुद्ध लोकांशी भेटून, त्यांच्याकडून कामठा जमीनदारीच्या उदयासंबंधी परंपरागत माहिती जाणून घेतली. कोलुबापूंच्या वंशावलीतील लोकांच्या ओठांवर खेळत असलेली बहेकार घराण्याच्या उदयाची माहिती, आणि कालुबापूंच्या वंशावलीतील नोंदीत साम्य आढळून आले. त्यामुळे संशोधकाने या वंशावलीची विश्वसनीयता (Reliability) ग्राह्य केलेली आहे. ही वंशावली आणि मि. लॉरेन्सचे वर्णन अमोरासमोर ठेवले तर, त्याने राजे रघूजी प्रथम यांच्या

नावाऐवजी चुकीने चिमणाजी भोसले या नावाची नोंद केलेली आहे, हे स्पष्ट होते.

### ७.४ ऐतिहासिक तथ्यांशी विसंगत

हट्टा येथील बावली देवगडच्या गोंड राजाने १७ व्या शतकात बांधलेली आहे. अत: गोंड राजांच्या शासनकाळात हट्टा हे त्यांचे एक महत्त्वपूर्ण प्रशासकीय केंद्र होते. मराठा शासनकाळात हट्टा जमीनदारी ही कामठा जमीनदारीतील एक उप-जमीनदारी होती. यावरुन रघूजी प्रथम यांनी देवगड संस्थानावर १७३४ च्या सुमारास अधिपत्य प्रस्थापित करुन या प्रदेशात देवगड सुभ्याची निर्मिती केली, त्यानंतर काही काळातच त्यांनी कामठा-हट्टा या परिसराची जबाबदारी कोलुबापू बहेकार यांच्याकडे सोपविली असे दिसते. अत: १७५१ मध्ये (रघूजी प्रथम यांच्या कटक विजयानंतर) कामठा जमीनदारीचा उदय घडून आला, हे मत संयुक्तिक आहे.

लॉरेन्सच्या वर्णनानुसार (वर्णन याच ग्रंथाच्या पृ. क्र. ३३-३४ वर दिलेले आहे.) चिमणाजी भोसलेच्या हस्ते कोलुबापूंना कामठ्याची जमीनदारी प्राप्त झाली होती यावर विश्वास ठेवला तर मग, १७८८ मध्ये कामठा जमीनदारीचा उदय घडून आला, असे मानणे क्रमप्राप्त ठरते. हे मत मान्य केले की, १७३४ पासून १७८८ पर्यंत सुमारे ५० वर्षे, हट्टा जमीनदारीवर कोणत्या जमीनदाराचे शासन होते, हा एक निरर्थक प्रश्न उपस्थित होतो, आणि इतिहासाच्या सुसंगत मांडणीमध्ये अडथळा उत्पन्न करतो. अत: १७८८ मध्ये (चिमणाजी भोसलेच्या इंग्रजांविरुद्ध मोहिमेनंतर) कामठा जमीनदारीचा उदय घडून आला, हे मत कदापि मान्य करता येत नाही. लॉरेन्सचे वर्णन, हे हट्टा जमीनदारीविषयक वरील ऐतिहासिक तथ्याशी विसंगत आहे.

### ७.५ ऐकीव माहितीचा आधार

इंग्रजांनी इ.स. १८१८ मध्ये नागपूर राज्यावर अधिपत्य प्रस्थापित केले. कामठा जमीनदारीच्या उदयाची घटना, नागपूर राज्यात इंग्रजांच्या आगमनापूर्वीची आहे. मि. लॉरेन्सने इ.स. १८६७ मध्ये बंदोबस्त अहवाल तयार केला. कामठा जमीनदारीचा उदय आणि बंदोबस्तचा काळ यात शंभर वर्षापेक्षाही जास्त अंतर आहे. अत: लॉरेन्सने कामठा जमीनदारीच्या उदयाचे वर्णन ऐकीव माहितीच्या आधारे केले असावे. त्यामुळेही त्याच्या या नोंदीत चूक घडून येण्याची शक्यता आहे.

**७.६ फंदफितुरीला झुकते माप**

इंग्रज अधिकाऱ्यांनी, जे भारतीय शासक त्यांच्या फंदफितुरीला बळी पडून त्यांच्या साम्राज्यवादी धोरणाला साहाय्यक ठरले त्यांची तरफदारी करणे आणि श्रेष्ठ भारतीय शासकांच्या चांगल्या कार्यावर पांघरुण घालणे स्वाभाविक आहे. ''गव्हर्नर जनरल हेस्टिंग्जने साताऱ्याच्या छत्रपतीची गादी तुझ्यासाठी मिळवून देवू असे खोटे आश्वासन इ.स. १७७९ मध्ये चिमणाजी भोसलेला देवून त्याला आपल्याकडे वळविले होते. म्हणून त्यावेळी चिमणाजीने नानासाहेब फडणविसांचा विश्वासघात करुन इंग्रजांना सर्वतोपरी मदत केली होती.''[1] कदाचित ही घटना लॉरेन्सच्या डोक्यात घोंघावत असल्यामुळे त्याने बंदोबस्त अहवालात कामठा जमीनदारीच्या उदयाचे वर्णन करतांना महान रघूजी प्रथम यांच्या या श्रेष्ठ कार्याचे श्रेय, चिमणाजी (खंडोजी) भोसले या विश्वासघाती–देशद्रोही माणसाच्या खात्यात जमा करण्याचा लांछणास्पद प्रकार केला असेल, असा संशय येतो.

**७.७ हे क्षणभंगूर स्वप्न नव्हे!**

मि. लॉरेन्सने कामठा जमीनदारीच्या उदयासंबंधी वर्णनात कोलुबापू, गोंदिबापू आणि चिमणा बहादूर यांच्या कर्तबगारीचा काळ इ.स.१७८८ ते इ.स.१८१८ असा नमूद केलेला आहे. (They exercised authority from Lanji hills in the north, to the Baghnadi where it crosses the Great Eastern Road in the south, over an area containing about one thousand square miles. They thus continued for 30 years from 1788 to 1818 A.D.) यानुसार कामठा जमीनदारीचा शासनकाळ हा फक्त ३० वर्षाचा (१७८८ ते १८१८) असून, क्षणभंगूर पाण्याच्या बुडबुड्यांसारखा कामठा येथे बहेकार घराण्याचा उदय व अस्त घडून आला. अत्यल्प काळात कामठा येथे बहेकार घराण्याचे तीन जमीनदार भराभर सत्तेवर आले, आणि पाहता–पाहता राजकीय रंगमंचावरुन अदृश्य झाले. ही जमीनदारी एवढी अल्पायुषी होती की फक्त एका पिढीच्या लोकांनी कामठ्यातील बहेकार घराण्याची जमीनदारी पाहिली व अनुभवली, असे मानणे क्रमप्राप्त ठरते. त्यामुळे कामठा जमीनदारीचा इतिहास हा क्षणभंगूर स्वप्नासारखा अथवा एखाद्या परीकथेतील कल्पनेसारखा वाटू लागतो, आणि मि. लॉरेन्सच्या तत्संबंधी नोंदीसमोर प्रश्नचिन्ह उपस्थित होतो.

## ८. कामठा जमीनदारीसंबंधी प्रचलित मान्यता

बहेकार वंशातील अनेक लोक आजही सांगतात की, कटक विजयानंतर

---

1. पूर्वोक्त, डॉ. कोलारकर आणि पुरंदरे, पृष्ठ क्र. १४०–१४१

नागपूरला भव्य उत्सवाचे (जश्न) आयोजन करण्यात आले होते. त्या उत्सवात कोलुबापूंचा जरीचा फेटा आणि तलवार देवून सत्कार करण्यात आला होता व त्याच वेळी नागपूरच्या राजाने त्यांना कामठ्याची जमीनदारी बहाल केली होती.

कामठा जमीनदारीच्या उदयासंबंधी प्रचलित मान्यता कर्णपरंपरेवर आधारित आहे. हा या मान्यतेचा कमकुवत बिंदू आहे. पण, कटक विजयानंतर नागपूरला भव्य विजयोत्सव संपन्न झाले होते, याचे अनेक पुरावे मराठ्यांच्या इतिहासात उपलब्ध आहेत. अत: राजे रघूजी प्रथम यांच्या हातून कोलुबापूंचा सत्कार होवून, त्यांना त्याचवेळी कामठा जमीनदारी प्राप्त होण्याची शक्यता एकदम नाकारता येत नाही.

## ९. कोलुबापूंच्या वंशावलीवर दृष्टिक्षेप

कोलुबापूंच्या वंशावलीत त्यांचा स्वत:चा शासनकाळ नमूद नाही, हा या वंशावलीचा कमकुवत बिंदू आहे. पण या वंशावलीत इ.स.१७५६ मध्ये त्यांचा मुलगा पांडुबापू हा आमगावचा जमीनदार होता, असे दर्शविण्यात आले आहे. यातून, कोलुबापूंना कामठ्याची जमीनदारी इ.स.१७५६ पूर्वी प्राप्त झालेली होती, असा स्पष्ट संकेत मिळतो. नागपूरला इ.स.१७५५ पर्यंत रघूजी प्रथमचे शासन होते, हे लक्षात घेता त्यांनीच कोलुबापूंना कामठ्याची जमीनदारी बहाल केली होती असे दिसते.

बहेकार घराण्याची वंशावली आणि कामठा जमीनदारीच्या उदयासंबंधी प्रचलित मान्यता हे दोन्ही स्त्रोत परस्पर मेळ खातात. त्यामुळे ते एक दुसऱ्याला शक्ती प्रदान करतात. अत: ते लॉरेन्सच्या वर्णनापेक्षा जास्त विश्वसनीय वाटतात.

## १०. ऐतिहासिक घटनांचा मागोवा

कामठा जमीनदारीच्या उदयाचे कालनिर्धारण करण्यासाठी खालील ऐतिहासिक घटना लक्षणीय आहेत–

१. कोलुबापू हे मराठा सरदार रघुजी करांडे यांची सौंदडला असलेली शेतीवाडी सांभाळत. रघुजी करांडे हे राजे रघूजी प्रथमच्या काळात देवगडचे सुभेदार होते. कामठा जमीनदारी ही देवगडच्या सुभ्यात असल्यामुळे, ही जमीनदारी रघूजी प्रथम यांच्या काळातच (१७२३–१७५५) कोलुबापूंना प्राप्त झाली असावी.

२. इंग्रजांचा बीमोड करण्यासाठी चिमणाजी भोसले हा इ.स.१७७९ मध्ये बंगालच्या स्वारीवर चाळीस हजार सैन्य घेवून गेला होता. या स्वारीच्या

वेळी त्याने नाना फडणविसांचा विश्वासघात करुन इंग्रजांशी हातमिळवणी केली. तो या स्वारीवरुन इ.स.१७८० मध्ये परत आला. ''तो नागपूरला परत येताच त्याचे वडील मुधोजी यांनी स्वत: पुण्याला जावून बंगालमध्ये झालेल्या प्रकाराबद्दल नाना फडणीसांची माफी मागितली. यापुढे आपण मराठ्यांविरूद्ध इंग्रजांना मदत करणार नाही, असे देखील त्याने यावेळी कबुल केले. बंगालच्या स्वारीनंतर चिमणाजी भोसलेच्या हातून कटकची सुभेदारी काढून त्याच्याकडे गढामंडल्याची सुभेदारी देण्यात आली.''[1]

उपरोक्त सगळी पार्श्वभूमी लक्षात घेता बंगालवरील दिखावटी, विश्वासघाती आणि देशद्रोहाच्या कलंकाने कलंकित स्वारीनंतर नागपूरचे तत्कालीन राजा रघूजी द्वितीय यांनी कोलुबापूंना कामठ्याची जमीनदारी बहाल केली असेल, या गोष्टीवर प्रस्तुत संशोधकाचा अजिबात विश्वास नाही. कामठा जमीनदारीच्या उदयासंबंधी मि. लॉरेन्सचे वर्णन हे त्याच्या लेखनचातुर्याचे आणि चुकीचा इतिहास लिहून भारतीयांच्या डोळ्यात धूळ कशी टाकायची या तत्कालीन इंग्रजांच्या रक्तात भिनलेल्या प्रवृत्तीचे नमूनेदार उदाहरण आहे, असे संशोधकाला मन:पूर्वक वाटते.

३. रघूजी प्रथम हे एक महान राजा होते. त्यांच्या शासनविषयक धोरणाचे विस्तार आणि विकास हे दोन मुख्य ध्येयबिंदू होते. नागपूर राज्यातील कृषी आणि हातमागावरील वस्त्रनिर्मितीच्या उद्योगाच्या विकासात त्यांचे फार मोठे योगदान आहे. त्यांनीच पश्चिम महाराष्ट्रातून अनेक शेतकरी व विणकर कुटुंबाना नागपूर राज्यात आणून प्रस्थापित केले. याला इतिहास साक्षी असून त्यांच्या या कार्याची दखल नागपूर व भंडारा जिल्हा गॅझेटिअरमध्ये घेण्यात आली आहे. याउलट, चिमणाजी भोसलेने नागपूर राज्याच्या विकासात योगदान दिल्याचे एकही उदाहरण इतिहासात दिसत नाही.

वरील वस्तुस्थितीच्या प्रकाशात प्रस्तुत संशोधकाचे प्रामाणिक मत आहे की, कामठा जमीनदारीच्या उदयाचा संबंध राजा रघूजी प्रथम यांच्या स्वर्णिम काळाशी असून कटक विजयानंतर इ.स.१७५१ मध्ये त्यांनी नागपूरला भव्य विजय महोत्सव व सत्कार समारंभाचे आयोजन करुन, पुरुषार्थपूर्ण कार्य करणाऱ्या अनेक सरदार, शिपाई व त्यांच्या परिजनांना वतन बहाल केले, त्याचवेळी त्यांनी कोलुबापूंना कामठा जमीनदारी बहाल केली.

---

**1**. पूर्वोक्त, डॉ.कोलारकर आणि पुरंदरे, पृष्ठ क्र.१४६

४. ''कामठ्याच्या जमीनदारांनी लांजी पासून देवरी-शिरपूर पर्यंतच्या सुमारे एक हजार चौ.मैल एवढ्या व्यापक प्रदेशातील घनदाट अरण्याने व्याप्त प्रदेशाचा कायापालट करविला. या प्रदेशात नवीन गावे वसविली व शेतीचा विकास घडवून आणला. त्यांनी हट्टा, लिंगा, किरणापूर, धनसुआ, बिंजली इ. अनेक नवीन जमीनदाऱ्यां निर्माण केल्या व संपूर्ण परगणा कामठ्याचा, वाखाणण्यायोग्य आर्थिक विकास घडवून आणला. त्यांनी या जमीनदारीला आर्थिक व लष्करी दृष्ट्या शक्तिशाली बनविले. म्हणूनच ही जमीनदारी इ.स.१८१८ मध्ये इंग्रजांच्या विरोधात उभी ठाकली.''

एकीकडे उपरोक्त ऐतिहासिक तथ्य (Historical facts) लक्षात घेतले व दुसरीकडे इ.स. १७८८ ते १८१८ हा कामठा जमीनदारीचा शासनकाळ होता, हे मि. लॉरेन्सचे वर्णन नजरेखालून घातले की, मग जुन्या काळात आधुनिक तंत्रज्ञानाचा पूर्णपणे अभाव असतांना फक्त ३० वर्षे एवढ्या अल्पावधीत कोणतीही जमीनदारी एवढा नेत्रदीपक उत्कर्ष संपादित करुन इंग्रजांच्या विरोधात उभी राहू शकत नाही, याची मनोमन खात्री पटते. अत: राजे रघूजी प्रथम यांच्या हयातीतच कामठा जमीनदारी अस्तित्वात आली असून कटकवरील विजयानंतर, इ.स. १७५१ ते इ.स.१८१८ या सुमारे सत्तर वर्षांच्या प्रदीर्घ काळात कामठ्याला बहेकार जमीनदारांचे शासन होते, हे आपणास नि:संकोचपणे, नि:संदिग्धपणे आणि मनात तिळमात्र शंका कायम न ठेवता मान्य करावे लागते.

## ११. निष्कर्ष (Conclusion)

कामठा जमीनदारी कोलुबापूंना कोणाकडून प्राप्त झाली, याबाबत मि. लॉरेन्सने केलेले वर्णन म्हणजे कामठा दरबारच्या (Kamtha House) उदयाचा प्रामाणिक इतिहास नव्हे. मि. लॉरेन्सचा बंदोबस्त अहवाल हा कामठा जमीनदारीच्या इतिहासाचा एक महत्त्वपूर्ण स्त्रोत असला तरी त्याच्या मर्यादा लक्षात घेणे आवश्यक आहे. समुद्रमंथनातून अमृत गवसले होते, त्याप्रमाणे विभिन्न साधनसामुग्रीच्या माध्यमातून एखाद्या विषयाचे सखोल ज्ञान संपादन करुन जेव्हा तर्कशुद्ध पद्धतीने वैचारिक मंथन केले जाते, तेव्हा 'सत्यम्-शिवम्-सुंदरम्' असे अमृतमय व आनंदमय सत्य हाती गवसत असते आणि त्यातून खरा, प्रामाणिक (Authentic) इतिहास समाजासमोर येतो.

या प्रकरणात मराठ्यांच्या कटकवरील सर्व स्वाऱ्यांचे चित्र आणि चरित्र

कर्तव्यकठोरतेने तपासून, कामठा जमीनदारीसंबंधी सर्व ऐतिहासिक साधनांची समीक्षा करुन आणि ऐतिहासिक घटनांचा मागोवा घेत कोलुबापूंना कामठा जमीनदारी ही इंग्रजांवर भारावून गेलेल्या खंडोजी उर्फ चिमणाजी भोसले याच्या कलंकित हाताने इ.स. १७८८ मध्ये नव्हे, तर नागपूरचे परम्प्रतापी महान राजा रघूजी प्रथम यांच्या करकमलाद्वारे इ.स.१७५१ मध्ये प्राप्त झाली होती, असे मत निष्कर्ष स्वरुपात याठिकाणी ठामपणे मांडत आहे.

# ४. कोलुबापू : एक कर्तबगार जमीनदार

## १. कामठा जमीनदारीचे संस्थापक

**को**लुबापू हे कामठ्याच्या बहेकार जमीनदारीचे संस्थापक असून इ.स.१७५१ ते इ.स. १७८८ हा त्यांचा शासन काळ होय. त्यांच्या अधिकारक्षेत्रात वर्तमान बालाघाट व गोंदिया जिल्ह्यातील सुमारे एक हजार चौरस मैल एवढा व्यापक प्रदेश होता. या विशाल प्रदेशावर व्यवस्थितपणे शासन करता यावे व संपूर्ण प्रदेशाला 'सुजलाम् सुफलाम्' करता यावे यादृष्टीने, कोलुबापूंनी या क्षेत्रात अनेक अन्य जमीनदाऱ्या निर्माण करुन तेथे नवीन जमीनदार नियुक्त केले. कालांतराने मराठा शासनाकडून कोलुबापूंच्या अधिकारक्षेत्राखालील प्रदेशाला स्वतंत्र परगण्याचा दर्जा प्राप्त होवून या प्रदेशाला 'कामठा परगणा' अशी नवीन ओळख प्राप्त झाली.

परगणा कामठ्यातील सर्व जमीनदार हे कोलुबापूंद्वारे प्रदत्त (Delegated) अधिकारांचा वापर करीत. स्वाभाविकतः या सर्व जमीनदारांपेक्षा कोलुबापूंचे स्थान श्रेष्ठ होते. त्यामुळे एकाचवेळी कोलुबापूंना कामठ्याचे जमीनदार आणि परगणा कामठ्यातील सर्व जमीनदारांचे सर्वोच्च जमीनदार असा दुहेरी सन्मान प्राप्त झाला. त्यामुळे नागपूरच्या भोसले दरबारात त्यांना एक वेगळे वजन प्राप्त होवून, एक कर्तबगार जमीनदार म्हणून जनमानसात त्यांची प्रतिमा साकारली. मध्ययुगीन मराठा राज्यात कोलुबापूंच्या तोडीचा एकही जमीनदार शोधूनही दिसून येत नाही.

## २. जन्म आणि बालपण

कोलुबापूंचे जन्मस्थान सौंदड असून त्यांचे बालपण येथेच घडले. त्यांचा जन्म केव्हा झाला, याबाबत कोणताही लिखित पुरावा उपलब्ध नाही. पण, त्यांच्या वंशावलीत त्यांचा मोठा मुलगा पांडुबापू हा इ.स.१७५६ मध्ये आमगावचा जमीनदार झाला असे नमूद आहे. यावेळी पांडुबापूंचे वय अंदाजे वीस वर्षाचे असावे, आणि कोलुबापूंना प्रथम संतानोत्पत्ती त्यांच्या वयाच्या विसाव्या वर्षी झाली असेल असे गृहीत धरल्यास, ज्यावेळी त्यांचा मोठा मुलगा आमगावचा जमीनदार बनला त्यावेळी कोलुबापूंचे वय सुमारे चाळीस वर्षाचे असावे, असा अनुमान काढता येतो. यावरुन कोलुबापूंचा जन्म इ.स. १७१५ च्या सुमारास झाला असावा असे दिसते. कोलुबापूंचा इतिहास वाचकांना समजणे सोयीचे व्हावे यादृष्टीने येथे त्यांचा संभाव्य जन्मकाल नमूद केलेला आहे.

कोलुबापूंचे जन्मगाव सौंदड हे भंडाऱ्याच्या पूर्वेला तीस मैल अंतरावर असून ते नागपूरच्या पूर्वेला सत्तर मैल अंतरावर आहे. हे गाव नागपूरहून रायपूरकडे जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावर आहे. मराठ्यांच्या शासनकाळात या मार्गावर पक्की सडक नव्हती. पण हा मार्ग मराठ्यांचा लष्करी मार्ग (Military road) होता. बंगालमधील चौथाई आणि सरदेशमुखीची रक्कम वसूल करण्यासाठी याच मार्गाने मराठ्यांचे सैन्य छत्तीसगडमध्ये प्रवेश करीत असे व नंतर तेथून बंगालकडे जात असे. सुमारे एक हजार मैलाचा हा प्रवास मराठा सैन्य घोड्यांच्या साहाय्याने करीत असे. कोलुबापूंचे वास्तव्य सौंदडलाच असल्यामुळे त्यांनी बालपणापासूनच मराठ्यांच्या प्रचंड लष्कराची हलचल जवळून पाहिली होती आणि युद्ध व राजकरणाचे बारकावे जाणून घेतले होते. युवावस्थेत पदार्पण करताच मराठा सरदार रघुजी करांडे यांच्याकडे ते दिवाण म्हणून नियुक्त झाले आणि त्यांचा सौंदड येथील संपूर्ण कारभार व शेतीवाडी सांभाळू लागले.

## ३. व्यक्तिमत्त्वाची घडवणूक

कोलुबापूंचे मूळ नाव कोयलबापू असे होते. पण ते कोलुबापू या नावानेच विख्यात झाले. त्यांनी बालपणापासूनच कुटुंबातील वडीलधाऱ्या व्यक्तींकडून आणि मराठा सरदार रघुजी करांडे यांच्या मुखारबिंदुतून युध्दाचे अनेक प्रसंग ऐकले होते. त्यामुळे पुरुषार्थाचे संस्कार त्यांच्या कोवळ्या मनावर झालेले होते. अत: सौंदडवरुन होणारी मराठ्यांची लष्करी हलचल पाहतांना आपणही मोठे झाल्यावर रणांगणात पराक्रम गाजवू, असे स्वप्न बालक कोयल मनोमन रंगवू लागला. युवावस्थेत पदार्पण करताच कोलुबापूंनी दांडपट्टा, कुस्ती, अश्वारोहण, गजारोहण, तलवारबाजी व युद्धकौशल्य अंगी बानवून घेतले.

## ४. दशवार्षिक युद्धात सहभाग

बंगालमध्ये नवाब अलिवर्दीखानाचे शासन होते. पण येथून चौथाई आणि सरदेशमुखीच्या स्वरुपात वार्षिक बारा लाख रुपये वसूल करण्याचा अधिकार नागपूरचे राजा रघूजी प्रथम यांना प्राप्त होता. नवाब ही रक्कम मराठ्यांना स्वखुशीने देत नसे. त्यामुळे बंगालमध्ये नवाब विरुद्ध मराठे असा संघर्ष सुरु झाला. हे युद्ध बंगालमध्ये इ.स.१७४२ पासून इ.स.१७५१ या दहा वर्षेपर्यंत निरंतर सुरु होते. म्हणून या युद्धाला दशवार्षिक युद्ध म्हणतात.

मराठ्यांना अमोरासमोरच्या लढाईत परास्त करणे हे नवाबाला अशक्य वाटल्यामुळे त्याने मराठ्यांची डोकेदुखी कायमची नाहिशी व्हावी या उद्देशाने एक

षड्यंत्र करुन सरसेनापती भास्करपंतासह अन्य एकेवीस मराठा सरदारांची हत्या करविली. आपल्या सरदारांच्या क्रूर हत्येने व्यथित होवून रघुजी प्रथम हे इ.स. १७४५ मध्ये नागपूर राज्यात असलेले उरलेसुरले सर्व सरदार व चौदा हजार लष्कर घेवून सौंदड, रायपूर, रतनपूर, संबलपूर या मार्गाने कटकला गेले व त्यांनी तेथे नवाबाच्या विरोधात निर्णायक लढाई सुरु केली. या स्वारीच्या वेळी रघूजी प्रथम हे रघुजी करांडे व कोलुबापूंना देखील युद्धावर घेवून गेले होते. इ.स. १७५१ मध्ये मराठ्यांनी कटकवर आपला ताबा प्रस्थापित करुन तेथील वाड्यावर व बाराभाटीच्या किल्यावर जरिपटका व भगवा ध्वज फडकविला.

मराठ्यांच्या शासनकाळात कटकवरील लढाईवर वर्तमान गोंदिया-बालाघाट जिल्ह्यांकडून एकमात्र कोलुबापू बहेकार हेच गेले होते असे नाही. त्या लढायांच्या काळात, या भागाकडील सगळ्याच समाजाचे लोक मराठ्यांच्या लष्करात भरती होत असत व कटकवरील लढाईवर जात असत. पोवार समाजाच्या लोकांनी देखील या लढायांच्या काळात महत्त्वपूर्ण योगदान दिले. काळ निघून गेला, अन् काळाबरोबर सगळ्या घटना लोकांच्या चर्चेतून नाहीशा झाल्या. पण 'जो गया कटक, वो गया लटक' असा एक वाक्य प्रस्तुत लेखकाने बुजुर्ग लोकांकडून बालपणात ऐकला होता. याचा अर्थ विचारल्यानंतर 'जो कटकच्या लढाईवर गेला तो तिकडचाच होवून जात असे. लढाईत जीवंत राहण्याची व तो पुन्हा परत येण्याची शक्यता कमी असे.' असा त्याचा अर्थ संबंधीत व्यक्तींनी सांगितला होता. प्रस्तुत ग्रंथ साकारतांना हे वाक्य मनात घोंघावत असे आणि दशवार्षिक युद्धाची भयानकता जाणवत असे.

## ५. नागपूरला विजयोत्सवाचे आयोजन

नागपूरचे राज्य आणि बंगालचा नवाब यांच्यात इ.स.१७५१ मध्ये नागपूर येथे एक तह घडून आल्यामुळे दशवार्षिक युद्ध संपुष्टात आले. या तहानुसार, कटक प्रांत पूर्णत: मराठ्यांच्या ताब्यात आला. बंगाल आणि बिहार या प्रांतातून चौथाई आणि सरदेशमुखी वसुल करण्याचा मराठ्यांचा अधिकार पूर्ववत् कायम राहिला. कटकवरील विजयामुळे नागपूर राज्याची पूर्वीय सीमा ही थेट बंगालच्या उपसागराला जाऊन भिडली, आणि संपूर्ण भारतात मराठ्यांचा एक महाशक्ती म्हणून उदय घडून आला.

कटकमधील नवाबाच्या वाड्यावर आणि तेथील बाराभाटीच्या किल्ल्यावर मराठ्यांचे जरीपटका आणि भगवा ध्वज फडकल्यामुळे रघूजी प्रथम यांनी लगेच

नागपूरला विजयोत्सवाचे आणि सत्कार सोहळ्याचे भव्य आयोजन केले. विजयोत्सवाच्या प्रसंगी समोर राजसिंहासनावर राजे रघूजी प्रथम विराजमान होते. राजसिंहासनासमोरिल एका बाजूस, कटक येथे सरसेनापतीसह ज्या एकवीस मराठा सरदारांनी आत्माहूती दिली त्यांचे परिजन विराजमान होते. यात भास्करपंत कोल्हटकर, अलीकखान, यशवंतराव गुजर, निलकंठराव मोहिते, दादाजी भोसले, बापूजी महाडिक, शहा महमदखा, मानाजी भोसले, नारायण भोसले, संभाजी भोसले, कृष्णराव निंबाळकर, बापुजी कदम, श्रीपतराव मेहकर, व्यंकटराव भाऊ, दाजीबा पाटणकर, यशवंतराव शिर्के, गोविंदराव शेलकर, सटवाजी जाधव, शिवाजी जामदार, सुभानजीराव, नाना बक्षी आणि ज्योतिबा कारभारी यांच्या परिजनांचा समावेश होता. याच बाजूला नागपूर राज्याचे सर्व मुत्सद्दी आणि रघुजी करांडेसह सर्व सुभेदार व सेनापती विराजमान होते. राजसिंहासनासमोरील दुसऱ्या बाजूस कोलुबापू बहेकार आणि दशवार्षिक युद्धाच्या वेळी ज्यांनी अद्‌भुत पराक्रम गाजविले असे सर्व मराठा लष्करी अधिकारी व सैनिक विराजमान होते.

रघुजी करांडे आणि कोलुबापू बहेकार यांना या विजयोत्सवात मानाचे स्थान, त्यांनी दशवार्षिक युद्धात दिलेल्या अतुल्य योगदानामुळे व पराक्रमामुळे प्राप्त झालेला होता.

## ६. सत्कार समारंभ

नागपूरला महाल येथील राजवाड्याचे प्रवेशद्वार विजयोत्सव आणि सत्कार समारंभाच्या पावन प्रसंगी चकाकणाऱ्या रेशमी पडद्यांनी, आम्रपर्णांच्या तोरणांनी आणि विविधरंगी रांगोळी घालून सजविलेला होता. फक्त राजवाडाच नव्हे तर संपूर्ण नागपूर नगर या दिवशी घरोघरी प्रवेशद्वारांवर लावलेल्या आम्रपर्णांच्या तोरणांनी आणि अंगणात व गल्लोगल्लीत काढलेल्या रांगोळ्यांनी शोभायमान झालेला होता. भोसल्यांची राजधानी नागपूर येथे सर्वत्र आनंदाचे वातावरण पसरले होते. राजदरबारातील आनंदाला तर पारावर नव्हतेच पण, नागपूरमध्ये उत्सवानिमित्त जमलेल्या जनसागराला त्यादिवशी जणूकाही आनंदाची भरती आलेली होती. रणदुंदुभी, रणसिंग आणि नगाड्यांच्या आवाजासोबतच शहनाईची मधुर गुंज वातावरणात गुंजत होती. राजदरबारासह संपूर्ण राजधानीत सुंगधीत धूपचा मधुर गंध दरवळत होता. भोसले राजवटीसाठी दाहिदिशा मंगलमय झालेल्या आहेत, असे तेथील वातावरण होते.

राजवाड्यातील वाद्यवादन शुभघडी आणि शुभमुहूर्तावर थांबले. सत्कार समारंभाला सुरुवात झाली. ''बंगालच्या स्वारीवर आपण सरसेनापती भास्करपंतासह आपल्या गळ्यातील अन्य एकवीस मूल्यवान रत्नजडीत हार, गळ्यातील अनेक ताईत आणि असंख्य मोहरा गमावल्या आहेत, याची या विजयोत्सव आणि सत्कार सोहळ्याच्या प्रसंगी आठवण झाल्याशिवाय राहत नाही.'' असे करुणोद्‌गार रघूजींच्या मुखारबिंदूतून ऐकताच त्या कार्यक्रमातील आनंदमय वातावरण एकदम भावूक आणि गंभीर होवून गेले. ''पण, नदीचा प्रवाह ज्याप्रमाणे अडथळे व संकटांना न जुमानता अविरत पुढची वाटचाल करीत असतो, त्याचप्रमाणे कटकवर विजय हासिल कारण्यासाठी, आणि बंगाल-बिहारमध्ये मराठ्यांचे अधिकार रुजू करण्यासाठी, आपण सर्वांनी प्राण संकटात घालून व अपार कष्ट सोसून दीर्घकाळ अविरत प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे विजय-महोत्सव व सत्कार समारंभाच्या स्वरुपात आज आपण हा सोन्याचा दिवस बघत आहोत.'' असे प्रभावोत्पादक वचन राजे रघूजींच्या मुखातून बाहेर पडताच उपस्थितांच्या मुखमंडळावर नवचैतन्य पसरले.

राजे रघूजी पुढे म्हणाले ''शिवाजी महाराज, तानाजी मालुसरे, बाजी प्रभू, पेशवा बाळाजी विश्वनाथ इ. वीर पुरुषांचे आदर्श डोळ्यांसमोर ठेवून आपल्याला यापुढची वाटचाल करायची आहे. गंगेचा प्रवाह ज्याप्रमाणे समुद्रात जावून गंगासागराच्या स्वरुपात आपल्या अस्तित्वाचा विस्तार करतो, त्याप्रमाणे मराठा राज्याला पुन्हा कीर्तीच्या अत्युच्च शिखरावर पोहचविल्याशिवाय आणि आपल्या अस्तित्वाचा 'आसेतुहिमालय' विस्तार केल्याशिवाय आपण विसावणार नाही. हा विचार सर्वांनी आपल्या मनात सदोदीत तेवत ठेवून, मराठा राज्याच्या उत्कर्षासाठी सर्वस्वाच्या त्यागाची आणि बलिदानाची तयारी ठेवावी. मराठा राज्याच्या उत्कर्षासाठी आणि भरभराटीसाठी पुन्हा नव्या जोमाने कामाला लागावे. आपण असे करु शकलो, तर मराठा राज्यात असे विजयोत्सव आणि सत्कार समारंभ घडून येण्याची संधी वारंवार चालून येईल व राज्याची अस्मिता जोपासली जाईल. आम्ही नागपूर राज्याच्या विकासासाठी आणि प्रजेच्या कल्याणासाठी सर्वसामर्थ्यानिशी कटिबद्ध आहोत.'' रघूजींचे हे ओजस्वी विचार ऐकून उपस्थितांच्या चेहऱ्यांवर नवी उमेद व अदम्य आशावाद झळकू लागला. सत्कार सोहळ्याला प्रत्यक्ष सुरुवात होण्यापूर्वी श्रीमंत रघूजी भोसले यांनी काही बाबी विधिवत् जाहिर केल्या-

राजे रघूजी यांनी सर्वप्रथम घोषित केले की ''मराठ्यांचे सरसेनापती भास्करपंत यांनी बंगालवरील तिसऱ्या स्वारीच्या वेळी (इ.स.१७४४) आपली आत्माहूती दिली. त्यावेळी त्यांनी बंगालकडे जातांना छत्तीसगड जिंकून फार मोठे कार्य केले. यामुळे नागपूर आणि बंगाल यामधील दुवा जोडला गेला व त्याचा पुढील स्वारीच्या वेळी फार उपयोग झाला. त्यांच्या या महान बलिदानाला आठवून, वऱ्हाडच्या सुभ्याचा कारभार भास्करपंताची पत्नी ताराबाई यांच्या नावाने करुन कृष्णाजी गोविंद यास ताराबाईच्या वतीने कारभारी नेमण्यात येत आहे.'' तत्पश्चात् त्यांनी, ''भास्करपंताचे बंधू कोन्हेरराम यांच्या उदरनिर्वाहासाठी वंशपरंपरा पंचवीस हजार रुपयांची व्यवस्था करुन दिली आहे.'' असे विधिवत् जाहिर केले.

रघूजी प्रथम यांनी सर्वांना यथायोग्य देणग्या व बक्षिसे जाहिर केल्यानंतर सत्कार समारंभाला सुरुवात झाली. कटक विजयाच्या वेळी ज्यांनी विशेष पराक्रम गाजविला होता त्या सर्वांचे, प्रत्येकाला एक-एक जरीचा फेटा आणि नवीन तलवार देवून सत्कार करण्यात आले. यावेळी कोलुबापू बहेकार यांचा देखील सत्कार करण्यात आला. सत्कारात मिळालेले फेटे सर्वांनी परिधान केले. पण कोलुबापूंनी जरीचा फेटा परिधान केला नाही. ते आपल्या आसनावर जावून शांतपणे बसून गेले, आणि जरीचा फेटा मांडीवर मांडून रघूजी प्रथम यांचेकडे मोठ्या आशेने बघू लागले. त्यांच्या या कृतीने राजाचे लक्ष त्यांच्याकडे वेधले गेले. सर्वांचे सत्कार आटोपताच राजे रघूजींनी कोलुबापूकडे कटाक्ष करीत विचारले ''कोलु पाटील! आम्हीं सत्कारात दिलेले फेटे सर्वांनी परिधान केले, पण तुम्ही मात्र फेटा परिधान केलेला नाही. यावरुन आम्ही काय समजावे?'' यावर कोलुबापू हे विनम्रपणे उभे राहून अत्यंत भावूकपणे म्हणाले ''सरकार! देवगडच्या सुभ्यात एखादे लहानसे वतन मिळाले असते तर मराठा राज्याच्या भरभराटीत, मीही आपले 'खारीचे योगदान' देवू शकलो असतो. श्रीमंत सरकारसमोर एवढेच मागणे आहे.''

राजे रघूजी यांनी कोलुबापूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर देवगडचे सुभेदार रघुजी करांडे यांच्याकडे दृष्टिक्षेप टाकत जिज्ञासापूर्वक विचारले ''कोलुबापू काय म्हणतो हे तुम्ही लक्षपूर्वक ऐकले काय?'' यावर रघुजी करांडे हे विनम्रपणे उभे राहून उद्‌गारले ''श्रीमंत सरकार यांना, माणसांची पारख चांगल्या प्रकारे करता येते. निष्ठावंत लोकांची जुळवाजुळव करुनच आपण मराठा राज्याचा उत्कर्ष घडवून आणलेला आहे. कोलुबापू हा मराठा राज्याविषयी निष्ठावान, ध्येयवादी आणि कर्तबगार आहे. यावर श्रीमंत सरकार जी आज्ञा देतील, ती शिरसावंद्य आहे''

रघूजी भोसले यांनी देवगडच्या सुभेदारांचे अनुकूल विचार ऐकून घेतल्यानंतर तत्काळ जाहिरपणे, ''कामठ्याची जमीनदारी कोलुबापूंना बहाल केली जात आहे.'' अशी घोषणा केली. याप्रसंगी राजे रघूजी यांच्या विवेकपूर्ण निर्णयाचा, निर्णयक्षमतेचा आणि उदात्त धोरणाचा सर्वांनी हर्षोल्हासाने, 'जयजयकार' करीत स्वागत केले.

## ७. कामठा जमीनदारीची प्राप्ती (इ.स.१७५१)

मराठा शासनाकडून कोलुबापूंना कामठ्याची जमीनदारी देण्याचे निश्चित झाल्यानंतर या जमीनदारीच्या प्राप्तीसाठी, देवगडचे सुभेदार रघुजी करांडे यांना कोलुबापूंनी रीतसर अर्ज सादर केले. मराठा शासनाकडून कोलुबापूंच्या अर्जाला औपचारिक मान्यता मिळताच, ''साठ रुपये वार्षिक खंडणीवर त्यांना कामठ्याची जमीनदारी प्राप्त झाली.''[1] कामठा जमीनदारीच्या प्राप्त सनदेनुसार, सुमारे एक हजार चौ.मैल एवढे व्यापक क्षेत्र आणि त्यातील दोनशे सात गावे कोलुबापूंच्या अधिकारक्षेत्राखाली आले.

कोलुबापूंच्या अधिकारक्षेत्रात आलेला प्रदेश, देवगडच्या सुभ्यात अंतर्भूत असून घनदाट अरण्याने व्याप्त होता. मराठा राजवटीपूर्वी या प्रदेशावर देवगडच्या गोंड राजांचे शासन होते. त्या काळात या प्रदेशात गोंड जनजातीचे लोक हे बहुसंख्यक होते. गोंड राजांनी आपल्या राजवटीत या प्रदेशाच्या विकासासाठी काहीच केले नाही. त्यामुळे कोलुबापूंच्या अधिकारक्षेत्रात आलेला संपूर्ण प्रदेश अविकसित अथवा अत्यंत मागासलेल्या अवस्थेत होता. कामठा जमीनदारीच्या सनदेनुसार या संपूर्ण प्रदेशाच्या राज्यकारभाराची आणि विकासाची जबाबदारी, जमीनदार या नात्याने कोलुबापूंच्या खांद्यांवर आली. त्यांची क्षमता काळाच्या कसोटीवर खरी ठरते अथवा नाही, हे भविष्याच्या गर्भात दडलेले होते.

## ८. जमीनदारवाडा गजबजला

कोलुबापूंनी मराठा शासनाकडून नवीन जबाबदारी स्वीकारताच, कामठ्याला स्थाईक होण्याचा विचार त्यांच्या मनात डोकावू लागला. कोलुबापूंचा वंशवृक्ष सौंदडलाच बहरला व फुलला होता. त्यामुळे कामठ्याला त्यांच्या कुटुंबाने कुठे राहावे, हा प्रश्न त्यांच्या मनात उपस्थित होणे स्वाभाविक होते. सुभेदार रघुजी करांडे यांचे वरदहस्त, पांडुबापूसारख्या बलवान मुलाच्या सहकार्याची ताकद आणि शून्यातून स्वर्ग निर्माण करु असा आत्मविश्वास त्यांच्यात असल्यामुळे त्यांनी अगोदर महालमाडींनी युक्त अशा एका भव्य वाड्याची निर्मिती कामठ्यात

1. पूर्वोक्त, Bhandara District Gazetteer, P. 94

करविली. त्यानंतर त्यांचे पूर्ण कुटूंब हत्तींवर रुपेरी अंबारीत बसून, सौंदडहून कामठ्याला आले आणि येथे स्थाई रुपाने वास्तव्य करु लागले. कोलुबापू आणि त्यांच्या कुटूंबाच्या वास्तव्याने व नोकरचाकरांच्या अस्तित्वाने कामठ्याचा जमीनदारवाडा गजबजून गेला.

## ९. अधिकार आणि कर्तव्याचे स्वरुप

जमीनदार हा आपल्या जमीनदारीचा सर्वश्रेष्ठ शासक होता. त्याच्या आदेशाचे पालन करणें, हे प्रजेचे कर्तव्य होते. शेतसाऱ्यापासून मिळणारे उत्पन्न, हे जमीनदाराच्या उत्पन्नाचे मुख्य साधन होते. एकूण शेतसाऱ्याचा निर्धारित अंश खंडणी स्वरुपात शासकीय तिजोरीत जमा करणे, हे जमीनदाराचे कर्तव्य होते. शेष रकमेचा वापर तो आपल्या अन्य कर्तव्यांच्या निर्वाहासाठी करीत असे. जमीनदारीतील शांतता, सुव्यवस्था आणि रस्ते बांधणी ही कामे जमीनदाराच्या अखत्यारीत होती. युद्धोपकाळात राजाला लष्करी मदत पाठविणे अथवा राजाज्ञा असेल तर लष्करासह स्वयं राजाच्या सेवेत उपस्थित राहणे, हे मराठा शासनकाळात जमीनदाराचे एक प्रमुख कर्तव्य होते. यासाठी, जमीनदार आपल्या पदरी कवायती सैन्य बाळगत. सैनिकांचा पगार जमीनदार आपल्या तिजोरीतून देत असे.

पेंढाऱ्यांची स्वारी व त्यांचे अत्याचार हे मध्ययुगीन मध्यहिंदूस्थानातील इतिहासावरील एक कलंक आहे. पेंढाऱ्यांची स्वारी म्हणजे एक भयंकर वादळ असे. लोकांकडून पैसे वसूल करण्यासाठी ते त्यांच्यावर वाटेल ते अत्याचार करीत असत. हातपाय तोडणे, गरम राखेचे तोबरे लावणे, हातांच्या बोटांना चिंध्या पेटवणे, घरादारांना पेटवून देणे असे अपकृत्य ते नेहमी करीत असत. पेंढारी ज्या गावाहून जात असत, तेथील हवेल्या व झोपड्या ते आगीत भस्म करीत असत. स्त्रियांवर अत्याचार करीत, आणि शेकडो तरुण मुलीं घोड्यांवर बांधून विकायला नेत. पेंढाऱ्यांच्या स्वारीचा बीमोड करणें आणि डाकुंच्या दरोड्यापासून प्रजेचे रक्षण करणें, हे मराठाकालीन जमीनदारांचे महत्त्वपूर्ण कर्तव्य होते.

जमीनदारीतील प्रजेच्या संरक्षणाची जबाबदारी जमीनदारावर होती. याशिवाय मराठा राज्याच्या संरक्षणात जमीनदाराला महत्त्वाची भूमिका पार पाडावी लागत असे. म्हणून, कामठ्याचे जमीनदार हे फक्त सत्तासुख भोगणारे आणि ऐषआरामात जीवन जगणारे जमीनदार नव्हते, तर ते लष्करीदृष्ट्या शक्तिशाली, युद्धकलेत पारंगत आणि पराक्रमी असे जमीनदार होते.

## १०. आमगाव जमीनदारीची प्राप्ती (इ.स.१७५६)

आमगाव जमीनदारी ही देवगड सुभ्यातील एक स्वतंत्र जमीनदारी होती. कोलुबापूंनी इ.स.१७५६ मध्ये राजे जानोजी भोसले यांच्याकडून, या जमीनदारीची सनद आपला मोठा मुलगा पांडुबापू याच्या नावाने आणली. त्यामुळे यावेळेपासून पांडुबापू हा आमगावचा जमीनदार झाला. या जमीनदारीचा स्वतंत्र दर्जा मात्र पूर्ववत् कायम राहिला. आमगाव जमीनदारीला कामठा जमीनदारीशी जोडण्यात आले नाही.

कोलुबापूंच्या उपरोक्त यशाचे कारण, नागपूर दरबारातील समकालीन राजकीय घडामोडींशी निगडीत आहे. रघूजी प्रथम यांचे इ.स.१७५५ मध्ये निधन झाल्यामुळे जानोजी भोसले यांना, मोठा मुलगा या नात्याने सेना साहेब सुभ्याचे पद प्राप्त होवून ते नागपूरच्या मराठा राज्याचे सर्वोच्च शासक बनले. पण, त्यांचा भाऊ मुधोजी भोसलेने त्यांच्याशी नागपूरच्या गादीसाठी भांडण सुरु केले. या भांडणाची परिणती लष्करी संघर्षात घडून आली. नागपूरच्या दरबारात जानोजी समर्थक व मुधोजी समर्थक असे दोन गट पडले. दरबारातील सर्व जुन्या सरदारांनी आणि देवगड, चंद्रपूर, वऱ्हाड व कटकच्या तत्कालीन सुभेदारांनी मात्र जानोजीला पाठिंबा दिला. देवगडचे सुभेदार रघुजी करांडे हे जानोजीचे प्रबळ समर्थक असल्यामुळे कोलुबापूंची गणना जानोजी समर्थक गटात होणे स्वाभाविक होते. परिणामस्वरुप, कोलुबापूंना जानोजी भोसले यांच्याकडून आमगाव जमीनदारीची सनद सुगमतेने प्राप्त झाली असे दिसते. नागपूरच्या गादीसाठी सुरु झालेले गृहयुद्ध इ.स.१७६१ पर्यंत सुरु होते.

## ११. कामठा जमीनदारीची क्षेत्रवाढ

कामठा जमीनदारीत कोलुबापूंचे शासन स्थिर होताच, भोसले राजवंशाकडून तीन खेड्यांची फुलचूर जमीनदारी त्यांच्या अधिकारक्षेत्राखाली देण्यात आली. कालांतराने चाळीस खेडी समाविष्ट असलेली केशोरी (देवरी) ही जमीनदारीदेखील कोलुबापूंच्या अधिकारक्षेत्राखाली समाविष्ट करण्यात आली. केशोरी ही जमीनदारी हलबा जमीनदाराच्या अधिपत्याखाली होती. येथील जमीनदाराची वंशवेल खुंटल्यामुळे ही जमीनदारी कामठा जमीनदारीला जोडण्यात आली. फुलचूर आणि केशोरी या दोन्ही जमीनदारीतील शेतसाऱ्याचा हिशेब वेगवेगळा होता. परंतु त्यावर कोलुबापूंची अधिसत्ता प्रस्थापित झाल्यामुळे कामठा जमीनदारीची सीमा विस्तारली. कामठा जमीनदारीचे क्षेत्रफळ वाढले.

## १२. शिकमी जमीनदारींचा उदय

कोलुबापूंच्या अधिकारक्षेत्राखाली फुलचूर आणि केशोरी या दोन जमीनदाऱ्या समाविष्ट झाल्यानंतर त्यांनी कार्यक्षम प्रशासनाचे उद्दिष्ट समोर ठेवून, या जमीनदारीतील उत्पन्नात समान हिस्सेदारी देण्याच्या अटीवर अन्य सक्षम व्यक्तींना जमीनदार बनविले. या जमीनदाऱ्यांना शिकमी जमीनदारी, आणि तेथील जमीनदारांना शिकमी जमीनदार (Joint proprietor) असे संबोधण्यात आले. अशाप्रकारे, 'शिकमी जमीनदारी' (Shikmi Zamindari) या नवीन संकल्पनेचा व व्यवस्थेचा उदय घडून आला.

शिकमी जमीनदार हे कोलुबापूद्वारे प्रदत्त अधिकारांचा (Delegated Rights) वापर करीत असत. शिकमी जमीनदार हे कोलुबापूंच्या अधिनस्थ जमीनदार होते. कोलुबापू हे ज्याप्रमाणें कामठा जमीनदारीचे आलामालिक होते, त्याचप्रमाणे ते या शिकमी जमीनदाऱ्यांचे सर्वोच्च शासक होते. फुलचूर आणि केशोरी या दोन शिकमी जमीनदाऱ्या प्रस्थापित केल्यानंतर कोलुबापूंनी, आमगावच्या पूर्वेला बिंजली ही एक नवीन शिकमी जमीनदारी निर्माण केली. अशाप्रकारे कामठा जमीनदारीत शिकमी जमीनदारीची पद्धती रुढ झाली.

कोलुबापूंनी आपल्या शासनकाळात हट्टा, लिंगा आणि किरणापूर या तीन उप-जमीनदाऱ्या (Subordinate Zamindaris) निर्माण केल्या. कामठा व अन्य तीन उप-जमीनदारींचे शासन कोलुबापू हे स्वयं सांभाळत असत. फक्त आर्थिक हिशोब वेगवेगळा ठेवता यावा यासाठी, कोलुबापूंनी उप-जमीनदाऱ्या प्रस्थापित केल्या.

अशाप्रकारे, कोलुबापूंच्या हाताखाली कामठ्याशिवाय उपरोक्त तीन उप-जमीनदाऱ्या आणि फुलचूर, केशोरी व बिंजली या तीन शिकमी जमीनदाऱ्या होत्या. अत: त्यांच्या अधिपत्याखाली एकूण सात जमीनदाऱ्या असून, आमगाव जमीनदारी ही त्यांच्या प्रभावक्षेत्राखाली होती. कोलुबापूंनी कार्यक्षम प्रशासनाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी उप-जमीनदाऱ्या आणि शिकमी जमीनदाऱ्या निर्माण करुन, सत्तेचे विकेंद्रीकरण केले व आपले प्रभुत्वही कायम राखले. यातून त्यांच्या उच्च राजकीय क्षमतेची प्रचिती येते.

## १३. वन्यप्रदेशाचा कायापालट

कोलुबापूंना जेव्हा कामठ्याची जमीनदारी प्राप्त झाली तेव्हा उत्तरेकडील लांजीकडील डोंगरी भागापासून दक्षिणेकडील देवरी-शिरपूर पर्यंतचा सुमारे एक

हजार चौ.मैल एवढा व्यापक प्रदेश त्यांच्या अधिकारक्षेत्राखाली आला. त्यामुळे वर्तमान बालाघाट व गोंदिया जिल्ह्यातील बहुतेक सर्व प्रदेश त्यांच्या अखत्यारीत होता. कोलुबापूंनी या प्रदेशात मोठ्या प्रमाणात जंगल कटाई करवून तेथील भूमी लागवडीखाली आणण्याच्या कार्याला सुरुवात केली. यासाठी त्यांनी तिरोड्याकडील शेतकरी कुटुंबांना आणून, या प्रदेशात प्रस्थापित करुन नवीन गावे वसविण्याचे कार्य प्रारंभ केले. कोलुबापूंनी आपल्या शासनकाळात सुरु केलेले हे कार्य त्यांचे उत्तराधिकारी, गोंदिबापू आणि चिमणा बहादूर यांनीही आपल्या कारकिर्दीत नेटाने सुरु ठेवले. त्यामुळे कामठा जमीनदारीतील वन्यप्रदेशाचा कायापालट घडून आला.

## १४. कामगिरीची तुलना

भोसले राजवटीत ''अहेरीला व्यंकटराव उर्फ भीमराव हे इ.स.१७७५ पासून १८१८ पर्यंत जमीनदार होते. ते अतिशय शूर व तडफदार होते.''[1] कोलुबापू आणि व्यंकटराव या दोन्ही समकालीन जमीनदारांच्या कामगिरीची व कार्यशैलीची तुलना लक्षात घेताच वाचकांना कोलुबापूंच्या व्यक्तिमत्त्वाची परिपूर्ण कल्पना येण्यास मदत होईल, या उद्देशाने यांची परस्पर तुलना खाली देत आहे-

प्रथम, व्यंकटरावाने घोट, अडपल्ली आणि मोलमपल्ली या तीन उप- जमीनदाऱ्या निर्माण करुन जिकडे-तिकडे आपला दबदबा निर्माण केला होता. कोलुबापूंनी देखील हट्टा, लिंगा व किरणापूर या तीन उपजमीनदाऱ्या आणि फुलचूर, केशोरी व बिंजली या तीन शिकमी जमीनदाऱ्या निर्माण करुन आपला दबदबा संपूर्ण नागपूर राज्यात निर्माण केला होता. द्वितीय, व्यंकटरावांनी आपल्या जमीनदारीचा विस्तार व्हावा यासाठी एकदा झाडा येथील जमीनदारावर आक्रमण केले होते व त्याच्या जमीनदारीचा काही भाग बळजबरीने बळकावला होता. कोलुबापूंनी मात्र नागपूर राज्याकडून फुलचूर आणि केशोरी या दोन जमीनदाऱ्या राजीखुशीने संपादित करुन कामठा जमीनदारीचा यशस्वीपणे विस्तार केला होता. तृतीय, व्यंकटरावांनी रघूजी द्वितीय यांच्या शासनकाळात इ.स.१७९० मध्ये भोसले राजवटीविरुद्ध बंड उभारले होते. कोलुबापूंनी मात्र भोसले राजवंशाशी मधुर संबंध प्रस्थापित करुन त्या संबंधाची काळजीपूर्वक जोपासना करण्याचा मार्ग स्वीकारला होता.

उपरोक्त विवेचनातून कोलुबापूंचे व्यक्तिमत्त्व हे भारदस्त, विवेकशील आणि मनमिळावू स्वरुपाचे होते अशी प्रचिती घडून येते.

---

1. पूर्वोक्त, डॉ.कोलारकर आणि पुरंदरे, पृष्ठ क्र. ३५४-३५५

## १५. कामगिरीचे मूल्यांकन

कोलुबापूंनी कामठा जमीनदारीत आपले शासन सुरळितपणे सुरु करताच त्यांनी नागपूर दरबारकडून आमगावची जमीनदारी, आपला मोठा मुलगा पांडुबापू याच्यासाठी प्राप्त केली. याशिवाय त्यांना नागपूर दरबारकडून फुलचूर व केशोरी या दोन जमीनदाऱ्या प्राप्त झाल्या. हा घटनाक्रम लक्षात घेताच कोलुबापू हे राजकारणात निष्णात असून त्यांना नागपूरच्या दरबारात पर्याप्त सन्मान प्राप्त होते याची स्पष्टपणे जाणीव होते.

कामठा जमीनदारीत इ.स.१७५१ पासून इ.स.१७८८ पर्यंत कोलुबापूंचे शासन होते. कोलुबापूंनी छत्तीस वर्षाच्या प्रदीर्घ शासनकाळात हट्टा, लिंगा व किरणापूर या उप–जमीनदाऱ्या आणि फुलचूर, केशोरी व बिंजली या शिकमी जमीनदाऱ्या निर्माण करुन आपल्या अधिकारक्षेत्राखालील संपूर्ण प्रदेशाला परगण्याचा दर्जा प्रात करवून घेतला. त्यामुळे ते फक्त कामठ्याचे जमीनदार न राहता, त्यांना परगणा कामठ्यातील सर्व जमीनदारांचे सर्वोच्च जमीनदार असा बहुमानही प्राप्त झाला.

कोलुबापूंचा प्रदीर्घ शासनकाळ हा अनेक महत्त्वपूर्ण घटनांनी परिपूर्ण असून या सर्व घटना, ते एक यशस्वी जमीनदार, उत्कृष्ट शासक व कुशल प्रशासक होते याची साक्ष देतात. त्यांच्या समकालीन कोणत्याही जमीनदाराला आपल्या उभ्या आयुष्यात जेवढे यश संपादित करणे शक्य झाले नाही तेवढे नेत्रदीपक यश संपादित करुन, कोलुबापूंनी मध्ययुगीन नागपूर राज्याच्या इतिहासात आपले नाव अजरामर केले. कोलुबापू हे कामठा जमीनदारीचे महान संस्थापक असून, त्यांनी परगणा कामठ्याच्या प्रशासनाची नीट घडी बसविली आणि या संपूर्ण परगण्याच्या भावी विकासाचा मजबूत पाया समर्थपणे घातला. यातच त्यांच्या सकळ कामगिरीचे मोल सामावलेले आहे.

■ ■ ■

## ५. गोंदिबापू : एक सामर्थ्यशाली जमीनदार

### १. नवा शासक!

**गों**दिबापू हे कामठ्याचे 'द्वितीय जमीनदार' असून इ.स. १७८८ ते इ.स.१८१६ हा त्यांचा शासनकाळ होय. कामठ्याचा जमीनदार हाच परगणा कामठ्यातील सर्व जमीनदारांचा सर्वोच्च शासक राहील, असा पायंडा कामठा जमीनदारीचे संस्थापक कोलुबापू यांच्या कारकिर्दीत घातला गेला. त्यामुळे इ.स.१७८८ मध्ये गोंदिबापू हे कामठ्याचे जमीनदार नियुक्त होताच परगणा कामठ्यातील सर्व जमीनदारांवरील सर्वोच्च जमीनदार हा बहुमानही त्यांना प्राप्त झाला. कामठ्याचे जमीनदार आणि परगणा कामठ्याचे सर्वोच्च शासक अशी दुहेरी जबाबदारी गोंदिबापूंच्या खांद्यावर आली, आणि संपूर्ण समाजाचे लक्ष त्यांच्या नवीन राजवटीकडे वेधले गेले.

### २. सत्ताप्राप्तीचा निकष

कोलुबापू यांना पांडुबापू, रामाबापू, गोंदिबापू, अजा, देवू आणि शिवा अशी सहा मुले होती. यापैकी पांडुबापूला त्यांनी इ.स.१७५६ मध्ये आमगावच्या जमीनदारीवर प्रस्थापित केले होते. कामठा जमीनदारीच्या उत्तराधिकारीचा प्रश्न जेव्हा कोलुबापूंच्या मनात उपस्थित झाला तेव्हा रामाबापू हा गोंदिबापूपेक्षा मोठा असल्यामुळे, हिंदू धर्मशास्त्रानुसार रामाबापूला कामठ्याची जमीनदारी सोपवावी, की योग्यता हे निकष मानून गोंदिबापूला आपला उत्तराधिकारी बनवावे, या अंतर्द्वंद्वात त्यांचे मन गुरफटले होते.

कोलुबापूंच्या शासनकाळात गोंदिबापू हा नेहमी त्यांच्या सोबत छायेसारखा वावरला, कामठा जमीनदारीच्या उत्कर्षासाठी पूर्ण मनोयोगपूर्वक झटला आणि त्यांचे मन जिंकले. गोंदिबापूत उत्तम शासक आणि कुशल प्रशासकाचे गुण होते. तो कर्तव्यदक्ष, कर्तृत्ववान आणि पितृभक्त होता. त्यामुळे कामठा जमीनदारीच्या उज्ज्वल भविष्यासाठी गोंदिबापूला कामठ्याच्या जमीनदार पदावर सत्तासीन करणे आवश्यक आहे, असे कोलुबापूंना मनोमन वाटत होते. पण गोंदिबापू हा रामाबापूपेक्षा लहान असूनही त्यांना उत्तराधिकारी बनविले की कुटुंबात मनोमालिन्य निर्माण होण्याची आणि ते कामठा जमीनदारीच्या भावी हिताला घातक ठरण्याची दाट शक्यता होती. त्यामुळे कोलुबापूंनी सर्वांना विश्वासात घेवून, गोंदिबापूला कामठ्याचा जमीनदार बनविण्यासंबंधी निर्णय

घेतला. यातून, कामठ्याच्या परमोच्च उत्कर्षासाठी पूर्ण कुटुंबाच्या एकजुटीचा आणि सर्वांच्या सम्मिलित प्रयत्नांचा मार्ग प्रशस्त झाला. कामठा जमीनदारीवर गृहयुद्धाच्या स्वरुपात ओढवू पाहणारे संकट धीरोदात्त पित्याच्या विवेकशील प्रयत्नामुळे आणि पितृभक्त रामाबापूच्या समजूतदारपणामुळे टळले.

## ३. त्रिवेणी संगमाचे मनोहारी दृश्य

गोंदिबापूंचे राज्यारोहण समारंभ इ.स.१७८८ मध्ये कामठा जमीनदारीचे संस्थापक कोलुबापू यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. या प्रसंगी सर्व मानकरी, तसेच कोलुबापूंची मुले आणि नातवंडांनी बहरलेला संपूर्ण बहेकार राजवंश उपस्थित होता. समारंभात बहेकार घराण्याच्या तिन्ही पिढ्यांचे लोक किंमती वस्त्रें परिधान करुन एकत्र जमल्यामुळे, तो क्षण उपस्थितांना त्रिवेणी संगमाच्या मनोहारी दृश्याची अनायास आठवण करुन देत होता. हे शब्दचित्र डोळ्यांसमोर उभे राहिले की मग गोंदिबापू हे ज्याक्षणी जमीनदार बनले तो क्षण, कामठा जमीनदारीच्या इतिहासातील सोनेरी व अविस्मरणीय क्षण होता, याची जाणीव होते आणि उर आनंदाने दाटून येते.

भावी काळात इंग्रजांसारख्या प्रबळ शक्तीच्या विरोधात आपली तलवार उगारण्याचे विलक्षण साहस करुन ज्याने काळाच्या कापाळावर आपले नाव कायमचे कोरले तो चिमणा बहादूर यावेळी फक्त सहा वर्षाचा असून त्याच्या सहजसुलभ-मनमोहक बालक्रीडेने उपस्थितांचे लक्ष स्वाभाविकपणे त्याच्याकडे वेधले जात होते. कोलुबापू हे त्या काळात सुमारे बहात्तर वर्षाचे असून त्यांचे लक्ष चिमणा बहादूरच्या बालक्रीडांकडे वेधले जाताच, त्यांच्या मनात कामठ्याच्या दुरगामी भविष्यातील उज्ज्वल चित्र क्षणभर तरंगून जात असे.

गोंदिबापूंना शासनकाळाच्या पूर्वार्धात कोलुबापूसारख्या अनुभवी वडीलांचे कृपाछत्र आणि शासनकाळाच्या उत्तरार्धात बुद्धिमान, शक्तिशाली व कोणतेही कार्य धडाडीने पार पाडण्यास उत्सूक असलेल्या चिमणा बहादूरसारख्या तडफदार मुलाचे पूर्ण सहकार्यदेखील लाभले. त्यामुळे कामठ्याच्या दरबारात ''जहाँ सुमति तहँ सम्पत्ति नाना। जहाँ कुमति तहँ विपत्ति निदाना।।'' ही म्हण चरितार्थ झाली आणि कामठा जमीनदारीने आर्थिक समृद्धीच्या बाबतीत उच्चांक गाठला.

## ४. प्रशासनाचे पुनर्संघटन

गोंदिबापूंच्या हाती कामठा जमीनदारीची शासनसत्ता आल्यानंतर लगेच त्यांनी धनसुआ नावाची एक नवीन जमीनदारी प्रस्थापित करुन इ.स.१७९० मध्ये,

विलायतखान पठाण यास धनसुआचा शिकमी जमीनदार बनविले. धनसुआ हे गाव वर्तमान मध्मप्रदेशमध्ये आहे.

गोंदिबापू यांना पुना, चिमणा बहादूर, मोहना आणि कोंडू अशी चार मुले होती. गोंदिबापूंनी पुनाबापू हा वयात येताच त्याची हट्टा जमीनदारीचा व्यवस्थापक म्हणून नियुक्ती केली. तसेच त्यांनी लिंगा आणि किरणापूर या अन्य दोन जमीनदारींचा राज्यकारभारदेखील पुनाबापूकडे सोपविला. चिमणा बहादूर हा वयात येताच गोंदिबापूंनी त्याच्याकडे कामठ्याच्या राज्यकारभारात मदत करण्याची आणि परगणा कामठ्यातील सर्व जमीनदाऱ्यांत समन्वय प्रस्थापित करण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविली. अशाप्रकारे, त्यांनी आपल्या शासनकाळात परगणा कामठ्याच्या व्यवस्थापनेत काही महत्त्वपूर्ण बदल करुन तेथील प्रशासनाचे पुनर्संघटन केले. त्यामुळे कामठ्याचे केंद्रीय शासन अधिक कार्यक्षम झाले.

## ५. कामठ्याला किल्ल्याची निर्मिती

मध्ययुगीन जमीनदारांना, राजाला लष्करी मदत पाठविण्यासाठी आपल्या जवळ लष्कर बाळगावे लागत असे. राजधानी, राजवाडा आणि तेथील मालमत्ता व दारुगोळ्याच्या संरक्षणासाठी, राजधानीच्या ठिकाणी किल्ल्याची निर्मिती केली जात असे. शत्रुचे आक्रमण परतवून लावण्यासाठी किल्ल्याच्या समोर सतत तोफा तैनात राहत असत.

''मराठा शासनकाळात किल्ल्याची निर्मिती हा राजाच्या अखत्यारितील विषय होता. पण राजाच्या अनुमतीने जमीनदार, नवाब आणि दिवाणांनी किल्ले निर्मित करण्याचे प्रचलनही त्या काळात अस्तित्वात होते. सानगडीचा किल्ला तेथील दिवाण कुटुंबियांनी बांधलेला आहे.''[1] गोंदिबापूंनीदेखील आपल्या शासनकाळात किल्ल्याची निर्मिती केली होती.

मराठा शासनकाळात डोंगरावरील आणि सपाट भूप्रदेशावरील असे दोन प्रकारचे किल्ले बनविले जात. सानगडीचा किल्ला हा एका टेकडीवर बनलेला असून कामठ्याचा किल्ला हा सपाट भूभागावर आहे. सध्या हा किल्ला भग्नावस्थेत असून किल्ल्याच्या रुंद भिंतीवर एका बुरुजाच्या आतील भागात 'चांदशहा वली' ची मजार आहे. मजारपर्यंत जाण्यासाठी बांधलेल्या पायऱ्या सुस्थितीत आहेत. आजही येथे लोकांचे जाणे-येणे सुरु असते.

---

**1**. पूर्वोक्त, डॉ.कोलारकर आणि पुरंदरे, पृष्ठ क्र. ३४६

## ६. प्रसिद्ध 'तीन वास्तु'

मराठा शासनकाळापासून अलीकडील काळापर्यंत कामठ्याचा किल्ला, हट्टयाची बावली आणि लिंग्याची हवेली या तीन वास्तु प्रसिद्ध होत्या. यापैकी हट्टयाची बावली ही देवगडच्या गोंड राजाद्वारे १७ व्या शतकात बांधलेली आहे. कामठ्याचा किल्ला आणि लिंग्याची हवेली यांचे बांधकाम मात्र १८ व्या शकतकातील आहे. लिंग्याची हवेली आता पूर्णत: नष्ट झालेली आहे. कामठ्याचा किल्ला आणि हट्टयाची बावली मात्र अजून अस्तित्वात असून बहेकार जमीनदारीच्या इतिहासाची साक्ष देत आहेत.

## ७. लागवडीखालील क्षेत्रात वाढ

कामठा जमीनदारीत समाविष्ट असलेला उत्तरेकडील लांजीपासून दक्षिणेकडील देवरी-शिरपूरपर्यंतचा संपूर्ण प्रदेश लागवडीखाली आणण्याचे कार्य कोलुबापूंनी आपल्या शासनकाळात प्रारंभ केले होते. गोंदिबापूंनी आपल्या कारकिर्दीत ती मोहीम प्रभावीपणे राबविली. त्यामुळे परगणा कामठ्यातील लागवडीखालील क्षेत्र आणि अन्नधान्याच्या उत्पादनात लक्षणीय वाढ होवून या परगण्याचा आर्थिक विकास घडून आला.

गोंदिबापूंना शासनकाळाच्या पूर्वार्धात कोलुबापूंचे पाठबळ आणि उत्तरार्धात चिमणा बहादूरचे धडाडीचे सहकार्य लाभले. म्हणून त्यांना आपल्या शासनकाळात, विकास व समृद्धीचा उच्चांक गाठणे सहज शक्य झाले. घनदाट अरण्याने व्याप्त उपरोक्त प्रदेशाचा कायापालट करण्यात, बहेकार राजवंशातील या तिन्ही प्रभावशाली शासकांची महत्त्वपूर्ण भूमिका होती.

## ८. राजकीय स्वायत्तता

कोलुबापू यांनी प्रखर राजनिष्ठा, समर्पण भाव आणि कर्तबगारीच्या बळावर राजे रघूजी प्रथम यांचे मन जिंकल्यामुळे, बहेकार घराण्याचे भोसले राजवंशाशी आत्मीयतापूर्ण संबंध प्रस्थापित झाले होते. कोलुबापूंचे प्रगाढ संबंध जसे रघूजी प्रथम यांच्याशी होते, तसेच ते संबंध राजे जानोजी भोसले यांच्याशीही कायम राहिले. जानोजी आणि त्यांची धर्मपत्नी राणी दर्याबाई यांना संतानोत्पत्ती न झाल्यामुळे त्यांनी कोलुबापूंचा मुलगा गोंदिबापू यास आपला मानसपुत्र मानले. यातून भोसले राजवंशाशी प्रस्थापित झालेले बहेकार घराण्याचे संबंध अधिकच घनीभूत झाले.

राजे जानोजी नंतर त्यांचा पुतण्या रघूजी द्वितीय याला नागपूरची गादी मिळाली. रघूजी द्वितीय यांच्या कारकिर्दीत (इ.स.१७७२-१८१६) गोंदिबापू हे इ.स.१७८८ मध्ये कामठ्याचे जमीनदार बनले. गोंदिबापूंनी भोसले राजवंशाशी पूर्वापार चालत आलेल्या मधुर संबंधांची जोपासना करीत रघूजी द्वितीय यांच्याशी देखील चांगले संबंध कायम राखले. त्यामुळे त्यांना आपल्या कारकिर्दीत पर्याप्त राजकीय व आर्थिक स्वायत्तता प्राप्त झाली. ही स्वायत्तता कामठा जमीनदारीच्या भरभराटीला पोषक ठरली.

## ९. अर्थव्यवस्थेत सुधारणा

गोंदिबापूंच्या अधिकारक्षेत्रात लागवडीखालील क्षेत्र जास्त असल्यामुळे आणि शेतजमीन ही सुपीक व उपजाऊ असल्यामुळे, त्यांना शेतसाऱ्यापासून भरपूर उत्पन्न मिळत असे. पण, भोसले शासनाद्वारे त्यांच्याकडून अत्यंत माफक दराने खंडणी घेतली जात असे. किंबहुना भोसले राजवंशाचे बहेकार घराण्याशी कौटुंबिक स्वरुपाचे संबंध असल्यामुळे गोंदिबापूंनी शासकीय नियमानुसार खंडणी द्यावी, अशी सक्ती राजे रघुजी द्वितीय यांच्या शासनाद्वारे केली जात नसे. त्यामुळे गोंदिबापूंचा खजिना समृद्ध झाला, परगणा कामठ्याची अर्थव्यवस्था बळकट झाली आणि कामठा जमीनदारीचा एक वैभवशाली जमीनदारीच्या स्वरुपात उत्कर्ष घडून आला. गोंदिबापूंना एक सामर्थ्यशाली जमीनदार म्हणून नवीन ओळख प्राप्त झाली. त्यामुळे त्यांच्या शासनकाळाला 'मध्ययुगीन कामठा जमीनदारीचा सुवर्णकाळ' असे संबोधण्याचा प्रघात पडला.

## १०. सीमा विवादात मध्यस्थी

''नागपूर राज्यातील देवगड सुभ्यात खैरागडचे मांडलिक राज्यदेखील समाविष्ट होते''.[1] खैरागडचा मांडलिक राजा ढोकलसिंग हा गोंदिबापूचा समकालीन शासक होय. ढोकलसिंगाच्या अधिकारक्षेत्रात लांजी, बहेला, बीजागड इ. जमीनदाऱ्या होत्या. गढामंडला सुभ्यातील खलोटी नामक जमीनदारीत गोंदिबापूच्या काळात हटीला नामक जमीनदार शासन करीत होता. हटीला जवळ पर्याप्त लष्करी सामर्थ्य असल्यामुळे त्याला वारंवार लढाईची खुमखुमी चढत असे.

कामठा जमीनदारी ही त्याकाळी एक शक्तिशाली जमीनदारी असल्यामुळे तिच्याकडे वाकड्या नजरेने पाहण्याची हिम्मत हटीलामध्ये नव्हती. पण खलोटी

---

1. पूर्वोक्त, डॉ.कोलारकर आणि पुरंदरे, पृष्ठ क्र.१६०

आणि लांजी या दोन जमीनदारींच्या सीमा एकमेकाला लागून असल्यामुळे हटीलाने सीमाविवाद उकरुन काढला. लांजी जमीनदारीच्या म्हशी गढामंडल्याच्या सीमेजवळ चरत असतांना, त्या म्हशी खलोटीच्या सीमेत चरत आहेत, या सबबीवर त्याने त्या ताब्यात घेतल्या. यावरुन हटीला आणि ढोकलसिंग यांच्यात सीमाविवाद सुरु झाला. परिणामस्वरुप ढोकलसिंगाने लांजीचे जमीनदार रामजी पटेल यांच्याशी सल्लामसलत करुन आपले सात-आठशे सैनिक खलोटीवर आक्रमण करण्यासाठी पाठविले. त्यांच्या सैनिकांनी खलोटी जमीनदारीतील महवा वगैरे सात गावे लुटली. यावर, खलोटीचा जमीनदार हटीलाने लांजीवर आक्रमण करण्यासाठी आपले लष्कर पाठविले. यावेळी कामठ्याचे जमीनदार गोंदिबापू यांनी मध्यस्थी केली व संघर्ष टाळण्याचा प्रयत्न केला परंतु हटीलाने, त्याच्या सात गावात लूटपाट केल्याच्या मोबदल्यात ढोकलसिंग व रामजी पटेल यांनी त्याला एक हजार गाई-म्हशी नुकसानभरपाईच्या स्वरुपात द्यावीत, अशी अट पुढे केली. त्यामुळे हा वाद जास्त चिघडला.

गोंदिबापूंनी हा सीमाविवाद नागपूरचे राजा रघूजी द्वितीय यांच्या दरबारात प्रस्तुत केला. या विवादात रघूजी द्वितीय यांनी हटीला यास दोषी ठरविले आणि देवगड व गढामंडला या दोन सुभ्यात निर्माण झालेला सीमाविवाद सामोपचाराने सोडविला. हा विवाद सोडविण्यात गोंदिबापूंनी महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली.

## ११. उपकाराची परतफेड

परगणे कामठ्याच्या लष्करी सेवेत बाणाजी आणि तानाजी हे दोन तुरकरबंधू कार्यरत होते. त्यांनी परगणे कामठ्याच्या उत्कर्षात महत्त्वपूर्ण योगदान दिले होते. त्यांच्या ऋणातून उऋण होण्यासाठी गोंदिबापूंनी त्यांना कामठ्याच्या उत्तर-पश्चिमेकडील ज्या ठिकाणी बाघ नदी ही वैनगंगेला जावून मिळते त्या परिसरातील काटी, बिरसोला, कोरणी, नीलज, दासगाव, सतोना, गर्रा, तेढवा, उमरी, शिवणी, माकडी आणि गिरोला ही बारा गावे बक्षीस दिली. समर्पणवृत्तीने केलेल्या सेवेची परतफेड कृतज्ञतापूर्वक कशी करावी, याचा एक उच्च आदर्श गोंदिबापूंनी आपल्या या कृतीतून समकालीन समाजासमोर घालून दिला.

हिंदू धर्मशास्त्रात 'बारा' या अंकाला विशेष महत्त्व आहे. बारा राशी, बारा ज्योतिर्लिंग, बारा महिन्यांचा एक वर्ष, बारा वर्षाचा एक तप, बारा खांबांचा लग्नमंडप आणि बारा दिवसात अपत्याचा बारसा इ. बाबी लक्षात घेतल्या की, मग भारतीय जीवनपद्धतीत बारा या अंकाला किती महत्त्व आहे याची साक्ष पटते.

यातून गोंदिबापू हे स्वभावाने धार्मिक असून हिंदू तत्त्वज्ञानावर त्यांची निष्ठा होती, असे परिलक्षित होते.

भारतात कोणतीही वस्तू दुसऱ्याला देतांना देणाऱ्याने 'पस्तुरी' (मोजमापपेक्षा थोडी जास्तीची वस्तू) देण्याची पद्धती प्रचलित होती. ही पद्धती म्हणजे भारतीयांच्या औदार्याची प्रतीक होती. संभवत: याच पद्धतीचे अनुसरण करीत गोंदिबापूंनी ज्यावेळी तुरकर बंधुंना बारा गावे बक्षीस स्वरुपात दिली, त्याचवेळी त्यांनी त्यांच्या कन्येला 'बिसरा' हे गाव दहेज स्वरुपात दिले आणि 'कासा' हे गाव एका ब्राम्हण परिवाराला दान दिले.

गोंदिबापूंना त्यांच्या काळात प्रचंड नावलौकिक प्राप्त होता. त्यांच्या मनाचे औदार्य हे त्याचे एक महत्त्वपूर्ण कारण होय. त्यांची ही दानवीर वृत्ती सदासर्वकाळ विनम्रपणे आठवली जाईल.

## १२. बारा गावचा 'बारसा'

बाणाजी आणि तानाजी तुरकर हे सिहोरा (तुमसर) येथील मूळ रहिवाशी असून मराठा शासनकाळात ते गिरोला येथे आले व वास्तव्य करु लागले. गोंदिबापूंकडून त्यांना बक्षीस स्वरुपात बारा गावे मिळताच त्यांनी गिरोला येथे 'बारसागडे' देवाची स्थापना केली आणि नंतर ते त्यांना प्राप्त झालेल्या अन्य गावात पसरले. पुढे इंग्रजी अमदानीत या सर्व बारा गावांची मालगुजारी तुरकर घराण्यातील लोकांनाच प्राप्त झाली.

मराठा शासनकाळापासून गिरोला येथे दरवर्षी बारसागडे देवाची यात्रा भरत असते. अलीकडे शिवशंकर तुरकर, ग्राम कोरणी यांच्या पुढाकारातून दरवर्षी २५ डिसेंबरला एक विशेष कार्यक्रमाचे आयोजन सुरु झालेले असून यात काटी-बिरसोला परिसरातील तुरकर घराण्याचे लोक सहभागी होत असतात. कार्यक्रमाचा मूळ उद्देश 'गोत्र संघटन' हा असून पूर्वजांना श्रद्धांजली देवून या कार्यक्रमाची सुरुवात होते. कार्यक्रमाचे स्थान अथवा गाव दरवर्षी बदलले जाते. या कार्यक्रमाला 'बारा गावचा बारसा' असे संबोधतात. गिरोला येथील बारसागडे देवावर उपरोक्त संपूर्ण बारा गावातील लोकांची अगाध निष्ठा आहे, असा भाव या संबोधनातून अभिव्यक्त होतो.

काळ निघून गेला, पण 'बारा गावचा बारसा' हा कार्यक्रम गोंदिबापूंच्या औदार्याची आणि बाणाजी व तानाजी या तुरकर बंधूंच्या समर्पणाची आठवण आणि नव्या प्रेरणा देत राहील, यात संशय नाही.

## १३. गोंदिबापूंचा ' गोंदिया'

गोंदिया हे नगर पूर्व महाराष्ट्रात असून मुंबई-कोलकाता रेल्वेमार्गावर आहे. इ.स. १९९९ मध्ये गोंदियाला जिल्ह्याचा दर्जा प्राप्त झालेला आहे. मोगल अमदानीत हा परिसर गोंड राजा बख्तबुलंदच्या देवगड संस्थानात असून घनदाट अरण्याने व्याप्त होता. 'गोंड' या आदिम जनजातीचे लोक हे या परिसरातील मूळ रहिवाशी होत. गोंड आणि गोंदिया या दोन शब्दात बरेच साम्य असल्यामुळे गोंदिया या नावाची उत्पत्ती गोंड या शब्दातून झाली असावी, असा एक विचार क्षणभर मनात येवून जातो. पण इ.स.१७५१ मध्ये कामठा जमीनदारीचा उदय घडून आला. या काळातील कागदपत्रात कामठा, लांजी, फुलचूर, हट्टा, लिंगा, किरणापूर, भंडारा, सानगडी, पवनी, तिरोडा, आमगाव, देवरी, केशोरी, बिंजली, धनसुआ इ. स्थानांचा कोणत्या-ना-कोणत्या कारणाने उल्लेख झालेला दिसून येतो. पण त्या श्रृंखलेत गोंदियाचा उल्लेख मात्र कुठेच दिसून येत नाही. यावरुन कामठा जमीनदारीच्या उदयापूर्वी गोंदिया हे गाव अस्तित्वातच नसावे आणि गोंदिया या नावाची उत्पत्ती गोंड या शब्दातून झाली नसावी या निष्कर्षावर आपण जाऊन पोहचतो.

इ.स.१७८८ च्या, भोसले राजवटीखालील प्रदेश दाखविणाऱ्या नकाशात कामठा (Coomtha) हे ठिकाण ठळकपणे दाखविण्यात आले आहे. त्याच्या जवळ अन्य स्थानांचा उल्लेख आहे. पण येथे गोंदियाचे नाव नमूद नाही, ही बाब देखील निष्कर्षाला बळकटी प्रदान करणारी आहे. प्रस्तुत नकाशा परिशिष्टात समाविष्ट केलेला आहे.

गोंदिबापू हे इ.स.१७८८ पासून इ.स.१८१६ पर्यंत कामठ्याचे जमीनदार होते. त्यांनी आपल्या कारकिर्दीत कामठा जमीनदारीच्या अधिकारक्षेत्राखालील व्यापक प्रदेश लागवडीखाली आणला आणि तेथे तिरोडा-तुमसरकडील शेतकरी कुटुंबाचे पुनर्वसन केले. या काळात कामठा जमीनदारीत अनेक नवीन गावांचा उदय घडून आला. अत: या काळातच कामठ्याचे सामर्थ्यशाली जमीनदार गोंदिबापू यांनी गोंदिया हे गाव वसविले असावे आणि लोकांनीच या लोकप्रिय जमीनदाराच्या नावाला अनुसरुन या नवोदित गावाला गोंदिया हे नाव दिले असावे असे दिसते. 'गोंदिया' आणि 'गोंदिबा' या दोन शब्दांचे अवलोकन केल्यास यांतील प्रथम दोन अक्षरे सारखीच असून तिसऱ्या अक्षराला 'आ' ची मात्रा लागलेली आहे, असे दिसून येते. हे साम्य लक्षात घेतले की 'गोंदिबा' या

नावातूनच 'गोंदिया' या शब्दाची उत्पत्ती झालेली आहे याची खात्री पटते आणि गोंदिबापू या विख्यात जमीनदारानेच गोंदिया हे गाव वसविले होते, असा या परिसरातील लोकात रुढ असलेला समज सार्थक सिद्ध होतो.

## १४. गोंदियाच्या उत्कर्षाचा इतिहास

''वऱ्हाडच्या पूर्वेस आज वर्धा, नागपूर, चंद्रपूर, भंडारा आणि गोंदिया या जिल्ह्यांचा जो भाग आहे त्यास पूर्वी झाडीपट्टी अथवा गोंडवण असे म्हणत. या भागात सतराव्या शतकापर्यंत दाट झाडी असून बहुतेक गोंड वस्ती होती. हा भाग मोगल साम्राज्यात येत असून त्यावर देवगड (वर्तमान मध्यप्रदेशाच्या छिंदवाडा जिल्ह्यातील डोंगरी किल्ला) चे गोंड राजे मोगलांचे मांडलिक म्हणून शासन करीत असत. त्यांच्या या राज्याला 'देवगड संस्थान' असे संबोधिले जात असे. मोगल सम्राट या गोंड राजांचा उल्लेख राजे म्हणून करीत नसत. ते त्यांचा जमीनदार म्हणून उल्लेख करीत असत.''[1] ''शाहू महाराजांनी रघूजी प्रथम यांना दिनांक २८ फेब्रुवारी १७२३ रोजी वऱ्हाड-गोंडवनची सनद दिली. यानंतर रघुजींनी देवगडच्या गोंड राजाकडून गोंडवनचा संपूर्ण प्रदेश मिळविला. यावेळेपर्यंत वऱ्हाडातील 'भाम' ही रघूजी प्रथम यांची राजधानी होती.

इ.स. १७३७ मध्ये त्यांनी नागपूरला आपली राजधानी बनविली. अशाप्रकारे इ.स.१७३७ मध्ये नागपूर राज्याची स्थापना झाली.''[2]

नागपूर राज्याच्या स्थापनेच्या वेळी गोंदियाचे अस्तित्व नव्हते. त्या काळात भंडारा हे मात्र महत्त्वाचे ठिकाण होते. भंडाऱ्याला त्या काळात मजबूत किल्ला होता. रघूजी प्रथम यांनी हरी पाटील नावाच्या किल्लेदाराला परास्त करुन भंडाऱ्याच्या किल्ल्यावर आपला ताबा प्रस्थापित केला होता. नागपूरहून छत्तीसगडकडे जाणारा लष्करी मार्ग भंडाऱ्याहून जात होता. भोसले राजवटीत कामठा जमीनदारी अस्तित्वात आल्यानंतर गोंदिबापू बहेकार, परगणे कामठ्याचे प्रसिद्ध जमीनदार यांच्या शासनकाळात (इ.स.१७८८-१८१६) गोंदियाचा उदय घडून आला. भोसले राजवटीपश्चात् ब्रिटिश राजवट सुरु झाल्यानंतर इ.स.१८८० च्या सुमारास मुंबई-कोलकाता रेल्वेमार्ग गोंदियावरुन सुरु झाल्यामुळे गोंदियाचे भाग्य उजळले. इ.स.१९१४ मध्ये इंग्रजांनी गोंदियाला तालुक्याचा दर्जा दिल्यामुळे आणि येथे एस.डी.ओ. कार्यालय व न्यायालयाची स्थापना झाल्यामुळे गोंदियाचे महत्त्व वाढले.

---

1. पूर्वोक्त, डॉ.कोलारकर आणि पुरंदरे, पृष्ठ क्र.१९

2. पूर्वोक्त, पृष्ठ क्र.१८-२२

द्वितीय महायुद्ध (इ.स.१९३९-४५) सुरु होताच इंग्रजांनी गोंदियाच्या उत्तर-पूर्वेस सुमारे पंधरा कि.मी. अंतरावर असलेल्या बिरसी येथे आपली लष्करी छावणी उभारली. त्यामुळे यानंतरच्या काळात गोंदियाला प्रवाशांचे आवागमन जास्त वाढले. मारवाडी व पंजाबी हे व्यापारी समुदायाचे लोक परप्रांतातून येवून गोंदियाला स्थाईक झाले. स्वातंत्र्योत्तर काळात सिंधी समाजाचे लोक मोठ्या प्रमाणात गोंदियाला स्थाईक झाले व हळूहळू त्यांनी येथील व्यापारात शिरकाव केला. काळाच्या ओघात परिस्थिती झपाट्याने बदलली आणि गोंदिया हे गाव शहरात परिवर्तीत होण्याची प्रक्रिया सुरु झाली. पाहता-पाहता गोंदिया हे एक सुंदर नगर आणि महत्त्वपूर्ण शैक्षणिक व व्यापारिक केंद्र म्हणून प्रसिद्धीस आले. इ.स.१९९९ मध्ये भंडारा जिल्ह्याचे विभाजन होवून गोंदियाला जिल्ह्याचा दर्जा प्राप्त झाला. एकेकाळी गोंदिया हे अस्तित्वात नसून भंडारा हे प्रसिद्धीच्या झोतात होते. आज मात्र गोंदियाला भंडाऱ्याच्या बरोबरीचा राजकीय दर्जा प्राप्त झालेला आहे. हा काळाचा महिमा आहे, असेच म्हणावे लागेल. या नगराचा उत्कर्ष यापुढेही सातत्याने होत राहील आणि गोंदिया हे नगर जोपर्यंत अस्तित्वात राहील तोपर्यंत त्याचे नाव हे गोंदिबापू जमीनदार यांच्या आठवणींना उजाळा देत राहील.

## १५. हाच खरा सुवर्णकाळ!

गोंदिबापू हे स्वयं प्रतिभाशाली, बलवान आणि उत्तम शासक होते. त्यांच्या नसानसात उद्यमशीलता सळसळत होती. त्यांनी इ.स.१७८८ पासून इ.स.१८१६ पर्यंत म्हणजे एकूण अठ्ठावीस वर्षे, एवढ्या दीर्घकाळापर्यंत परगणा कामठ्याचा राज्यकारभार कुशलतेने सांभाळला. त्यांनी भोसले शासनाशी उत्तम संबंधाचे निर्वाह करीत कामठा जमीनदारी आणि परगणा कामठ्याचा विकास घडवून आणला. परगणा कामठ्याच्या उत्कर्षात ज्यांनी-ज्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले, त्यांची त्यांनी नेहमी बूज राखली. त्यामुळे जनमानसात त्यांची चांगली प्रतिमा साकारली. समकालीन समाजात त्यांना भरपूर आदर-सत्कार प्राप्त होवून त्यांची लोकप्रियता जनमानसात रुजली आणि त्यांच्या कर्तबगारीची इतिहासात नोंद झाली.

कामठा जमीनदारीच्या इतिहासातील गोंदिबापूंचा शासनकाळ हा गौरवशाली काळ होता. त्यांच्या शासनकाळात कामठा जमीनदारी ही आर्थिक दृष्ट्या समृद्ध आणि लष्करी सामर्थ्याच्या दृष्टीने सशक्त झाली. म्हणून इ.स.१८१८ मध्ये कामठा जमीनदारी ही चिमणा बहादूरच्या नेतृत्वाखाली इंग्रजांविरुद्ध स्वातंत्र्य लढा उभारण्यास समर्थ ठरली. यातूनच गोंदिबापूंच्या शासनकाळाचे मोल लक्षात येते. तात्पर्य, गोंदिबापू हे एक प्रतिभाशाली शासक होते. त्यांच्या कर्तबगारीमुळे कामठा जमीनदारीचा नावलौकिक वाढला.

# ६. चिमणा बहादूर : समग्र जीवन–चरित्र

## १. ध्येयवादी 'चिमणा बहादूर'

**चि**मणा बहादूर यांनी इ.स.१८१८ च्या स्वातंत्र्य लढ्याच्या प्रसंगी स्वातंत्र्याची एक धगधगती मशाल बनून आणि अत्यंत चपळ अशा चंपा घोड्यावर बसून, वैनगंगेकडील व्यापक प्रदेश त्याच्या टापांखाली तुडविला. ते आपल्या प्रभावक्षेत्राखालील संपूर्ण प्रदेशात रात्रंदिवस वावरले आणि तिथे स्वातंत्र्य युद्धाची ज्वाला भडकविली. इंग्रजांची गुलामगिरी झुगारुन देण्यासाठी, प्राणाची पर्वा न करता प्रयत्नांची पराकाष्ठा केली.

चिमणा बहादूर हे मराठाकालीन कामठा जमीनदारीचे 'तृतीय जमीनदार' होत. त्यांना वैनगंगा व वाघ नदीच्या खोऱ्यातील, सुमारे दहा हजार चौ.कि.मी. एवढ्या व्यापक प्रदेशातील सर्व जमीनदार आपला प्रमुख मानत. इंग्रज हे परकीय आहेत, हा भाव त्यांच्या ध्यानी–मनी बालपणापासूनच रुजला होता. म्हणून इ.स.१८१८ मध्ये नागपूरचे निर्वासित राजा आप्पासाहेब भोसले यांनी महादेवाच्या डोंगरात राहून इंग्रजांविरुद्ध स्वातंत्र्य युद्ध सुरु केले, त्यावेळी चिमणा बहादूर यांनीही स्वातंत्र्य युद्धात पदार्पण केले. स्वातंत्र्य लढ्याच्या प्रसंगी चिमणा बहादूर हे आप्पासाहेबांचे उजवा हात होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात अतिशय ध्येयासक्त, आणि यासाठी व्यक्तिगत सुखाकडे पाठ फिरवून वाटचाल करणारा देशभक्त झळकत होता. चिमणा बहादूरचे संपूर्ण जीवन–वृत्तांत उजेडात आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न या ग्रंथात केलेला आहे.

## २. जन्म आणि बालपण

चिमणा बहादूरचा जन्म दि. १८ फेब्रुवारी १७८२ रोजी झाला. त्यांच्या आईचे नाव यशोदा, वडीलांचे नाव गोंदिबापू आणि बहेकार हे त्यांचे कुलनाम होते. कामठा जमीनदारीचे संस्थापक कोलुबापू हे त्यांचे आजोबा होत. त्याकाळी संयुक्त कुटुंबपद्धती प्रचलित असल्यामुळे त्यांचे बालपण संपन्न व मोठ्या कुटुंबात आई–वडील, आजोबा–आजी, काका–काकू आणि भाऊ–बहिणी या सर्वांच्या सान्निध्यात घडले. गोंदिबापूंना पुना, चिमणा, मोहना आणि कोंडु अशी एकूण चार मुले होती. धनधान्यसंपन्न अशा कामठा जमीनदारीतील या चारही मुलांचे बालपण अत्यंत गोडीगुलाबीत घडले.

बालपण हे सुरम्य असते. पण त्यातही चिमणा बहादूरचे बालपण हे अनेक अर्थाने उल्लेखनीय असे आहे. बाळ चिमणा हा अतिशय देखणा, बोलका आणि कुणालाही हवाहवासा वाटेल असा होता. आपल्या सुलभ बालक्रीडांनी सर्वांचे लक्ष वेधून घेणाऱ्या बाळ चिमणाला कडेवर घ्यावे आणि त्याचे पटापट मुके घ्यावे, असे राजवाड्यातील प्रत्येकाला वाटत असे. कामठा येथील भव्य राजवाडा, हत्तीखान्यातील हत्ती, घोडपागेतील घोडे, शस्त्रागारातील अस्त्रशस्त्र, राजवाड्याभोवती असलेला किल्ला, किल्ल्याच्या भव्य प्रवेशद्वारासमोरील तोफा, भूयारटोला येथील कामठा जमीनदारीच्या लष्कराची कवायत इ. बाबी पाहून त्याच्या मनात कुतूहल निर्माण होत असे आणि त्यामुळे तो यासंबंधी जिज्ञासायुक्त प्रश्न कुटुंबातील वडीलधाऱ्या व्यक्तींना, मानवाईकांना अथवा सेवादारांना विचारित असे. आपणही मोठे झाल्यावर घुडसवारी, हत्तीची सवारी व तलवारबाजी करावी आणि रणांगणावर पराक्रम गाजवावा, असे त्याला मनोमन वाटत असे.

कामठा येथील जमीनदारवाड्याची कचेरी ही नेहमी अन्य जमीनदारीतून येणाऱ्या-जाणाऱ्या जमीनदारांच्या वास्तव्यामुळे शोभायमान होत असे. कचेरीत राज्यकारभार, राजकीय घडामोडी, जमीनदारीतील शांतता-सुव्यवस्था, रस्तेबांधणी आणि अर्थव्यवस्था इ. विविध विषयांवर चर्चा होत असे. ही चर्चा वारंवार बाळ चिमणाच्या कानांवर पडत असे. यातून चिमणा बहादूरचे बालमन स्वाभाविकपणे घडत गेले.

## ३. कुशाग्र बुद्धीची चाहूल

चिमणा बहादूरच्या स्वभावात जन्मजात गोडवा होता. त्यामुळे त्याच्या बालपणी कामठ्याच्या जमीनदारवाड्यात नित्य नियमाने दररोज त्याचे सवंगडी जमत असत. बाळ चिमणा हा सवंगड्यांसोबत नानातऱ्हेचे खेळ खेळतांना देहभान विसरुन जात असे. अनेकदा तो सवंगड्यांसोबत लुटपुटीची (कृत्रिम) लढाई लढत असे. कधी तो हातात काठीची तलवार घेवून लाकडी दरवाज्यावर वार करीत असे, तर कधी तो जरीच्या टोपीची ढाल हातात घेवून सवंगड्यांना स्वत:वर काठीच्या तलवारीने वार करायला लावत असे. कधी-कधी तो आपल्या बालमित्रांना गुडघे व हातांच्या बळावर वाकून राहायला लावत असे आणि त्यांच्या पाठीवर बसून घोड्याच्या सवारीचा आनंद घेत असे. तो आपल्या सर्व भावांच्या आणि मित्रांच्या 'गळ्यातील ताईत' होता. तो सर्वांना मनापासून आवडत असे. त्यामुळे त्याचे सर्व मित्र त्याचे म्हणणे मोठ्या सहजतेने ऐकत

असत. जेव्हा तो सवंगड्यांना आदेश देत असे तेव्हा ते मुकाट्याने त्याच्या आज्ञेचे पालन करीत असत. असे दृश्य वारंवार पाहून बाळ चिमणामध्ये नेतृत्वाचा उपजत गुण आहे, असे वडीलधाऱ्या व्यक्तींना वाटत असे.

राजवाड्यातील मोतद्दार हे जेव्हा हत्तींवर बसून त्यांना झाडाच्या फांद्या चारायला व त्यांची आंघोळ घालायला दक्षिणेकडील पांगोली नदीकाठी वा उत्तरेकडील झिलमिली तलावावर घेवून जात असत, तेव्हा बाळ चिमणा हा सवंगड्यांसह हत्तीवर बसून आणि स्वत: हत्ती हाकीत जलाशयावर जात असे. तिथे गेल्यावर तो सवंगड्यांशी धावण्याची शर्थ लावत असे. कधी तो भरधाव सैरावैरा पळत असे तर कधी–कधी तो बालमित्रांसह झाडाच्या फाद्यांना धरुन मनसोक्त झोके घेत असे. एखाद्या वेळी तो झाडाच्या निंबोण्या तोडून निर्भयपणे हत्तीपुढे जावून टाकत असे. त्याचे असे नानाविध खेळ पाहून दिवसाचा संपूर्ण वेळ कसा भर–भर निघून जात असे याचा थांगपत्ताही सेवादारांना लागत नसे. त्याच्या नानाविध खेळाने वडीलाधाऱ्या माणसांचे डोळे सुखावत असत, तो खऱ्या अर्थाने राजघराण्याला शोभत होता आणि त्यातून त्याच्या कुशाग्र बुद्धीची कल्पना त्याच्या सर्व सवंगड्यांना व वडीलधाऱ्या माणसांना येत होती.

## ४. स्वातंत्र्याचे मोल

कामठा परगणा हे नागपूरकर भोसलेंच्या काळात मध्यवर्ती भारतातील एक प्रसिद्ध परगणा असून नागपूर राज्याचे अभिन्न अंग होते. या परगण्यातील एक जमीनदार घराण्यात चिमणा बहादूरचे जन्म झाले होते. म्हणून शिवाजी महाराजांपासून थेट पेशवा बाजीराव द्वितीय यांच्या काळापर्यंत मराठ्यांनी भारतवर्षात गाजविलेल्या पराक्रमाच्या कथा आणि व्यथा ऐकण्याचे योग चिमणा बहादूरला बालपणातच लाभले. त्यातूनच गुलामगिरी ही दु:खदायी असून त्यात समाजाचा स्वाभिमान हा शत्रुच्या पायदळी तुडविला जातो, स्वराज्य व स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी युद्धाचा मार्ग स्वीकारावा लागतो व यासाठी असंख्य शुरवीरांच्या बलिदानाच्या स्वरुपात असीम किंमत चुकवावी लागते ही बाब चिमणा बहादूरच्या मनावर बालपणातच प्रतिबिंबित झालेली होती, असे त्यांच्या भावी आयुष्यातील घटनांवरुन दिसून येते.

## ५. शिवभक्तीचे संस्कार

मराठा शासक हे शिवजींचे परम् उपासक होते. ते आपले राज्य जिथे–जिथे प्रस्थापित करीत तिथे–तिथे ते शिवलिंगाची स्थापना देखील करीत असत.

त्याचप्रमाणे मराठा शासक हे आपल्या प्रत्येक किल्ल्यात चांदशहा वली या मुस्लिम संताची मजार बनवित असत. मजार स्थापित केली की त्यामुळे शत्रुच्या आक्रमणापासून किल्ल्याचे आणि त्यातील लष्कराचे संरक्षण होते, अशी धारणा त्याकाळी मराठ्यांत रुढ होती. यातून मराठा शासक हे धार्मिक सहिष्णुतेच्या धोरणाचे पुरस्कर्ते होते ही बाब देखील स्पष्टपणे परिलक्षित होते.

कामठ्याच्या जमीनदारांनी शिवजींची उपासना आणि धार्मिक सहिष्णुता या दोन बाबी मराठा शासकांकडून आत्मसात केल्याचे दिसते. कामठ्यात आजही मराठा शासनकाळात बनलेले शिवमंदिर अस्तित्वात असून येथील किल्ल्यात असलेली चांदशहा वलीची मजारदेखील सुस्थितीत आहे. कोलुबापू आणि त्यांचा संपूर्ण परिवार शिवजींचा परम उपासक होता. कुटुंबातील वातावरणामुळे बाळ चिमणावर शिवभक्तीचे आणि धार्मिक सहिष्णुतेचे संस्कार नकळत झालेले होते.

## ६. आदर्शांचे बीजारोपण

बाळ चिमणा हा वडिलाधाऱ्या व्यक्तींकडून रामायण-महाभारतातील गोष्टी लक्षपूर्वक ऐकत असे. त्यातून अन्यायाचा प्रतिकार करण्याचे संस्कार त्याच्या अंतर्मनावर नकळत होवू लागले. राणा सांगा व महाराणा प्रतापांचे पराक्रम, साहस आणि स्वातंत्र्यासाठी त्यांनी भोगलेले अपार कष्ट यासंबंधी गोष्टी ऐकून त्याच्या मनात या महान स्वाभिमानी राजांविषयी श्रद्धेचे भाव रुजू लागले. त्यांचे स्वातंत्र्य प्रेम आठवून तो भारावून जाऊ लागला आणि शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेच्या गोष्टी ऐकून तो त्यांच्या समग्र चरित्राशी समरस होवू लागला. हा देश कोणाचा? या भूमीचे खरे मालक कोण? परकीय लोक येऊन या भूमीवर राज्य कां करावे? असे अनेक प्रश्न त्याच्या बालमनात निर्माण होत असत. मनात उद्‌भवणाऱ्या या प्रश्नांच्या भडिमारामुळे कधी-कधी बाळ चिमणा भांबाहून जात असे. यासंबंधी मनात उद्‌भवणारे प्रश्न, योग्य प्रसंगी वडिलधाऱ्या व्यक्तींना विचारुन तो आपल्या बालमनाचे समाधान करुन घेत असे.

शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेसाठी केलेल्या प्रयत्नामुळे, त्यांनी केलेल्या समाज जागृती व संघटनात्मक कार्यामुळे, आणि रणांगणात गाजविलेल्या पराक्रमामुळे ते या बाळ चिमणाला एक आदर्श पुरुष वाटू लागले. रामायण महाभारतातील प्रसंग आणि राणा सांगा, महाराणा प्रताप व शिवाजी महाराज यासारख्या वीर पुरुषांच्या ऐतिहासिक गोष्टी लक्षपूर्वक ऐकून चिमणा बहादूरचे

बालमन घडले होते, आकार पावले होते. महापुरुषांच्या जीवन-चरित्रातील बारकावे त्याने बालपणापासूनच लक्षात घेतले होते. त्यातून बाळ चिमणाच्या भावी आयुष्याला एक विशिष्ट वळण लागले. बालपणातील या संस्कारातूनच चिमणा बहादूरचे स्वत:चे असे एक भावविश्व आणि जीवनविषयक तत्त्वज्ञान विकसित झाले होते.

## ७. शौर्यशाली खेळांचा अभ्यास

मराठा शासनकाळात राजामहाराजांमध्ये परस्पर युद्ध घडून येणे ही नित्याचीच बाब होती. म्हणून त्या काळात आखाडे, शौर्यशाली खेळांचा अभ्यास आणि लष्करी स्वरुपाच्या शिक्षणाला सर्वत्र प्रोत्साहन दिले जात असे. प्रत्येक जमीनदाराच्या अंगी युद्धकौशल्य असावे, त्याने आपल्या पदरी कवायती सैन्य ठेवावे आणि प्रसंगी लष्करासह राजाच्या सेवेत उपस्थित व्हावे अशी अपेक्षा त्याकाळी जमीनदारांविषयी बाळगली जात असे. त्यामुळे जमीनदार लोकही आपल्या घराण्यातील मुले लष्करी शिक्षणात पारंगत व्हावे, असा प्रयत्न काळजीपूर्वक करीत असत.

कामठ्याच्या राजवाड्यातही आखाड्याची व्यवस्था होती. यात कर्तृत्ववान मुले दांडपट्टा, छडीपट्टी, लाठी-काठी, कुस्ती, तलवारबाजी, भालाफेक, बंदूक चालविणे, नेमबाजी इ. बाबींचे प्रशिक्षण घेत असत. बाळ चिमणाला सुरुवातीपासूनच या सर्व बाबी जवळून पाहण्याची संधी उपलब्ध होती. किशोरावस्थेत त्याने मोठ्या उत्साहाने या सर्व बाबींचे प्रशिक्षण घेतले आणि दोनास दोन असा समसमान सामना लढण्याची वेळ आली तर समर्थ प्रतिस्पर्ध्यावरही निश्चितपणे विजय हासिल करता येईल एवढे कौशल्य त्याने त्यात आत्मसात करुन सर्वत्र नावलौकिक प्राप्त केला. मजबूत शरीरयष्टी, कोणत्याही क्षेत्रात अद्भुत साहस करण्याची, आणि कोणतीही जोखीम पत्करुन लोकोपयोगी कार्यात पुढाकार घेण्याची जन्मजात प्रवृत्ती, यामुळे आप्त-स्वकीय, मित्रमंडळी व सर्वलोक चिमणाबापूला चिमणा बहादूर असे संबोधू लागले.

## ८. युद्धाविषयी आकर्षण

कामठा जमीनदारीतून ज्या-ज्या वेळी भोसलेंच्या मदतीसाठी लष्कर पाठविले जात असे त्या-त्या वेळी युद्धांचा प्रसंग पाहण्यासाठी त्या लष्करासोबत जाण्याचा हट्ट बाळ चिमणा धरत असे. अशावेळी हे वय लष्करासोबत जायचे नाही, अशी त्याची प्रेमाने, धाकाने अथवा नानापरीने समजूत घालावी लागे.

चिमणा बहादूरच्या मनात बालपणापासूनच नागपूरचा राजवाडा, युद्ध आणि राजकीय घडामोडीविषयी सुप्त आकर्षण होते. तो यासंबंधी जिज्ञासायुक्त प्रश्न वडिलधाऱ्या व्यक्तींना विचारित असे आणि तत्संबंधी माहिती लक्षपूर्वक जाणून घेत असे. कधी-कधी तो नागपूरला जाण्याचा आग्रह कुटुंबातील लोकांजवळ धरत असे. गोंदिबापू हे त्याचा हा आग्रह अनेकदा पूर्ण करीत असत.

## ९. नागपूर दरबारात ओळख

गोंदिबापू हे इ.स.१७८८ मध्ये कामठ्याचे जमीनदार बनले. यावेळी बाळ चिमणाचे वय अवघे सात वर्षाचे होते. गोंदिबापूंना राज्यकारभारविषयक कामासाठी अनेकदा नागपूर दरबारात जावे लागत असे. ते नागपूरला जातांना कधी-कधी बाळ चिमणालाही सोबत घेवून जात असत. त्यामुळे बाळ चिमणा हा राजे रघूजी द्वितीय यांना लहानपणापासूनच चांगल्याप्रकारे ओळखत होता. मजबूत शरीरयष्टी, स्वभावातील गोडवा, आणि व्यक्तिमत्त्वातून झळकणारा करारीपणा, यामुळे तो राजे रघूजी द्वितीय यांना मनापासून आवडू लागला.

रघूजी हे कामठ्याहून येत असलेल्या बाळ चिमणावर मनापासून प्रेम करु लागले. रघुजींचा एक लहान भाऊ खंडोजी उर्फ चिमणाजी भोसले हा होता. त्याला रघुजींनी इ.स.१७७९ मध्ये नवेगावबांध येथे पूर्ण राजकीय सन्मानाने बहाद्दर ही उपाधी प्रदान केली होती. त्यांचा हा सख्खा भाऊ चिमणा बहादूर याचे इ.स.१७८९ मध्ये निधन झाले. या भावाच्या निधनानंतर लगेच कामठ्याचा साहसी बालक चिमणा हा रघुजींच्या सान्निध्यात आला आणि या बालकाने रघुजींचे मन जिंकले. नावातील साधर्म्य लक्षात घेवून राजे रघूजी द्वितीय हे कामठा जमीनदारीतील साहसी बालक चिमणाबापू यास मोठ्या आपुलकीने चिमणा बहादूर असे संबोधू लागले. राजेसाहेबांचे अनुकरण करीत नागपूर दरबारातील नारायण पंडितसारखे उच्चभ्रू व्यक्तीदेखील, कामठ्याचे सामर्थ्यशाली जमीनदार गोंदिबापू यांच्या या प्रतिभाशाली मुलाला चिमणा बहादूर असे संबोधू लागले. पाहता-पाहता संपूर्ण नागपूर दरबारात त्याला चिमणा बहादूर या नावाने नवीन ओळख प्राप्त झाली.

## १०. चिमणा बहादूरचा उत्कर्ष

भोसले राजवंशाच्या शासनकाळात राजाला राज्यकारभारविषयक सल्ला देण्यासाठी मुत्सद्दी व मानवाईक लोक असत. त्याने कोणताही महत्त्वपूर्ण निर्णय घेण्याच्या प्रसंगी राजदरबारातील राजकारणात उधाण येत असे. तसेच कोणत्याही

जमीनदाराला नवीन जमीनदारी बहाल करण्याच्या वेळी राजवाड्यातील राजकारण सक्रिय होत असे. नवीन जमीनदारी आपल्या पदरी पाडून घेण्यासाठी संबंधीत जमीनदाराचा राजकीय प्रभाव महत्त्वपूर्ण ठरत असे.

कामठ्याचे संस्थापक जमीनदार कोलुबापू यांच्या प्रयत्नामुळे कामठा जमीनदारी ही त्यांचा मोठा मुलगा पांडुबापू याला प्राप्त झाली होती. या जमीनदारीत एकूण ५१ गावे होती. याशिवाय सावली डोंगरगाव आणि फुक्कीमेटा या दोन जमीनदारींचा समावेश आमगावच्या जमीनदारीत साहाय्यक जमीनदारी (Subordinate Zamindari) म्हणून होत असे. आमगाव जमीनदारी ही अगोदर लांजी जमीनदारीच्या अधीन होती. पण, पांडुबापूच्या नावाने नवीन सनद आली त्यावेळी या जमीनदारीला स्वतंत्र जमीनदारीचा दर्जा देण्यात आला. पांडुबापूच्या निधनानंतर लांजीचे तत्कालीन जमीनदार सोनबा यांनी आमगावच्या जमीनदारीवर पुन: आपला हक्क सांगितला. नागपूरच्या मुत्सद्यांना हाताशी घेवून त्यांनी राजदरबारातून नवीन सनद आणली. या सनदेनुसार आमगाव जमीनदारी ही इ.स.१७९६ मध्ये काही काळ लांजी जमीनदारीच्या अधीन होती. या ठिकाणी लांजीचे जमीनदार सोनबा, यांच्या वतीने एक परदेशी (राजपूत) जमीनदार शासन करीत होता. यामुळे कामठा येथील बहेकार घराण्यावर नामुष्कीची पाळी आली होती.

कोलुबापू यांनी संपादित केलेली आमगाव जमीनदारी ही त्यांच्या हयातीतच दुसऱ्याच्या हाती गेल्यामुळे गोंदिबापू हे चिंतीत झाले होते. वडीलधारी व्यक्तींचे दु:ख आणि चिंता, चिमणा बहादूरच्या लक्षात यायला फारसा उशीर लागला नाही. कोलुबापू व गोंदिबापू हे पिता-पुत्र एकदा एकत्र बसलेले असतांना, उपयुक्त वेळ समजून तो त्यांच्या जवळ जाऊन म्हणला ''तुमच्या हाताखाली चिमणा बहादूरसारखा आज्ञाकारी व सक्षम मुलगा हयात असतांना, आमगाव जमीनदारीविषयी तुम्ही दु:खी होण्याचे अथवा चिंता करण्याचे काहीच कारण नाही. आमगाव जमीनदारी पुन्हा प्राप्त केल्याशिवाय, मी शांत बसणार नाही. वडीलधारी व्यक्तींना आपल्या कर्तृत्वाने सुखावणे आणि त्यांच्या मुखमंडळावर हास्य फुलविणे, हाच त्यांच्या अपत्यांचा खरा धर्म होय.'' एवढे बोलून चिमणा बहादूरने आजोबा आणि वडीलांशी विचारविमर्श करुन, त्यांना अगोदर विश्वासात घेतले. त्यानंतर, त्याने आमगाव जमीनदारी ही कामठा जमीनदारीला जोडली जावी, आणि या जमीनदारीची सनद पांडुबापूचा मुलगा सोनाबापू याला मिळावी, यासाठी कंबर कसली. त्याने सोनाबापूसोबत नागपूरला जावून, राजे रघूजी द्वितीय यांच्यासमोर आपली कैफियत रीतसर प्रस्तुत केली.

चिमणा बहादूर आणि सोनाबापू यांनी नागपूर दरबारात आमगाव जमीनदारीसंबंधी अर्ज प्रस्तुत केल्यामुळे रघूजी द्वितीय यांनी लांजीचे जमीनदार सोनबा यांना तातडीने नागपूरला बोलावून घेतले. नंतर दरबारात सर्व मुत्सद्यांच्या उपस्थितीत चिमणा बहादूर-सोनाबापू आणि सोनबा यांना आपल्या अमोरा-समोर बसविले व त्यांना आमगाव जमीनदारीच्या संदर्भात आपआपली बाजू मांडण्याची अनुमती दिली. यावर लांजीचे जमीनदार सोनबा म्हणाले ''आमगाव जमीनदारी ही इ.स. १७५६ च्या पूर्वी लांजी जमीनदारीच्या अधीन होती. परंतु यावर्षी राजे जानोजी भोसले यांनी या जमीनदारीला स्वतंत्र जमीनदारीचा दर्जा देवून ती पांडुबापूंना बहाल केली. पांडुबापूंचे आता निधन झालेले आहे. त्यामुळे ही जमीनदारी पुन्हा लांजी जमीनदारीला जोडण्यात यावी, असे करणे हेच व्यवस्थेच्या दृष्टीने योग्य व न्यायोचित आहे.''

सोनबा यांचा युक्तिवाद, संपताच, चिमणा बहादूरला आपली बाजू मांडण्याची संधी दिली गेली. युक्तिवाद प्रस्तुत करतांना चिमणा बहादूर म्हणाला ''आमगावची जमीनदारी राजे जानोजी भोसले यांनी पांडुबापूंना अधिकृतपणे बहाल केली होती. पांडुबापूंचे निधन झाल्यामुळे हिंदूधर्मशास्त्रातील वारसा हक्कानुसार ही जमीनदारी त्यांचा मुलगा सोनाबापू यांना प्राप्त होणे न्यायोचित आहे. म्हणून आमगाव जमीनदारीची सनद सोनाबापू यांना देण्यात यावी, ही आमची प्रथम मागणी आहे. तसेच पश्चिमेकडील कामठा आणि पूर्वेकडील बिंजली-सालेकसा या दोन्ही जमीनदाऱ्या कामठ्याच्या अधीन असून या दोहोंच्या मध्यभागी आमगाव जमीनदारी असल्यामुळे या जमीनदारीचा स्वतंत्र दर्जा समाप्त करुन, याला परगणा लांजी ऐवजी परगणा कामठ्यात समाविष्ट करणे हे भौगोलिक आणि प्रशासकीय व्यवस्थेच्या दृष्टीनेही संयुक्तिक आहे. म्हणून ही जमीनदारी कामठा जमीनदारीला जोडण्यात यावी, अशी आमची दुसरी मागणी आहे.'' चिमणा बहादूरने आपला युक्तिवाद प्रस्तुत करतांना त्याने कोलुबापू आणि गोंदिबापूंच्या कर्तबगारीची आणि भोसले राजवंशाप्रती असलेल्या त्यांच्या प्रगाढ निष्ठेची देखील राजदरबारातील सर्वांना आठवण करुन दिली.

राजे रघूजी द्वितीय यांनी उपरोक्त दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकल्यानंतर, प्रस्तुत विषयाबाबत सर्व मुत्सद्यांचे मत जाणून घेतले. सरतेशेवटी, त्यांनी आमगाव जमीनदारीला भौगोलिक दृष्ट्या परगणा कामठ्यात समाविष्ट करणे सर्वथा उचित असून सोनाबापूला आमगावचा जमीनदार नियुक्त केले जात आहे, असा निर्णय जाहिर केला. चिमणा बहादूरच्या यशस्वी प्रयत्नामुळे इ.स. १७९६ मध्ये

सोनाबापूला प्राप्त झालेल्या आमगाव जमीनदारीच्या सनदेत खालील अटी समाविष्ट होत्या–

१. आमगावच्या जमीनदाराने शासकीय खजिन्यात २२६३/– रु. वार्षिक या दराने खंडणी जमा करणे बंधनकारक राहील.
२. नागपूर राज्याला आवश्यक असेल तेव्हा स्वत: जमीनदार आपल्या लष्करासह राजाच्या सेवेत उपस्थित होईल.
३. आमगाव जमीनदारी हे कामठा जमीनदारीचे अभिन्न अंग राहील.
४. आमगाव जमीनदारीत सावली–डोंगरगाव आणि फुक्कीमेटा या दोन जमीनदाऱ्या, साहाय्यक जमीनदारी (Subordinate Zamindari) म्हणून पूर्ववत् कायम राहतील.

चिमणा बहादूर आणि सोनाबापू हे जेव्हा गोंदिबापूंच्या नावाने प्रेषित केलेला, राजाचा खलिता घेवून कामठ्याला पोहचले तेव्हा त्यात असलेली आमगाव जमीनदारीची सनद वाचून, कोलुबापू आणि गोंदिबापूंच्या आनंदाला पारावर राहिला नाही. त्यांनी चिमणा बहादूर व सोनाबापूचे खूप कौतुक केले आणि त्यांना शाबासकी दिली. चिमणा बहादूरचे वय त्यावेळी सुमारे चौदा–पंधरा वर्षाचे होते. त्याच्या कर्तबगारीची ही सुरुवात असून ती सर्वांना आश्चर्याचा सुखद धक्का देईल एवढी दमदार होती.

आमगाव जमीनदारी ही परगणा कामठ्यात समाविष्ट झाल्यामुळे आणि ही प्रसिद्ध जमीनदारी कामठा जमीनदारीच्या वर्चस्वाखाली आल्यामुळे, कामठ्याला सर्वत्र आनंदाचे वातावरण तर होतेच, पण नागपूरहून आणलेल्या नवीन सनदेनुसार आमगावला सर्वांसमक्ष सोनाबापूंचा राज्यारोहण संस्कार संपन्न करणेही आवश्यक होते. अत: शुभ मुहूर्त पाहून चिमणा बहादूरच्या नेतृत्वाखाली आमगावला राज्यारोहण समारंभाचे आयोजन करण्यात आले. समारंभाच्या दिवशी संपूर्ण आमगाव आणि तेथील जमीनदारवाडा सडा–सारवन करुन व चौक पुरुन तोरण–पताकांनी सजविण्यात आले. प्रेषित निमंत्रणानुसार परगणा कामठा आणि अन्य परगण्यांतील लहान–मोठ्या सर्व जमीनदारींचे जमीनदार व गावोगावचे मानवाईक आमगावच्या जमीनदार वाड्यात पोहचले आणि समारंभाच्या स्थानी विराजमान झाले. कामठ्यांहून आमगावला येण्यासाठी एका हत्तीच्या रुपेरी अंबारीत बसून कोलुबापूंसोबत कामठ्याचे जमीनदार गोंदिबापू आणि दुसऱ्या हत्तीच्या अंबारीत बसून हट्टा जमीनदारीचे व्यवस्थापक पुनाबापू हे आपल्या भावांसह रवाना झाले होते. तेही नियोजित वेळेपूर्वी समारंभात उपस्थित झाले. यावेळी कामठा जमीनदारीचे

संस्थापक कोलुबापू यांच्या मुखमंडळावर गौरवाचे भाव झळकत होते. गोंदिबापूंच्या मुखमंडळावर समाधानाचे तेज झळकत असून पुनाबापूंच्या मुखमंडळावरील प्रसन्नताही सर्वांचे लक्ष वेधून घेत होती.

वेदज्ञ ब्राम्हणांच्या हातून सर्वप्रथम यज्ञविधी संपन्न झाला. यावेळी संपूर्ण राजवाड्यात सुगंधीत धूप आणि यज्ञात समर्पित होत असलेल्या हवन सामुग्रीचा सुगंध सर्वत्र दरवळत होता. यज्ञविधान पूर्ण होताच, ब्राम्हणांच्या हातून वैदिक पद्धतीने आणि पवित्र वेदमंत्रांच्या उच्चारणाने सोनाबापूंचा राजतिलक समारंभ संपन्न झाला. राज्यारोहण समारंभ आटोपताच, सोनाबापू आणि चिमणा बहादूर यांनी सर्व वडीलधारी व्यक्तींचे चरणस्पर्श केले. तद्नंतर, समोरील भागात ज्या ठिकाणी वेदज्ञ ब्राम्हण विराजमान होते त्यास्थळी चिमणा बहादूर पोहचताच, त्यांच्या दिशेने सोनाबापू हे पुढे सरसावले. दोन्ही भाऊ अमोरासमोर येताच, क्षणभर दोघांची दृष्टादृष्ट झाली आणि दोघेही अत्यंत भावविभोर झाले. या भावूक अवस्थेत दोघांचे डोळे पाणावले असतांना सोनाबापूने लहान चुलत भाऊ चिमणा बहादूर याला हृदयाशी लावून घेतले आणि काही न बोलता, त्यांनी या महान यशाचे संपूर्ण श्रेय चिमणा बहादूरलाच आहे, याची सर्वासमक्ष ग्वाही दिली. त्यावेळी त्यांचे बंधुप्रेम पाहून क्षणभर सर्वांना, राम आणि भरत यांच्या आलिंगणाची व त्यांच्या बंधुप्रेमाची आठवण होवून गेली. हे दृश्य बघून तेथील संपूर्ण वातावरण भावपूर्ण व गंभीर होवून गेले. या भावपूर्ण वातावरणात, सर्वांनी चिमणा बहादूर आणि सोनाबापूंचा 'जयजयकार' केला.

चिमणा बहादूरच्या कर्तबगारीची इत्यंभूत माहिती समारंभाच्या वेळी मिळाल्यामुळे, आणि त्याच्या बुद्धिमत्तेची साक्षात प्रचिती घडून आल्यामुळे, एक प्रतिभाशाली युवराज अशी जनमानसात त्याची प्रतिमा साकारली. समारंभानंतर भोजन ग्रहण करुन जेव्हा सर्वांनी आपआपल्या गंतव्य स्थानाकडे जाण्यासाठी प्रस्थान केले तेव्हा वाटचाल करतांना, चिमणा बहादूरचा दिग्विजय आणि दूरदृष्टी हे त्यांच्या चर्चेचे मुख्य विषय होते.

''राजे रघूजी द्वितीय यांनी आमगाव जमीनदारीला कामठा जमीनदारीशी जोडण्याचा आणि आमगाव जमीनदारीची नवीन सनद सोनाबापूला देण्याचा जो निर्णय घेतला त्याच्या मुळाशी चिमणा बहादूरच्या यशस्वी राजनयासोबतच कोलुबापू आणि गोंदिबापू यांचे वलयांकित व्यक्तिमत्त्वदेखील कारणीभूत होते असे दिसते. तरीपण, या भव्य यशात चिमणा बहादूरचे श्रेय मात्र अजिबात दुर्लक्षित करता येणार नाही. त्यांच्या या यशामुळे एकीकडे कामठा जमीनदारीच्या

अधिकारक्षेत्रात वाढ होवून या जमीनदारीने यशाचे एक नवे शिखर पादाक्रांत केले व भोसले राजवटीत एक वेगळी उंची गाठली, दुसरीकडे चिमणा बहादूरच्या व्यक्तिमत्त्वाला एक नवे वलय प्राप्त होवून परगणा कामठ्याच्या राजकारणात त्यांचा उदय (The Rise of Chimna Bahaddur) घडून आला. इ.स. १७९६ चे वर्ष हे फक्त कामठा जमीनदारीचे नावलौकिक वाढविणारे वर्ष नसून, ते चिमणा बहादूरच्या जीवनातील एक अविस्मरणीय वर्ष आणि त्यांच्या राजकीय जीवनाचे उत्कर्ष बिंदू ठरले'' कामठा जमीनदारीसंबंधी संशोधन करतांना १७९६ मधील या घटनेसंबंधी प्रस्तुत लेखकाचे जे प्रामाणिक मत तयार झालेले आहे ते इथे निष्कर्ष स्वरुपात दिले आहे.

## ११. राजकीय प्रभावात वाढ

राणी दर्याबाई आणि राजे जानोजी यांनी गोंदिबापूला मानसपुत्र मानले होते. त्यातून बहेकार घराण्याशी विकसित झालेल्या मधुर संबंधाचे निर्वाह, राजे रघूजी द्वितीय हे देखील करीत असत. एवढेच नव्हे तर ते स्वत: चिमणा बहादूरला मानसपुत्र मानत असत. पुढे चिमणा बहादूरने आमगाव जमीनदारीसंबंधी विवादात, कौटुंबिक संबंधाचा कोणताही गैरफायदा न घेता, पूर्णत: नैतिक व भौगोलिक आधारावर आपली बाजू ज्या शिताफीने मांडली ते पाहून रघूजी द्वितीय यांना, चिमणा बहादूरमधील अंगभूत गुणांची खरी प्रचिती आली. त्यामुळे चिमणा बहादूरवरील त्यांचे प्रेम द्विगुणीत झाले. राजाशी जुडलेल्या या आत्मीय संबंधामुळे नागपूर राज्यात चिमणा बहादूरचा राजकीय प्रभाव वाढला.

## १२. राज्यकारभार आणि विकासात सहभाग

चिमणा बहादूरच्या यशस्वी प्रयत्नातून आमगाव जमीनदारीचा प्रश्न सुटल्यामुळे यानंतर कामठा जमीनदारीच्या राज्यकारभारात त्यांचा सहभाग वाढला व ते परगणा कामठ्याच्या विकासकार्यात सक्रिय झाले.

कोलुबापूंच्या शासनकाळात (इ.स.१७५१-१७८८) उत्तरेकडील लांजीच्या डोंगरमालेपासून दक्षिणेकडील देवरी-शिरपूर पर्यंतच्या सुमारे एक हजार चौ.मैल एवढ्या व्यापक प्रदेशात जंगल कटाई करवून तेथील भूमी लागवडीखाली आणण्याची आणि नवीन गावे वसविण्याची मोहिम सुरु झालेली होती. गोंदिबापूंच्या शासनकाळात (इ.स. १७८८-१८१६) ही मोहिम धडाडीने राबविण्यात आली. या कार्यात चिमणा बहादूरने आपल्या वडीलांना मोलाची साथ दिली. विकासविषयक या कामामुळे परगणा कामठ्यातील अन्नधान्य, आणि महसूलविषयक उत्पन्नात

लक्षणीय वाढ होवून परगणा कामठा धनधान्यसमृद्ध झाले. परिणामस्वरुप, कामठा जमीनदारीला नागपूर राज्यात एक समृद्धशाली जमीनदारी म्हणून नवी ओळख प्राप्त झाली.

गोंदिबापूंनी पुनाबापू नावाच्या आपल्या मोठ्या मुलास हट्टा जमीनदारीचा व्यवस्थापक नियुक्त करुन त्यांच्याकडे हट्टा, लिंगा आणि किरणापूर या तीन जमीनदारींचा राज्यकारभार सोपविला होता. पुढे त्यांनी चिमणा बहादूरची विलक्षण बुद्धिमत्ता पाहून त्यांच्याकडे कामठा जमीनदारीच्या राज्यकारभारात सहयोग करण्याची, आणि परगणा कामठ्यातील सर्व जमीनदारीत समन्वय प्रस्थापित करण्याची, अशी दुहेरी जबाबदारी सोपविली.

उपरोक्त विस्तृत प्रदेशातील भूमी लागवडीखाली आणण्याची मोहिम, आणि अधिकारक्षेत्रातील सर्व जमीनदाऱ्यांत समन्वय प्रस्थापित करण्याचे कार्य, यामुळे चिमणा बहादूरच्या वाट्याला भ्रमंती आली. घोड्यावर स्वार होवून, भूक व तृष्णा यांची पर्वा न करता दिवस-रात्र भ्रमण करुन, कर्तव्य संपन्न करणे असा चिमणा बहादूरचा नित्यक्रम झाला. त्यामुळे त्यांचे नाव घेताच अथवा त्यांची आठवण होताच, घोड्यावर स्वार होवून वायुवेगाने मार्ग तुडवित असलेल्या चिमणा बहादूरची प्रतिमा लोकांच्या डोळ्यांसमोर स्वाभाविकपणे झळकत असे. असे होते चिमणा बहादूर! जसे त्यांचे नाव होते तसेच त्यांचे प्रत्यक्ष जीवन होते.

## १३. चिमणा बहादूरचे व्यक्तिमत्त्व

चिमणा बहादूरवर गोंदिबापूंच्या अधिकारक्षेत्राखालील कामठा, हट्टा, लिंगा, किरणापूर, धनसुआ, फुलचूर, केशोरी (देवरी), बिंजली, सालेकसा, पलखेडा, आमगाव, फुक्कीमेटा आणि सावली डोंगरगाव या सर्व जमीनदारींच्या राज्यकारभारात समन्वय प्रस्थापित करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली होती. यातून त्यांची पूर्ण क्षमता कसोटीवर चढली, आणि त्यांचे व्यक्तिमत्त्व तावून-सुलाखून जनमानसासमोर आले. चिमणा बहादूरच्या अंगी लोकांना आकर्षित करण्याचे, आणि त्यांना आपल्या ध्येय-धोरणाच्या दिशेने वाटचाल करायला प्रेरित करण्याचे असीम सामर्थ्य आहे हे सिद्ध झाले. ज्याप्रमाणें सूर्यकिरणांमध्ये चक्रीवादळातही स्थिर राहून त्याला छेदून पुढे जाण्याचे सामर्थ्य असते, त्याचप्रमाणे राज्यकारभारविषयक कोणतीही समस्या समोर उपस्थित झाली असता त्याप्रसंगी अविचल राहून त्यावर मात करण्याचे सामर्थ्य चिमणा बहादूरच्या अंगी आहे, याची तत्कालीन शासकांना खात्री पटली. लोक त्यांच्याकडे गोंदिबापूंच्या उत्तराधिकारीच्या स्वरुपात पाहू लागले.

चिमणा बहादूर हे शारीरिक रचनेच्या दृष्टीने उंच, पिळदार बांध्याचे आणि प्रभावशाली होते. वर्णाच्या दृष्टीने ते गौरवर्णीय होते. स्वभावाच्या दृष्टीने ते स्वाभिमानी, तेजस्वी आणि धाडसी होते. तारुण्याचा रक्त त्यांच्या नसानसात, सळसळत वाहत जाणाऱ्या जलप्रवाहासारखा सळसळत होता. त्यांच्या जीवनाला आध्यात्मिक अधिष्ठान असून ते शिवजींचे परम् उपासक होते. उच्च प्रेरणांनी प्रेरित होणे व चांगल्या कार्यात नेतृत्व करणे हे गुण त्यांच्या अंगी जन्मजात होते. आवश्यकता पडेल तेव्हा जोखीम पत्करण्यात ते नेहमी अग्रेसर असत. ते साहसी व निर्भय होते.

चिमणा बहादूरची वेशभूषा ही मराठा सरदाराला शोभेल अशी होती. ते सुंदर कशीदाकाम केलेला–छातीवरील डाव्या भागात बटनपट्टी असलेला–कमरेखालील भागात घेरदार असलेला अंगरखा, आणि विजार नेहमी परिधान करीत. त्यांचे केश काळेभोर असून खांद्याला स्पर्श करतील एवढे लांब असत. डोक्यावर ते जरीची किनार असलेली रेशमी वस्त्राची पगडी परिधान करीत, पगडीच्या समोरील डाव्या भागात 'मोत्यांची कलगी' लावलेली असे. खांद्यावर असलेला जरीच्या किनारीने सुशोभित रेशमी शेला त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला उठावदार बनवत असून त्यांचे वेगळेपण जनमानसावर प्रतिबिंबित करीत असे. ते आपल्या गळ्यात सोन्याची भारदस्त गोफ, आणि मोत्यांची त्रिसरी माळा परिधान करीत. उजव्या हाताच्या तर्जनी, मध्यमा व अनामिका या तिन्ही बोटात सोन्याच्या रत्नजडीत आंगठ्या घालत असत. त्यांच्या कानांच्या वरील व मध्यभागात असलेले सोन्याचे रींग त्यांच्या कानांची शोभा वाढवित आणि त्यांच्या वैभवाची साक्ष देत असत. ते नेहमी राजस्थानी शैलीचे जोडे वापरत. शूरवीराला शोभून दिसतील अशा पिळदार मिशांमुळे ते रुबाबदार दिसत. त्यांच्या मुखमंडळावर आत्मविश्वास, करारीपणा आणि भावनेचा ओलावा नेहमी झळकत असे.

## १४. वेशांतराचे कसब

चिमणा बहादूरचा अश्व दुर्गम भागाच्या समृद्धीसाठी अविरत धावला. यातून त्यांना समाजात मिसळण्याची, संवाद साधण्याची आणि इतरांचे सुख–दुःख वाटून घेण्याची संधी उपलब्ध झाली. त्यामुळे त्यांचे जीवन संस्कारित व समृद्ध झाले. त्यांच्याविषयीं आख्यायिका आहे की, वेशांतर करुन स्वरुप बदलण्याचे कसब त्यांना अवगत असून राजकीय कारणासाठी ते याचा वापर करीत असत. तळागाळातील लोकांची राज्यकारभार विषयक प्रतिक्रिया, प्रशासकीय

कर्मचाऱ्यांकडून झालेला अधिकाराचा दुरुपयोग, शासनविरोधी संभावित षड्यंत्र इ. बाबींविषयी माहिती मिळवून तिचा वापर ते शासनाला सतर्कतेचा संकेत देण्यासाठी करीत असत.

मध्ययुगात काही राजामहाराजांनी वेगवेगळ्या उद्देशासाठी वेशांतर कलेचा उपयोग केल्याचे दाखले इतिहासात उपलब्ध आहेत. हे सर्व लक्षात घेता चिमणा बहादूरने देखील ही कला अवगत करुन तिचा वापर ध्येयपूर्तीसाठी केला असेल असे दिसते.

## १५. वाघाशी झुंज

चिमणा बहादूर हे लष्कराच्या कवायतीची पाहणी करण्यासाठी भूयारटोला येथे नेहमी कोणत्याही एका महत्त्वपूर्ण व्यक्तीला सोबत घेवून जात असत. भूयारटोला हे गाव कामठ्याच्या उत्तर-पश्चिमेत सुमारे वीस कि.मी.अंतरावर असून कामठ्याहून काटीकडे जातांना रावणवाडी व राजाराणी देवस्थानानंतर मार्गात पडते. येथून पुढे थोड्याच अंतरावर काटी हे मोठे गाव आहे. भूयारटोला या गावाजवळील विशाल पटांगणात आजही एका भुयाराचे आणि मोठ्या बावलीचे अवशेष कायम असून ते मध्ययुगीन कामठा जमीनदारीच्या वैभवशाली इतिहासाची साक्ष देतात.

पूर्वीच्या काळी उपरोक्त संपूर्ण प्रदेश घनदाट अरण्याने व्याप्त होता. या अरण्याला कोरणीचा जंगल असे म्हणत. नेहमी प्रमाणे चिमणा बहादूर हे दिवाण सिताराम पंत यांच्यासोबत आपआपल्या घोड्यावर स्वार होवून भूयारटोला येथे जाण्यासाठी कामठ्याहून निघाले. राजाराणी देवस्थानाच्या ठिकाणी पूजा आटोपून त्यांनी पुढचा प्रवास सुरु करताच त्या निबीड अरण्यात एका पट्टेदार वाघाने चिमणा बहादूरचा मार्ग रोखला. बिकट परिस्थिती लक्षात येताच चिमणा बहादूरने घोड्यावरुन खाली उडी घेवून म्यानमधील तलवार हातात थांबली. एवढ्यात वाघाशी त्यांची झुंज सुरु झाली. या झुंजीत चिमणा बहादूरलादेखील जखमा झाल्या, पण त्यांनी त्याची पर्वा न करता कुशल तलवारबाजीने वाघाला घायाळ करुन ठार केले. त्या मृत वाघाला काटी-बिरसोला परिसरातील अनेक गावात लोकांना पाहता यावा यासाठी वाजागाज्यासह फिरविण्यात आले.

चिमणा बहादूर हे पुढे बऱ्याच औषधोपचारानंतर बरे झाले. ज्या ठिकाणी त्यांची व वाघाची झुंज झाली होती, त्याठिकाणी पुढे जे गाव वसले त्या गावाला शेरकाटोला (शेर का टोला) असे नाव पडले. महाराष्ट्रातील या परिसराला लागून

उत्तरेत मध्यप्रदेश असल्यामुळे येथील गावांच्या नावावर हिंदीचा प्रभाव जाणवतो. शेरकाटोला या गावाचे नाव आजही लोकांना चिमणा बहादूरच्या नावाची व काळाची आठवण करुन देते. काळ बराच लोटून गेला पण, कामठा परिसरातीलही काही लोक चिमणा बहादूरच्या जीवनातील त्या प्रसंगाचा आजही आवर्जून उल्लेख करतात.

## १६. एक परिपूर्ण जमीनदार

चिमणा बहादूरचे व्यक्तिमत्त्व हे अनुभवसंपन्न होते. गोंदिबापूंच्या कारकिर्दीतच ते राज्यकारभारात सक्रिय झाल्यामुळे ऐन तारुण्याच्या उंबरठ्यावरच त्यांना प्रशासकीय कामकाजाचा पूर्ण अनुभव प्राप्त झालेला होता. वडिलांना पूर्ण क्षमतेनिशी धडाडीची साथ दिल्यामुळे यशस्वी शासकासाठी आवश्यक असलेल्या क्षमता त्यांनी आपल्या तरुणाईतच अर्जित केलेल्या होत्या.

भोसले राजवटीच्या काळात शांतता, सुव्यवस्था, न्यायदान, रस्तेबांधणी, नवीन गावांचे पुनर्वसन, शेतकरी कुटुंबाना लागवडीसाठी भूमी उपलब्ध करुन देणे, शेतकऱ्यांकडून शेतसारा वसूल करणे, शासकीय नियमानुसार त्यातील काही अंश राजकोषात जमा करणे, पाणीपुरवठ्यासाठी तलाव बांधणे, मासेमारीसाठी तलावांचे लिलांव करणे, लोकांना घरे बांधण्यासाठी जागा उपलब्ध करुन देणे, लोकांना निस्तारासाठी बांबू, शिवार-फाटा व जलाऊ काड्या आणण्याची परवानगी देणे, किल्ल्याची डागडूजी करणे, आपल्या पदरी लष्कर बाळगणे, राजाला युद्धासाठी गरज भासेल तेव्हा त्याला लष्करी मदत करणे, पेंढारी व दरोडेखोरांचा बंदोबस्त करणे, लोकांच्या तक्रारींचे निवारण करणे, सार्वजनिक कार्यात व सणासमारंभात पुढाकार घेणे इ. विविध कामे जमीनदाराला करावी लागत. या सर्व कामांच्या अनुभवातून चिमणा बहादूर यांच्या व्यक्तिमत्त्वात समंजसपणा आलेला होता. ते कमी वयातच एक परिपूर्ण जमीनदारासारखे होते. म्हणून नागपूर दरबारातील नारायण पंडीतसारख्या मुत्सद्यांच्या प्रशंसेला ते पात्र ठरले.

## १७. राजकीय प्रगल्भता

चिमणा बहादूर यांना राजकारणात आवड होती. राजकीय विषयांवर चर्चा करणे आणि तत्संबंधी इत्यंभूत माहिती अर्जित करणे हा त्यांचा स्वभाव होता. गोंदिबापूंच्या शासनकाळापासूनच राज्यकारभाराशी संबंधीत कामासाठी त्यांचे नागपूरला जाणे-येणे होते. अत: राजे रघूजी द्वितीय आणि नागपूर दरबारातील मोठमोठ्या मुत्सद्यांशी केलेल्या वार्तालापातून भारतात सुरु असलेल्या राजकीय

घडामोडीतील बारकावे टिपून घेण्यास त्यांना फारसा उशीर लागला नाही. ''इंग्रजांनी बंगाल व बिहारवर आपले साम्राज्य प्रस्थापित केले असून आता मराठा साम्राज्य हे त्यांचे पुढचे लक्ष्य आहे. भविष्यात संपूर्ण भारतात इंग्रज हीच एक बलाढ्य शक्ती होणार आहे आणि त्यांच्याशीच भारतीयांना संघर्ष करावा लागणार आहे.'' ही बाब नागपूर दरबारातील संभाषणातून चिमणा बहादूरच्या लक्षात आलेली होती. या वार्तालापातूनच त्यांनी ''भारतीय प्रदेशावर इंग्रजांच्या अधिपत्याचा इतिहास हा त्यांच्या फंदफितुरी व कपटकारस्थानांच्या कारवाईंनी बरबटलेला आहे.'' ही बाबदेखील जाणून घेतली होती. ''भारतीय राजामहाराजा हे इंग्रजांच्या पराक्रम, शिस्त व गोड बोलणे या गोष्टींवर भारावले आहेत. इंग्रजांच्या अंतिम हेतुबद्दल जाणीव असण्याइतकी बुद्धीही अनेकांना नाही. दुहीचा शाप आणि दूरदृष्टीचा अभाव यामुळे भारतीय राज्यकर्त्यांनी आत्मघातकीपणा स्वीकारला आहे व ते गुप्तपणे परस्पर विश्वासघात करण्यात मश्गुल आहेत'' हे विदारक सत्यदेखील चिमणा बहादूर यांना पुरेपूर कळलेले होते. यामुळे त्यांच्या राजकीय जाणीवा समृद्ध होवून त्यांचा राजकीय दृष्टिकोन व्यापक बनला, आणि त्यांच्यात राजकीय प्रगल्भता आली. चिमणा बहादूरचा हा राजकीय स्तर असल्यामुळे ते नागपूर दरबारातील मुत्सद्यांच्या चर्चेचे केंद्रबिंदू बनले.

कामठा जमीनदारीच्या उत्कर्षात त्यांचा मोलाचा वाटा, त्यांची अनुभवसंपन्नता, लोकाभिमुख कार्यशैली आणि त्यांचे राजकीय आकलन मौलिक असल्यामुळे त्यांना परगणा कामठ्यात अमाप मानसन्मान मिळाला आणि भरपूर लोकप्रियता लाभली. चिमणा बहादूरचे व्यक्तिमत्त्व बहुआयामी असल्यामुळे एकाच वेळी त्यांचे परगणा कामठ्यात व नागपूर दरबारात राजकीय वजन वाढले.

## १८. प्रखर राजकीय निष्ठा

चिमणा बहादूर यांनी त्यांच्या पूर्वजांनी भोसले राजवंशाशी प्रस्थापित केलेले राजकीय संबंध फक्त जसेच्या जसे कायम ठेवण्याचेच कार्य केले नाही, तर ते संबंध आपल्या मौलिक निष्ठेने अधिक घनीभूत, सार्थक व प्रभावपूर्ण केले. त्यांच्या अंतर्मनात नागपूर राज्याप्रती समर्पणाचा भाव होता. भोसले राजवंशाच्या अस्तित्वासाठी आपले अवघे अस्तित्व पणाला लावण्याची मानसिक तयारी चिमणा बहादूर यांच्यात होती. ही त्यांच्या मनाची तयारी, त्यांना बालपणापासून लाभलेल्या कौटुंबिक वातावरणातून विकसित झाली होती. म्हणून भावी काळात ज्या दिशेने भोसले राजवटीची वाटचाल घडून आली, त्या दिशेनेच चिमणा बहादूरच्या नेतृत्वाखाली परगणे कामठ्याची पावले पुढे पडली.

## १९. रेसिडेंट विरुद्ध चिमणा बहादूर

चिमणा बहादूर हे कर्तबगार होते. कर्तबगार व्यक्ती सर्वांचे लक्ष वेधून घेते. पण अशी व्यक्ती ही सर्वांनाच आवडते व सर्वच तिचे प्रशंसक असतात, असे मात्र कधीच घडत नाही. स्वार्थी व अन्यायकारी तत्त्व ध्येयवादी व्यक्तीला पाहून त्याच्याविषयी मनात शत्रुत्व बाळगतात, हा अनुभव सर्वांच्याच जीवनात कोणत्या-ना-कोणत्या स्वरुपात येत असतो. असेच चिमणा बहादूर यांच्या बाबतीतही घडून आलेले दिसते. रेसिडेंट जेन्किन्स हा इंग्रज अधिकारी इ.स.१८०७ पासून नागपूरला आपले बस्तान मांडून बसला होता. त्याची गिद्धदृष्टी नागपूर राज्यावर होती. तो तेथे राहून या राज्यातील सशक्त व कमकुवत बिंदूंचा अंदाज घेत असे आणि नागपूर राज्य केव्हा गिळंकृत करता येईल यासाठी योग्य संधीची वाट पाहत बसला होता. म्हणून त्याला निपुत्रिक शासक व देशद्रोही भारतीय व्यक्ती आवडत असत. कर्तबगार व निष्ठावान व्यक्तींचा तो कट्टर शत्रू होता. पण हे समजण्याइतकी बुद्धी नागपूर राज्यातील सर्व मुत्सद्यांत नव्हती अथवा ते इंग्रजांच्या गोड बोलण्याने भारावून जात आणि निहित स्वार्थापायी येथील सर्व वस्तुस्थितीचा त्याच्या समोर बखान करीत असत.

नागपूरला असलेले नारायण पंडित सारखे मुत्सद्दी, रेसिडेंट जेन्किन्सला चिमणा बहादूरच्या व्यक्तिमत्त्वासंबंधी व त्यांच्या कर्तबगारीसंबंधी अनेक गोष्टी सांगत असत. अशावेळी रेसिडेंट जेन्किन्स हा प्रगटपणे मोठा खुश असे व चिमणा बहादूरची मुक्तकंठाने प्रशंसा करीत असे. चिमणा बहादूर हे नागपूरला गेले असता या बाबी त्यांच्या कानावर पडत असत. रेसिडेंटचे मनोभाव जेव्हा त्यांना कळत तेव्हा ते प्रसन्न मुद्रेने सर्वकाही ऐकून घेत. पण त्यांना इंग्रजाच्या सुप्त ध्येयधोरणांविषयी स्पष्ट जाणीव असल्यामुळे रेसिडेंटच्या प्रसन्नतेत दडलेला एक वेगळा अर्थ त्यांच्या लक्षात येत असे आणि त्यावेळी प्रशंसा, अपेक्षा-उपेक्षा व तक्रार हे सर्वभाव एकत्रितपणे एकवटून असलेला रेसिडेंटचा चेहरा त्यांच्या दृष्टीसमोर झळकत असे. किंबहुना चिमणा बहादूरला रेसिडेंटच्या मनात त्यांच्या विषयी विकसित होत जाणाऱ्या शत्रुत्वाची कल्पना येत असे.

भोसलेंच्या राजदरबारातील राजकारण आणि कामठा जमीनदारीचे शासन यांच्यामधील सीमारेषा ही अत्यंत धूसर होती. राजदरबारातील राजकारणाचा कामठा जमीनदारीच्या राज्यकारभाराशी अन्योन्यसंबंध होता व तेथील राजकारणाला प्रभावित करुन कामठा जमीनदारीचे हितसंवर्धन करण्याएवढा मुत्सद्दीपणा चिमणा

बहादूरच्या अंगी होता. पण, नागपूरला आपले बस्तान मांडून बसलेला इंग्रज अधिकारी रेसिडेंट जेन्किन्सचे राजकारण व कामठा जमीनदारीच्या उत्कर्षाचा मात्र सकृतदर्शनी कोणताही संबंध नव्हता. तरीपण एकीकडे चिमणा बहादूर हे रेसिडेंट जेन्किन्सच्या राजकारणाच्या प्रेरणा व कारक शक्ती कोणत्या हे जाणत होते. त्यामुळे त्यांच्याविषयी रेसिडेंटचे चांगले भाव कधीच राहू शकत नाही, असे त्यांचे खरे आकलन होते. दुसरीकडे चिमणा बहादूर यांचे तडफदार व्यक्तिमत्त्व व त्यांच्या वाढत्या राजकीय व लष्करी सामर्थ्याची रेसिडेंट जेन्किन्सला सातत्याने कल्पना येत असल्यामुळे चिमणा बहादूरच्या स्वरुपात भोसले राजवंशाच्या एका नव्या सामर्थ्यशाली साहाय्यकाचा उदय होत आहे, असे त्याला वाटत होते. त्यामुळे त्याच्या अंतर्मनात चिमणा बहादूरविषयी घर करुन बसलेल्या शत्रुत्त्वाचा आवेग, वादळाच्या वेळी समुद्रात उसळणाऱ्या लाटांसारखा उसळत असे.

रघूजी द्वितीय (१७७२–१८१६) यांनी इंग्रजांशी तैनाती फौजेचा करार न करता त्यांना विशिष्ट अंतरावर खेळवत ठेवले. त्यामुळे चिमणा बहादूर व रेसिडेंटमधील शत्रुत्व प्रगटपणे पुढे आले नाही. पण पुढे आप्पासाहेबांनी रेसिडेंटशी तैनाती फौजेचा करार (२८.०५.१८१६) करताच घटनाक्रम झपाट्याने पुढे सरकले आणि चिमणा बहादूर हे रेसिडेंटच्या निशाणावर आले.

## २०. जमीनदार पदावर नियुक्ती

नागपूरचे राजे रघूजी द्वितीय यांचे दि. २२ मार्च १८१६ ला निधन झाले. त्यांचा मुलगा परसोजी हा यावेळी सुमारे सदतीस वर्षाचा होता. पण तो अपंग व मंदबुद्धीचा असल्यामुळे राज्यकारभार सांभाळण्याच्या दृष्टीने असमर्थ होता. त्यावेळी रघूजींच्या गोत्रातील आप्पासाहेब हा भोसले राजवंशातील एकमात्र कर्ता पुरुष हयात होता. अत:आप्पासाहेबांनी परसोजीला दि. १४ एप्रिल १८१६ ला नागपूरच्या गादीवर (मनसदीवर) बसविले व त्याच्या वतीने राज्यकारभार आपल्या हाती घेतले. याचवेळी गोंदिबापू यांनी कामठा जमीनदारीची सत्तासूत्रे चिमणा बहादूरकडे सोपवावीत असे आपले मानस बनविले. अत: ''चिमणा बहादूर यांनी आप्पासाहेबांना ३ लक्ष रुपये नजराणा (अथवा वारसा फी ची रक्कम) देवून आपल्या नावाने कामठा जमीनदारीची सनद मिळविली.''[1] अशाप्रकारे चिमणा बहादूर हे इ.स.१८१६ मध्ये गोंदिबापूच्या उत्तराधिकारीच्या स्वरुपात कामठ्याचे रीतसर जमीनदार झाले.

---

**1**. पूर्वोक्त, Bhandara District Gazetteer, P.136

वारसा हक्क प्राप्त करण्यासाठी नजराणा अथवा वारसा फी देणे हा मध्ययुगीन राजकीय व्यवस्थेचा एक अनिवार्य भाग होता. ही रक्कम भरुन कामठा जमीनदारीची नवीन सनद प्राप्त करताच चिमणा बहादूर हे फक्त कामठ्याचेच नव्हे तर या जमीनदारीच्या अधिकारक्षेत्राखालील हट्टा, लिंगा, किरणापूर, धनसुआ, फुलचूर, आमगाव, बिंजली आणि केशोरी(देवरी) या अन्य आठ जमीनदारींचे ते सर्वोच्च जमीनदार (मनसबदार) बनले.

चिमणा बहादूर यांच्या अधिकारक्षेत्रात असलेल्या जमीनदारींची सूची प्रस्तुत करतांना नेमक्या कोणत्या ठिकाणी पूर्णविराम द्यायचा, हे निर्धारित करणे अवघड आहे. कारण त्यांची अधिसत्ता व्यापक प्रदेशात असल्यामुळे त्यांच्या अधिकारक्षेत्रात असलेल्या जमीनदारींची संख्या सखोल संशोधनात आणखी वाढत जाते. 'द मिल्कियत केस ऑफ मौजा आमगाव', या दाव्याच्या आदेशपत्रात (इ.स.१८६६) मराठाकालीन कामठा जमीनदारीच्या संदर्भात म्हटलेले आहे की, कामठा जमीनदारीच्या अखत्यारीत विभिन्न वेळी आणि विभिन्न परिस्थितीत अनेक साहाय्यक जमीनदाऱ्या (Sub-Zamindarees) अस्तित्वात आल्या. त्यातील सूचीत तिरखेडी, पुराडा, मलपूरी व पलखेडा या जमीनदारींचादेखील उल्लेख आहे. अत: चिमणा बहादूर हे इ.स. १८१६ मध्ये कामठ्याचे जमीनदार बनले तेव्हा या चार जमीनदाऱ्यादेखील त्यांच्या अधिकारक्षेत्रात होत्या. तात्पर्य, चिमणा बहादूर यांना जेव्हा राजयोग लाभले तेव्हा ते कामठ्याशिवाय अन्य १२ जमीनदारींचे आलामालिक होते.

## २१. कामठा व यादवगडचे जमीनदार

आप्पासाहेबांनी ज्यावेळी कामठा जमीनदारीची सनद चिमणा बहादूर यांच्या नावाने दिली, त्याचवेळी त्यांनी लांजीची मनसबदारीदेखील त्यांना बहाल केली. त्यामुळे त्यांना यावेळेपासून 'लांजीचे मनसबदार' अशी नवीन ओळख प्राप्त झाली. लांजीचा किल्ला हा प्राचीन हैहय (कलचुरी) राजवंशाच्या राजाने बांधलेला असला तरी त्यानंतर हा किल्ला यादव राजवंशाच्या अधिपत्याखाली होता. अत: चिमणा बहादूरला लांजीची मनसबदारी प्राप्त होताच, त्यांना 'कामठा व यादवगडचे जमीनदार' असेही लोक संबोधित करु लागले. मराठ्यांचे प्रशासकीय केंद्र असलेले लांजी हे महत्त्वाचे ठिकाण व तेथील प्रसिद्ध किल्ला चिमणा बहादूरच्या अखत्यारीत आल्यामुळे त्यांची जबाबदारी व दबदबा वाढला. म्हणून पुढे स्वातंत्र्य लढ्याच्या वेळी वैनगंगा व वाघ या दोन्ही प्रसिद्ध नद्यांच्या खोऱ्यातील

सर्व जमीनदारांनी चिमणा बहादूरला पाठिंबा दिला. यातून चिमणा बहादूरच्या नेतृत्व क्षमतेची, संघटन कौशल्याची आणि ऐश्वर्याची सुस्पष्ट जाणीव होते.

चिमणा बहादूरच्या अधिकारक्षेत्राखालील अनेक जमीनदाऱ्या लक्षात घेता, त्यांची स्थिती एखाद्या संस्थानिकासारखी अथवा लहान राज्याच्या राजासारखी होती, हे सहजपणे लक्षात येते. राजधानी नागपूरच्या कागदपत्रात त्यांचा उल्लेख 'जमीनदार' असाच होत असे. पण, भारतीयांना हीन लेखण्याच्या आपल्या मूळ प्रवृत्तीमुळे इंग्रज अधिकाऱ्यांनी मात्र प्रत्येक ठिकाणी त्यांचा उल्लेख 'चिमणा पटेल' असा केला आहे. असे असले तरी, त्याकाळी लोकव्यवहारात त्यांना 'राजे' असे संबोधिले जात असे. चिमणा बहादूर हे शूरवीर असल्यामुळे ते 'वीर राजे चिमणा बहादूर' या नावाने विख्यात झाले. त्यांना 'कामठा व यादवगडचे जमीनदार'[1] अथवा 'लांजीचे मनसबदार'[2] असे संबोधित करण्याचा प्रघातही रुढ होता असे दिसून येते.

ज्यावेळी चिमणा बहादूरच्या भाग्यात राजयोग आला, त्यावेळी राजधानी नागपूरमध्ये आप्पासाहेब विरुद्ध बाकाबाई असा संघर्ष सुरु झालेला होता. परसोजीची सावत्र आई बाकाबाई ही नागपूरच्या मनसदीवर आपला हक्क सांगत होती. त्यामुळे नागपूर येथे इंग्रजांच्या राजकारणाला व कूटनीतीला उधाण आलेले होते. तात्पर्य, अत्यंत बिकट परिस्थितीत चिमणा बहादूरच्या भाग्यात राजयोग आला.

## २२. किरणापूर जमीनदारीचा विषय?

हट्टा जमीनदारीचे व्यवस्थापक पुनाबापू हे किरणापूर जमीनदारीचा राज्यकारभार सांभाळत होते. आप्पासाहेबांनी किरणापूर जमीनदारीची नवीन सनद चिमणा बहादूरचा दत्तक पुत्र रामाबापू याच्या नावाने देण्याचे ठरविले होते. पण पुढे अनपेक्षितपणे इतिहास घडत गेल्यामुळे किरणापूरची अथवा अन्य कोणतीही जमीनदारी रामाबापूला कधीच प्राप्त झाली नाही.

## २३. पुढचा काळ आव्हानांचा!

चिमणा बहादूरचे जन्म एका समृद्ध जमीनदार घराण्यात झाले, आणि त्यांचे बालपण कोलुबापू व गोंदिबापू या कर्तबगार व्यक्तींच्या सान्निध्यात घडले. त्यांचे समग्र जीवन हे बालपणापासूनच ओजपूर्ण असून त्यांची प्रत्येक कृती ही

---

1. भंडारा जिल्ह्यातील स्वातंत्र्य लढा, प्रा. डॉ. वि. ना. हंडियेकर, पृष्ठ क्र.१०
2. पूर्वोक्त, दै. ब्लिट्ज मीमांसा बालाघाट-सिवनी, पृष्ठ क्र.१

नव्या उन्मेषाने भरलेली असे. फार कमी वयापासूनच चिमणा बहादूरच्या जीवनात परिपक्वता झळकू लागली. त्यांच्या आशादायी विचारांनी संपर्कक्षेत्रातील लोकांची मनेही उचंबळून येत असत. कामठा जमीनदारीच्या उत्कर्षात त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान होते.

चिमणा बहादूरच्या हाती जेव्हा कामठा जमीनदारीची सत्तासूत्रे आली तेव्हा त्यांचे वय सुमारे चौतीस वर्षाचे असून ते अनुभवसंपन्न होते. सुरुवातीपासूनच ते भोसले राजवंशाप्रती निष्ठावान आणि त्या राजवंशाचे विश्वासपात्र सहकारी होते. त्यांच्या कारकिर्दीच्या सुरुवातीलाच नागपूर राज्यात आप्पासाहेब विरुद्ध बाकाबाई असे गृहयुद्ध सुरु असल्यामुळे, आणि पुढे तिसरे इंग्रज-मराठा युद्ध घडून आल्यामुळे कोणाचीही छाती दडपून जावी अशी आव्हाने नागपूर राज्याविरुद्ध आणि कामठा जमीनदारीसमोर उभी राहिली, आणि ती आव्हाने चिमणा बहादूरच्या नेतृत्वाची, योग्यतेची व निष्ठांची कसोटी पाहू लागली. त्या कसोटीच्या काळात त्यांनी दाखविलेले देशकालाचे भान, साहस आणि निष्ठा पाहून आपले मन थक्क आणि नम्र होते. त्यांचे हे कार्यकर्तृत्व इंग्रजांचा साम्राज्यवाद, नागपूर राज्यातील राजकीय घडमोडी आणि आप्पासाहेबांनी सुरु केलेल्या स्वातंत्र्य लढ्याशी निगडीत असल्यामुळे हा संपूर्ण संदर्भ यापुढील तीन प्रकरणात क्रमशः देत असून, त्यानंतरच्या दहाव्या प्रकरणात चिमणा बहादूरचा पुढील इतिहास प्रस्तुत आहे.

■ ■ ■

# ७. भारत आणि इंग्रजांचा साम्राज्यवाद (१७५१-१८१८)

## १. भारतातील राजकारण

**म**ध्यवर्ती भारतातील परगणे कामठा आणि चिमणा बहादूरचा इतिहास हा या ग्रंथाचा मुख्य विषय असल्यामुळे त्या इतिहासाचे खरे स्वरुप लक्षात येण्यासाठी आणि इ.स.१८१८ मध्ये चिमणा बहादूर यांनी स्वीकारलेल्या इंग्रजविरोधी भूमिकेचे समर्थपणे समालोचन करता यावे, यासाठी तत्कालीन भारतात इंग्रज हे साम्राज्यविस्तारासाठी प्रयत्नशील असतांना भारतीय शासक मात्र राजकीय अज्ञानांधकारात व संकुचित स्वार्थात कसे आकंठ बुडालेले होते आणि एक दुसऱ्याच्या विरोधात इंग्रजांना मदत करण्यात कसे आपले सामर्थ्य व्यर्थ खर्च करीत होते, हे विदारक सत्य जाणून घेणे आवश्यक आहे. म्हणून या प्रकरणात समकालीन भारताचे राजकीय चित्र प्रस्तुत करीत आहे.

## २. मराठा साम्राज्याचे स्वरुप

मध्ययुगात मोगल साम्राज्याच्या ऱ्हासानंतर मराठा साम्राज्याचा उदय घडून आला. मराठा साम्राज्य ही भारतातील सर्वात मोठी राजकीय शक्ती होती. याशिवाय भारतात अनेक लहान-मोठे राज्य (संस्थान) होते. मराठा साम्राज्यात मुख्यत: पुण्याच्या पेशव्याच्या अधिकारक्षेत्राखालील माळवा, बुंदेलखंड, झांसी इ.प्रदेश तसेच नागपूरचे भोसले, ग्वाल्हेरचे शिंदे व इंदौरचे होळकर यांच्या राज्यांचा समावेश होता. पुण्याच्या पेशव्याची स्थिती केंद्रीय सरकारसारखी होती. शिंदे, होळकर व भोसले यांची स्थिती प्रांतीय सरकारसारखी होती. वास्तविक पाहता ते पेशव्याचे सरदार (सेनापती) होते. त्यांना पेशव्याकडून सेनासाहेब सुभ्याची पदवी बहाल केली जात असे. पुण्याचे केंद्रीय शासन कमकुवत झाल्यानंतर या शासकांची स्थिती जवळपास स्वायत्त शासकांसारखी झालेली होती.

भारतामध्ये जेव्हा एक प्रबळ राजकीय सत्तेच्या स्वरुपात इंग्रजांचा उत्कर्ष सुरु होता त्या काळात मराठा शासकांमध्ये एकजुटीचा पूर्णपणे अभाव होता. त्यामुळे भावी काळात इंग्रज हे मराठा शासकांना आपल्या कठपुतलीप्रमाणे वागविण्यात यशस्वी झाले. इंग्रज हे भारतात इ.स.१८०० पर्यंत मराठा साम्राज्याच्या बरोबरीचे साम्राज्य प्रस्थापित करण्यात यशस्वी झाले होते. इ.स.१८०० च्या सुमारासही मराठा शासकांनी आपसात एकजूट प्रस्थापित केली असती तर भारतातील इंग्रजी साम्राज्यवाद समूळ नष्ट करण्याएवढे सामर्थ्य त्यांच्यात होते.

### ३. इंग्रजांचा साम्राज्यवाद

भारतात व्यापार करण्याच्या उद्देशाने इ.स. १६०० मध्ये ब्रिटिश इस्ट इंडिया कंपनीची व इ.स. १६६४ मध्ये फ्रेंच इस्ट इंडिया कंपनीची क्रमश: इग्लैंड व फ्रांसमध्ये स्थापना झाली होती. कोलकाता व मुंबई हे इंग्रजांचे मुख्य व्यापारिक केंद्र होते. मद्रास हे फ्रेंच लोकांचे व्यापारिक केंद्र होते. संपूर्ण मद्रास प्रांतावर फ्रांसने साम्राज्य प्रस्थापित केल्यामुळे व इंग्लैंडमध्ये औद्योगिक क्रांती घडून आल्यामुळे इंग्रजांतही साम्राज्यवादी महत्त्वाकांक्षा बळावली.

युरोपियन राजकारणात त्यावेळी इंग्लैंड व फ्रांस हे दोन्ही राष्ट्र परस्पर एक दुसऱ्याचे प्रबळ शत्रू होते. त्यामुळे भारतातही ब्रिटिश इस्ट इंडिया कंपनीच्या साम्राज्यवादी महत्त्वकांक्षेच्या मार्गात फ्रांस हा फार मोठा अडथळा ठरणार होता. अत: आपल्या मार्गातील फ्रांसचा काटा काढणे हे ब्रिटिश कंपनीला आवश्यक वाटू लागले. यातून इंग्रज व फ्रेंच यांच्यात तीन युद्धे झाली. ती 'कर्नाटक युद्धे' म्हणून ओळखली जातात. तिसऱ्या कर्नाटक युद्धात इंग्रजांनी फ्रेंचांचा दारुण पराभव केला. यानंतर इंग्रजांना भारतात युरोपियन स्पर्धक उरला नाही. भारतावर राजकीय वर्चस्व प्रस्थापित करण्याचा त्यांचा मार्ग मोकळा झाला.

### ४. भारताविषयी इंग्रजांचे धोरण

भारतात इंग्रजांनी नियोजितपणे राजकीय साम्राज्य प्रस्थापित केले. फ्रेंच लोकांशी जसा एकट्याच्या बळावर सरळ लष्करी संघर्ष केला तसा लष्करी संघर्ष भारतीय शासकांशी न करण्याचे धोरण त्यांनी आखले. याची प्रमुख दोन कारणे होती. प्रथम, भारतात लहान-मोठे अनेक राज्य असल्यामुळे प्रत्येकाशी सरळ लष्करी संघर्ष करणे हे त्यांना परवळणारे नव्हते. दुसरे, प्रत्येकाशी सरळ लष्करी संघर्ष सुरु केल्यास सर्व भारतीय शासक त्यांच्या विरोधात एकजूट होतील, अशी इंग्रजांना भीती वाटत होती.

इंग्रजांनी उपरोक्त कारणांमुळे भारतात साम्राज्यविस्तार करण्यासाठी 'फोडा आणि झोडा' (Divide and Rule) या नीतीचा वापर केला. त्यांनी साम-दाम-दंड-भेद या सर्व उपायांचा अवलंब करुन भारतावर साम्राज्य प्रस्थापित करणे सुरु केले.

### ५. प्लासीची लढाई (इ.स.१७५७)

बंगालच्या सुभ्यात बंगाल, बिहार व कटक (ओडिशा) हे तीन प्रांत होते.

मोगल सम्राटाच्या वतीने नवाब अलिवर्दीखान हा बंगालचा राज्यकारभार सांभाळत असे. या तिन्ही प्रांतातील महसुलीतून चौथाई आणि सरदेशमुखीची रक्कम वसूल करण्याचा अधिकार मोगल सम्राटाकडून मराठयांना प्राप्त होता. नागपूरचे राजे रघूजी प्रथम यांनी नवाब अलिवर्दीखानला परास्त करुन इ.स. १७५१ मध्ये कटकवर मराठ्यांचे पूर्ण अधिपत्य प्रस्थापित केले. यानंतर बंगालच्या सुभ्यात बंगाल व बिहार हे दोनच प्रांत राहिले. या दोन्ही प्रांतातून चौथाई आणि सरदेशमुखी वसूल करण्याचा मराठ्यांचा अधिकार पूर्ववत् कायम होता. बंगालमध्ये व्यापार करण्याचा परवाना इंग्रजांनी मोगल सम्राटाकडून प्राप्त केला होता. कर्नाटक युद्धानंतर ते या प्रांतात मिळालेल्या व्यापारविषयक सवलतींचा गैरफायदा घेवू लागले यामुळे इंग्रज व बंगालचा नवाब यांच्यात युद्ध घडून येणे अटळ झाले.

अलिवर्दीखानानंतर त्याचा नातू शिराजउद्दौला हा बंगालचा नवाब बनला. त्याची परवानगी न घेता इंग्रजांनी कोलकाता येथील आपल्या वखारीभोवती (Warehouse) तटबंदी उभारली. यातून शिराजउद्दौला व इंग्रज यांच्यात संघर्ष सुरु झाला. इ.स.१७५७ मध्ये प्लासी येथे इंग्रजांचे लष्कर व सेनापती मीर जाफरच्या नेतृत्वाखाली शिराजउद्दौलाचे सैन्य अमोरासमोर आले. शिराजउद्दौलाने मीर जाफरला इंग्रजांच्या लष्करावर आक्रमण करण्याचा आदेश दिला. पण मीर जाफरने या आदेशाचे पालन केले नाही. मीर जाफर हा फितूर झालेला आहे हे शिराजउद्दौलाच्या लक्षात येताच त्याने रणभूमीवरुन पळ काढला. अशाप्रकारे इंग्रजांनी शस्त्रबळाचा वापर न करता फंदाफितुरीने प्लासीची लढाई जिंकली.

प्लासीच्या लढाईनंतर इंग्रजांच्या पाठिंब्याने मीर जाफर हा बंगालचा नवाब बनला. त्यामुळे बंगालच्या राज्यकारभारात इंग्रजांचा हस्तक्षेप सुरु झाला.

## ६. बक्सारची लढाई (इ.स.१७६४)

इंग्रजांच्या हस्तक्षेपाला मीर जाफरने विरोध करताच त्यांनी त्याचा जावई मीर कासीम याला नवाब बनविले. इंग्रजांच्या बेकायदेशीर व्यापाराला आळा घालण्याचा प्रयत्न जेव्हा मीर कासीमने केला तेव्हा इंग्रजांनी पुन्हा मीर जाफरला बंगालचे नवाबपद दिले. बंगालमध्ये सुरु असलेल्या सर्व कारवायांना आळा घालण्यासाठी यावेळी त्यांच्या विरोधात मीर कासीम, मोगल बादशहा शाहआलम आणि अयोध्येचा नवाब शुजाउद्दौला हे एकजूट झाले. मीर कासीमने नागपूरचे राजा जानोजी भोसले यांना या युद्धासाठी लष्करी मदत मागितली. जानोजींनी या युद्धात त्याला लष्करी मदत न देता इंग्रजांच्या मदतीसाठी पाच हजार सैन्य

पाठविले. इ.स.१७६४ मध्ये त्रिगुट सेना व इंग्रजांचे लष्कर यांच्यात बिहारमधील बक्सार येथे युद्ध झाले. या युद्धात इंग्रज विजयी झाले.

बक्सारच्या लढाईनंतर झालेल्या अलाहाबादच्या तहानुसार बंगालच्या सुभ्यात महसूल गोळा करण्याचा अधिकार इंग्रजांना प्राप्त झाला. बंगालचा नवाब हा तेथील नाममात्र शासक राहिला. इंग्रज हे तेथील वास्तविक शासक झाले. इंग्रजांनी बंगालची राजधानी मुर्शिदाबादहून कोलकाता येथे नेली. अशाप्रकारे इंग्रजी सत्तेचा पाया बंगालमध्ये घातला गेला.

## ७. जानोजींचे चुकीचे धोरण

इंग्रजांचे अधिपत्य बंगालवर प्रस्थापित झाल्यानंतर कटक प्रांतात इंग्रजाच्या रुपाने एक कायमची डोकेदुखी भोसले राजवटीच्या मागे लागली. इंग्रजांनी बंगाल व बिहार या प्रांतातील चौथाई आणि सरदेशमुखीच्या स्वरुपातील महसूल तर मराठ्यांना देणे बंद केलेच, याशिवाय त्यांनी कटक प्रांत मराठ्यांनी इंग्रजांना द्यावा, यासाठी भोसले राजवटीच्या मागे कायमचा तकादा लावला. त्यामुळे या भागात इंग्रज व मराठे यांच्यात संघर्ष घडून येणे अपरिहार्य झाले. बक्सारच्या लढाईच्या वेळी या भावी संघर्षाची जानोजी भोसले यांना किंचितही कल्पना आली नाही आणि त्यांनी इंग्रजांना लष्करी मदत पाठविली, हे खरे मराठा राज्याचे दुर्दैव होय. राजे रघूजी प्रथम यांच्यात असलेले मुत्सद्दीपणा, क्षात्रतेज व दूरदृष्टी हे गुण राजे जानोजी भोसले यांच्यात नव्हते, ही बाब त्यांच्या त्यावेळच्या कृतीतून अधोरेखित होते.

## ८. पानिपतचे तिसरे युद्ध (इ.स.१७६१)

प्लासीच्या युद्धानंतरच्या काळात भारतावर अहमदशहा अब्दालीचे आक्रमण झाले तेव्हा त्याचे हे आव्हान मराठ्यांनी स्वीकारले. उत्तर भारतातील पानिपत येथे मराठा व अहमदशहा अब्दाली यांच्यात इ.स.१७६१ मध्ये युद्ध घडून आले. हे युद्ध पानिपतचे तिसरे युद्ध म्हणून इतिहासात प्रसिद्ध आहे.

पानिपतचे तिसरे युद्ध ही मराठ्यांच्या इतिहासाला कलाटणी देणारी अशी घटना आहे. या युद्धात मराठ्यांचा दारुण पराभव झाला. असंख्य मराठा शूरवीरांनी युद्धात प्राण गमावले. युद्धातील पराभवामुळे मराठ्यांची संपूर्ण प्रतिष्ठा धुळीस मिळाली व मराठा साम्राज्य खिळखिळित झाले. याचा भरपूर फायदा उठविण्यासाठी इंग्रज, हैदरअली व निजाम हे सक्रिय झाले. इंग्रजांनी भारतात निर्धास्तपणे साम्राज्यविस्तार केले.

## ९. इंग्रजांचे पुण्यावर आक्रमण (इ.स.१७७९)

नागपूरचे राजे जानोजी भोसले यांचा इ.स.१७७२ मध्ये मृत्यू झाला. त्यांनी आपला लहान भाऊ मुधोजीचा मुलगा रघूजी द्वितीय यास रीतसर दत्तक घेतले होते. त्यामुळे रघूजी द्वितीय यांना नागपूरचे राजपद प्राप्त झाले. अत: अज्ञान मुलाचा पालक या नात्याने नागपूरच्या राजकारणात मुधोजीचे महत्त्व वाढले. तिकडे पुण्यात पेशवा नारायणरावाचा दि. ३० आगष्ट १७७३ ला रघुनाथरावाने खून करविला. यानंतर पुणे दरबारातील मुत्सद्यांनी बारभाई मंडळ स्थापन करुन राज्यकारभार आपल्या हाती घेतला. या बारभाई मंडळात नानासाहेब फडणीस, हरीपंत फडके, सखारामबापू बोकिल इ. मुत्सद्यांचा समावेश होता. रघुनाथराव व मुधोजी हे दोन्ही स्वार्थांध, इंग्रजधार्जिणी वृत्तीचे व राष्ट्रहिताला घातक व्यक्ती होते. त्यांच्यामुळे मराठा साम्राज्याची फार मोठी हानी झाली.

रघुनाथरावाला पेशवा बनण्याची महत्त्वाकांक्षा होती. म्हणून तो इंग्रजांच्या मदतीसाठी सुरतेस पळून गेला. मराठ्यांच्या राजकारणात हस्तक्षेप करण्याची चांगली संधी चालून आल्यामुळे इंग्रजांनी रघुनाथरावाला सोबत घेवून पुण्यावर इ.स.१७७९ मध्ये चढाई केली. परंतु या लढाईत इंग्रजांचा पूर्ण पराभव झाला. दि. १७ जानेवारी १७७९ ला पुणे दरबार आणि इंग्रजांत वडगावचा तह झाला. पण हा तह अपमानजनक आहे, अशी सबब पुढे करुन मुंबईच्या गव्हर्नरने तो नाकबूल केला.

## १०. नाना फडणीसांची दूरदृष्टी

नाना फडणीस हे पुण्याच्या दरबारात बसून भारतभरच्या सर्व हालचालींचे निरीक्षण करीत. त्यांच्यात इंग्रजांचे अंतस्थ हेतु ओळखण्याएवढा मुत्सद्दीपणा व भावी काळात भारतातील राजकीय घडामोडींना कशा स्वरुपाचे वळण लागेल याची कल्पना करण्याएवढे बुद्धिचातुर्य होते. भविष्यात इंग्रज हीच एकमेव शक्ती भारतात महान होणार आहे आणि त्यांच्याशीच आपल्याला संघर्ष करावा लागणार आहे हे त्यांनी ओळखले होते. संपूर्ण भारतीय शासकांनी एकजुटीने इंग्रजांच्या सामर्थ्याचा बीमोड करुन ते भारतात पुन: आपले डोके वर काढणार नाहीत असा प्रयत्न करणे आवश्यक आहे, असे त्यांना मनापासून वाटत असे.

इंग्रजांनी इ.स.१७७९ मध्ये पुण्यावर आक्रमण केले होते. याचवर्षी नाना फडणविसांनी पेशवे, शिंदे, भोसले, हैदर आणि निजाम यांनी एकाच वेळी आपआपल्या प्रदेशात इंग्रजांविरुद्ध युद्ध सुरु करावे व त्यांचा बीमोड करावा अशी

एक महान योजना आखली होती. या योजनेला सर्वांनी मान्यता दिली होती. त्यानुसार हैदर, पेशवे आणि शिंदे यांनी आपले सैन्य हलविले होते. भोसल्यांनी बंगालवर हल्ला करावा असे ठरले होते. मुधोजी भोसलेने चिमणाजी भोसलेला बंगालच्या स्वारीवर पाठविले होते. चिमणाजी हा कटकला गेला, पण त्याने इंग्रजांशी हातमिळवणी केली. बंगालवर आक्रमण न करता, उलट त्याने बंगालमधील इंग्रजांच्या सैन्याला कटकमधून हैदरवर आक्रमण करण्यासाठी कर्नाटककडे जावू दिले. नागपूरकर भोसले, निजाम आणि महादजी शिंदे यांनी आतून विश्वासघात केला व योजनेला यश मिळू दिले नाही. नाना फडणविसांच्या योजनेप्रमाणे त्यावेळी सर्व घडले असते तर त्यावेळीच इंग्रजी सत्तेचा शेवट झाला असता, पण नियतीला ते मंजूर नव्हते.

नाना फडणीसांची योजना बारगळल्यामुळे इंग्रजांच्या वाढत्या सामर्थ्याला आळा घालण्याएवढी हिम्मत भारतीय शासकांत नाही, हे इंग्रजांच्या लक्षात आले. भावी काळात इंग्रजांच्या स्वरुपात मराठा राज्यावर जे संकट ओढवले त्यासाठी मुधोजी व त्यांचा मुलगा चिमणाजी भोसले यांच्यातील दूरदृष्टीचा अभाव, त्यांचे आत्मघातकी धोरण आणि इंग्रजांच्या चांगुलपणाविषयी निरर्थक आस्था या बाबी कारणीभूत आहेत.

## ११. हेस्टिंग्जचे कारस्थान

गव्हर्नर जनरल लॉर्ड हेस्टिंग्जला कॅप्टन गॉडर्डच्या मार्फत सप्टेंबर १७७९ मध्ये नाना फडणविसांच्या योजनेची माहिती मिळाली. लॉर्ड हेस्टिंग्जने सगळ्यांना निरनिराळ्या प्रकारे समजावून व वेगवेगळी लालच देऊन इंग्रजांविरुद्ध युद्ध न करण्यासाठी राजी करण्याचा प्रयत्न सुरु केला. त्याने चिमणाजी भोसले याला साताऱ्यात मराठयांचा छत्रपती बनविण्याचे आश्वासन दिले. यावेळी हेंस्टिंग्जच्या कूटनीतीला निजाम, शिंदे व भोसले हे बळी पडले. त्यामुळे नानासाहेब फडणीसांची महान योजना बारगळली.

तात्पर्य, हे युद्ध लॉर्ड हेस्टिंग्जने कोणतीही लढाई न करता फक्त आपल्या कुटील कारस्थानाच्या बळावर जिंकली. आपल्या उत्तम कूटनीतीने त्याने यावेळी म्हैसूरचा शासक हैदरअली यास एकटे पाडले. हा हेस्टिंग्जचा एक महान विजय होता.

इंग्रज व मराठा यांच्यात दि.१७ मे १७८२ ला सालबाईचा तह घडून आला. या तहामुळे मराठ्यांचा काहीच फायदा झाला नाही. पण उपस्थित

झालेल्या मोठ्या संकटापासून इंग्रजांनी मोठ्या बुद्धिचातुर्याने आपला बचाव करुन घेतला व भारतीय शासकांत कायमची फूट पाडून दिली. इंग्रजांनी लढाई न करताच जिंकलेले हे युद्ध इतिहासात पहिले इंग्रज–मराठा युद्ध म्हणून नमूद आहे. सालबाईचा तह हैदरअलीला मान्य नव्हता. त्याच्या मृत्युनंतर पुणे दरबारने या तहावर शिक्कामोर्तब केले.

## १२. इंग्रज–म्हैसूर संघर्ष

नाना फडणविसांच्या योजनेप्रमाणे हैदरने कर्नाटकात इंग्रजांशी युद्ध सुरु केले व त्याने इंग्रजांचा पूर्ण पराभव करुन सर हेक्टर मनरो यास मद्रासपर्यंत पिटाळून लावले. वास्तविकत: नाना फडणीसांच्या योजनेप्रमाणे सर्व घडले असते तर इंग्रजी सत्तेचा शेवट त्यावेळीच झाला असता. पण गव्हर्नर जनरल लॉर्ड हेस्टिंग्जच्या कुशल कूटनीतीने नाना फडणीसांची योजना बारगळल्यामुळे हैदरअली हा इंग्रजांचा एकच खरा शत्रू उरला. त्यानंतर इंग्रजांनी आपले सर्व लष्करी सामर्थ्य त्याच्या विरोधात झोकून दिले.

हैदरअलीने स्वत: एकट्याच्या बळावर इंग्रजांशी अनेक लढाया लढल्या. दि. ५ डिसेंबर १७८२ रोजी तो मरण पावला. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र टिपू सुलतान याने इंग्रजांविरुद्ध मोहिम नेटाने चालू ठेवली. अंतत: ४ मे १७९९ रोजी त्याच्यावर विजय मिळविण्यात इंग्रज यशस्वी झाले.

## १३. इंग्रजांचा राजकीय उत्कर्ष

इंग्रजांनी लष्करी बळाचा व कूटनीतीचा वापर करुन क्रमश: फ्रेंच, बंगालचा नवाब व म्हैसूरचा टिपू सुलतान यांना परास्त करुन त्यांच्या अधिकारक्षेत्रातील प्रदेशावर आपला अधिकार प्रस्थापित केला. त्यामुळे मद्रास, बंगाल, बिहार, कर्नाटक इ. प्रदेशावर इंग्रजांचे साम्राज्य प्रस्थापित झाले. भारतात मराठ्यांच्या साम्राज्याएवढे साम्राज्य प्रस्थापित करण्यात इंग्रज यशस्वी झाले. इ.स.१८०० च्या सुमारास संपूर्ण भारतात इंग्रज आणि मराठा या दोन मोठ्या राजकीय शक्ती होत्या.

त्यावेळी रघूजी द्वितीय, दौलतराव शिंदे आणि यशवंतराव होळकर यांच्याजवळ भरपूर कवायती फौज होती. या मराठा शासकांनी एकजूट होवून आपल्या लष्करी सामर्थ्याचा वापर इंग्रजांविरुद्ध केला असता तर भारतातील इंग्रजांच्या साम्राज्यविस्ताराला आळा बसला असता. पण, ऐन त्यावेळी मराठ्यांतील परस्पर शत्रुत्व शिगेला पोहचले होते.

## १४. भारतीय राजकारणात इंग्रजांचा हस्तक्षेप

लॉर्ड वेलस्ली हा इ.स.१७९८ मध्ये गव्हर्नर जनरल म्हणून आला. भारतात इंग्रजी सत्तेचा पाया मजबूत करण्यात त्याचा सिंहाचा वाटा होता. यासाठी त्याने भारतात तैनाती फौजेची पद्धती अमलात आणली. त्याने इ.स. १७९९ मध्ये म्हैसूरशी तैनाती फौजेचा तह केला. पुढे त्याने इ.स.१८०० मध्ये निजामाशी, इ.स.१८०१ मध्ये अयोध्येच्या नवाबाशी आणि इ.स. १८०२ मध्ये बडोद्याच्या गायकवाडाशी तैनाती फौजेचा तह केला. तैनाती फौजेची पद्धती स्वीकारावी म्हणून वेलस्लीने दौलतराव शिंदे, यशवंतराव होळकर आणि रघूजी द्वितीय यांच्यावर भरपूर प्रयोग केले होते. परंतु त्यात त्याला यश आलेले नव्हते. कारण यांच्याजवळ भरपूर कवायती फौज होती.

इंग्रजांनी उपरोक्त राज्यांच्या संरक्षणासाठी आपली फौज तैनात केल्यामुळे तेथील राज्यकारभारात इंग्रजांचा हस्तक्षेप वाढला. वरील शासकांची स्थिती इंग्रजांच्या मांडलिक राजांसारखी झाली.

## १५. मराठ्यांतील शत्रुत्व

भारतात साम्राज्यविस्तारासाठी ज्यावेळी इंग्रज हे उत्साहाने प्रयत्नशील होते त्यावेळी मराठा शासक हे परस्पर भांडणात गुंतले होते. इ.स. १८०२ मध्ये यशवंतराव होळकरने सरळ पुण्यावर हल्ला केला. दौलतराव शिंदे हा यावेळी पेशवा बाजीरावाच्या बाजूने लढला. पण या युद्धात यशवंतरावाला विजय प्राप्त होवून दौलतराव शिंद्याचा पराभव झाला. यशवंतराव होळकराच्या भीतीने बाजीराव हा मुंबईला व नंतर वसईला पळून गेला. वसई येथे त्याने दि. ३१ डिसेंबर १८०२ रोजी इंग्रजाशी तैनाती फौजेचा करार केला. हा तह वसईचा तह म्हणून मराठ्यांच्या इतिहासात प्रसिद्ध आहे.

## १६. दुसरे इंग्रज–मराठा युद्ध (इ.स. १८०३)

मराठा शासकांतील परस्पर शत्रुत्व इ.स.१८०२ मध्ये प्रकर्षाने पुढे आले. इंग्रजांनी याचा फायदा घेण्याचे ठरविले. परिणामस्वरुप इ.स. १८०३ मध्ये दुसरे इंग्रज–मराठा युद्ध घडून आले. हे युद्ध इंग्रजांविरुद्ध भोसले आणि शिंदे हे एकजुटीने लढले. या युद्धाच्या वेळी मेळघाटच्या डोंगरी भागात इंग्रज व मराठा यांच्यात अनेक लढाया झाल्या. या सर्व लढायांत गाविलगडची लढाई (दि. १३,१४ व १५ डिसेंबर १८०३) मराठ्यांच्या इतिहासात फार प्रसिद्ध आहे. या लढाईत मराठ्यांचा पराभव झाल्यानंतर मराठे व इंग्रज यांच्यात देवगावचा तह (दि. १७ डिसेंबर १८०३) घडून आला.

## १७. कटकवर इंग्रजांचा ताबा

बंगाल व मद्रास या दोन प्रदेशावर इ.स.१७६४ पर्यंत इंग्रजांचे अधिपत्य प्रस्थापित झाले होते. या दोन प्रदेशाच्या मध्यभागी असलेल्या कटक प्रांतावर मराठ्यांची सत्ता होती. त्यामुळे बंगाल व मद्रास या दोन प्रदेशातील इंग्रजी लष्कराची इकडून तिकडे हलचल करण्यासाठीं कटक प्रांत हा इंग्रजांच्या मार्गात बाधक होता. म्हणून इंग्रजांनी बंगाल काबीज केले तेव्हापासून त्यांचा डोळा कटक प्रांतावर होता.

दुसरे इंग्रज-मराठा युद्ध इ.स. १८०३ मध्ये घडून आले. यावेळी मेळघाटच्या डोंगरी भागाकडे इंग्रज व मराठा यांच्या लढाया सुरु असतांना बंगालच्या इंग्रजी सैन्याने कर्नल हारकोर्ट याच्या नेतृत्वाखाली भोसल्यांच्या कटक प्रांतावर स्वारी केली. इंग्रजांचे लष्कर जास्त असल्यामुळे त्यांना यावेळी बालासौर बंदर, जगन्नाथपुरी व बाराभाटीच्या किल्ल्यावर आपला अधिकार प्रस्थापित करण्यात यश प्राप्त झाले. ऑगष्ट १८०३ मध्ये संपूर्ण कटक प्रांतावर इंग्रजाचे अधिपत्य प्रस्थापित झाले. देवगावच्या तहानुसार मराठ्यांचा कटक प्रांत इंग्रजांच्या अधिकारक्षेत्रात गेला.

## १८. भारताची राजकीय अवनती

भारतातील प्रत्येक शासक इंग्रजांचा द्वेष करीत होता. इंग्रजांच्या स्वरुपात उपस्थित झालेल्या संकटातून सुटका व्हावी असे प्रत्येकालाच वाटत होते. याच भावनेतून नानासाहेब फडणीसांनी इ.स.१७७९ मध्ये इंग्रजांविरुद्ध काही भारतीय शासकांचा एक महासंघ बनविला होता. यानंतरच्या काळात यशवंतराव होळकर हा पंजाबपर्यंत स्वत: जाऊन आला. भोसले, पेशवे, शिंदे, राजपूत यांच्याकडे पत्राद्वारे व माणसे पाठवून त्याने इंग्रजांविरुद्ध एकजूट होण्यासाठी खूप प्रयत्न केले. दौलतराव शिंद्यानेही रघूजी द्वितीय यांच्याकडे वकील पाठवून इंग्रजांविरुद्ध एकजूट होण्यासाठी प्रयत्न केला होता. पण इंग्रजांविरुद्ध भारतीय शासक संघटित होवू शकले नाही.

वस्तुत: मध्ययुगात भारताची राजकीय अवनती झालेली होती. भारतीय संस्थानिकांत दूरदर्शीपणा, पारस्परिक विश्वास आणि इंग्रजांविरुद्ध एकजूट होवून परिणामास सामोरे जाण्याइतकी स्वार्थत्यागाची भावना नव्हती. भोसले, शिंदे, होळकर व पेशवे हे एकाच मराठा साम्राज्याचे घटक असूनदेखील पहिल्या व दुसऱ्या इंग्रज-मराठायुद्धात इंग्रजांविरुद्ध एकजुटीने लढू शकले नाही. असे असतांना

पंजाबचे रणजीतसिंग, अयोध्येचा नवाब, हैदराबादचा निजाम, मराठा, दिल्लीचा बादशहा, ब्रम्हदेश व नेपाळचे राजे हे भिन्न-भिन्न मनोवृत्तीचे लोक इंग्रजांविरुद्ध एकजूट होणे शक्य नव्हते. त्यामुळे प्रत्येक जण इंग्रजांच्या साम्राज्यवादाला एकामागून एक बळी पडत गेला. बंगाल, बिहार, कर्नाटक, म्हैसूर आणि कटकवर आपली सत्ता प्रस्थापित केल्यानंतर इंग्रजांनी मराठा साम्राज्याला आपले लक्ष्य बनविले.

## १९. तृतीय इंग्रज-मराठा युद्ध (इ.स.१८१७)

पेशवे बाजीराव द्वितीय यांनी इ.स.१८०२ मध्ये व आप्पासाहेब भोसले यांनी इ.स.१८१६ मध्ये इंग्रजांशी तैनाती फौजेचा करार केला होता. या करारानंतर पुण्याच्या व नागपूरच्या राज्यकारभारात इंग्रजांचे राजकीय हस्तक्षेप वाढले. या हस्तक्षेपाच्या विरोधातून इंग्रज विरुद्ध पेशवा यांच्यात खडकीचे युद्ध घडून आले. तसेच इंग्रज विरुद्ध आप्पासाहेब यांच्यात नागपूरचे युद्ध घडून आले. हे दोन्ही युद्ध इ.स.१८१७ मध्ये घडून आले. या युद्धांना तृतीय इंग्रज-मराठा युद्ध असे संबोधतात. यावेळी देखील हे दोन्ही मराठा शासक इंग्रजांविरुद्ध संघटितपणे लढू शकले नाही. परिणामस्वरुप क्रमश: बाजीराव द्वितीय व आप्पासाहेब भोसल्यांचा दारुण पराभव झाला. पुणे आणि नागपूर या दोन्ही राज्यांवर इंग्रजांचे पूर्ण अधिपत्य प्रस्थापित झाले. दोन्ही राज्यांवर इंग्रजांच्या गुलामीची काळी छाया पसरली.

## २०. प्रथम स्वातंत्र्य युध्द (इ.स.१८१८-१९)

नागपूरचे राज्य गमावल्यानंतरही आप्पासाहेबांनी हिम्मत हारली नाही. प्रत्येक संकटाला सामोरे जात त्यांनी पचमढीच्या डोंगरात आश्रय घेतला. येथे राहून त्यांनी कामठ्याचे चिमणा बहादूर, हरईचे राजा चैनशहा, पचमढीचा ठाकूर मोहनसिंग, चित्तु पेंढारी इ. बाणेदार व्यक्तींच्या सहयोगातून मोठ्या प्रमाणात लष्कर भरती केली. यानंतर पचमढीपासून दक्षिणेकडील मेळघाटपर्यंत आणि पूर्वेकडील लांजी-कामठ्यापर्यंतच्या विशाल भूप्रदेशात इंग्रजांविरुद्ध निर्णायक लढा उभारला. या लढ्यात पचमढी, शिवणी व मेळघाटच्या भागातील आदिवासींनी मोठ्या प्रमाणात योगदान दिले असून यात काही अंशी स्थानिक लोकांचाही सहभाग होता. इ.स. १८१८ मध्ये घडून आलेल्या या युद्धाला प्रस्तुत ग्रंथात स्वातंत्र्य लढा असे संबोधण्यात आले आहे.

## २१. युद्ध आणि स्वातंत्र्य युद्ध : भेद

मराठा इतिहासाचे लेखक अजूनही इंग्रजांनी लिहून ठेवलेल्या लिखाणाचे

अनुसरण करुन खडकीची लढाई, नागपूरचे युद्ध आणि आप्पासाहेबांनी पचमढीत आश्रय घेवून इंग्रजांविरुद्ध पुकारलेले निर्णायक युद्ध या तिन्ही लढ्यांचे वर्णन तृतीय इंग्रज–मराठा युद्ध या शीर्षकांतर्गतच करतात. ही बाब निश्चितच खेदजनक आहे. प्रस्तुत संशोधकाने मात्र युद्ध आणि स्वातंत्र्य युद्ध या दोन्ही संकल्पनांना स्वतंत्रपणे परिभाषित केले असून त्या आधारावर आप्पासाहेबांनी पचमढी व लांजीला केंद्र बनवून इंग्रजाविरुद्ध पुकारलेल्या लढ्याला स्वातंत्र्य लढा असे संबोधिले आहे. अत: युद्ध आणि स्वातंत्र्य युद्ध या दोन संकल्पनेतील भेद खाली स्पष्ट करीत आहे–

''कोणताही राज्य जेव्हा स्वसंरक्षणासाठी, दुसऱ्या राज्याला संधीच्या कलमांचे पालन करण्यास बाध्य करण्यासाठी अथवा दुसऱ्या राज्याचा भूप्रदेश बळकावण्यासाठी लढा पुकारतो तेव्हा त्या लढ्याला युद्ध म्हणतात. या दृष्टिकोनातून विचार केल्यास आप्पासाहेबांनी इ.स. १८१७ मध्ये इंग्रजांविरुद्ध पुकारलेला नागपूरचा लढा हा 'युद्ध' या सदरात मोडतो. कारण तो लढा त्यांनी नागपूर राज्याच्या संरक्षणासाठी लढला होता.

''परकियांच्या राजवटीतून अथवा गुलामगिरीतून मायभूमीला मुक्त करण्यासाठी अहिंसात्मक, क्रांतिकारी वा शस्त्रसंघर्षाच्या मार्गाने लढलेल्या लढ्याला स्वातंत्र्य युद्ध म्हणतात.'' या व्याख्येनुसार म. गांधीच्या नेतृत्वाखालील व सुभाशचंद्र बोस यांच्या नेतृत्वाखालील तसेच सरदार भगतसिंगसारख्या क्रांतिकारकांनी सुरु केलेला आणि इ.स. १८५७ मध्ये लढला गेलेला इ. सर्व लढ्यांचा समावेश स्वातंत्र्य लढा या संकल्पनेत होतो. यातून ही व्याख्या सार्थक सिद्ध होते. या व्याख्येच्या कसोटीवर आप्पासाहेब भोसले यांनी पचमढीच्या डोंगरी भागात आश्रय घेवून इंग्रजांविरुद्ध केलेला लढा हा देखील स्वातंत्र्य युद्ध या संज्ञेस पात्र ठरतो. कारण त्यांनी हा लढा नागपूरचे राज्य पूर्णपणे इंग्रजांच्या गुलामगिरीच्या विळख्यात गुरफटल्यानंतर ती गुलामगिरी झुगारुन देण्यासाठी नवी लष्करभरती करुन हरिजन–गिरिजनांच्या सहयोगातून उभारला होता.

तात्पर्य, आप्पासाहेबांनी पचमढी व लांजीला केंद्र बनवून इंग्रजांविरुद्ध जो लढा लढला तो नागपूरचे राज्य गमावल्यानंतर, इंग्रजांच्या प्रस्थापित राजवटीविरुद्ध आणि येथील मूळ रहिवाशांच्या अस्मितेच्या रक्षणासाठी लढला. म्हणून हा लढा इंग्रजांच्या दृष्टीने युद्ध असला तरी भारतीयांच्या दृष्टीने या लढ्याला स्वातंत्र्य लढा संबोधित करणे सर्वथा संयुक्तिक आहे. तसेच, यापूर्वी कोणत्याही भारतीय शासकाने स्वत:चे राज्य गमावल्यानंतर जनसहयोगातून इंग्रजांविरुद्ध असा लढा

उभारलेला नव्हता, म्हणून आप्पासाहेब भोसले व चिमणा बहादूरसारख्या बाणेदार व्यक्तींनी इ.स.१८१८ मध्ये इंग्रजांविरुद्ध उभारलेला हा लढा भारतातील पहिला स्वातंत्र्य लढा होय, ही बाब या ठिकाणी समर्थपणे अधोरेखित करीत आहे. हा लढा म्हणजे भारतीयांच्या अद्‌भुत साहस करण्याच्या क्षमतेचे ज्वलंत उदाहरण होय.

## २२. राजकीय जागृतीची सुरुवात

इंग्रजांच्या गुलामगिरीतून मायभूमीला मुक्त करण्यासाठी पचमढी व लांजी-कामठ्याला केंद्र बनवून आप्पासाहेब भोसले, राजे चिमणा बहादूर, हरईचा राजा चैनशहा इ. व्यक्तींनी जो लढा उभारला होता त्या लढ्याचा योग्य अन्वयार्थ जाणूनबुजून दुर्लक्षित केला तर त्यात ज्या बाणेदार व्यक्तींनी प्रचंड जोखीम पत्करुन, प्राणाची पर्वा न करता आश्चर्यजनक पराक्रम गाजविला व आपल्या सर्वस्वाचे त्याग केले, त्यांना आपण योग्य न्याय देवू शकणार नाही.

भारतातील तत्कालीन राजकीय अवनतीच्या संदर्भात विचार केला तर इ.स.१८१८ च्या स्वातंत्र्य लढ्याच्या प्रसंगी जे व्यक्ती इंग्रजांच्या गुलामगिरीला नाकारण्याठी पुढे सरसावले, त्यांनी त्यावेळी आपल्या कृतीतून भारताच्या राष्ट्रीय जागृतीसाठी शंखनाद केला, ही बाब प्रकर्षाने जाणवते. त्यांच्या या प्रयत्नातून त्यांची दूरदृष्टी व उच्च राजकीय जागृती या दोन बाबी परिलक्षित होतात आणि त्यांचे पुरोगामित्व सिद्ध होते. कारण भावी काळात भारताने त्यांच्याच मार्गाचे अनुसरण परिवर्तित अथवा संशोधित स्वरुपात केले, याला इतिहास साक्षी आहे. या दृष्टिकोनातून आप्पासाहेब भोसले व चिमणाबहादूर यांचा काळ हा खऱ्या अर्थाने मध्ययुग व आधुनिक युगाचा संधीकाळ (Period of transitions) ठरतो.

# ८. नागपूर राज्यातील राजकीय घडामोडी (इ.स.१८१६–१७)

## १. राजवाड्यातील सत्तासंघर्ष

**दु**सऱ्या रघूजींच्या निधनानंतर परसोजी हा त्यांचा अडतीस वर्षाचा एकुलता एक मुलगा त्यांचा वारसदार म्हणून हयात होता. पण तो अपंग असल्यामुळे राज्यकारभार सांभाळण्यास असमर्थ होता. त्यामुळे नागपूरच्या गादीसाठी बाकाबाई व आप्पासाहेब भोसले यांच्यात संघर्ष सुरु झाला. बाकाबाई ही परसोजीची सावत्र आई असून ती धूर्त आणि अतिशय महत्त्वाकांक्षी बाई होती. आप्पासाहेब हा रघूजींचा पुतण्या (व्यंकोजीचा मुलगा) असून तो हुशार व कर्तबगार होता. नागपूरच्या गादीवर परसोजीनंतर कायदेशीरपणे त्याचाच हक्क पोहचत असल्यामुळे लोकांचा ओढा स्वाभाविकत: त्याच्याकडे होता. त्यावेळी आप्पासाहेबाचे वय जेमतेम २० वर्षाचे होते.

आप्पासाहेबांनी दि. १४ एप्रिल १८१६ ला परसोजीला गादीवर बसविले व त्याच्यावतीने नागपूरचा राज्यकारभार हाती घेतले. बाकाबाईने आप्पासाहेबाच्या हातून राज्यकारभार हिसकावून घेण्यासाठी सगळ्याप्रकारचे कारस्थान सुरु केले. अशा बिकट परिस्थितीत नागोपंत, नारायण पंडित व यशवंत रामचंद्र या मुत्सद्यांनी आप्पासाहेबाभोवती गराडा घातला व नागपूरची गादी टिकवून ठेवण्यासाठी इंग्रजांशी तैनाती फौजेचा करार केल्याशिवाय तरणोपाय नाही, ही बाब त्यांच्या गळी उतरविली. इंग्रजांशी कोणताही तह केल्यामुळे काय त्रास सहन करावा लागतो याची पूर्व कल्पना आप्पासाहेबांना होती. पण इंग्रजांच्या मदतीशिवाय त्यांना परसोजीनंतर नागपूरची गादी मिळणे कठीण आहे, असे स्पष्ट चित्र त्यांना दिसत होते. सर्व बाजूंनी कोंडी झालेली पाहून आप्पासाहेब हे इंग्रजांबरोबर तैनाती फौजेचा करार करण्यास तयार झाले.

## २. तैनाती फौजेचा तह (दि. २८ मे १८१६)

रेसिडेंट बरोबर गुप्त बोलणी झाल्यानंतर आप्पासाहेबांनी आणि रेसिडेंटने तैनाती फौजेच्या करारावर दि. २८ मे १८१६ रोजी नागोपंताच्या घरी सह्या केल्या. दुसऱ्या रघूजींनी जो तह अनेक वर्षे सतत टाळला होता त्याला आप्पासाहेबांनी मंजूरी दिली. या तहामुळे नागपूर राज्यावर गुलामगिरीचे सावट पसरले. या तहात खालील कलमा समाविष्ट होत्या.

१. इंग्रज हे नागपूर राज्याच्या संरक्षणासाठी राजाच्या सेवेत पायदळाच्या सहा पलटणी व घोडेस्वारांची एक पलटण ठेवतील. लष्कराच्या खर्चासाठी राजा दरसाल साडेसात लाख रुपये इंग्रजांना देईल. राजाने ही रक्कम न दिल्यास इंग्रज सरकारला हवा असलेला मुलुख, त्या रकमेच्या मोबदल्यात राजा इंग्रजांना देईल.
२. राजाने आपले पदरी स्वखर्चाने तीन हजार स्वार व दोन हजार पायदळ 'कांटीजन्ट फौज' म्हणून ठेवावे. तिच्यावर देखरेख ठेवण्याचा रेसिडेंटला अधिकार राहील. राजाच्या सैन्याचा पगार, शिस्त आणि सामानसुमान या बाबतीत रेसिडेंटचा निर्णय अंतिम राहील.
३. राजाने कंपनी सरकार मार्फतच परराज्यांशी व्यवहार करणे बंधनकारक राहील.
४. राजाने इंग्रजांविरुद्ध अथवा त्यांच्या मित्रांविरुद्ध युद्ध पुकारणे अवैध राहील.

या तहाच्या वेळी नागोपंत व नारायण पंडित हे इंग्रजांस फितूर झालेले होते. त्यांनी यावेळी इंग्रजांना अनुकूल ठरेल असा सल्ला आप्पासाहेबांना दिला होता. यासाठी इंग्रजांनी भरपूर पैसा या फितूर झालेल्या लोकांना दिला होता. यावरुन, नागपूर राज्यातील मुत्सद्दी लोकांचे किती नैतिक अध:पतन झालेले होते याची कल्पना येते.

## ३. परसोजीचा मृत्यू (दि. १फेब्रुवारी १८१७)

परसोजीचा दि. १ फेब्रुवारी १८१७ च्या रात्री अकस्मात मृत्यू झाला. त्याचा मृत्यू झाला त्या दिवशी आप्पासाहेब हे चंद्रपूरला होते. मृत्युची वार्ता ऐकताच ते नागपूरला येवून पोहचले. परसोजीच्या मृत्युचे वादळ शांत झाल्यानंतर आप्पासाहेबांनी नागपूरच्या गादीवर बसण्याचे ठरविले. त्यावेळी सेनासाहेब सुभ्याची वस्त्रे पुण्याहून येत होती. रेसिडेंट जेकिन्सने पुण्याच्या रेसिडेंटला पत्र लिहून आप्पासाहेबांच्या राज्यारोहणासाठी पेशव्याकडून वस्त्रें पाठविण्याबाबत आपली संमती कळविली होती. पेशवा बाजीराव यांनी आप्पासाहेबांसाठी वस्त्रे रवाना देखील केली. पण त्यानंतर लगेच इंग्रज व पेशवा यांच्या संबंधात बिघाड आला.

## ४. खडकीची लढाई (दि. ५ नोव्हेंबर १८१७)

पेशवा बाजीराव द्वितीय यांनी इंग्रजांशी दि.३१ डिसेंबर १८०२ रोजी तैनाती फौजेचा करार केला. हा तह वसईचा तह म्हणून इतिहासात प्रसिद्ध आहे. या

तहामुळे पुण्याच्या रेसिडेंटची बाजीरावच्या राज्यकारभारात ढवळाढवळ वाढली होती. या हस्तक्षेपाला कंटाळून ५ नोव्हेंबर १८१७ रोजी पेशव्याच्या मराठा सैन्याने पुण्याच्या इंग्रजी रेसिडेंसीवर अचानक हल्ला केला. यातून जी लढाई सुरु झाली ती खडकीची लढाई म्हणून ओळखली जाते. या लढाईची परिणती अखेर बाजीरावाच्या राजत्यागात झाली.

पेशवा बाजीरावांनी खडकीच्या लढाईत परास्त झाल्यानंतर आपल्या मोजक्या सैन्यासह पुण्याहून पलायन केले. आप्पासाहेबांना भेटून सम्मिलितपणे इंग्रजांविरुद्ध स्वातंत्र्य लढा उभारावा, असा त्यांचा विचार होता. त्यामुळे ते पुण्याहून मार्गात नवीन लष्कर भरती करत नागपूरच्या दिशेन निघाले. हे दोन्ही भारतीय शासक इंग्रजांविरुद्ध एक होवू नये यासाठी इंग्रजांच्या एका लष्करी तुकडीने पेशवा बाजीराव यांचा सतत पाठलाग केला व त्यांना नवीन लष्कर भरतीची सवड मिळू दिली नाही. नागपूरच्या रेसिडेंट जेन्किन्सने आप्पासाहेबांना, त्यांनी पुण्याशी संबंध ठेवू नये असे स्पष्टपणे बजावले.

आप्पासाहेबांनी इंग्रजांशी केलेल्या तैनाती फौजेच्या करारात ''राजाने कंपनी सरकार मार्फतच परराज्यांशी व्यवहार करणे बंधनकारक राहील''. असे स्पष्ट कलम होते. पेशवा बाजीराव हे मराठ्यांचे सर्वोच्च शासक असल्यामुळे त्यांच्याशी असलेल्या नागपूर राज्याच्या संबंधावर ही कलम लागू होत नाही, असे आप्पासाहेबांचे म्हणणे होते. त्यामुळे त्यांनी ''पुण्याशी संबंध ठेवू नये'', अशी रेसिडेंटकडून प्राप्त झालेली सूचना अमान्य केली. यातून रेसिडेंट व आप्पासाहेबांच्या संबंधात बिघाड आला.

## ५. वस्त्र ग्रहण समारंभ (दि. २४ नोव्हेंबर १८१७)

पेशवा बाजीराव द्वितीय यांनी सेनासाहेब सुभ्याची वस्त्रे आप्पासाहेबांकडे पाठविली होती. इकडे आप्पासाहेबांनी नागपूर राज्याच्या सेनासाहेब सुभ्याच्या पदावर आपले विधिवत् राजतिलक करविण्यासाठी दि. २४ नोव्हेंबर १८१७ चा मुहूर्त निवडला होता. पुण्याचे पेशवा हे मराठा साम्राज्याचे सर्वोच्च शासक असल्यामुळे त्यांनी पाठविलेली सेनासाहेब सुभ्याची वस्त्रे समारंभाच्या वेळी विधिवत् परिधान करण्याचे आप्पासाहेबांनी ठरविले होते. पेशवा बाजीरावांनी पाठविलेली ही वस्त्रें आप्पासाहेबांना खडकीच्या लढाईपूर्वीच प्राप्त झालेली होती. परिस्थिती बदलल्यामुळे रेसिडेंट जेन्किन्सने आप्पासाहेबांना स्पष्टपणे कळविले की, खडकीच्या लढाईत पेशवा बाजीराव हे परास्त झालेले असून

कंपनी सरकारने त्यांचे पेशवा पद खारिज केलेले आहे. अत: आप्पासाहेबांनी राज्यारोहणाच्या वेळी बाजीराव द्वितीय यांनी पाठविलेली सेनासाहेब सुभ्याची वस्त्रें परिधान करु नये. आप्पासाहेबांना मराठा राज्याच्या सर्वोच्च सत्तेवर (Sovereignty) होणारा हा आघात अमान्य होता. रेसिडेंटच्या या आदेशामुळे आप्पासाहेबांची राष्ट्रीय अस्मिता दुखावली. त्यामुळे त्यांनी परिणामांची अजिबात पर्वा न करता रेसिडेंटचा आदेश झुगारुन देण्याचा ठाम निर्धार केला.

आप्पासाहेबांनी नियोजित दिवशी शुभ मुहुर्तावर पेशवा बाजीराव द्वितीय यांनी पाठविलेली सेनासाहेब सुभ्याची वस्त्रें परिधान केली आणि आपला राज्यारोहण समारंभ थाटात पार पाडला. समारंभ संपल्यावर आप्पासाहेब हे दरबारातून बाहेर पडले आणि हत्तीच्या अंबारीत बसून त्यांनी जाहीर भाषण केले. इंग्रजांविरुद्ध संघर्षमय भाषण देतांना ते उपस्थित रयतेला आणि लष्कराला उद्देशून म्हणाले ''आता माझी इज्जत तुमच्या हाती आहे. तुमच्यावर माझा दृढ विश्वास आहे---''[1] हे सर्व रेसिडेंटच्या मर्जीविरुद्ध होत आहे याची कल्पना आप्पासाहेबांना होती. समारंभाला इंग्रजांकडून कोणीही न आल्यामुळे आप्पासाहेबांचा स्वाभिमान दुखावला, त्यांना राग आला आणि त्यांनी जाहिरपणे इंग्रजांशी सर्व संबंध तोडून टाकले.

## ६. नागपूरचे युद्ध (दि. २५ नोव्हेंबर ते ३० डिसेंबर १८१७)

आप्पासाहेबांनी राज्यारोहणाच्या दुसऱ्याच दिवशी म्हणजे २५ नोव्हेंबर १८१७ ला इंग्रजांच्या रेसिडेंसीवर अकस्मात आक्रमण करण्याची एक गुप्त योजना आखलेली होती. पण नारायण पंडीताने फितुरी केली व २४ नोव्हेंबरच्या रात्री ठीक दोन वाजता स्वत: जाऊन आप्पासाहेबांची ही गुप्त योजना रेसिडेंट जेन्किन्सला कळविली. (Foreign Secret, Proceedings dated 21 Nov.1818) त्यामुळे आप्पासाहेबांच्या गुप्त योजनेवर पाणी फिरले. रेसिडेंटने दि.२५ नोव्हेंबरला सकाळीच संपूर्ण नागपूर शहराची नाकेबंदी केली. दि. २६ नोव्हेंबरला इंग्रज विरुद्ध आप्पासाहेब या दोन्ही पक्षात घमासान युद्ध सुरु झाले.

दीर्घकाळ चाललेल्या या युद्धाच्या काळात सीताबर्डी व सक्करदरा या भागात घडून आलेल्या लढाया इतिहासात प्रसिद्ध आहेत. युद्धाच्या काळात गणपतराव सुभेदार, रामचंद्र वाघ आणि मनभटसारखी शूर व इमानदार माणसे आप्पासाहेबांच्या पक्षात होती. नारो सखाराम अमृतराव, पांडुरंग नागोपंत, सुभेदार

1. पूर्वोक्त, डॉ.कोलारकर आणि पुरंदरे, पृष्ठ क्र.२१३

निंबाळकर, माधवराव खळतकर यांनी देखील युद्धाच्या काळात आप्पासाहेबांना खंबीरपणे पाठिंबा दिला.

युद्धासाठी आप्पसाहेबांनी इंग्रजी सैन्यास पुरुन उरेल एवढे मोठे सैन्य जमा केले होते. त्यामुळे सुरुवातीला इंग्रजांपेक्षा आप्पासाहेबांकडील लष्करी सामर्थ्य जास्त होते. पण बाकाबाईचा इंग्रजांना गुप्त पाठिंबा असल्यामुळे व मराठ्यांत फितुरीचे प्रमाण जास्त असल्यामुळे युद्धात आप्पासाहेबांना अपेक्षित यश मिळणे कठीण झाले. आप्पासाहेबांच्या पक्षाकडून लढाईत झालेल्या दिरंगाईचा फायदा उठवित इंग्रजांनी एलिचपूर, हुशंगाबाद, मुर्तिजापूर इ. ठिकाणी असलेले आपले लष्कर नागपूरला बोलविले. त्यामुळे युद्धाचे चित्र झपाट्याने बदलले व लढाईत इंग्रज हे अजिंक्य ठरले.

आप्पासाहेबांकडील नोकरापासून सेनापतीपर्यंत अनेक लोक वैयक्तिक स्वार्थात आकंठ बुडालेले होते. देशाभिमान शून्य पातळीवर होता. याउलट इंग्रजांचे होते. युद्धकला, मुत्सद्देगिरी, गुप्तचर यंत्रणा, देशाभिमान आणि स्वार्थत्याग यात त्या काळी ते सर्वश्रेष्ठ होते. म्हणून नागपूरच्या युद्धात अंततः इंग्रज विजयी झाले.

## ७. राजवाड्यावर युनियन जॅक (दि. ३० डिसेंबर १८१७)

इंग्रजांनी भोसल्यांच्या राजवाड्यावर दि. ३० डिसेंबर १८१७ ला ताबा प्रस्थापित केला. या दिवशी दुपारी निश्चित दोन वाजून एकवीस मिनटानी भोसल्यांच्या महालावरील जरीपटका हे निशाण उतरवून त्या ठिकाणी इंग्रजांचे निशाण 'युनियन जॅक' फडकविण्यात आले. त्या प्रीत्यर्थ एकवीस तोफांची सलामी देण्यात आली. नागपूरच्या राजवाड्यावर युनियन जॅक फडकविण्यापूर्वी इंग्रजांनी आप्पासाहेबांना कैद केले होते.

## ८. इंग्रज सरकारची दक्षता

आप्पासाहेब हे इंग्रजांच्या कैदेत असल्यामुळे त्यांना आजन्म कैदेत ठेवणे हे इंग्रजांना शक्य होते. पण, असे केल्यास इंग्रज बदनाम होतील आणि नागपूर राज्यातील प्रदेश व किल्ले आपल्या अधिकारात घेतांना, तसेच येथे प्रत्यक्ष राज्यकारभार करतांना स्थानिक लोकांचा विरोध पत्करावा लागेल, असे इंग्रजांना वाटत होते. याउलट, आप्पासाहेबांशी संधी करुन त्यांनाच नाममात्र शासक म्हणून कायम ठेवल्यास त्यांच्या सहीने हवे तसे आदेश काढता येतील, इंग्रजांना हवा तो प्रदेश व हवे ते किल्ले आपल्या अधिकारात घेता येतील आणि राज्यकारभार करणे देखील सुलभ होईल. तसेच या मार्गाचा अवलंब केल्यास इंग्रजांविरुद्ध

पूर्ण जनता एकदम बंड करणार नाही, असे त्यावेळी इंग्रजांना वाटत होते. म्हणून रेसिडेंट जेन्किन्सने आप्पासाहेबांशी एक करार करण्याचे ठरविले.

## ९. नागपूरचा अपमानजनक तह (दि. ६ जानेवारी १८१८)

आप्पासाहेब हे इंग्रजांचे कैदी होते. संपूर्ण नागपूर शहर इंग्रजांच्या ताब्यात असून सर्वत्र त्यांचा पहारा होता. अशा परिस्थितीत रेसिडेंट जेन्किन्सने त्यांच्या समोर दि. ६ जानेवारी १८१८ ला एक अपमानजनक तह प्रस्तुत केला. यावेळी आप्पासाहेब हे रेसिडेंटला उद्देशून म्हणाले ''पेशव्यांच्या आदेशानुसार युद्ध करणे हे माझे कर्तव्य होते. या युद्धातील विनाशासाठी मला आपण जबाबदार मानत असाल तर ही जबाबदारी स्वीकारायला मी तयार आहे.'' (The Raja answered that it was his duty to risk ruin for the services of the Peshwas and as the ruin had fallen on him, he must bear it.) आप्पासाहेबांचे हे बाणेदार उत्तर मार्क्विस ऑफ हेस्टिंग्जच्या रोजनिशीत नमूद आहे. पण, यावेळी आप्पासाहेब हे असाहाय्य होते. त्यामुळे त्यांनी हा अपमानजनक तह नाइलाजाने स्वीकार केला, आणि त्यांनी अत्यंत दु:खी अंत:करणाने त्या तहावर सही केली. हा तह नागपूरचा तह या नावाने जाणला जातो. या तहात अंतर्भूत असलेली कलमे अशी–

१. राजाने सहकुटुंब महालात राहावे. महालावर इंग्रजी शिपायांचा पहारा राहील.
२. आप्पासाहेबांनी नागपूर राज्याचा संपूर्ण कारभार रेसिडेंटच्या सम्मतीने चालवावा.
३. तैनाती फौज आणि कॉंटिजंट फौज यांच्या खर्च्यासाठी नर्मदेच्या उत्तरेकडील काही प्रदेश, वऱ्हाडातील गाविलगड व नरनाळा हे किल्ले आणि त्याखालचा मुलुख, तसेच सिरगुजा व जशपूर ही संस्थाने आप्पासाहेबांनी इंग्रजांना द्यावी.
४. नागपूर राज्यातील जे किल्ले इंग्रज मागतील ते आप्पासाहेबांनी इंग्रजांस द्यावे.
५. सीताबर्डीच्या दोन्ही टेकड्या आणि रेसिडेंसीच्या सभोवतालची जितकी जागा इंग्रजांना लागेल तितकी जागा राजाने इंग्रजांना द्यावी.
६. तैनाती फौजेच्या करारानुसार राजाच्या सुरक्षेसाठी जी फौज ठेवण्यात आली आहे त्या फौजेच्या खर्चाची थकीत रक्कम राजाने इंग्रजाना त्वरीत द्यावी.

७. नागपूरच्या युद्धासाठी जे मराठा सरदार दोषी आहेत त्यांना पकडून राजाने इंग्रजांच्या स्वाधीन करावे.

## १०. राजवाड्यावर इंग्रजांचा पहारा

आप्पासाहेब हे इंग्रजांच्या चक्रव्यूहात अडकल्यामुळे त्यांनी अनिच्छेने नागपूरचा तह मान्य केला. या तहाला अनुसरुन ते दि. ९ जानेवारी १८१८ ला राजवाड्यात परत आले. त्यांनी नागपूरच्या लढाईपूर्वी आपल्या पत्नींना जडजवाहिरातसह भंडाऱ्यास पाठविले होते. त्यांनाही दि. १९ जानेवारीला इंग्रजी शिपायांच्या पहाऱ्यात परत आणण्यात आले. तहाप्रमाणे राजवाड्यावर आणि शहरावर स्थाई स्वरुपात इंग्रजांचा पहारा लावण्यात आला.

आप्पासाहेबांनी स्वातंत्र्य लढ्याच्या भावी योजनेबाबत पेशवा बाजीराव आणि नागपूर राज्यातील त्यांच्याशी एकनिष्ठ असलेल्या लोकांशी पत्रव्यवहार आणि संदेश देवाणघेवाण सुरु ठेवले होते. ही पत्रे इंग्रजांच्या हाती पडत होती. त्यामुळे आप्पासाहेबांच्या इंग्रज विरोधाबाबत इंग्रजांना पुरेपूर कल्पना आलेली होती. अत: इंग्रजांनी आप्पासाहेबांभोवती कडक पहारा लावून त्यांना आपल्या मगरमिठीत जकडून ठेवले. या संपूर्ण काळात आप्पासाहेबांची स्थिती इंग्रजांच्या नजरकैदेत असल्यासारखी होती. या विपरीत परिस्थितीला न जुमानता आप्पासाहेबांनी मात्र इंग्रजांविरुद्ध पुन्हा निर्णायक लढा लढण्याविषयी गुप्तपणे प्रयत्न सुरु ठेवले.

## ११. इंग्रजांविरुद्ध स्थानिक संघर्ष

आप्पासाहेब व इंग्रज यांच्यात घडून आलेल्या नागपूरच्या तहानुसार इंग्रजांना नर्मदेच्या उत्तरेकडील प्रदेश आणि नागपूर राज्यातील जे किल्ले त्यांना हवे असतील ते आपल्या अधिपत्याखाली घेण्याचा अधिकार प्राप्त झाला. अत: या तहानंतर रेसिडेंटने आप्पासाहेबांच्या नावाने आदेश काढून वेगवेगळ्या किल्ल्यांवर व प्रदेशावर आपला ताबा प्रस्थापित करण्याचा प्रयत्न सुरु केला. यावेळी मराठा अधिकारी व स्थानिक लोकांनी इंग्रजांना जागोजागी विरोध केला. म्हणून त्यांना कोणताही प्रदेश अथवा किल्ला सहजासहजी प्राप्त न होता लढाई करुन ताब्यात घ्यावा लागला. स्वराज्याच्या रक्षणासाठी, त्याकाळी लोकांनी स्वयंप्रेरणेने दिलेली प्राणाहुती ही प्रत्येक भारतीयांसाठी स्वाभिमानास्पद, प्रेरणास्पद आणि लक्षणीय अशी बाब आहे. आप्पासाहेब हे दि. ९ जानेवारी १८१८ पासून नागपूरच्या राजवाड्यात इंग्रजांच्या नजरकैदेत होते. यावेळेपासून दि. २० मे १८१८ पर्यंत म्हणजेच सुमारे पाच महिन्याच्या काळात खालीलप्रमाणे संघर्ष घडून आले.

## ११.१ नर्मदेकडील संघर्ष

सागर आणि दमोहकडील प्रदेश, पेशवा प्रथम बाजीराव यांनी तलवारीच्या बळावर जिंकला होता. इ.स.१८१७ च्या खडकीच्या लढाईत पेशवा द्वितीय बाजीराव परास्त झाल्यामुळे हा प्रदेश इंग्रजांना मिळाला होता. तसेच, इ.स.१८१८ च्या नागपूरच्या तहामुळे बैतूल, शिवणी आणि नर्मदेकाठचा जबलपूरकडील प्रदेश त्यांना आप्पासाहेबांकडून मिळाला होता.

नागपूरच्या तहानंतर लगेच इंग्रज हे उपरोक्त भागावर ताबा प्रस्थापित करण्यासाठी गेले तेव्हा त्या भागातील मराठा सरदार, मराठा किल्लेदार आणि स्थानिक लोकांनी त्यांचा कडाडून विरोध केला. नर्मदेच्या काठावर व जबलपूरला मोठ्या प्रमाणात जमलेल्या मराठ्यांनी इंग्रज अधिकारी हार्डिमनच्या नेतृत्वाखालील लष्कराविरुद्ध लढाई केली. इंग्रजांच्या लष्करासमोर मराठ्यांचा टिकाव लागू शकला नाही व हा सर्व प्रदेश इंग्रजांच्या ताब्यात गेला. हा सर्व प्रदेश मिळून इंग्रजांनी इ.स.१८२० मध्ये सागर-नर्मदा नावाचा एक प्रांत निर्माण केला. जबलपूर हे त्याचे मुख्य ठिकाण होते.

## ११.२ श्रीनगरसाठी संघर्ष

आप्पासाहेबांनी जो प्रदेश इंग्रजांना देण्याचे मान्य केले होते तो प्रदेश मराठा सरदारांनी इंग्रजांना द्यावा, असा हुकूम इंग्रजांनी आप्पासाहेबांकडून जारी करविला होता. पण कोणत्याही मुलूखातील लोक आपला मुलूख इंग्रजांना देण्यास तयार नव्हते. लोकांना स्वराज्य व स्वातंत्र्याचे मोल कळत होते. म्हणून ते आपला प्रदेश परकियांच्या अधिपत्याखाली जावू नये या उद्देशाने इंग्रजांचा पूर्ण शक्तीनिशी विरोध करीत असत.

श्रीनगरवर (नर्मदेच्या दक्षिणेकडील) इंग्रज आपला ताबा प्रस्थापित करणार आहेत हे माहित होताच सदूबाबा नावाच्या मराठा सरदाराने इंग्रजांविरुद्ध लढण्याची तयारी केली होती. गादरवाड्याचे बाजूसही इंग्रजांविरुद्ध लढा पुकारण्यास बरेच लोक जमले होते. हरिपूर येथेही इंग्रजांचा विरोध करण्यास मराठा लष्कर तयार होते. हा सर्व प्रदेश लेफ्टनंट कर्नल मॅकमॉरिन याला लष्करी बळाचा वापर करुन जिंकावा लागला.

## ११.३ शिवणी आणि वैरागडचा संघर्ष

शिवणीचा किल्ला ताब्यात घेण्यासाठी जेव्हा हुशंगाबादहून मेजर मॅकफर्सन हा तेथे गेला तेव्हा खंडोपंताने इंग्रजांविरुद्ध लढाई केली. इंग्रजांनी खंडोपंताला

परास्त केल्यानंतरच त्यांना या किल्यावर ताबा प्रस्थापित करणे शक्य झाले. खंडोपंत परास्त झाल्यानंतर तो शिवणीपासून सात-आठ कोसावर असलेल्या वैरागडला गेला व तेथे परमसुख नावाच्या मराठा अधिकाऱ्याला जावून मिळाला. येथे खंडोपंताचे लष्कर आणि परमसुखचे शेदीडशे सैनिक मिळून इंग्रजांविरुद्ध निकराचा लढा दिला. या लढाईत परमसुख पकडला गेला व खंडोपत थोड्या लष्करासह पळून गेला.

इंग्रजांच्या प्रबळ लष्करी सामर्थ्यासमोर मराठा सरदारांचा कुठेच टिकाव लागणे शक्य नव्हते. पण स्वराज्य व स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी विनाशकाळाच्या त्या काळोख्या अंधारातही मराठा सरदारांनी प्रत्येक ठिकाणी एकाकी प्रयत्न केला आणि या प्रयत्नातून त्यांनी इंग्रज हे लष्करी सामर्थ्याच्या बळावर मराठ्यांना परास्त करु शकतात, पण ते त्यांचे मायभूमीवरील प्रेम हे धारदार तलवारीच्या आणि आधुनिक बंदुकीच्या गोळीच्या माऱ्याने देखील कायमचा कदापि नष्ट करु शकणार नाही, हे साऱ्या जगाला दाखवून दिले.

## ११.४ भिरुडची लढाई

नागपूरच्या आग्नेय दिशेला सुमारे ३५ मैल अंतरावर भिरुड नावाचे गाव आहे. नागपूरच्या लढाईत परास्त झाल्यानंतर गणपतराव सुभेदार नावाच्या मराठा सरदारने पुन्हा एकदा नागपूरच्या इंग्रजी सैन्यावर जोरदार आक्रमण करण्याच्या उद्देशाने या गावात मोठ्या प्रमाणात नागपूरहून पांगापांग झालेले मराठी लष्कर एकत्र केले होते. ही बातमी नागपूर येथे रेसिडेंट जेन्किन्सला कळताच त्याने गणपतरावाचा बीमोड करण्यासाठी इंग्रजी लष्कर तातडीने भिरुड गावाकडे रवाना केले. या ठिकाणी इंग्रजी लष्कर व गणपतरावाच्या लष्करात घमासान लढाई झाली. इंग्रजांचे लष्करी सामर्थ्य जास्त असल्यामुळे मराठा लष्कर पराभूत झाले.

## ११.५ वऱ्हाडवर इंग्रजांचा अधिकार

देवगावच्या तहानुसार (इ.स.१८०३) इंग्रजांना वर्धा नदीच्या पश्चिमेकडील सर्व भाग भोसल्यांनी दिलेला होता. वऱ्हाडातील फक्त गाविलगड व नरनाळा हे किल्ले आणि अकोट, अडगाव, बडनेर, भातुकली आणि खटकळी हे परगणे भोसल्यांकडे राहिले होते.

इ.स. १८१८ मध्ये झालेल्या नागपूरच्या तहानुसार गाविलगड, नरनाळा हे किल्ले आणि या परिसरातील भोसल्यांच्या अखत्यारीत असलेले सर्व परगणे आप्पासाहेबांनी इंग्रजांना द्यावे असे ठरले. या तहानंतर इंग्रजांनी हा सर्व प्रदेश

आपल्या ताब्यात घेण्याची जबाबदारी जनरल डव्हटनवर सोपविली. भोसले आणि पेशवे यांच्या दारुण पराभवामुळे या भागातील मराठा अधिकारी एवढे घाबरले होते की त्यांचा काही प्रतिकार न होता हा सर्व प्रदेश इंग्रजांच्या ताब्यात आला.

देवगावच्या तहापासून मेळघाटचा तापीपर्यंतचा भाग पेशव्याच्या अधिकाऱ्यांच्या ताब्यात होता. इंग्रजांनी इ.स. १८१८ मध्ये अमरावती, अकोलासह या संपूर्ण प्रदेशावरदेखील आपला ताबा प्रस्थापित केला. यानंतर इंग्रजांनी गाविलगड व नरनाळा हे किल्ले आणि पेशव्याचा मुलूख एलिचपूरच्या नबाबाच्या स्वाधीन केला. तसेच त्यांनी यावेळी अमरावती जवळील भातुकली हा परगणा हैदराबादचा निजाम या आपल्या सहकाऱ्यास दिला.

## ११.६ मंडल्याकरिता संघर्ष

छत्तीसगडात फार पूर्वीपासून मंडला हे भोसल्यांचे अगदी मजबूत ठाणे होते. मंडल्याच्या किल्ल्याला तिन्ही बाजूंनी नर्मदेच्या मोठ्या प्रवाहाची नैसर्गिक तटबंदी लाभली आहे. उत्तरेस पक्की तटबंदी बांधलेली आहे. शिवाय कृत्रिम तटबंदीच्या बाजूने मोठा खंदक असून त्यात नदीचे पाणी खेळवले आहे. या किल्ल्यात लहानमोठ्या २६ तोफा आणि भरपूर दारुगोळा होता.

मेजर जनरल मार्शलच्या नेतृत्वाखाली इंग्रजी लष्कराच्या एका तुकडीने दि. १८ एप्रिल १८१८ ला मंडल्याला चारही बाजूंनी वेढा दिला. सर्व बाजूंनी तयार झालेल्या मोर्चावरुन दि. २६ एप्रिल १८१८ ला तटबंदीवर मारा सुरु केला. त्याच दिवशी दुपारी दोन वाजता तटबंदीस मोठे भगदाड पडले. भगदाड पडताच इंग्रजी सैन्याने शहरात घुसून हल्ला केला. शहरात घमासान युद्ध झाले. त्यात मराठ्यांचा प्रमुख आनंदसिंग याने प्राणाची पर्वा न करता खूप पराक्रम केला. तो आप्पासाहेबांचा खास व्यक्ती असून इंग्रजांचा कट्टर वैरी होता. या युद्धात तो मारला गेला. त्यामुळे मराठ्यांची फार मोठी हानी झाली. त्याच्या बलिदानामुळे नेतृत्व व योजकतेचा अभाव निर्माण झाला. त्यामुळे गावातले अनेक लोक कापल्या गेले. काहींनी नदीत उडी टाकून प्राण दिले. काही लोकांना इंग्रजांनी पकडले. किल्लेदार रायहजारी पळून गेला. त्यामुळे इतर शिबंदींनी आत्मसमर्पण केले व किल्ला इंग्रजांच्या हाती गेला. किल्लेदार व शिबंदीत चिकाटी व विजयासाठी आवश्यक असलेल्या दुर्दम्य इच्छाशक्तीचा अभाव असल्यामुळे किल्ला दुर्गम असून व त्यात भरपूर दारुगोळा असूनही इंग्रजांना तो सहजपणे सर करता आला.

## ११.७ इंग्रजांचा चौरागडवर अधिकार

मंडल्याकडील भागात चौरागड नावाचा अगदी मजबूत आणि अजिंक्य असा किल्ला होता. मॅकमार्टिन हा इंग्रज अधिकारी जेव्हा चौरागडचा किल्ला जिंकण्यास चालून गेला तेव्हा किल्लेदाराने इंग्रजी लष्करासमोर आपला टिकाव लागणार नाही, असे गृहीत धरुन किल्ला इंग्रजांच्या स्वाधीन करुन दिला.

## ११.८ चंद्रपूरचा लढा

नागपूरच्या तहानंतर राज्यातील सर्व महत्त्वाच्या किल्ल्यांवर आपला अधिकार प्रस्थापित करण्याची, राज्याच्या आर्थिक व राजकीय नाड्या पूर्णपणे कंपनी सरकारच्या ताब्यात आणण्याची आणि नवीन राजवटीला आकार देण्याची मोहीम रेसिडेंट जेन्किन्सने हाती घेतली. चांदा हे शहर नागपूर राज्यात दुसऱ्या क्रमांकाचे शहर होते. या शहराच्या सभोवताली तटबंदी होती व तटबंदीच्या आंत एक किल्ला होता. या किल्लयावर आपला अधिकार असणे आवश्यक आहे, असे इंग्रजांना वाटणे स्वाभाविक होते. आप्पासाहेब भोसले आणि पेशवा बाजीराव हे चंद्रपूरच्या किल्ल्यात गुप्त भेट घेणार आहेत, ही योजना इंग्रजांना कळल्यामुळे त्यांनी नजरकैदेत असलेल्या आप्पासाहेबांची प्रयागकडे रवानगी केली व चंद्रपूरच्या किल्ल्यावर ताबा प्रस्थापित करण्यासाठी आपले लष्कर रवाना केले.

प्रयागच्या वाटेत जबलपूरच्या दक्षिणेस रायचूर येथे मुक्काम असतांना आप्पा-साहेबांनी दि. १३ मे १८१८ च्या रात्री वेशांतर करुन इंग्रजांच्या कैदेतून रहस्यमयरित्या सुटका करुन घेतली. यानंतर ते पचमढीच्या डोंगराळ प्रदेशाकडे निघून गेले. इकडे याच दिवशी इंग्रज अधिकारी कॅप्टन स्कॉट याने चंद्रपूरवर हल्ला केला. यावेळी किल्लेदार गंगासिंग, किल्लेदाराचा व्याही गणेशराव, गोलंदाज अलिखान, अहेरीचे जमीनदार भुजंगराव आणि आलापल्ली येथील उपजमीनदार कोंडेबापू यांनी आप्पासाहेबांच्या वतीने किल्ला लढविला. इंग्रजी सैन्यासमोर त्यांचा टिकाव लागू शकला नाही. दि. २० मे १८१८ रोजी सकाळी कॅप्टन स्कॉटने चंद्रपूरच्या किल्ल्यावर अधिकार प्रस्थापित केला. चंद्रपूरच्या लढाईत किल्लेदार गंगासिंग मोठ्या शौर्याने लढला आणि जखमी होवून पडला. त्यावेळी त्याने अलिखान या गोलंदाजास आपल्याजवळ बोलाविले व इंग्रज अधिकाऱ्यास ठार केल्याबद्दल त्याचा मोठा गौरव करुन त्यास बक्षीस दिले. त्यानंतर त्याने प्राण सोडला. या युद्धात अलिखानाने अनेक इंग्रजांचे मुडदे पाडले. पण तो मात्र बचावला. स्कॉटचे सैन्य किल्ल्यात घुसल्याबरोबर भुजंगराव आणि कोंडेबापू

यांनी लढण्याचे सोडून अहेरीस पळून गेले. चंद्रपूरचा गोंड राजा माणिकगडकडे पळून गेला. इंग्रजांनी त्याची सर्व मालमत्ता लुटली. त्याचा वाडा व बालेकिल्ला पाडून जमीनदोस्त करण्यात आला. या लढाईत मराठ्यांचे २०० लोक मारले गेले. १०० लोकांना कैद करण्यात आले. काही झाडीत पळून गेले.

## ११.९ लांजीवर इंग्रजांचे अधिपत्य

लांजी हे वर्तमान मध्यप्रदेशात असून एक प्राचीन धार्मिक व ऐतिहासिक स्थळ आहे. लांजी हे गाव प्राचीनकाळी रतनपूर येथील कलचुरी राजवंशाच्या अधिकारक्षेत्रात होता. येथील किल्ला आणि लंजकाई देवी, महामाया देवी व कोटेश्वराचे मंदिर या बाबी प्रसिद्ध आहेत. येथील किल्ला भव्य व मजबूत असून इ.स. १११४ मध्ये कलचुरी राजवंशाच्या राजाने बांधलेला आहे. यानंतर हा किल्ला क्रमश: यादव, गोंड व भोसले राजवंशाच्या वर्चस्वाखाली होता. या किल्ल्याला यादवगड म्हणण्याचा प्रघातही दिसतो.

मराठ्यांच्या शासनकाळात लांजी हे खैरागडच्या मांडलिक राजाच्या अधिकार-क्षेत्रात असून जमीनदारीचे स्थान होते. आप्पासाहेबांनी इ.स.१८१६ मध्ये लांजीची मनसबदारी चिमणा बहादूरला बहाल केली. त्याकाळी लांजी हे मराठ्यांचे एक महत्त्वपूर्ण प्रशासकीय केंद्र देखील होते. लांजीला मराठ्यांच्या वतीने कमाविसदार हा महसूल अधिकारी राहत असे. कामठा, लांजी इ. परगण्यातील शेतसारा निर्धारित करण्याचा त्याला अधिकार होता.

नागपूर राज्यातील विविध किल्ल्यांवर इंग्रजांचा अधिकार प्रस्थापित झाल्यानंतर लांजी येथील मराठा कमाविसदार हा इंग्रजास फितूर होवून त्यांच्या वतीने कार्य करु लागला. त्याच्या फितुरीमुळे आणि लांजी येथील किल्लेदाराच्या अकर्मण्यतेमुळे लांजीचा किल्ला व सभोवतालचा संपूर्ण प्रदेश इंग्रजांच्या वर्चस्वाखाली गेला. कमाविसदाराची ही कृती देशद्रोहीपणाची असून मराठ्यांच्या अस्तित्वाला धोका निर्माण करणारी आहे, ही बाब चिमणा बहादूर यांच्या लक्षात आली. पण, यावेळी ते महादेवाच्या डोंगरात आश्रय घेवून असलेल्या आप्पासाहेबांशी स्वातंत्र्यलढ्याविषयी रणनीती आखण्यात तसेच लढ्यासाठी लष्कर भरती करुन त्यांना लष्करी मदत पाठविण्यात व्यस्त असल्यामुळे ते लांजीकडे वाढत चाललेल्या इंग्रजांच्या प्रभावाला लगेच आळा घालू शकले नाही.

## १२. पेशवा बाजीराव आणि आप्पासाहेब

पेशवा बाजीराव द्वितीय, आप्पासाहेब भोसले आणि चिमणा बहादूर हे

एकाच राजकीय व्यवस्थेतील तीन महत्त्वपूर्ण केंद्र असल्यामुळे इंग्रजांविरुद्ध चिमणा बहादूरच्या लढ्याचे समग्र चित्र आणि चरित्र लक्षात यावे यासाठी नोव्हेंबर १८१७ पासून मे १८१८ पर्यंतच्या सुमारे सात महिन्याच्या काळात इंग्रज विरुद्ध आप्पासाहेब यांच्यात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष स्वरुपात घडून आलेला संघर्ष जाणून घेणे, त्याचप्रमाणे या सात महिन्याच्या कालावधीत इंग्रजाविरुद्ध स्वातंत्र्य लढा उभारण्यासाठी आप्पासाहेब व पेशवा बाजीराव द्वितीय यांच्यात गुप्तपणे सुरु असलेले राजकारण समजून घेणे आवश्यक होते. अत: या दोन्ही बाबींचे वर्णन या प्रकरणातील वरील विविध मुद्यांत दिलेले आहे. आता या नवीन मुद्यात आप्पासाहेब व बाजीराव द्वितीय यांचे प्रयत्न कसे फिस्कटले हे प्रस्तुत करीत आहे.

नागपूरच्या पराभवानंतर पांगापांग झालेले मराठा लष्कर सोईस्कर ठिकाणी निघून जात असतांना गणपतराव सुभेदार हे आपल्या मोजक्या लष्करासह बाजीराव पेशव्याला भेटण्यासाठी सोलापूरच्या दिशेने निघून गेले. येथे पेशवा बाजीराव यांच्याशी त्यांची भेट झाली. येथून पेशवे बाजीराव हे गणपतराव सुभेदारासह राक्षसभुवन, वाशीम या मार्गाने पांढरकवडा येथे आले. येथून ते थेट चंद्रपूरला जाणार होते. चंद्रपूरच्या किल्ल्यात गुप्तपणे भेटून बाजीराव व आप्पासाहेब हे इंग्रजांविरुद्ध स्वातंत्र्य लढ्याची भावी योजना आखणार होते. या संपूर्ण काळात दोघांचे पत्रव्यवहार आणि संदेश देवाणघेवाण सुरु होते. ही पत्रे पुणे अथवा नागपूरच्या रेसिडेंटच्या हाती पडत होती. बाजीराव हा चंद्रपूरला जाणार आहे अशी बातमी नागपूरच्या रेसिडेंटला मिळताच त्याने बाजीरावला अडविण्यासाठी नागपूरहून स्कॉटला पाठविले. बाजीरावाची आघाडीची फौज दि. २ एप्रिल १८१८ ला चंद्रपूरच्या रोखाने वर्धा नदीवर आली. शिवणी गावाजवळ घमासान युद्ध झाले व त्यात इंग्रजांनी बाजीरावाच्या सेनेचा पराभव केला. याच सुमारास, इंग्रजांनी नागपूरच्या राजवाड्याला गराडा घालून आप्पासाहेबांना कैद केलेले आहे, ही बातमी पेशवा बाजीराव यांना कळली. अत: त्यांनी चंद्रपूरला जाण्याचा आपला बेत बदलला व ते इंग्रजांना झुकांड्या देत उत्तरेकडील बऱ्हाणपूरच्या रोखाने निघाले. अशाप्रकारे प्रत्येक ठिकाणी उद्देशपूर्तीच्या मार्गात अडथळे आल्यामुळे इंग्रजांविरुद्ध स्वातंत्र्यलढा उभारण्याची आप्पासाहेब व पेशवा बाजीराव यांची योजना बारगळली.

आप्पासाहेबांना नागपूरात ठेवणे फार धोक्याचे आहे ही बाब रेसिडेंटच्या लक्षात येताच त्याने त्यांना प्रयागच्या किल्ल्यात ठेवण्याचे ठरविले. दि. ३ मे

१८१८ रोजी रेसिडेंटने कॅप्टन ब्राऊन याच्या हाताखाली एक लष्करी तुकडी देवून आप्पासाहेबांची रवानगी प्रयागच्या दिशेने केली. दि. १३ मे १८१८ ला रात्री अलाहाबादच्या वाटेवरील रायचूर येथे मुक्काम असतांना मध्यरात्री २ ते ३ च्या सुमारास आप्पासाहेबांनी रहस्यमयरित्या इंग्रजांच्या कैदेतून आपली सुटका करुन घेतली व ते भूमिगत झाले. कर्मधर्मसंयोगाने या काळात आप्पासाहेब व बाजीरावांची भेट झाली असती तर मराठ्यांचा इतिहास वेगळ्या पद्धतीने लिहिल्या गेला असता असे मनाला क्षणभर वाटून जाते. पण, तसे घडणे कदापि शक्य नव्हते. बाजीरावाला पकडण्यासाठी इंग्रजी लष्कर त्यांचा पाठलाग करीत होते. अखेर दि. ३ जून १८१८ रोजी खैरीघाटच्या पायथ्याशी इंग्रजी लष्कराने बाजीरावला घेरले. त्यामुळे बाजीरावने येथे इंग्रजांसमोर आत्मसमर्पण केले. प्रतिवर्ष आठ लाख रुपये याप्रमाणे निवृत्तिवेतन घेवून त्यांनी आपल्या सर्व राज्यावर पाणी सोडले. यानंतर ते कानपूरपासून १२ मैलावर गंगाकिनारी ब्रम्हावर्त येथे एका टोलेगंज वाड्यात जावून राहिले.

पेशवा बाजीराव यांनी आपल्या मनात स्वातंत्र्य लढ्याची तळमळ कायम ठेवून आपले उर्वरित आयुष्य ब्रम्हावर्त येथील भव्य वाड्यात व्यतीत केले. आप्पासाहेबांनी मात्र यापुढे प्रचंड जोखीम पत्करुन इंग्रजांविरुद्ध स्वातंत्र्य लढा उभारला. एकच नदी दोन जलप्रवाहात विभक्त होवून त्यांनी स्वतंत्रपणे पुढे मार्गक्रमण करावे, जणूकाही त्याचप्रमाणे मराठा साम्राज्याचे दोन राज्यकर्ते आप्पासाहेब आणि बाजीराव द्वितीय यांनी दोन स्वतंत्र मार्गाने यापुढील आयुष्यात आपली वाटचाल सुरु ठेवली. या दोहोंच्या अंतर्मनात 'भारत मातेचे स्वातंत्र्य' हा भाव मात्र त्यांच्या अंतिम श्वासापर्यंत तेवत होता. आप्पासाहेब आणि निवृत्त पेशवा बाजीराव यांच्या पुढील आयुष्यातील घटनांवरुन ही गोष्ट फार प्रमाणात शक्य वाटते.

## १३. स्वातंत्र्यासाठी आप्पासाहेबांची धडपड

आप्पासाहेब भोसले यांनी प्रथम इंग्रजांशी तैनाती फौजेचा करार केला व नंतर त्यांनी हा करार झुगारुन त्यांच्याशी युद्ध केले. युद्धात परास्त झाल्यानंतर त्यांनी इंग्रजांची गुलामगिरी स्वीकारली आणि लगेच स्वातंत्र्य लढ्यासाठी धडपडदेखील सुरु केली. यातून प्रश्न उपस्थित होतो की, त्यांनी इंग्रजांविषयी असे धरसोडीचे धोरण कां स्वीकारले. यासंबंधी डॉ. कोलारकर आणि गो.मा.पुरंदरे यांनी ''आप्पासाहेबांचे कमी वय, अनुभव संपन्नतेचा अभाव आणि नागोपंत व

नारायण पंडीत यांच्यासारख्या मुत्सद्यांनी स्वार्थासाठी केलेली त्यांची दिशाभूल''[1] ही कारणे अधोरेखित केलेली आहेत. रियासतकार गो. स. सरदेसाई यांनी रियासत (उत्तर विभाग ३) या ग्रंथात ''आप्पासाहेबांच्या धरसोड वृत्तीला तत्कालीन परिस्थिती बहुतांश जबाबदार आहे.'' असे मत व्यक्त केले आहे. आप्पासाहेबांचे अंतरंग जाणून घ्यायचे असेल तर तत्कालीन राजकीय परिस्थिती, त्यांच्या समोरील पेचप्रसंग आणि त्यांच्या मनाचा कल लक्षात घेणे आवश्यक आहे.

राजे रघूजी द्वितीय यांच्या मृत्युनंतर परसोजीला नागपूरची गादी प्राप्त होणे क्रमप्राप्त होते. पण तो अपंग असल्यामुळे व सख्ख्या आईचे पूर्वीच निधन झालेले असल्यामुळे त्याची सावत्रआई बाकाबाई ही मूठभर संधीसाधू लोकांच्या मदतीने राज्यकारभार सांभाळू लागली. त्यामुळे भोसले राजवंशाचे भवितव्य अंधकारमय वाटू लागले. अशा परिस्थितीत आप्पासाहेब हे रघूजी द्वितीय यांच्या घराण्यातील असल्यामुळे त्यांनी सत्ताप्राप्तीसाठी धडपड सुरु केली. यामुळे राजधानी नागपूर येथील मुत्सद्दी व सरदार हे आप्पासाहेब व बाकाबाई यांच्या दोन गटात विभक्त झाले. इंग्रजांचा कल बाकाबाईच्या पक्षाकडे होता. अशा परिस्थितीत राज्याची सत्ता आपल्या हाती घेवून भोसले राजवंशाचे अस्तित्व कायम राखण्यासाठी इंग्रजांना आपल्या गटाकडे वळविण्याशिवाय अन्य कोणताही पर्याय आप्पासाहेबांच्या हाती शिल्लक नव्हता. म्हणून त्यांनी दि. २८मे १८१६ ला रेसिडेंट जेन्किन्सशी तैनाती फौजेचा करार केला. त्यामुळे इंग्रजांची संपूर्ण ताकद आप्पासाहेबांच्या बाजूने उभी राहिली व ते नागपूर राज्याची सत्ता आपल्या हाती घेण्यात यशस्वी झाले. अशाप्रकारे आप्पासाहेबांनी भोसले राजवंशाचे अस्तित्व कायम राखून कुलधर्माचे पालन केले.

आप्पासाहेब हे सत्तासीन झाल्यानंतर त्यांच्या समोर धर्मसंकट उभे राहिले. सत्ता हासिल करुन त्यांनी कुलधर्माचे तर पालन केले होते, पण तैनाती फौजेच्या करारानुसार त्यांच्या राज्यकारभारात रेसिडेंटचा हस्तक्षेप सुरु झाला. राज्यकारभारात परकियांचा हस्तक्षेप सहन करणे हे राजधर्माच्या विरुद्ध होते. राजधर्माचे पालन करण्यासाठी त्यांनी इंग्रजांशी युद्ध करणे अपरिहार्य झाले. यातून नागपूरचे युद्ध घडून आले. या युद्धात इंग्रज विजयी झाल्यामुळे त्यांनी आप्पासाहेबांना कैद केले.

---

1. पूर्वोक्त, डॉ.कोलारकर आणि पुरंदरे, पृष्ठ क्र.२४६

आप्पासाहेब कैदेत असतांना रेसिडेंट जेन्किन्सने त्यांच्या समोर दि. ६जानेवारी १८१८ ला एक अपमानजनक तह प्रस्तुत केला. या तहानुसार आप्पासाहेबांना नागपूरची गादी पुन्हा प्राप्त झाली. परंतु तैनाती फौजेचा तह आणि नागपूरच्या अपमानजनक तहामुळे राज्याची प्रजा ही पूर्णपणे इंग्रजांच्या गुलामगिरीत लोटली गेली. त्यामुळे आपण राजधर्माचे पालन करु शकलो नाही आणि राष्ट्रधर्माची देखील प्रतारणा केलेली आहे असे आप्पासाहेबांना वाटू लागले. राजधर्म व राष्ट्रधर्म बुडविल्याचे कलंक आपल्या माथी लागले याची आप्पासाहेबांना खंत वाटू लागली. अत: इंग्रजांविरुद्ध स्वातंत्र्य लढा उभारण्याची तळमळ त्यांच्या मनात उत्पन्न झाली. आप्पासाहेबांच्या मनाची इकडे अशी अवस्था असतांना तिकडे पेशवा बाजीराव द्वितीय यांनी पुण्याहून पलायन करुन इंग्रजांविरुद्ध स्वातंत्र्य लढा उभारण्याचा प्रयत्न सुरु केलेला होता. शिंदेही या लढ्यात सहभागी होणार होते. परिणामस्वरुप आप्पासाहेब व पेशवा बाजीराव यांच्यात या स्वातंत्र्य लढ्याबाबत गुप्तचरांच्या व पत्रव्यवहाराच्या माध्यमातून वैचारिक देवाणघेवाण सुरु होवून आप्पासाहेबांनी पुन्हा एकदा इंग्रजांशी निर्णायक युद्ध करण्याचे ठरविले. पण इंग्रजांच्या कुशल गुप्तचर यंत्रणेमुळे आप्पासाहेब व बाजीराव द्वितीय यांची ही गुप्त योजना बारगळली.

तात्पर्य, आप्पासाहेब भोसले हे ज्यावेळी सत्तारुढ झाले त्यावेळची राजकीय परिस्थिती अत्यंत गुंतागुंतीची होती. म्हणून त्यांच्या इंग्रजविषयक धोरणात वा कृतीत धरसोड वृत्ती झळकते. वस्तुत: आप्पासाहेब भोसले यांच्यात कर्तबगारी, धडाडी व नेतृत्व क्षमता हे गुण होते. त्यांनी इ.स. १८१८ मध्ये जेव्हा महादेवाच्या डोंगरात आश्रय घेवून इंग्रजांविरुद्ध स्वातंत्र्य लढा प्रारंभ केला तेव्हा त्यांचे हे गुण प्रकर्षाने प्रगट झाले.

## १४. कामठावासियांना 'संकटाची चाहूल'

इंग्रजांनी नर्मदेकडील प्रदेशावर आणि शिवणी, वैरागड, मंडला, चंद्रपूर इ. किल्ल्यांवर आपला ताबा प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्यांना स्थानिक मराठा अधिकाऱ्यांशी आणि यापैकी काही ठिकाणी स्थानिक लोकांशीही संघर्ष करावा लागला. परंतु ज्यावेळी त्यांनी गाविलगड, नरनाळा व लांजीच्या किल्ल्यावर अधिकार प्रस्थापित केला त्यावेळी त्यांना ते किल्ले संघर्ष न करता सहजासहजी प्राप्त झाले. यापैकी वऱ्हाडातील गाविलगड व नरनाळा हे किल्ले इंग्रजांना मराठा अधिकाऱ्यांच्या नैराश्यामुळे सहजासहजी प्राप्त झाले. पण, लांजीचा ऐतिहासिक किल्ला हा त्यांना तेथील कमाविसदाराच्या देशद्रोहीपणामुळे आणि किल्लेदाराच्या

नाकर्तेपणामुळे सहजासहजी प्राप्त झाला.

लांजीच्या पश्चिम दिशेत सुमारे ३० मैल अंतरावर कामठ्याचा किल्ला आहे. लांजीवर इंग्रजांचे वर्चस्व प्रस्थापित झाल्यामुळे युद्ध कामठ्याच्या दारापर्यंत पोहचले होते. पण कामठ्याचे जमीनदार चिमणाबहादूर यांची प्रशंसा नागपूर दरबारातील नारायण पंडित सारख्या मुत्सद्यांच्या मुखातून रेसिडेंट जेन्किन्सने वारंवार ऐकलेली असल्यमुळे व त्यांच्या संबंधी रेसिडेंट जेन्किन्सचे अनुकूल मत असल्यामुळे चिमणाबहादूर हा इंग्रजांविरुद्ध उभा राहील अशी किंचितही शंका त्याला आली नाही. तसेच, नेमके याचवेळी आपासाहेबांनी महादेवाच्या डोंगरात आश्रय घेवून इंग्रजांसमोर बिकट समस्या निर्माण केली होती. त्यामुळे आप्पासाहेबांना पकडण्यासाठी इंग्रजांना आपले संपूर्ण लष्करी सामर्थ्य महादेवाच्या डोंगराकडे वळवावे लागले. अत: कामठा जमीनदारीवर अधिकारप्राप्तीचा विषय लांबणीवर पडला. पण घटनाक्रम निर्णायक लढ्याच्या दिशेने पुढे सरकत गेल्यामुळे निकट भविष्यात इंग्रज विरुद्ध चिमणा बहादूर असा संघर्ष घडून येणे अपरिहार्य झाले आणि कामठावासियांना भावी संकटाची चाहूल लागली. यानंतरच्या नवव्या प्रकरणात आप्पासाहेबांनी इंग्रजांविरुद्ध सुरु केलेल्या स्वातंत्र्य लढ्याची माहिती दिलेली असून दहाव्या प्रकरणात या स्वातंत्र्य लढ्यातील चिमणा बहादूरची भूमिका विशद केलेली आहे.

## ९. इ.स.१८१८ चे प्रथम स्वातंत्र्य युद्ध

### १. स्वातंत्र्य युद्धाचे स्वरुप

**भा**रतात इंग्रजांविरुद्ध इ.स.१८१८ मध्ये घडून आलेले स्वातंत्र्य युद्ध हे नागपूर राज्याचे विस्थापित राजे आप्पासाहेब भोसले, कामठ्याचे जमीनदार वीर राजे चिमणा बहादूर, हरईचे गोंडराजा चैनशहा आणि पचमढीचे ठाकूर मोहनसिंग यांच्या नेतृत्वाखाली लढले गेले. हे युद्ध जुलै १८१८ ते फेब्रुवारी १८१९ या आठ महिन्याच्या काळात लढले गेले. हे युद्ध उत्तरेतील सागर-दमोह पासून दक्षिणेतील मेळघाटपर्यंत आणि पश्चिमेकडील पचमढीच्या डोंगरापासून पूर्वेकडील लांजीची डोंगरमाला एवढ्या व्यापक प्रदेशात पसरले होते. ही या युद्धाची व्याप्ती होती.

### २. स्वातंत्र्ययुद्धाची कारणे

इंग्रजांविरुद्ध भारतात घडून आलेल्या या पहिल्या स्वातंत्र्य युद्धाची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.

#### २.१ नागपूरचे युद्ध

मराठा साम्राज्यातील परंपरेनुसार आप्पासाहेबांनी दि. २४ नोव्हेंबर १८१७ ला पेशवा बाजीराव द्वितीय यांच्याकडून पाठविण्यात आलेली सेनासाहेब सुभ्याची वस्त्रें विधिवत ग्रहण केली आणि ते नागपूर राज्याच्या मनसदीवर रीतसर विराजमान झाले. हा समारंभ संपन्न होताच आप्पासाहेबांना नागपूर राज्याच्या वैध शासकाचा दर्जा प्राप्त झाला. नागपूरच्या गादीवर आप्पासाहेबांचा कायदेशीर अधिकार होता. पण, त्यांची काकू बाकाबाई ही नागपूर राज्यातील काही संधीसाधू लोकांना हाताशी घेवून नागपूरची गादी बळकावण्यासाठी प्रयत्नशील होती. अशा गुंतागुंतीच्या परिस्थितीत आप्पासाहेबांनी इंग्रजांना हाताशी घेवून बाकाबाईला शह दिला. हा आप्पासाहेबांचा पहिला राजकीय विजय होता. यावेळी आप्पासाहेबांचे वय २१ वर्षाचे होते. हे लक्षात घेता यातून आप्पासाहेबांच्या प्रतिभेची प्रचिती येते.

आप्पासाहेबांसमोर नागपूरचे राजपद प्राप्त करण्यासाठी अन्य कोणताही पर्याय उपलब्ध नव्हता. म्हणून त्यांनी नाईलाजाने दि. २८ मे १८१६ ला इंग्रजांबरोबर तैनाती फौजेचा करार केला होता. त्यामुळे त्यांनी यावेळेपासूनच इंग्रजांविरुद्ध सर्व मराठा शासकांचा सम्मिलितपणे लढा उभारण्यासाठी पुण्याचे

पेशवा बाजीराव द्वितीय यांच्याशी गुप्तचरांच्या माध्यमातून संदेशाचे आदान-प्रदान सुरु केले होते. या प्रयत्नाला फारसे यश न मिळाल्यामुळे आप्पासाहेबांनी राज्यारोहण समारंभ आटोपताच स्वबळावर इंग्रजांना शह देता यावा यासाठी आपले विश्वासपात्र चिमणा बहादूर, चैनशहा, मोहनसिंग ठाकूर, छट्टू पेंढारी इ. लोकांच्या माध्यमातून समारंभाच्या निमित्ताने नागपूरमध्ये प्रचंड लष्कराची जमवाजमव केलेली होती. अत: त्यांनी दि. २४ नोव्हेंबर १८१७ ला राज्यारोहण समारंभ आटोपताच इंग्रजांविरुद्ध संघर्षमय भाषण केले आणि जाहिरपणे इंग्रजांशी सर्व राजकीय संबंध तोडले. परिणामस्वरुप दुसऱ्याच दिवशी इंग्रजांविरुद्ध आप्पासाहेबांचे युद्ध सुरु झाले. आप्पासाहेबांच्या घरातच घरभेदी असल्यामुळे या युद्धात अंतत: इंग्रजांना विजय प्राप्त होवून त्यांनी दि.३० डिसेंबर १८१७ ला आप्पासाहेबांच्या राजवाड्यावर आपला ताबा प्रस्थापित केला. नागपूरचे हे युद्ध दि. २५ नोव्हेंबर १८१७ ते दि.३० डिसेंबर १८१७ या कालावधीत लढले गेले. प्रत्येक युद्ध हे नव्या युद्धाला जन्म देते, ही उक्ती या ठिकाणी चरितार्थ झाली. नागपूर युद्धाच्या परिणामामुळे इ.स.१८१८ च्या स्वातंत्र्य लढ्याचे बी पेरले गेले.

## २.२ सहकाऱ्यांची प्रेरणा

नागपूरच्या अपमानजनक तहानंतर आप्पासाहेबांना राजवाड्यात आणण्यात आले. ते दि. ९ जानेवारी १८१८ पासून येथे वास्तव्य करु लागले. पण राजवाड्याच्या सभोवताली इंग्रजी लष्कराचा पहारा लावण्यात आला. येथे असतांना त्यांची स्थिती इंग्रजांच्या नजरकैदेत असण्यासारखी होती. त्यामुळे राज्यातील मराठा अधिकाऱ्यांत असंतोष पसरला. रामचंद्र वाघ, नागोपंत, आनंदसिंग, गंगासिंग इ. मराठा अधिकारी आप्पासाहेबांना इंग्रजांची गुलामी झुगारुन देण्याचा सल्ला देवू लागले. यावेळी पेशवा बाजीराव द्वितीय हे देखील गुप्तचरांच्या माध्यमातून आप्पासाहेबांना इंग्रजांविरुद्ध पुन्हा निर्णायक लढा उभारण्याविषयी उद्युक्त करीत होते.

आप्पासाहेब हे नजरकैदेत असतांना कामठ्याचे जमीनदार चिमणा बहादूर यांनी त्यांची भेट घेतली. यावेळी चिमणा बहादूर हे आप्पासाहेबांना म्हणाले ''शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्यावर आता संकटाचे आभाळ कोसळले आहे. रात्र होताच ज्याप्रमाणे सर्वत्र काळोख पसरतो त्याप्रमाणे मनाच्या दौर्बल्यामुळे मानवी मन नैराश्याच्या काळोखाने आच्छादून जाते. पण भारतभूच्या काळवंडत चाललेल्या उज्ज्वल इतिहासाला आपल्या पुरुषार्थाने पुन्हा

सोन्यासारखी झळाळी आणण्याचे सामर्थ्य अंगी असल्याचे भोसले राजवंशाने पूर्वी सिद्ध केले आहे. याचे सदोदीत स्मरण करुन आपण प्रत्येक पाऊल पुढे टाकावे. त्यातून भावी कर्तव्यपथ स्पष्टपणे आपल्या दृष्टीपथात येईल. तुमच्या आदेशावर प्राण न्योछावर करायला तयार असणारे आणि आपण ज्या मातीत जन्मलो त्या मातीशी इमान राखणारे अनेक मराठा सरदार व असंख्य लोक हयात असतांना आपण काळजी करण्याचे कारण नाही. धैर्याने संकटांना सामोरे जावे. वीर शिवाजी महाराजांचा इतिहास आठवून राजकीय क्षितिजावर वाटचाल करीत राहावे. हाच या संकटाच्या क्षणी आपणास आमचा रास्त सल्ला आहे.'' नवी उमेद जागविणाऱ्या आपल्या या मनोभावातून चिमणा बहादूर यांनी आप्पासाहेब भोसलेंचे सांत्वन केले, त्यांना धीर दिला, आश्वस्त केले व दिशानिर्देशही केले.

आप्पासाहेबांचे वय त्यावेळी २१ वर्षाचे होते. चिमणा बहादूरचे वय त्या सुमारास ३५ वर्षाचे असून ते आप्पासाहेबांपेक्षा वयाने मोठे होते. कामठ्याचा बहेकार घराणा आणि नागपूरचे भोसले राजवंश यात आत्मीयसंबंध होते. तसेच चिमणा बहादूरच्या अधिकारक्षेत्रात असलेली कामठा जमीनदारी ही संपूर्ण नागपूर राज्यात सर्वात शक्तिशाली जमीनदारी होती. म्हणून चिमणा बहादूर हे राजे आप्पासाहेब भोसलेंचे वरील शब्दात सांत्वन करु शकले, ही बाब या ठिकाणी लक्षणीय आहे. यावेळी चिमणा बहादूर यांनी व्यक्त केलेल्या विचारातून त्यांची राजकीय निष्ठा, उच्चकोटीची राजकीय समज आणि ज्या मातीत ते जन्मले तिच्याप्रती प्रेम व अस्मिता प्रकर्षाने झळकते.

चिमणा बहादूरप्रमाणेच रामचंद्र वाघ, नागोपंत, हरईचे गोंड राजा चैनशहा इ. व्यक्ती आप्पासाहेबांना इंग्रजांची गुलामगिरी झुगारुन देण्यासाठी उद्युक्त करीत होते. म्हणून १८१८ चे स्वातंत्र्ययुद्ध घडून आले. आप्पासाहेबांना उमाबाई व सावित्रीबाई या दोन पत्नी होत्या. उमाबाईचे आप्पासाहेबांवर स्वत:च्या प्राणाहूनही जास्त प्रेम होते. आप्पासाहेबांच्या क्षात्रतेजाशी तिने लग्न केले आहे, असे तिचे मनोभाव होते आणि ती आप्पासाहेबांच्या नजरकैदेमुळे व्यथीत होती. उमाबाईची प्रेरणादेखील १८१८ च्या स्वातंत्र्य युद्धाला कारणीभूत आहे. उमाबाईने आप्पासाहेबांची नेहमी काळजी घेतली व अज्ञातवासात भरपूर द्रव्याचा पुरवठा केला होता. शोकाने ती जून १८१८ मध्येच मृत्यू पावली.

### २.३ गुलामगिरीविरुद्ध आक्रोश

आप्पासाहेब भोसले हे रघूजी द्वितीय यांचे तत्कालीन परंपरेनुसार वैध वारस होते. वारसाहक्कानुसार त्यांना नागपूरचे राजपद प्राप्त होणे आवश्यक होते. त्यांना

हे राजपद प्राप्त झाल्यामुळे 'आपले राजा' म्हणून जनतेच्या हृदयात त्यांना स्थान प्राप्त झाले व संपूर्ण राज्यात लोकप्रियता प्राप्त झाली. आप्पासाहेब हे स्वकीय असून इंग्रज हे परकीय आहेत, हा भेद लोकांच्या दृष्टीने महत्त्वाचा होता. म्हणून जेव्हा नागपूर राज्यावर इंग्रजांनी आपली सत्ता प्रस्थापित करणे सुरु केले तेव्हा त्यांच्या विरोधात अनेक ठिकाणी जनभावना उफाळून आली.

नागपूरच्या राजवाड्यावर युनियन जॅक फडकविल्यानंतर ''रेसिडेंटने राजाच्या नावाने हुकूम पाठवून सत्ता बळकट करणे प्रारंभ केले तेव्हा तो हुकूम घेवून जाणाऱ्या इंग्रजांच्या एका लष्करी तुकडीवर रामटेकजवळ लोकांच्या जमावाने हल्ला केला.''[1] गणपतराव सुभेदाराने देखील इंग्रजाच्या अशाच एका लष्करी तुकडीवर नागपूरच्या आग्नेय दिशेला सुमारे ३०/३५ मैलावर असलेल्या भिरुड या गावाजवळ हल्ला केला होता. नंतर तो सोलापूर येथे बाजीरावास जावून मिळाला. बाजीराव व आप्पासाहेब यांनी चंद्रपूरच्या किल्ल्यात भेट घ्यावी व नंतर दोघांच्या सम्मिलित सामर्थ्यानिशी इंग्रजांविरुद्ध स्वातंत्र्य लढा सुरु करावा, अशी या दोन्ही शासकांची गुप्त योजना होती. पण इंग्रजांच्या कुशल गुप्तचर यंत्रणेमुळे ही योजना बारगळली.

इंग्रजांनी जेव्हा नागपूर राज्यात आपली सत्ता बळकट करणे प्रारंभ केले तेव्हा सागर, जबलपूर, श्रीनगर, मंडला, चौरागड, शिवणी, रामटेक, भिरुड व चांदा या भागात इंग्रजांविरुद्ध मराठा सरदार, मराठा किल्लेदार आणि स्थानिक जनतेने जो पराक्रम गाजविला त्यामुळे आप्पासाहेबांना जनमानसाचा कल लक्षात आला व इंग्रजांविरुद्ध पुन्हा निर्णायक युद्ध करण्याचा विचार ते करु लागले. इंग्रजांच्या गुलामीचे सावट सर्वत्र पसरु लागताच सर्वांना स्वातंत्र्याचे मोल कळू लागले व ते इंग्रजांच्या गुलामगिरीविरुद्ध सावध झाले. ''अणुपासून मोठ्या ताऱ्यापर्यंत सर्वजण स्वातंत्र्यासाठी झगडत असतात.'' असे स्वामी विवेकानंद म्हणत असत. त्यांचे हे कथन या ठिकाणी स्वाभाविकपणे आठवून जाते. विजय अथवा पराजयाची चिंता न करता ध्येयवादाने प्रेरित होवून आप्पासाहेब, चिमणा बहादूर व चैनशहा यांच्या नेतृत्वात स्वातंत्र्य लढा लढला गेला. म्हणून ते भावी पिढीसाठी प्रेरणास्त्रोत ठरले.

### २.४ मराठ्यांची शौर्यशाली परंपरा

नागपूर विजयानंतर इंग्रजांनी राज्यातील सर्व महत्त्वपूर्ण किल्ले आपल्या ताब्यात

---

1. पूर्वोक्त, डॉ.कोलारकर आणि पुरंदरे, पृष्ठ क्र.२२२

घेणे सुरु केले, तेव्हा तेथील मराठा अधिकाऱ्यांनी इंग्रजांविरुद्ध लढा पुकारला. या लढ्यात अनेक निष्ठावंत मराठा अधिकाऱ्यांनी प्राणाहुती दिली. मंडला येथील किल्ल्याचा प्रभार आनंदसिंग नावाच्या मराठा अधिकाऱ्यावर सोपविलेला होता. हा इंग्रजांचा कट्टर वैरी व स्वराज्याप्रती पूर्ण निष्ठावान होता. येथील लढ्यात आनंदसिंग हा मोठ्या शौर्याने लढला. पण शेवटी त्याला प्राण गमवावे लागले. चंद्रपूरच्या लढ्यात निष्ठावंत किल्लेदार गंगासिंग हा जखमी होवून पडला. यापूर्वी नागपूरचे युद्ध सुरु असतांना मनभट या मराठा अधिकाऱ्याने अरब सेनेचे नेतृत्व केले व इंग्रजांविरुद्ध खूप पराक्रम गाजविला होता. त्याला इंग्रजांनी कैद करुन अंबागडच्या किल्ल्यात ठेवले होते. पुढे त्याचे तेथेच निधन झाले.

नागपूरच्या लढ्यात व त्यानंतर राज्यातील विभिन्न ठिकाणी झालेल्या लढ्यांत शेकडो मराठा वीरांना प्राणाहुती द्यावी लागली. तसेच असंख्य मराठा वीरांना इंग्रजांनी कैद केले व कैदेतील यातनेने अनेक लोकांना प्राण गमवावे लागले. इंग्रजविरोधी लढ्यात भयंकर नरसंहार झाल्यानंतर व अनेक कुटुंब उध्वस्त झाल्यानंतर आपण मात्र इंग्रजांची गुलामगिरी पत्करुन राजा म्हणवत ऐषआरामाने पुढील आयुष्य घालवावे, हा विचार येताच आप्पासाहेबांचा स्वत:चा विवेकच त्यांचा धिक्कार करीत होता. आप्पासाहेब हे मराठ्यांच्या शौर्यशाली परंपरेचे वारस होते. त्यांनी इंग्रजांसमोर आत्मसमर्पण केले व नागपूरचा अपमानजनक तहदेखील स्वीकारला. पण, यानंतर मात्र आप्पासाहेबांच्या मनात ''शिवाजी महाराजांनी, मोगलांनी प्रस्थापित केलेल्या गुलामीच्या श्रृंखला तोडून हिंदवी स्वराज्याची स्थापना केली, पेशव्यांनी या स्वराज्याचा विस्तार करुन भारतात मराठ्यांचे साम्राज्य प्रस्थापित केले, कालांतराने रघूजी प्रथम यांनी पराक्रमाच्या बळावर नागपूर राज्याची स्थापना केली, सर्वत्र नावलौकिक प्राप्त या राज्याच्याच शासकाने इंग्रजांच्या गुलामीच्या श्रृंखला आपल्या हातात घालून राज्यातील जनतेला गुलामगिरीच्या विळख्यात गुरफटून टाकण्यास कारणीभूत व्हावे यासारखा मोठा गुन्हा आणि आपल्या गौरवशाली इतिहासाला काळिमा फासणारे व आपले नाव कलंकित करणारे मोठे दृष्कृत्य या जगात दुसरे कोणतेच असू शकत नाही.'' हा विचार वारंवार येवू लागला व त्यांना सतावू लागला. आप्पासाहेबांच्या मनातील या अंतर्द्वंद्वात हळूहळू त्यांच्या संकुचित, स्वार्थी व सत्तालोलुप विचारांवर विवेकशील, प्रेरणास्पद व गौरवास्पद विचार प्रभावी ठरत गेले. म्हणून ''शरीरात प्राण असेपर्यंत मायभूच्या स्वातंत्र्यासाठी संघर्ष करत राहीन'', असा त्यांनी निर्धार केला. आप्पासाहेबांची संवेदनाशीलता, मराठ्यांची शौर्यशाली परंपरा व

त्यांच्यासमोरील शिवाजी महाराज, रघूजी प्रथम इत्यादींचे आदर्श हे १८१८ च्या पहिल्या स्वातंत्र्ययुद्धाचे एक मौलिक कारण होय.

## २.५ आप्पासाहेबांचा स्वाभिमान

इंग्रजांच्या गोड बोलण्याने भारतीय शासक भारावले व त्यांना इंग्रजांच्या दुष्ट नीतीचा अनुमान लावता न आल्यामुळे त्यांनी इंग्रजांशी तैनाती फौजेचा करार केला, पण रघूजी द्वितीय यांनी मात्र आपल्या पूर्ण हयातीत इंग्रजांशी तैनाती फौजेचा करार करण्याचे टाळले, याची कल्पना आप्पासाहेबांना होती. तसेच दुसऱ्या इंग्रज-मराठा युद्धानंतर झालेल्या देवगावच्या तहानुसार (इ.स.१८०३) इंग्रज रेसिडेंट एलफिन्स्टन हा नागपूरला वास्तव्य करु लागताच, त्याच्या हस्तक्षेपामुळे नागपूर राज्याला किती त्रास सहन करावा लागला आणि पुढे रेसिडेंट जेन्किन्समुळे किती त्रास झाला, ही सर्व हकीकत आप्पासाहेबांना त्यांचे काका रघूजी द्वितीय यांच्याकडून कळलेली होती. त्यामुळे आप्पासाहेबांचे इंग्रजांविषयी फारसे चांगले मत नव्हते. पण बाकाबाईला शह देवून नागपूरचे राजपद प्राप्त करता यावे यासाठी त्यांना नाइलाजाने इंग्रजांशी तैनाती फौजेचा करार करावा लागला. पुढे रेसिडेंट जेन्किन्सने जेव्हा त्यांना पेशवा बाजीरावशी कोणताही संबंध ठेवू नये व त्यांनी पाठविलेली सेनासाहेब सुभ्याची वस्त्रें राज्यारोहण समारंभाच्या वेळी परिधान करु नये असे बजावले, तेव्हा आप्पासाहेबांचा स्वाभिमान दुखावला व त्यावेळेपासून ते इंग्रजांना आपला शत्रू समजू लागले.

इंग्रजांनी नागपूरवरील विजयानंतर आप्पासाहेबांचा स्वाभिमान अक्षरश: ठेचून काढला. राजवाड्याभोवती लष्कराचा पहारा बसविला व त्यांना अपमानास्पद वागणूक दिली. इंग्रजांना ज्या दिवशी आप्पासाहेबांची रवानगी प्रयागला करायची होती त्या दिवशी तर इंग्रजांच्या दुष्टतेने पराकाष्ठा गाठली. आप्पासाहेब हे आपल्या राजवाड्यातील अंतरगृहात उमाबाई व सावित्रीबाई यांच्याशी अखेरची भेट घेण्यााठी गेले असता इंग्रजांच्या दोन शिपायांनी त्यांचे दोन्ही हात पकडून तेथून बाहेर आणले, आणि नंतर आप्पासाहेब हा भित्रा असून तो कैदेच्या भीतीने अंतरगृहात दडून बसला होता, असा इंग्रजांनी सर्वत्र ढिंढोरा पीटला. आप्पासाहेबांची प्रतिमा डागाळण्यासाठी इंग्रजांनी केलेल्या या कुटिल-कारस्थानामुळे त्यांना त्यांच्या ताज्या जखमांवर मिठ चोळण्यासारख्या अनंत वेदना झाल्या. यामुळे आप्पासाहेबांचा स्वाभिमान खूप दुखावला व त्यांनी इंग्रजांविरुद्ध स्वातंत्र्य लढा लढण्याचा ठाम निर्णय घेतला.

आप्पासाहेबांचा स्वाभिमान इंग्रजांनी ज्याप्रमाणे आपल्या पायाखाली तुडविला तीच गत ते पुढे आपलीही करणार आहेत, असे चिमणा बहादूर यांना वाटू लागले. तसेच ज्या गोंड जमातीने मायभूशी कधीही द्रोह केला नाही व आपल्या स्वातंत्र्यात दुसऱ्या लोकांचा हस्तक्षेप कदापि सहन केला नाही त्या जमातीतील राजे चैनशहा व इतर गोंड राजांच्या मनात इंग्रजांविरुद्ध तीव्र आक्रोश उत्पन्न झाला. म्हणून घटनाक्रम वेगाने स्वातंत्र्ययुद्धाच्या दिशेने पुढे सरकू लागले व १८१८ चे पहिले स्वातंत्र्य युद्ध घडून येणे अपरिहार्य झाले.

## २.६ प्रबळ इच्छाशक्ती

इंग्रजांनी नागपूर राज्यातील विभिन्न प्रदेश व किल्ले आपल्या ताब्यात घेण्याची मोहीम राबविली तेव्हा त्यांना सर्वत्र विरोध सहन करावा लागला, आणि हा ताबा लष्करी सामर्थ्याच्या बळावर प्रस्थापित करावा लागला. यावरुन रेसिडेंट जेन्किन्सच्या लक्षात आले की, जोपर्यंत आप्पासाहेबांचे वास्तव्य नागपूरला राहील तो पर्यंत कंपनी सरकारला विरोध करण्याचा जनतेचा व मराठा अधिकाऱ्यांचा हुरुप कायम राहील. एवढ्यात त्याच्या निदर्शनात आले की आप्पासाहेब हे नजरकैदेत असूनही आपल्या राजवाड्यात शांतपणे बसलेले नाहीत. ते पेशवा बाजीरावशी संपर्क साधून आहेत व इंग्रजांविरुद्ध पुन्हा निर्णयाक लढा उभारण्याची गुप्तपणे योजना आखत आहेत. त्यामुळे रेसिडेंट जेन्किन्सला आप्पासाहेबांना नागपूर येथे ठेवणे फार धोक्याचे आहे असे वाटू लागले व त्याने त्यांना प्रयागच्या किल्ल्यात नेहमीसाठी कैद करुन ठेवण्याचे ठरविले. अत: दि. ३ मे १८१८ ला आप्पासाहेबांना पुन्हा कैद करुन कॅप्टन ब्राऊनच्या हाताखाली एक लष्करी तुकडी देवून त्यांची रवानगी प्रयागकडे करण्यात आली.

आप्पासाहेबांसोबत रामचंद्र वाघ आणि नागोपंत या दोन मराठा अधिकाऱ्यांची रवानगीदेखील प्रयागकडे करण्यात आली. रेसिडेंटने या दोघांवर फितुरीचे आरोप लावले होते. कॅप्टन ब्राऊनच्या मागोमाग उमाबाईने गंगासिंगला काही लोकांसह भरपूर द्रव्य देवून रवाना केले होते. आप्पासाहेबांना प्रयागलाच पाठविले जात आहे अथवा अन्यत्र कुठे पाठविले जात आहे हे निश्चितपणे कळावे, तसेच आप्पासाहेबांवर कोणतेही संकट ओढवल्यास त्यांना मदत करता यावी, यासाठी हे लोक ब्राऊनच्या लष्करी तुकडीची नजर आपल्यावर पडणार नाही याची सतत खबरदारी बाळगून मार्गात त्यांच्या मागोमाग प्रवास करीत होते.

आप्पासाहेबांनी शिवाजी महाराजांचे अनुसरण करीत दि.१३ मे १८१८ ला

जबलपूरच्या दक्षिणेस रायचूर येथे मुक्काम असतांना रात्री २-३ वाजताच्या सुमारास वेशांतर करुन रहस्यमयरित्या इंग्रजांच्या कैदेतून आपली सुटका करुन घेतली व ते महादेवाच्या डोंगरात निघून गेले. तेथे त्यांनी पचमढी (पचमठी) आणि धवलगिरी (आज त्याला धूपगड म्हणतात.) या दुर्गम ठिकाणी आश्रय घेतले. आप्पासाहेबांसोबत प्रवासात राजाराम नावाचा एक व्यक्ती होता. त्याने पलायनात आप्पासाहेबांना मोलाची मदत केली. इंग्रजांनी त्याला कैद करुन प्रयागच्या किल्ल्यात पाठविले. ब्राऊनला नागपूर येथे बोलावून त्याची कोर्टमार्शल चौकशी करण्यात आली व त्याला शिक्षा देण्यात आली.

इंग्रजांच्या कैदेतून सुटका करुन घेणे हे वाघाच्या जबड्यातून सुटण्याएवढे कठीण काम होते. पण प्रबळ इच्छाशक्ती आणि निष्ठावंत सहकारी या दोन तत्त्वांच्या बळावर आप्पासाहेबांनी वरील अद्‌भुत कार्य केले. आप्पासाहेब आणि त्यांच्या निष्ठावंत सहकाऱ्यांत असलेली स्वातंत्र्य प्राप्तीविषयी प्रबळ इच्छाशक्ती आणि अद्‌भुत पराक्रम गाजविण्याची क्षमता हे १८१८ च्या स्वातंत्र्य लढयाचे एक मौलिक कारण होय.

## ३. स्वातंत्र्ययुद्धासाठी लष्करभरती

मराठा शासनकाळात नागपूर राज्यामध्ये अरब, राजपूत, मुसलमान, गोसावी इ. लढवय्या जातीचे अनेक लोक राहत असत. हे लोक युद्धमोहिमेच्या वेळी शिपाई म्हणून राजाच्या लष्करात भरती होत व मोहिमेवरुन परत आल्यानंतर आपआपल्या घरी जात व आपले इतर व्यवसाय करीत असत. अशी परिस्थिती असल्यामुळे आप्पासाहेबांना स्वातंत्र्य लढ्यासाठी लष्कर उपलब्ध झाले. नागपूरच्या लढाईनंतर इकडे-तिकडे पांगापांग झालेले मराठा सैनिकही आप्पासाहेबांना येवून मिळाले. तसेच बाजीराव पेशव्याचे रिकामे झालेले लोकदेखील त्यांना येवून मिळाले. स्वातंत्र्य लढ्यासाठी त्यांना नागपूरातून गुप्तपणे पैशाचा पुरवठा होत राहिला. त्यामुळे आप्पासाहेबांना इंग्रजांविरुद्ध स्वातंत्र्य लढा उभारणे शक्य झाले.

आप्पांसाहेबांनी जेव्हा पचमढी येथे राहून स्वातंत्र्य लढ्यासाठी लष्कर भरती करणे सुरु केले, तेव्हा या कामात त्यांना पचमढीचा ठाकूर मोहनसिंग, हरईचा राजा चैनशहा व इतर गोंड राजांनी भरपूर मदत केली. मध्यभारतात चित्तु अथवा छट्टू पेंढारी हा लढाईसाठी फार प्रसिद्ध होता. त्याचे प्रमुख ठाणे माळव्यात होते. तो देखील आप्पासाहेबांना स्वातंत्र्य लढ्यात मदत करण्यासाठी लष्करासह त्यांना येऊन मिळाला. याशिवाय महादेवाच्या डोंगराबाहेर अनेक ठिकाणी वेगवेगळ्या

लोकांनी आप्पासाहेबांसाठी सैन्य भरती केली. शिवणी, बालाघाट व भंडारा (Seoni, Balaghat and Bhandara) या भागात कामठ्याचे जमीनदार चिमणा बहादूर यांनी, सागरकडील भागात रावजी नारायण यांनी, जबलपूर कडील भागात नारोपंत व बाबूपंत यांनी आणि मुलताई कडील भागात तेथील पाटील, देशमुख व देशपांडे यांनी स्वातंत्र्यलढ्यासाठी लष्कर भरती करुन आप्पासाहेबांना मोलाची मदत केली. आप्पासाहेबांनी या सर्व निष्ठावंत लोकांच्या सहकार्याने इंग्रजांविरुद्ध स्वातंत्र्य लढा उभारला.

उपरोक्त सर्व व्यक्तींना आप्पासाहेबांचे सहकारी वा त्यांचे मदतगार असे संबोधून स्वातंत्र्य लढ्यातील त्यांचे योगदान निर्देशित करणे म्हणजे या लढ्यातील त्यांचे मोल कमी लेखण्यासारखे आहे. स्वातंत्र्य लढ्याच्या वेळी ते आप्पासाहेबांचे मदतगार तर होतेच पण याशिवाय ते या लढ्याचे कर्णधारही होते. स्वातंत्र्य लढ्याची मुख्य धुरा जरी आप्पासाहेब व चिमणा बहादूर यांच्या हाती असली तरी वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या लढायात वरील व्यक्तींनी नेतृत्व केले, पराक्रम गाजविले व स्वयंप्रज्ञेने स्वतंत्र निर्णय देखील घेतले. म्हणून हा लढा व्यापक बनला.

## ४. स्वातंत्र्य युद्धातील प्रमुख घटना

आप्पासाहेबांनी इंग्रजांच्या कैदेतून दि. १३ मे १८१८ ला आपली रहस्यमय सुटका करुन घेतल्यानंतर त्यांनी महादेवाच्या डोंगरी भागात आश्रय घेतला. यानंतर गुप्त यंत्रणा, स्वातंत्र्य लढ्याची रणनीती ठरविणे व सैन्य भरती करणे इ. कामात मे आणि जून या दोन महिन्यांचा कालावधी निघून गेला. या काळात आप्पासाहेब, चिमणा बहादूर, ठाकूर मोहनसिंग, हरईचा राजा चैनशहा इ. व्यक्ती परस्पर संपर्कात राहून त्यांनी जनमानसात स्वातंत्र्याची ज्वाला प्रज्वलित करुन मोठ्या संख्येत आदिवासी, वनवासी व अन्य स्थानिक लोकांना इंग्रजांविरुद्ध संघटित केले. जुलै १८१८ मध्ये स्वातंत्र्य लढ्याला प्रत्यक्षपणे सुरुवात झाली. या स्वातंत्र्य लढ्यातील प्रमुख घटना खालीलप्रमाणे आहेत–

### ४.१ कर्नल स्पार्कवर विजय

कर्नल स्पार्क या इंग्रज अधिकाऱ्याने बैतुलकडील भागात जुलै १८१८ मध्ये शंभर सैन्यासह आप्पासाहेबांच्या एका जमावावर अकस्मात हल्ला केला. त्यामुळे इंग्रजांविरुद्ध युद्धाची ठिणगी पडली व स्वातंत्र्य युद्धाला सुरुवात झाली. कर्नल स्पार्कला आप्पासाहेबांच्या लोकांच्या जमावाची खरी कल्पना आली नव्हती.

त्याला तो जमाव लहान असेल असे वाटले. परंतु तो जमाव ३ हजार लोकांचा होता. त्यामुळे या लढ्यात कर्नल स्पार्कसह सर्व इंग्रज सैन्य कापले गेले. ही घटना दि. २१ जुलै १८१८ ला घडून आली. त्यामुळे आप्पासाहेबांच्या लोकांची हिम्मत व उत्साह वाढला.

## ४.२ इंग्रजविरोधी लाट

आप्पासाहेबांच्या लोकांनी शिवणीच्या सभोवतालचे गोंड, अरब आणि अन्य स्थानिक लोक मिळून १५ हजार लोकांचा जमाव स्वातंत्र्य लढ्यासाठी तयार केला. हरईचे राज्य कामठा जमीनदारीच्या पश्चिमोत्तर दिशेत असून हरई आणि कामठ्याच्या मध्यभागी शिवणी असल्यामुळे या भागातील गोंड जमातीवर ज्याप्रमाणे कामठ्याचे जमीनदार चिमणा बहादूर यांचा प्रभाव होता त्याचप्रमाणे त्यांच्यावर हरईचे राजा चैनशहा याचाही चांगला प्रभाव होता. त्यामुळे या जमातीला इंग्रजांविरुद्ध संघटित करण्यात आप्पासाहेबांच्या या दोन्ही कर्णधारांचे महत्त्वपूर्ण योगदान होते. याचवेळी आप्पासाहेबांच्या अन्य लोकांनी मेळघाटच्या आदिवासी वनवासी लोकांनाही इंग्रजांविरुद्ध संघटित केले. त्यामुळे इंग्रजविरोधी लाट संपूर्ण नागपूर राज्यात पसरली. उत्तरेतील सागर-दमोहपासून दक्षिणेतील मेळघाटपर्यंतचा संपूर्ण प्रदेश या लाटेने आपल्या कवेत घेतले.

यावेळी मेळघाट, भैसदेही, आमनेर, सातनेर व आमला वगैरे प्रांत आप्पासाहेबांच्या ताब्यात आले. त्याचप्रमाणे ऑगष्ट १८१८ च्या सुमारास मुलताई व आसपासचा भाग देखील आप्पासाहेबांच्या लोकांनी आपल्या ताब्यात घेतला. त्यामुळे यावेळी नागपूर व नर्मदा प्रांतात इंग्रजी सत्ता डळमळू लागली. पण लवकरच बैतूल, हुशंगाबाद व जालन्याहून स्वातंत्र्य लढ्याचा बीमोड करण्यासाठी इंग्रजी सैन्य आले. एलिचपूरहून नवाबाचे सैन्य देखील इंग्रजांच्या मदतीसाठी चालून आले. त्यामुळे महादेवाच्या डोंगरी भागात इंग्रजांचा जम बसला.

## ४.३ वैनगंगेचा पाणी खवळला!

चिमणा बहादूर हे कामठ्याचे जमीनदार असून उत्तरेतील शिवणी-छपाऱ्या पासून दक्षिणेतील प्रतापगडपर्यंत आणि पश्चिमेकडील वैनगंगा नदीपासून पूर्वेकडील लांजीपर्यंतचे सर्व जमीनदार त्यांना आपला प्रमुख मानत असत. त्यामुळे स्वातंत्र्य लढ्याच्या प्रसंगी असलेल्या आप्पासाहेबांच्या सर्व सहकाऱ्यांत चिमणा बहादूर हे साधन-संपत्ती, सामर्थ्य व प्रभावाच्या दृष्टीने सर्वात प्रबळ सहकारी गणले जात. स्वातंत्र्य लढ्यात चिमणा बहादूर यांनी आप्पासाहेबांच्या तोलामोलाचे योगदान दिले.

आप्पासाहेबांनी पचमढीत राहून स्वातंत्र्यलढ्यासाठी लष्करभरती सुरु करताच चिमणा बहादूरचा अश्व संपूर्ण वैनगंगा प्रांतात बेफाम धावू लागला. चिमणा बहादूर यांनी आपल्या अधिकारक्षेत्राखालील व प्रभावक्षेत्राखालील संपूर्ण प्रदेश आपल्या घोड्याच्या टापांखाली तुडविला आणि येथील सर्व जमीनदारांना व किल्लेदारांना संघटित केले. कामठा, हट्टा, अंबागड, रामपायली, चांदपूर, सानगडी, प्रतापगड, पवनी, लांजी इ. सर्व क्षेत्रात त्यांनी स्वातंत्र्याची ज्वाला भडकविली व जागोजागी लष्करभरती सुरु केली. यावेळी वैनगंगा प्रांतात असलेले राजपूत, मुसलमान, गोसावी, अरब इ. विविध जातींचे व धर्माचे लढवय्ये लोक लष्करात भरती झाले. नागपूरच्या युद्धानंतर पांगापांग झालेले व बाजीराव पेशव्यांचे रिकामे झालेले सैनिकही त्यांना येवून मिळाले. यापैकी पर्याप्त सैनिक त्यांनी आपल्या प्रभावक्षेत्राखालील वेगवेगळ्या किल्ल्यांच्या ठिकाणी तैनात केले व बाकीचे सैनिक आप्पासाहेबांच्या मदतीसाठी पाठविले. यामुळे संपूर्ण वैनगंगा प्रांतात स्फोटक परिस्थिती निर्माण झाली.

### ४.४ चिमणा बहादूरचे वराडवर आक्रमण

कामठा जमीनदारीला लागून पश्चिमेस वराडची जमीनदारी होती. नर्मद पाटील हे तेथील जमीनदार होते. त्यांची राजकीय निष्ठा दुभंगलेली होती व ते स्वातंत्र्य लढ्याला अनुकूल नव्हते. म्हणून त्यांना धडा शिकवावा व या जमीनदारीवर आपले अधिपत्य प्रस्थापित करावे, असे चिमणा बहादूर यांना वाटू लागले. अत: स्वातंत्र्य लढ्याच्या अगदी सुरुवातीलाच त्यांनी वराडवर आक्रमण केले. चिमणा बहादूरचे आक्रमण एवढे जबरदस्त होते की, नर्मद पाटील हे घाबरुन इंग्रजांच्या मदतीसाठी नागपूरला पळून गेले. यावेळी रेसिडेंट जेन्किन्सचा असा गैरसमज झाला की, चिमणा बहादूरने बळजबरीने पैसा वसूल करण्यासाठी नर्मद पाटीलवर आक्रमण केले असावे. तसेच त्यावेळी त्याचे संपूर्ण लक्ष पचमढीकडे वेधले गेले होते. त्यामुळे त्याने लगेच या घटनेकडे लक्ष पुरविले नाही. काही महिन्यानंतर ऑगष्टमध्ये चिमणा बहादूर यांनी वराडवर पुन्हा आक्रमण केले. यावेळी चिमणा बहादूर यांनी एकीकडे नर्मद पाटीलचे भाऊ सुकूल पाटील यांना व दुसरीकडे लांजी येथे इंग्रजांच्या वतीने कार्यरत असलेल्या मराठा कमाविसदाराला बंदी बनवून व लांजीच्या किल्ल्यावर पुन्हा मराठ्यांची पताका फडकवून इंग्रजांविरुद्ध स्वातंत्र्य लढ्याचा शंखनाद केला. तेव्हा रेसिडेंट जेन्किन्सचे डोळे उघडले, आणि त्याने नागपूरहून तातडीने लांजी व कामठ्याकडे आपले लष्कर रवाना केले. अत: इंग्रजांविरुद्ध चिमणा बहादूरचे युद्ध घडून येणे अटळ झाले.

## ५. रक्तपाताला पुनः प्रारंभ

आप्पासाहेबांनी पश्चिमेकडील महादेवाचे डोंगर आणि पूर्वेकडील लांजी–कामठा असे स्वातंत्र्य लढयाचे दोन प्रमुख केंद्र निर्धारित केले होते. यापैकी महादेवाच्या डोंगरी भागाकडील स्वातंत्र्य लढा हा चिमणा बहादूर यांच्या नेतृत्वाखाली लढला गेला. या दोन्ही भागाकडे स्वातंत्र्य लढ्याची तयारी एकाच वेळी प्रारंभ झाली. पण, आप्पासाहेब हे पचमढीकडील दुर्गम भागात असल्यामुळे त्यांना पकडण्यासाठी इंग्रजांनी आपले संपूर्ण लष्कर त्या भागाकडे जमा करणे सुरु केले. परिणामस्वरुप बैतुलकडील भागात युद्धाची पहिली ठिणगी पडली व स्वातंत्र्य लढ्याचा वणवा व्यापक प्रदेशात पसरला. जुलै व ऑगष्ट १८१८ मध्ये सागर–दमोह पासून मेळघाटपर्यंत स्वातंत्र्य लढा जोमात सुरु होता. त्या भागाकडील परिस्थिती आटोक्यात येताच इंग्रजांनी आपला दुसरा युद्धमोर्चा वैनगंगा प्रांताकडे वळविला. इंग्रजांनी या प्रदेशातील स्थानिक लोकांचा विरोध दडपून काढण्यासाठी लष्करी बळाचा वापर सुरु करताच या भागातही रक्तपाताला प्रारंभ झाला. या प्रदेशातील स्वातंत्र्य लढा हा चिमणा बहादूरच्या नेतृत्वाखाली लढला गेला. इंग्रज विरुद्ध चिमणा बहादूर यांच्यात घडून आलेल्या लष्करी संघर्षाची सविस्तर माहिती, यापुढील प्रकरणात सलगपणे दिलेली आहे.

# १०. स्वातंत्र्ययुद्धात चिमणा बहादूरची भूमिका

## १. युद्धाची दुसरी आघाडी

**इ.**स.१८१८ मध्ये महादेवाच्या डोंगराळ प्रदेशाचा आश्रय घेवून आप्पासाहेबांनी प्रारंभ केलेले स्वातंत्र्य युद्ध जुलै व ऑगष्ट या महिन्यात जोमात सुरु होते. त्यामुळे नागपूर राज्यात इंग्रजी सत्ता डळमळू लागली. हे स्वातंत्र्य युद्ध दडपून काढण्यासाठी इंग्रजांनी आपले संपूर्ण लष्करी सामर्थ्य पचमढीकडील भागात केंद्रित केले. अत: इंग्रजांचे लक्ष व त्यांचे लष्करी सामर्थ्य विकेंद्रित करुन त्यांना शह देता यावा, यासाठी पूर्वेकडील लांजीला केंद्र बनवून स्वातंत्र्य लढ्याचा दुसरा मोर्चा प्रारंभ करण्याचा निर्णय आप्पासाहेबांनी घेतला (The insurrection in the Lanji and neighbouring Districts, to the eastward of Nagpur, was only inferior in consequence to that in the Mahadev hills, from the latter being the position chosen by Appasaheb himself for his rallying point )[1]

## २. चिमणा बहादूरचे नेतृत्व

कामठ्याचे जमीनदार राजे चिमणा बहादूर हे आप्पासाहेबांचे सर्वात प्रबळ सहकारी होते. लांजीकडील डोंगराळ प्रदेश चिमणा बहादूर यांना सुपरिचित होता. या भागातील सर्वात प्रभावी शासक चिमणा बहादूर हे होते. त्यांची आप्पासाहेबांवर अतूट निष्ठा होती. मायभूमीच्या स्वातंत्र्याविषयी त्यांच्या अंत:करणात तळमळ होती व ते इंग्रजांचे कट्टर वैरी होते. ही सर्व पार्श्वभूमी लक्षात घेवून लांजीला केंद्र बनवून स्वातंत्र्य लढ्याची दुसरी आघाडी सुरु करण्याची जवाबदारी आप्पासाहेब भोसले यांनी चिमणा बहादूर यांच्याकडे सोपविली. (In respect of resources and influence, Chimna Patel, who was at the head of this insurrection, was of superior consequence to any of Appasaheb's partisans)[2]

## ३. दुसऱ्या आघाडीकडील प्रमुख घटना

स्वातंत्र्य लढ्याची दुसरी आघाडी चिमणा बहादूरच्या नेतृत्वाखाली उघडण्यात आली. या आघाडीने ऑगष्ट १८१८ मध्ये इंग्रजांविरुद्ध स्वातंत्र्य लढ्याचे रणशिंग फुंकले. दुसऱ्या आघाडीकडील प्रमुख युद्धविषयक घडामोडी खालीलप्रमाणे आहेत-

1. Memoir of the Maratha War of 1817-1819, Colonel Valentine Blacker
2. Despatch No.38 of 10th Janurary 1819, Resident Jenkins.

### ३.१ लांजी गदर (Lanji Revolt)

चिमणा बहादूर यांनी दूरदृष्टी ठेवून व आप्पासाहेब भोसले यांच्या रणनीतीला अनुसरुन उत्तरेकडील शिवणी-छपाऱ्यापासून दक्षिणेकडील प्रतापगडपर्यंत स्वातंत्र्य लढ्याची पूर्वतयारी इ.स. १८१८ च्या मे आणि जून या दोन महिन्याच्या कालावधीत पूर्ण केलेली होती. याच काळात त्यांनी महादेवाच्या डोंगरात आश्रय घेवून असलेल्या आप्पासाहेबांना लष्करी व आर्थिक मदत पाठवून स्वातंत्र्य लढा उभारण्याच्या कार्यात मोलाची मदत केली. वराडचे जमीनदार नर्मद पाटील (The Zamindar of Warad) हे स्वातंत्र्य लढ्याला अनुकूल नसल्यामुळे चिमणा बहादूर यांनी सुरुवातीलाच त्यांच्या जमीनदारीवर आक्रमण केले होते. परिणामस्वरुप नर्मद पाटील हे इंग्रजांच्या मदतीसाठी नागपूरला पळून गेले.

वराडचे जमीनदार इंग्रजांच्या आश्रयास गेल्यामुळे चिमणा बहादूर यांनी ऑगष्ट १८१८ मध्ये या जमीनदारीवर दुसऱ्यांदा आक्रमण करुन व नर्मद पाटीलचे भाऊ सुकूल पाटील यांना बंधक बनवून इंग्रजांना युद्धासाठी चिथावणी दिली. याचवेळी चिमणा बहादूर यांनी इंग्रजांच्या विस्तारवादाविरुद्ध संपूर्ण लांजी क्षेत्रात जनतेचा जोरदार स्वातंत्र्य लढा घडवून आणला. इंग्रजांच्या वतीने लांजी येथे नवनियुक्त झालेला मराठा कमाविसदार हा आपल्या पथकासह लांजी क्षेत्रातील दौऱ्यावर होता. चिमणा बहादूरने त्याच्या पथकावर आक्रमण करुन त्याला बंदी बनविले. आक्रमणाच्यावेळी कमाविसदाराचे काही सहकारी मारले गेले व काही पळून गेले. (The disturbances commenced by an attack on the Kamavishdar of Lanji and a party of Sebandis (Sepoys), with which he was making a tour of the district. His person was seized and his party either destroyed or dispersed.)[1]

चिमणा बहादूर हे फक्त कमाविसदाराला कैद करुन थांबले नाहीत तर त्यांनी लांजीच्या किल्ल्यावर आक्रमण करुन तो किल्ला इंग्रजांच्या हातातून हिसकावून घेतला व सभोवतालचा संपूर्ण प्रदेश पुन्हा आपल्या ताब्यात घेतला. लांजी हे वर्तमान मध्यप्रदेशात असून लांजीचा परिसर हिंदी भाषिक असल्यामुळे परिसरातील लोक या घटनेला 'लांजी गदर' (Lanji Revolt) या नावाने जाणतात.

### ३.२ कॅप्टन गॉर्डनची नागपूरहून रवानगी

चिमणा बहादूरच्या नेतृत्वाखाली लांजीचा स्वातंत्र लढा, ऑगष्ट १८१८ च्या अंतिम आठवड्यात घडून आला. लांजी येथील लढ्याची माहिती नागपूर

---

1. पूर्वोक्त, Resident Jenkins

येथे रेसिडेंट जेन्किन्सच्या कानी पडताच त्याला या घटनेविषयीं फार आश्चर्य वाटले. कारण नागपूर मधील अनेक प्रतिष्ठित व्यक्तींकडून ऐकलेल्या माहितीच्या आधारे चिमणा बहादूर हा आज्ञाधारक, शांत स्वभावाचा आणि विवेकशील शासक आहे, असा त्याचा समज दृढ झालेला होता. (This general character for prudence and quiet demeanour, his continued professions of obedience, the general tranquillity of the districts and the good opinion of him entertained by Narayan Pandit, and the other respectable people in Nagpur.)[1] परंतु लांजी येथे घडून आलेल्या उठावाची माहिती ऐकताच, आपण आजपर्यंत चिमणा बहादूरसंबंधी जे काही ऐकले आहे ते सफसेल चुकीचे आहे असे त्याने गृहीत धरले. अत: त्याने चिमणा बहादूरचा बीमोड करण्यासाठी कॅप्टन विलियम गॉर्डनला, त्याच्या नेतृत्वाखाली एक जमादार पथक आणि नागपूर ब्रिगेडच्या तीनशे मराठा सैनिकांसह एकूण आठशे सैनिक देवून तातडीने रवाना केले.

### ३.३ वैनगंगेकाठचा संघर्ष

कॅप्टन गॉर्डन हा ज्यावेळी नागपूरहून लष्करासह रवाना झाला ती वेळ भर पावसाळ्याची होती. मुसळधार पावसामुळे सर्व नद्या-नाल्यांना पूर आलेले होते व नद्यांकाठी सर्वत्र दलदल पसरलेली होती. नागपूरहून कामठ्याकडे येतांना मार्गात कन्हान व वैनगंगा या दोन मोठ्या नद्या पडतात. नदी पार करण्यासाठी त्या काळात देखील बोटींचा वापर केला जात असे. चिमणा बहादूर यांना इंग्रजांच्या लष्करी कार्यवाहीची पुरेपूर कल्पना होती. म्हणून त्यांच्या सूचनेनुसार वैनगंगा नदीच्या घाटावर इंग्रजांना रोखण्यासाठी स्थानिक लोक मोठ्या संख्येत जमले होते. वैनगंगेच्या घाटावरील सर्व नौका चिमणा बहादूरच्या लोकांनी पकडून ठेवल्या होत्या. कॅप्टन गॉर्डन हा वैनगंगेच्या घाटावर येताच त्याला येथील समस्येचे स्वरुप लक्षात आले. कोणत्याही समस्येला घाबरुन स्वस्थ बसायचे हे इंग्रजांच्या स्वभावातच नाही. त्यामुळे त्याने कन्हान नदीच्या घाटावरील नौका येथे बोलविल्या व या नौकांच्या साहाय्याने त्याच्या लष्कराने वैनगंगा नदी पार केली. नदी पार करतांना त्याच्या लष्कराने बेछूट गोळीबार सुरु ठेवून दहशत निर्माण करण्याचा पुरेपूर प्रयत्न केला.

कॅप्टन गॉर्डनने वैनगंगा नदी ओलांडताच इंग्रज विरुद्ध स्थानिक जनसमुदाय यांच्यात संघर्ष घडून येण्याची स्थिती निर्माण झालेली होती. पण इंग्रजांच्या प्रचंड

---

**1**. पूर्वोक्त, Resident Jenkins

लष्करासमोर आपला टिकाव लागणार नाही, ही बाब लक्षात घेवून स्थानिक लोकांनी समजूतदारपणे माघार घेतली व संघर्ष टळला. स्थानिक लोकांच्या जमावाने इंग्रजांच्या लष्करासमोर हार मानणे हे स्वाभाविक होते. पण, चिमणा बहादूरच्या एका इशाराने इंग्रजांच्या विरोधात स्थानिक लोकांचा प्रचंड जनसमुदाय एकत्र जमणे, ही बाब या ठिकाणी विशेष लक्षणीय आहे. यातून चिमणा बहादूरची त्यांच्या हयातीत असलेली लोकप्रियता व परकियांच्या वाढत्या वर्चस्वाविरुद्ध स्थानिक भारतीय लोकांत व्याप्त असलेला आक्रोश या दोन बाबी अधोरिखित होतात.

**३.४ नवरगावचे युध्द**

कॅप्टन गॉर्डन हा कामठा व लांजीवर अधिपत्य प्रस्थापित करण्यासाठी नागपूरहून निघाला त्यावेळी पावसाळ्याचे दिवस, नद्यांना पूर आणि जागोजागी दलदल असल्यामुळे त्याच्या प्रवासाची गती मंद होती. नैसर्गिक बाधा, लोकांचा आक्रोश व असहकार इ. बाबींचा धैर्याने सामना करीत-करीत शेवटी कॅप्टन गॉर्डन हा सप्टेंबर १८१८ च्या दुसऱ्या आठवड्यात आपल्या लष्करासह नवरगावच्या नाल्यावर येऊन पोहचला नवरगाव व त्याच्या पलीकडील कामठ्याच्या मध्यभागी एक खोल ओढा असून स्थानिक लोक त्याला 'नवरगावचा नाला' असे संबोधतात. या ठिकाणी इंग्रज विरुद्ध चिमणा बहादूर यांच्यात जे युद्ध घडून आले ते नवरगावचे युद्ध या नावाने प्रसिद्ध आहे. नवरगावच्या नाल्यावर कॅप्टन गॉर्डन हा पोहचला त्यावेळी या नाल्याला पूर आलेला होता, आणि इंग्रजांच्या लष्कराला रोखण्यासाठी चिमणा बहादूर हे मराठा, मुसलमान, राजपूत व गोसावी मिळून एकूण चारशे सैनिकांसह तिथे दबा धरुन बसले होते. परिस्थिती लक्षात येताच कॅप्टन गॉर्डनने पंचवीस नियमित सैनिकांवर खजिना व साधनसामग्रीचे संरक्षण करण्याची जबाबदारी सोपविली, आणि तो उरलेल्या सुमारे आठशे सैनिकांसह शत्रुपक्षाशी लढण्यासाठी सिद्ध झाला. क्षणार्धात त्या ठिकाणी एका काठावर कॅप्टन गॉर्डनचे आठशे सैनिक व दुसऱ्या काठावर चिमणा बहादूरच्या नेतृत्वाखालील चारशे सैनिक असे दृश्य दिसू लागले.

परस्परविरोधी पक्षाचे लष्कर अमोरासमोर उभे ठाकताच प्रत्येक पक्षाने दुसऱ्या पक्षावर बेछूट गोळीबार सुरु केला. हा गोळीबार सतत १५ मिनिटेपर्यंत सुरु होता. इंग्रजांचे लष्कर जास्त असल्यामुळे व त्यांच्याजवळ दूरपर्यंत मारा करु शकतील अशा बंदुका असल्यामुळे शेवटी चिमणा बहादूरला या लढ्यात माघार घ्यावी लागली. ''या लढाईत चिमणा बहादूरचे शंभर सैनिक मारले गेले व काही

कैद करण्यात आले. इंग्रजांचे फक्त चार सैनिक मारले गेले.''[1] अशाप्रकारे १५ सप्टेंबरच्या सुमारास कॅप्टन गॉर्डनने आपल्या लष्करासह नवरगावचा नाला ओलांडला.

इंग्रजांच्या लष्करापेक्षा स्वत:जवळ निम्मे सैनिक असूनही त्यांच्याशी युद्ध करण्याचे साहस चिमणा बहादूर यांनी का केले, याचा उलगडा होण्यासाठी दोन बाबीं लक्षात घेणे आवश्यक आहे. प्रथम, लष्करी सामर्थ्याच्या दृष्टीने प्रबळ असलेल्या शत्रुवर अल्प सामर्थ्यानिशी मात करण्यासाठी शिवाजी महाराजांच्या काळापासून मराठ्यांनी गनिमी काव्याची पद्धती अंगीकारिली होती. १८१८ च्या स्वातंत्र्य लढ्यातदेखील आप्पासाहेब व चिमणा बहादूर यांनी याच युद्धशैलीचा वापर केला. पण, नवरगावच्या लढ्यात झालेला चिमणा बहादूर यांचा पराभव व त्यांना सोसावी लागणारी प्रचंड प्राणहानी लक्षात घेता एक बाब ठळकपणे स्पष्ट होते की, मोगलांच्या विरोधात ज्याप्रमाणे गनिमी काव्याची युद्धपद्धती प्रभावी ठरली ती इंग्रजांच्या विरोधात यशस्वी ठरली नाही. गनिमी काव्याच्या युद्धासाठी उपयुक्त अशी भौगोलिक परिस्थिती नवरगावच्या नाल्याभोवती अस्तित्वात होती. पण इंग्रजांजवळ दूरपर्यंत मारा करु शकतील अशा बंदुका असल्यामुळे परिणाम मात्र विपरीत घडून आला. द्वितीय, आदर्शांनी प्रेरित असलेला लढा हा लाभ-हानी अथवा विजय-पराजय या गणितावर आधारित नसतो. अशाप्रकारचा लढा हा तत्त्वांसाठी असतो. चिमणा बहादूरने सुरु केलेला लढा हा गुलामगिरीविरुद्ध असल्यामुळे याच श्रेणीत मोडणारा लढा होता. या विश्लेषणातून ध्येयवाद आणि व्यवहारवाद या दोन्ही बाबींचे बेमालूम मिश्रण चिमणा बहादूर यांच्या व्यक्तिमत्त्वात होते, याची सहज प्रचिती घडून येते.

### ३.५ झिलमिलीची लढाई

कामठ्याच्या दक्षिणेत नवरगाव असून या दोन्ही गावांच्या मधे पूर्ववाहिनी पांगोली नदी आहे. कामठ्याच्या उत्तरेत झिलमिली हे गाव असून या गावाच्या पश्चिमेकडील भागात एक मोठा तलाव आहे. या तलावाला झिलमिली तलाव या नावाने संबोधतात.

नवरगावच्या लढाईत चिमणा बहादूरला पराभूत केल्यानंतर इंग्रजांनी सरळ कामठ्यावर आक्रमण न करता ते थेट झिलमिली जलाशयावर पोहचले. विसावा आणि भोजनपाण्याच्या व्यवस्थेसाठी कॅप्टन गॉर्डनने आपल्या लष्करासह येथे

---

1. पूर्वोक्त, Colonel Valentine Blacker

तळ ठोकला, आणि समग्र परिस्थतीचे आकलन करुन कामठ्यावर आक्रमण करण्याची योजना आखू लागला. या कार्यात त्याला नर्मद पाटील, आनंदराव इ. स्थानिक लोकांनी मोलाची मदत केली.

चिमणा बहादूर यांनी युद्धाचे संकट जवळ पोहचले आहे आणि लवकरच हे संकट संपूर्ण कामठ्यावर तुटून पडणार आहे, ही बाब लक्षात घेतली. अशा परिस्थितीत कामठ्यातच हातावर हात ठेवून संकटाची वाट पाहत बसणे योग्य नाही, असे वाटल्यामुळे त्यांनी झिलमिली तलावावर मुक्काम करुन असलेल्या इंग्रजी सैन्यावर जोरदार आक्रमण केले. हे युद्ध निरंतर तीन दिवस (१५ ते १८ सप्टेंबरच्या दरम्यान) चालले. अंतत: चिमणा बहादूरचा पक्ष कमजोर पडू लागला. त्यामुळे त्यांनी माघार घेत-घेत कामठ्याच्या किल्ल्याचा आश्रय घेतला. येथे त्यांनी इंग्रजांविरुद्ध युद्ध लढण्यासाठी नव्या जोमाने तयारी सुरु केली. चिमणा बहादूरची ही तयारी सुरु असतांनाच इंग्रजांच्या लष्कराने संपूर्ण कामठा नगरीची चौफेर नाकेबंदी (Blocked) केली.

झिलमिलीच्या लढाईचा कागदोपत्री कोणताही पुरावा उपलब्ध नाही. पण पिढी-दर-पिढी काही घटनांची माहिती पुढे-पुढे संक्रमित होत असते यानुसार या परिसरातील लोक चिमणा बहादूरविषयी बोलतांना झिलमिलीच्या लढाईचा आवर्जून उल्लेख करतात. म्हणून या लढाईचा वा सत्य घटनेचा या ग्रंथात समावेश केलेला आहे.

### ३.६ कामठ्याचा रणसंग्राम

कामठा नगरी ही परगणा कामठ्याची राजधानी असल्यामुळे या नगरीच्या संरक्षणासाठी पुरेपूर व्यवस्था केलेली होती. अन्य मराठाकालीन नगराप्रमाणे कामठ्यातही एक किल्ला आहे. हा किल्ला पूर्वमुखी असून त्यात एक राजवाडा होता. चिमणा बहादूरचे वास्तव्य या राजवाड्यातच होते. किल्ल्याच्या पूर्वेकडील भागात लागोपाठ दोन भव्य, मजबूत व कलाकुसरीच्या कामाने सुशोभित असे लाकडी प्रवेशद्वार होते. शेष किल्ल्याच्या सभोवताली खोल खंदक (Ditch) होते. खंदकाच्या उत्तरेकडील भागात मानव वस्ती आणि एक शिव मंदीर आहे. किल्ल्याच्या बाहेर असलेल्या गाव अथवा नगराला त्या काळात पेटा (Petlah) असे म्हणत. पेट्याच्या सभोवताली विहीरी आणि सुरक्षेसाठी खोल खंदक होते.

झिलमिलीच्या लढाईत विजयाचे स्वप्न भंगल्यामुळे चिमणा बहादूरने माघार घेत कामठ्याचा किल्ला गाठला. त्यांचा पाठलाग करीत शत्रुचे सैन्य कामठा नगरीच्या सभोवताली असलेल्या खंदकापर्यंत पोहचले. अत: चिमणा बहादूरने

तातडीने मोर्चेबांधणी सुरु केली. आपले अनेक सैनिक नगराच्या सभोवताली असलेल्या खंदकाजवळ तैनात केले आणि सुरक्षेचा विचार करुन नगरातील बहुतेक लोकांना किल्ल्यात आश्रय दिला.

कॅप्टन गॉर्डनने पंधरा सप्टेंबरच्या सुमारास नवरगावचा ओढा पार केलेला होता. याच सुमारास नागपूरहून लेफ्टिनंट थ्यूलरच्या नेतृत्वाखाली पाठविण्यात आलेली लष्करी मदत कॅप्टन गॉर्डनला प्राप्त झाली. यानंतर तब्बल तीन दिवस झिलमिलीचे युद्ध सुरु होते. ही रणधुमाळी सुरु होताच चिमणा बहादूरच्या लोकांनी अंबागड, चांदपूर, रामपायली व सानगडी या ठिकाणी मोर्चेबांधणी सुरु केली. नागपूरला ही बातमी पोहचताच दि. १७ सप्टेंबरला मेजर विल्सनच्या नेतृत्वाखाली एक विशाल सैन्य कॅप्टन गॉर्डनच्या मदतीसाठी रवाना करण्यात आले. या लष्कराची वाट न पाहता कॅप्टन गॉर्डनने दि. १८ सप्टेंबरच्या पहाटे कामठ्याच्या सभोवताली असलेल्या खंदकाबाहेर नगरावर आक्रमणाची तयारी केली.

कामठ्यावर आक्रमण करण्यास कॅप्टन गॉर्डनने दक्षिणाभिमुख असलेल्या आपल्या लष्कराची तीन भागात विभागणी केली. डावीकडील चमूचे नेतृत्व लेफ्टिनंट थ्यूलरवर सोपविण्यात आले. यात नागपूर ब्रिगेडचे २०० आणि मद्रास स्थानिक पायदळाचे १६० असे एकूण ३६० सैनिक समाविष्ट करण्यात आले. या चमूच्या प्रत्येक दुसऱ्या सैनिकाजवळ एक-एक बंदूक देण्यात आली. केंद्रीय चमूत नागपूर ब्रिगेडच्या अन्य सैनिकांचा समावेश करुन या चमूकडे एक तोफ देण्यात आली. उजवीकडील चमूचे नेतृत्व आनंदराव या स्थानिक सरदाराकडे सोपविण्यात आले. एवढी जबरदस्त तयारी करुन कॅप्टन गॉर्डनने कामठ्यात प्रवेश करण्यासाठी खंदक पार करण्याची कार्यवाही सुरु केली. खंदकामध्ये पावसाचे पाणी तुडूंब भरलेले होते, त्यांत भयंकर घसरण होती व खंदकाचे कडे देखील उंच होते. याशिवाय चिमणा बहादूरच्या पक्षाने त्यांच्याकडे असलेल्या एका तोफेने इंग्रजांच्या केंद्रीय तुकडीवर व दुसऱ्या तोफेने त्यांच्या उजवीकडील तुकडीवर जोरदार मारा सुरु केला. त्यामुळे खंदक पार करुन शत्रुने कामठ्यात प्रवेश करणे हे फार अवघड कार्य होते. डावीकडील चमूवर तोफेचा मारा सुरु नसल्यामुळे खंदक पार करण्यात अगोदर ती यशस्वी झाली व नंतर इंग्रजांच्या लष्कराने सहजतेने खंदक पार केले. दुर्दम्य इच्छाशक्ती, इमानदारी व कर्तव्यनिष्ठा यांच्या बळावर जगात कोणतेही कार्य अशक्य नाही हे इंग्रजांच्या लष्कराने एकदा पुन्हा सिद्ध केले.

कामठ्यात प्रवेश करताच कॅप्टन गॉर्डनने आपल्या लष्कराची फक्त दोन गटात विभागणी केली. यापैकी एक तुकडी तेथील शिवमंदिरासमोरील मैदानावर येताच चिमणा बहादूर यांनी तिच्यावर जोरदार आक्रमण केले. परिणामस्वरुप कॅप्टन गॉर्डन विरुद्ध चिमणा बहादूर यांच्यात घमासान युद्ध सुरु झाले. एवढ्यात इंग्रजी लष्कराच्या दुसऱ्या तुकडीने किल्ल्यावर ताबा मिळविण्यासाठी झेप घेतली. किल्ल्याकडे होणारी शत्रुची वाटचाल रोखण्यासाठी चिमणा बहादूरच्या दोन्ही तोफचींनी आपआपल्या तोफांचा जोरदार मारा सुरु केला. पण शत्रुचे सैन्य भयंकर नरसंहार करीत दोन्ही तोफखान्यांवर ताबा प्रस्थापित करण्यात व किल्ल्याच्या प्रवेशद्वारासमोर पोहचण्यात यशस्वी झाले. तेथे पोहचताच शत्रू सैन्याने एक तोफ प्रवेशद्वारासमोर आणली. तोफेचा मारा करुन प्रवेशद्वार उघडण्याचा त्यांचा विचार होता. पण ऐनवेळी तोफेत बिघाड झाल्यामुळे त्या ठिकाणी एक बलाढ्य हत्ती आणले गेले. त्या हत्तीने प्रवेशद्वारावर जोरदार आघात करणे सुरु करताच प्रवेशद्वार उघडले. या प्रवेशद्वारासमोरच किल्ल्याच्या आतील भागात दूसरे एक भव्य प्रवेशद्वार होते. या महाद्वारालाही हत्तीच्या साहाय्याने तोडण्याचा प्रयत्न सुरु होताच किल्लेदार व पहारेदार हे स्वत:च्या प्राण रक्षणाची याचना करीत शत्रुला शरण गेले. अशाप्रकारे कामठ्याच्या किल्ल्यावर व त्यातील राजवाड्यावर इंग्रजांचा ताबा प्रस्थापित झाला.

प्रवेशद्वार उघडण्यासाठी ज्यावेळी हत्तीने त्यावर आपल्या मस्तकाचा प्रहार सुरु केला त्यावेळी त्यातून उत्पन्न होणारा भयंकर आवाज शिवमंदिरासमोरील मैदानावर, इंग्रजांशी लढत असलेल्या चिमणा बहादूरपर्यंत सहजपणे पोहचत होता. प्रवेशद्वार उघडताच इंग्रजांच्या लष्कराने केलेल्या जल्लोषाचा आवाजही शिवमंदिरापर्यंत पोहचला. त्यामुळे चिमणा बहादूर व त्यांच्या विरुद्ध लढत असलेल्या लष्कराला इंग्रजांच्या विजयाची पुरपूर कल्पना आली. पण त्यातून उत्पन्न झालेल्या आनंदातिरेकाने, लढत असलेल्या शत्रुपक्षाचे लक्ष विचलित झाले. नेमक्या याच परिस्थितीचा फायदा उठवून, चिमणा बहादूर हे अन्यत्र सुरु असलेल्या स्वातंत्र्य लढ्याच्या प्रयत्नात प्राण फुंकण्यासाठी वायुवेगाने तिकडे निघून गेले. ही बाब जेव्हा कॅप्टन गॉर्डनच्या लक्षात आली तेव्हा किल्ल्यावरील विजयामुळे त्याच्या मनात उत्पन्न झालेल्या आनंदावर विरजन पडले व चिमणा बहादूरला पकडण्याच्या मार्गातील त्याच्या समस्या वाढल्या.

कामठ्याच्या युद्धात चिमणा बहादूरकडील सैनिक संख्या सुमारे दोन हजार होती. इंग्रजांचे लष्करी सामर्थ्य आठशे एवढे होते. दोन्हीकडील लष्करात घोडदळ व पायदळ सैनिकांचा समावेश होता. हे युद्ध तलवार, बंदुका व

तोफांच्या साहाय्याने लढले गेले. या युद्धात ''चिमणा बहादूरच्या पक्षातील सुमारे चारशे लोक मृत्युमुखी पडले. इंग्रजांकडील मृत्युमुखी पडलेल्या व गंभीररित्या जखमी झालेल्या सैनिकांची एकूण संख्या एकषष्ट होती.''[1] यावेळी झालेल्या भीषण नरसंहारामुळे कामठ्याचे सर्व मार्ग रक्तबंबाळ झाले. गल्लोगल्लीत घडलेल्या युद्धात, घायाळ झालेल्या सैनिकांच्या जखमेतून उडालेल्या रक्तामुळे घरांच्या भिंतीवर सर्वत्र लाल डाग पडले व त्या विद्रूप दिसू लागल्या. संपूर्ण कामठा नगरीत दहशतीचे वातावरण पसरले. मृत्युमुखी पडलेल्या माहिला, पुरुष व बालकांसाठी त्यांच्या परिजनांनी केलेले भीषण रुदन, आर्त टाहो आणि करुण किंकाळ्या यामुळे संपूर्ण कामठा नगरीत हाहाकार माजला व परगणा कामठ्याची प्रजा दु:खसागरात लोटल्या गेली. कॅप्टन गॉर्डन, लेफ्टिनंट थ्यूलर व शत्रू सैन्याच्या मुखमंडळावर मात्र विजयोन्मादाने व्याप्त झालेला पाशवी आनंद स्पष्टपणे झळकत होता.

**३.७ अंबागडवर इंग्रजांचा ताबा**

रेसिडेंट जेन्किन्सने चिमणा बहादूरचा उठाव दडपून काढण्यासाठी मेजर विल्सनच्या नेतृत्वाखाली वेगळे सैन्य देवून त्याला नागपूरहून दि.१७ सप्टेंबर १८१८ ला रवाना केले होते. कामठ्यावर कॅप्टन गॉर्डनने विजय संपादित केलेला आहे ही वार्ता मार्गातच त्याच्या कानी पडल्यामुळे तो कामठ्याकडे न जाता सरळ अंबागडचा किल्ला सर करण्यासाठी निघून गेला. अंबागड हे भंडाऱ्याच्या उत्तरेला १८ मैल अंतरावर आहे. नागपूर ते अंबागड हे अंतर तुडविण्यासाठी मेजर विल्सनला सहा दिवसांचा कालावधी लागला. सातव्या दिवशी अर्थात् दिनांक २३ सप्टेंबर १८१८ ला तो लष्करासह अंबागडला जावून पोहचला.

अंबागडच्या रक्षणासाठी चिमणा बहादूरने तेथे पाचशे सैनिक तैनात केलेले होते. पण कामठ्याच्या पराजयाची वार्ता त्यांच्यापर्यंत पोहचल्यामुळे तेथील बहुतेक सैनिकांचे मनोधैर्य खचले होते, स्वातंत्र्य लढ्याबाबतीत त्यांच्या मनातील उत्साह मावळला होता आणि इंग्रजांच्या लष्करी सामर्थ्यांसमोर आपला टिकाव लागणार नाही याची सर्वांना पुरेपूर कल्पना आल्यामुळे मेजर विल्सनच्या लष्कराचा त्यांनी कोणताही प्रतिकार केला नाही. ''त्यांनी शांतपणे किल्ला सोडला व ते समीपस्थ टेकडीच्या दिशेने निघून गेले. मेजर विल्सनने अंबागडवर अधिपत्य प्रस्थापित करुन तो पवनीच्या विरोधात लष्करी कार्यवाही करण्यासाठी निघून गेला.''[2]

---

1. पूर्वोक्त, Colonel Valentine Blacker

2. पूर्वोक्त, Colonel Valentine Blacker

### ३.८ पवनीचा लढा

पवनी हे एक ऐतिहासिक स्थान असून भंडाऱ्याच्या दक्षिणेला आहे. पवनीच्या सभोवताली बहुतेक ठिकाणी सुरक्षाभिंत असून दक्षिण-पश्चिमेस प्रवेशद्वार होते. प्रवेशद्वाराच्या विरुद्ध बाजूला अगदी जीर्णावस्थेत असलेला किल्ला होता. पवनीच्या दक्षिण-पूर्वेस दक्षिणवाहिनी वैनगंगा नदी असून तिच्या एका घाटावर नदी पार करता यावी यासाठी नौका राहत असत. नगराच्या प्रवेशद्वाराजवळून या घाटाकडे जाण्यासाठी एक चांगला मार्ग उपलब्ध होता. या ठिकाणी पोहचण्याचे बाकी सर्व मार्ग दुर्गम होते. पवनी येथे इंग्रजांविरुद्ध झालेल्या स्वातंत्र्य लढ्याचे स्वरुप लक्षात घेण्यासाठी ही नगररचना ध्यानात ठेवणे आवश्यक आहे.

मेजर विल्सन हा पवनीवर ताबा प्रस्थापित करण्यासाठी आला तेव्हा त्याला संघर्षाची कल्पना आल्यामुळे त्याने नगराच्या बाहेर आपल्या लष्कराला दोन भागात विभक्त केले. प्रवेशद्वारासमोर मद्रास स्थानिक पायदळाची एक पलटण ठेवण्यात आली. प्रवेशद्वाराच्या विरुद्ध बाजूस एक घोडदळ ठेवण्यात आले. याशिवाय नगराच्या सभोवताली चिमणा बहादूरच्या लोकांना हुसकावून लावण्यासाठी मोगल घोडेस्वार तैनात करण्यात आले. यावेळी किल्ल्याकडील भागात असलेल्या एका विशाल उंचवट्याच्या आडोशात हाती लहान बंदुका घेवून लढाईसाठी सिद्ध असलेले चिमणा बहादूरचे लोक होते. दोन्ही सैन्य अमोरासमोर येताच घमासान युद्ध घडून आले. युद्धात विजयी ठरताच इंग्रजांनी पवनीच्या गल्लोगल्लीत पाठलाग करीत चिमणा बहादूरच्या सैनिकांना हुसकावून लावले व किल्ल्यावर ताबा प्रस्थापित केला. पराभवाने खचून चिमणा बहादूरचे लोक जेव्हा वैनगंगेकडे पळू लागले तेव्हा इंग्रजांनी पुन्हा त्यांच्यावर आक्रमण केले. यावेळी चिमणा बहादूरचे अनेक लोक मृत्युमुखी पडले. त्यांचे जे लोक जीव मुठीत घेवून घाटावर पोहचण्यात यशस्वी झाले ते सर्व दाटीवाटीने दोन बोटीत बसून, नदीच्या पैलतिरी जाण्यासाठी रवाना झाले. यावेळी देखील इंग्रजांनी त्यांच्यावर निर्दयतेने गोळीबार केला. त्यामुळे बोटीत बसलेल्या लोकांची तारांबळ उडाली व तेथे उत्पन्न झालेल्या गोंधळामुळे दोन्ही बोटी हेलकावे खावू लागल्या, परिणामस्वरुप दोन्ही बोटीतून सुमारे चाळीस लोक नदीत पडले व बुडून मरण पावले. पवनीच्या या लढ्यात चिमणा बहादूरचे दीडशे सैनिक मृत्युमुखी पडले आणि इंग्रजांकडील मृत्युमुखी पडलेल्या व जखमी झालेल्या सैनिकांची संख्या फक्त बारा एवढी अल्प होती. (Their entire loss was estimated at about

one hundred and fifty, while that of the detachment amounted to twelve killed and wounded)[1]

### ३.९ स्वातंत्र्य लढा कोसळला

कामठ्यावर कॅप्टन गॉर्डनने दणदणीत विजय प्राप्त केल्यानंतर मेजर विल्सनच्या नेतृत्वाखाली इंग्रजांनी अंबागड आणि पवनीवर अधिपत्य प्रस्थापित केले. कॅप्टन गॉर्डन हा कामठ्यावरील विजयानंतर तेथे लष्करी पहारा बसवून, लांजी व हट्टा येथील लोकांचा स्वातंत्र्य लढा दडपून काढण्यासाठी तिकडे निघून गेला. चिमणा बहादूरच्या लोकांनी नाईलाजाने या दोन्ही ठिकाणी कॅप्टन गॉर्डनसमोर आत्मसमर्पण केले. अशाप्रकारे, चिमणा बहादूरच्या नेतृत्वाखाली वैनगंगेच्या खोऱ्यात सुरु झालेल्या स्वातंत्र्य लढ्याचा शेवट घडून आला.

## ४. चिमणा बहादूरची हुलकावणी

कॅप्टन गॉर्डन हा ज्यावेळी हट्टयात होता त्यावेळी चिमणा बहादूरचा दिवाण सितारामपंत हा हट्टा येथे गेला व त्याने कॅप्टन गॉर्डन समोर शरणागती पत्करली. इंग्रजांनी त्याला कैद करुन घेतले. पण, त्यावेळेपर्यंत चिमणा बहादूर यांनी इंग्रजांना हुलकावणी देत आपल्या पाठीमागे झुलवत ठेवले होते. स्वातंत्र्य लढ्याचा शेवट झाल्यानंतर चिमणा बहादूरला पकडणे हे एक अवघड काम इंग्रजांसमोर अजून बाकी होते, आणि या कामात चिमणा बहादूरने इंग्रजांची खूप दमछाक केली. त्यामुळे चिमणा बहादूरला पकडणे हे इंग्रजांना फार मोठे आव्हान वाटत होते.

## ५. चिमणा बहादूरची निर्भयता

कामठ्याच्या लढ्यात भीषण नरसंहार व इंग्रजांना विजय प्राप्त होणे सुनिश्चित झाल्यानंतर चिमणा बहादूर हे अन्यत्र धगधगत असलेली इंग्रजविरोधी ज्वाला विझू नये यासाठी तातडीने निघून गेले. पण कामठ्यानंतर अंबागड, पवनी, लांजी व हट्टा या ठिकाणी इंग्रजांना लागोपाठ विजय प्राप्त होत गेल्यामुळे चिमणा बहादूर हे खचून न जाता, स्वत:च्या निवडक सैनिकासह कामठ्यात निर्भयतेने वावरले आणि तेथील दु:खी, घायाळ व व्यथीत झालेल्या प्रजेची सांत्वना करीत संपूर्ण नगरात फिरले. यावेळी चिमणा बहादूरचे मन हे मानवता हा सर्वापरी धर्म आहे, कृतज्ञता हे सर्वश्रेष्ठ जीवनमूल्य आहे आणि धीरोदात्तपणा हा मानवी जीवनाचा सर्वात किंमती अलंकार आहे, अशा स्वरुपाच्या उदात्त तत्त्वज्ञानाने ओथंबलेला

1. पूर्वोक्त, Colonel Valentine Blacker

असावा. महान तत्त्वज्ञानाने भारावलेले लोकच हिस्त्र श्वापदासारख्या क्रूरकर्मा, सत्तापिपासू विरोधकांच्या समूहात निर्भयतेने विचरण करु शकतात, शत्रुच्या बंदुकीतून सुटलेल्या गोळ्या सहर्ष आपल्या छातीवर झेलू शकतात आणि यातून प्राण वाचलेच तर फाशीचा फासा आनंदाने गळयात घालून स्वत:चे बलिदान द्यायलाही तत्पर असतात. भारतीय स्वातंत्र्याचा ओजस्वी इतिहास याला साक्षी आहे.

चिमणा बहादूर हे कामठा नगरीत एक संपूर्ण दिवसभर निर्भयतेने वावरले. रात्री ते स्वत:च्या राजवाड्यात थांबले. यावेळी ते आपल्या परिजनांना व सेवकवर्गाला म्हणाले, ''आज मी पराजयाच्या कलंकाने कलंकित झालेलो आहे. माझी अवस्था आज विनाशाच्या चक्रीवादळात उडत जाणाऱ्या झाडांच्या वाळलेल्या पानांसारखी आहे. जनताजनार्दनाला गुलामगिरीत लोटण्याचे कलंक माझ्या माथी लागलेले आहे. अनेक वीर योद्ध्यांना मृत्युच्या खाईत लोटून मी आज जीवंत आहे, याचे माझ्या अंतर्मनात शल्य आहे. आता तुम्ही मला माझ्या नशीबावर सोडून द्या. तुम्ही मात्र खचून जावू नका---'' चिमणा बहादूर हे सूर्योदयापूर्वी अज्ञात स्थानी निघून जाणार होते. त्यांनी आपल्या मनाचा हा बेत परिजनांजवळ बोलून दाखविला होता. पण, नियतीला ते मंजूर नव्हते.

यावेळी कॅप्टन गॉर्डनने लांजी व हट्टयाच्या कामगिरीवर आपले संपूर्ण लक्ष केंद्रीत केले होते. त्याला कामठ्यातील चिमणा बहादूरच्या उपस्थितीची माहिती मिळताच तो या दिशेने लष्करासह आला व रात्री त्याने या नगरीच्या किल्ल्याभोवती गराडा घातला. यानंतर त्याने पूर्ण सावधगिरीने कामठ्याच्या किल्ल्यात कोंडून चिमणा बहादूरला कैद केले. (The forts of Lanji and Hatta was then surrendered to captain Gorden and the insurrection was at an end. Chimna Patel was confined in his fort of Kamtha---)[1]

''चिमणा बहादूर हे शक्तिशाली असून तलवारबाजीत तरबेज होते. साधारण सैनिकांनी सभोवताली गराडा घातला तरी त्यांच्यावर मात करण्यात चिमणा बहादूर हे सक्षम होते. अत: ज्यावेळी चिमणा बहादूर हे नि:शस्त्र असतील त्यावेळीच त्यांच्याभोवती गराडा घालून त्यांना पकडणे शक्य आहे, अशी वस्तुस्थिती असल्यामुळे चिमणा बहादूर हे पहाटे सुमारे तीन वाजता भगवान शिवशंकराच्या पूजेत निमग्न असतांना इंग्रजांनी कामठ्याच्या किल्ल्याची नाकेबंदी केली व त्यांना दगाबाजीने पकडले.'' अशी मान्यता या घटनेसंबंधी कामठा व

---

**1**. पूर्वोक्त, Bhandara District Gazetteer, P.139

त्या परिसरात प्रचलित असलेली दिसून येते. यासंबंधी लिखित तथ्य लक्षात घेता चिमणा बहादूरच्या शौर्यशाली व्यक्तिमत्त्वासंबंधी जनमानसात रुढ असलेली मान्यता, अक्षरश: खरी आहे हे प्रमाणित होते.

इंग्रजांचे आपण कट्टर शत्रू असून त्यांनी कामठा ताब्यात घेतल्यानंतर त्या नगरीत जावून तेथे निर्भयपणे वावरल्यास आपल्या जीवावर बेतू शकते अथवा ते आपल्याला कैदेत डांबू शकतात, याची पुरेपूर कल्पना असून देखील तशी कृती चिमणा बहादूरच्या आचरणातून घडली, हे लक्षात घेता प्रचंड साहस करण्याची अथवा प्राण तळहातावर घेवून संकटाला सामोरे जाण्याची वृत्ती ही त्यांच्या रोमारोमात भिनली होती याची पुन्हा एकदा प्रचिती येते, आणि चिमणा बहादूरने कोरणीच्या जंगलात वाघाशी घेतलेली झुंज ही अनेक प्रबुद्ध लोकांच्या मुखारबिंदुतून ऐकलेली घटना, केवळ कपोलकल्पना नसून वास्तविक आहे, यावर देखील पूर्ण विश्वास बसतो.

## ६. चिमणा बहादूर: एक कर्मठ योद्धा

चिमणा बहादूरचा समकालीन इंग्रज अधिकारी रेसिडेंट जेन्किन्स याने कंपनी सरकारला पाठविलेल्या अहवालात, ''आप्पासाहेबांचा सर्वात प्रबळ सहकारी असा त्यांचा उल्लेख केलेला आहे. उत्तरेकडील कटंगी परगण्यापासून दक्षिणेकडील प्रतापगडपर्यंतचे आणि पश्चिमेकडील वैनगंगेपासून पूर्वेकडील लांजीपर्यंतचे सर्व जमीनदार त्यांना आपला प्रमुख मानत असत, याचाही त्याने त्यात उल्लेख केलेला आहे. तसेच त्याने, वराड जमीनदारीवर चिमणा बहादूरने केलेल्या आक्रमणाचा, आणि लांजीच्या कमाविसदाराला त्यांनी बंदी बनविलेल्या घटनेचाही उल्लेख केलेला आहे.''[1] रेसिडेंट जेन्किन्सच्या या माहितीत चिमणा बहादूरच्या वादळी व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब उमटले आहे.

मि. लॉरेन्सेने बंदोबस्त अहवालात कामठा जमीनदारीच्या उदयाचे वर्णन करतांना चिमणा बहादूरसाठी (Vigorous) हा शब्द वापरलेला आहे. व्यक्तिमत्त्वाच्या वेगवेगळया छटा एकवटून असलेल्या या शब्दातून चिमणा बहादूरचे व्यक्तिमत्त्व हे जोमदार (energetic) हिंमतवान (forcible) आणि परिणामकारक (effective)' असे होते, ही बाब प्रकर्षाने स्पष्ट होते. चिमणा बहादूरच्या कार्यक्षेत्रातील लोकांच्या ओठांवर कर्णपरंपरेने खेळत असलेली माहिती विचारात घेतल्यास त्यातूनही ते शूरवीर, चलाख आणि पाणीदार होते, असे निदर्शनात येते.

कर्नल व्हॅलेन्टाइन ब्लॅकरने ''मराठा युद्धविषयक (१८१७-१८१९)

1- Despatch No. 38 of 10t January 1819, Resident Jenkins.

आठवणी'' या ग्रंथात, ''आप्पासाहेबांनी इंग्रजांविरुद्ध सुरु केलेल्या युद्धाचे प्रमुख केंद्र पचमढी असून दुसरे केंद्र लांजी हे होते. तसेच चिमणा बहादूर हे या दुसऱ्या केंद्राचे प्रमुख होते'', असे नमूद केले आहे. यातून चिमणा बहादूरच्या नेतृत्वाखाली इंग्रजांविरुद्ध लांजी, नवरगाव, कामठा, अंबागड, पवनी, हट्टा इ. ठिकाणच्या लढाया घडून आल्या ही बाब सूर्यप्रकाशासारखी स्पष्ट आहे. या सर्व लढ्यांचे वर्णनही कर्नल ब्लॅकरने आपल्या ग्रंथात केलेले आहे. पण, चिमणा बहादूरच्या साहसी (Adventurous ) व्यक्तिमत्त्वाचे जे प्रतिबिंब रेसिडेंट जेन्किन्स व मि. लॉरेन्सच्या वर्णनात उमटले आहे, आणि परंपरागत माहितीच्या आधारे जनमानसात त्यांच्या धाडसी व्यक्तिमत्त्वासंबंधी जी धारणा रुजलेली आहे, त्याला साजेसे असे त्यांच्या शौर्याचे वर्णन चुकूनही कर्नल ब्लॅकरच्या वर्णनात झळकत नाही. त्याने केलेल्या उपरोक्त लढ्यांच्या वर्णनात ''चिमणा बहादूरच्या पराक्रमाचा तर सोडाच, पण शत्रुकडील लष्कर व लोकांची कशी नामुष्की, फजिती व पांगापांग झाली आणि इंग्रजांच्या सैनिकांपेक्षा किती मोठ्या प्रमाणात शत्रुचे लोक मारले गेले याचाच उल्लेख आढळतो.''[1] अत: रेसिडेंट जेन्किन्सचा अहवाल, मि. लॉरेन्सचे वर्णन आणि जनमानसात जसे चिमणा बहादूरचे शौर्यशाली व्यक्तिमत्त्व झळकते तसे त्यांचे शौर्य कर्नल ब्लॅकरद्वारे वर्णित लढ्यात अजिबात झळकत नाही. ही विसंगती लक्षात घेता असे वाटते की, ''कर्नल ब्लॅकरने आपल्या ग्रंथात केलेले लढ्यांचे वर्णन हे एकांगी, पक्षपातपूर्ण आणि प्रतिद्वंद्वीच्या शौर्याची उपेक्षा (Ignore) करीत केले गेलेले वर्णन आहे. म्हणूनच ते पूर्णत: विश्वसनीय (Reliable) नसून, एक योद्धा नात्याने चिमणा बहादूरची गुणवत्ता निश्चित करण्याच्या दृष्टीने निरुपयोगी आहे.''[2]

चिमणा बहादूरच्या जीवनाला, व्यक्तिमत्त्वाला आणि समर्पणाला योग्य न्याय मिळवून देण्यासाठी 'एक योद्धा' या नात्याने त्यांची गुणवत्ता निश्चित करणे आवश्यक आहे. त्यांची ही गुणवत्ता निश्चित करण्याठी उपयुक्त असलेले तथ्य खाली देत आहे–

१. आप्पासाहेबांनी इंग्रजांविरुद्ध सुरु केलेल्या स्वातंत्र्य लढ्याच्या प्रसंगी वैनगंगेकडील युद्धाची संपूर्ण जबाबदारी चिमणा बहादूरवर सोपविली होती. यातून चिमणा बहादूरच्या अंगी युद्ध कौशल्य आणि रणनीती आखण्याची क्षमता होती, ही बाब ठळकपणे लक्षात येते.

२. मराठा शासनकाळात मोठ्या जमीनदारांजवळ स्वत:चे घोडदळ व पायदळ

**1.** Review of te Colonel Blacker's Memoir
**2.** Comment on the Colonel Blacker's Memoir.

असे दोन्ही प्रकारचे लष्कर राहत असे. चिमणा बहादूर यांच्याजवळदेखील दोन तोफखाने आणि त्यांचे स्वत:चे कवायती लष्कर होते. यातून चिमणा बहादूरच्या अंगी युद्धकौशल्य होते, ही बाब स्पष्ट होते.

३. चिमणा बहादूर यांनी इ.स. १८१८ मध्ये वराड जमीनदारीवर दोनदा आक्रमण केले. पहिल्या आक्रमणाच्या वेळी वराडचे जमीनदार नर्मद पाटील हे इंग्रजांच्या मदतीसाठी नागपूरला पळून गेले. दुसऱ्या आक्रमणाच्या वेळी चिमणा बहादूर यांनी सुकूल पाटील यांना बंधक बनविले. यातून अन्य लोकांच्या तलवारीला तलवार भिडविण्याची हिम्मत चिमणा बहादूरमध्ये होती, ही बाब सहजपणे लक्षात येते.
४. चिमणा बहादूरने लांजी येथे इंग्रजांच्या वतीने कार्यरत असलेल्या मराठा कमाविसदाराला बंधक बनवून, त्यांच्या प्रबळ सत्तेला आव्हान दिले. यातून इंग्रजांच्या नजरेला नजर भिडवून बोलण्याचे नैतिक सामर्थ्य चिमणा बहादूरमध्ये होते आणि त्यांचा स्वत:च्या मनगटावर व तलवारीवर दृढ विश्वास होता, ही बाब ठळकपणे निदर्शनात येते.
५. इ.स. १८१८ च्या स्वातंत्र्य लढ्याच्या प्रसंगी शिवणी-छपाऱ्यापासून प्रतापगडपर्यंत आणि वैनगंगेपासून लांजीपर्यंतचे सर्व जमीनदार चिमणा बहादूरच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. त्यांचा जर चिमणा बहादूरच्या पराक्रमावर विश्वास नसता तर ते त्यांच्या पाठीशी उभे राहिले नसते. यातून एक पराक्रमी योद्धा अशी चिमणा बहादूरची प्रतिमा समकालीन लोकांत प्रस्थापित होती, हे लक्षात येते.
६. चिमणा बहादूर यांनी इंग्रजांच्या विरोधात लांजी, वैनगंगा, नवरगाव, झिलमिली, कामठा, अंबागड, पवनी, हट्टा इ. ठिकाणी लढे उभारुन त्यांच्या विरुद्ध निकराने लढा दिला. त्यांनी इ.स. १८१८ च्या पूर्ण सप्टेंबर महिन्याभर इंग्रजांना सतत लढाईत झुलवत ठेवले. त्यातून त्यांची कर्मठता, 'मोडेन पण वाकणार नाही,' ही वृत्ती आणि मायभूमी वरील अतूट प्रेम, या बाबी अधोरेखित होतात.

तात्पर्य, कर्नल व्हलेन्टाईन ब्लॅकरने नमूद केले आहे की शत्रुपक्षाचे शंभर सैनिक नवरगावच्या लढाईत मारले गेले, कामठ्याच्या लढाईत त्यांचे चारशे लोक मारले गेले आणि पवनीच्या लढ्यात त्यांच्या दीडशे लोकांना प्राण गमवावे लागले. ही आकडेवारी लक्षात घेता, पावसाळ्यात संध्याकाळी पतंगांचे झुंडच्या झुंड प्रकाशाकडे झेप घेतात व तेथे येऊन, पंख तुटून सगळे पतंग ज्याप्रमाणें

पटापट मरुन पडतात त्याप्रमाणे चिमणा बहादूरचे सैनिक मेले नसतील, ही बाब समजण्याएवढी बुद्धी सर्वांनाच आहे. यातून प्रमाणित होते की चिमणा बहादूरने इंग्रजांविरुद्ध प्राणपणाला लावून लढा दिला. ते निर्भय, साहसी व कर्मठ योद्धा होते, असा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाबाबत निष्कर्ष (Conclusion) प्राप्त होतो.

## ७. पराभवाची कारणे

भारतात त्यावेळी देशाभिमान शून्य पातळीवर होता. येथील लोक वैयक्तिक स्वार्थात आकंठ बुडालेले असल्यामुळे येथे फितुरीचे प्रमाण जास्त असून कर्तव्यात कुचराई करण्याची प्रवृत्ती व्याप्त होती. याउलट इंग्रज हे अल्पसंख्य आणि परक्या मुलखात असल्यामुळे कर्तव्यदक्ष होते. कर्तव्यात कुचराई करणे फार महागात पडू शकते याची इंग्रजांना पुरेपूर कल्पना होती. युद्धकला, मुत्सद्देगिरी, देशाभिमान आणि स्वार्थत्याग यात इंग्रज हे त्याकाळी सर्वश्रेष्ठ होते. यामुळे चिमणा बहादूर हे एक कर्मठ योद्धा असूनही युद्धात त्यांना दारुण पराभव स्वीकारणें भाग पडले. परिस्थिती प्रतिकूल असल्यामुळे चिमणा बहादूरचे युद्धकौशल्य मातीमोल झाले, ही बाब खरी असली तरी विनाशकाळाच्या त्या काळोख्या अंधारातही चिमणा बहादूर हे राष्ट्रोद्धाराच्या तेजस्वी बाण्याने काही काळ चमकले, यातच त्यांच्या जीवनाचे मोल सामावलेले आहे.

चिमणा बहादूरच्या नेतृत्वाखालील स्वातंत्र्य लढा हा सप्टेम्बर १८१८ मध्ये जोमात सुरु होता. नेमका याच वेळी पचमढीला केंद्र बनवून सुरु असलेला स्वातंत्र्य लढा कमजोर पडला. ही बाब इंग्रजांच्या पथ्यावर पडली. यामुळे कॅप्टन गॉर्डनचा मनोबल व उत्साह वाढला. अन्यथा चिमणा बहादूरचा इतिहास आणखी वेगळ्या पद्धतीने घडला असता.

## ८. कल्पनेपलिकडील साहस

पहिल्या स्वातंत्र्य लढ्यातील चिमणा बहादूरच्या भूमिकेविषयी बोलायचे झाल्यास म्हणता येईल की, ''चिमणा बहादूर यांनी आपल्या स्वप्नाला, त्यांच्यावर ओढवलेली आपत्ती किती मोठी आहे हे कधीच सांगितले नाही--- पण ते स्वत:वर ओढवलेल्या संकटांना त्यांचे स्वप्न किती मोठे आहे, हे मात्र नेहमीच सांगत राहिले---'' म्हणून स्वातंत्र्य लढ्याच्या प्रसंगी सामान्य माणसाच्या कल्पनेपलिकडील साहस त्यांच्या प्रत्येक कृतीतून प्रगट झाले. भारताला मिळालेले स्वातंत्र्य हे एकाएकी मिळालेले नाही. त्यासाठी प्रदीर्घकाळ विविधस्वरुपात, अनेक पिढ्यातील अशाच असंख्य शूरवीरांनी, यशापयशाची पर्वा न करता अपार

हालअपेष्टा सहन केल्या, आप्तस्वकीयांना संकटात टाकले व प्रसंगी आत्मबलिदानही केले. अनेक पिढ्यातील असंख्य निर्भय लोकांच्या समग्र प्रयासाने भारताला स्वातंत्र्य मिळणे संभव झाले. हे सर्व लिहितांना एक म्हण आठवते – ''मंजिल मिल ही जायेगी--- भटकते हुए ही सही । गुमराह तो वो हैं--- जो घर से निकलतेही नहीं।''

भारत मातेच्या हातापायात इंग्रजांनी घातलेल्या गुलामगिरीच्या बेड्या १४ ऑगष्ट १९४७ च्या मध्यरात्री खाळकन तुटून पडल्या आणि भारताला पूर्ण स्वातंत्र्य मिळाले तेव्हा स्वातंत्र्यासाठी भटकत गेलेल्या चिमणा बहादूर, आप्पासाहेब भोसले, महाराणी लक्ष्मीबाई, तात्या टोपे, वीरांगणा अवंतीबाई, बिरसा मुंडा यासारख्या असंख्य शूरवीरांचे आणि वीरांगणांचे भटकत गेलेले प्रयत्न सार्थक झाले. चिमणा बहादूरसारखे शूरवीर समकालीन परिस्थितीत ध्येयवेडे म्हणून गणले गेले असतील, उपहासास पात्र ठरले असतील आणि प्रसंगी अपमानाचे घोटही त्यांनी आनंदाने प्राशन केले असतील. पण, त्यांनीच भारतीय स्वातंत्र्यरुपी या सुंदर, आकर्षक आणि लक्षवेधक इमारतीचा पाया रचला. चिमणा बहादूरसारखे असंख्य शूरवीर या भव्य भवनाच्या पायातील दगड बनले. म्हणून आज आपण त्या स्वातंत्र्याची मधुर फळे चाखत आहोत. पण, हे करतांना आपण त्याग आणि बलिदानाने व्याप्त असलेला स्वत:चा गौरवशाली इतिहास विसरतो, कर्तव्यविमुख व कृतघ्न होतो आणि महत्प्रयासाने प्राप्त झालेल्या भारतीय स्वातंत्र्याला व अस्मितेला तडे पडतील असे दृष्कृत्य करायलाही मागेपुढे पाहत नाही, हीच खरी आधुनिक भारताची समस्या आहे, आणि हेच आज भारतासमोरील सर्वात मोठे आव्हान आहे.

■ ■ ■

# ११. युद्धोपरांत चिमणा बहादूर

## १. कामठ्यात इंग्रजांची दहशत

**चि**मणा बहादूर हे स्वराज्याच्या रक्षणासाठी इंग्रजांविरुद्ध पूर्ण सामर्थ्यानिशी लढले. पण, या लढ्यात त्यांचा पूर्ण पराभव झाला. युद्धानंतर इंग्रजांनी त्यांना जेरबंद करुन कामठ्याच्या किल्ल्यात कैद करुन ठेवले. यानंतर त्यांनी चिमणा बहादूर यांच्या अधिपत्याखालील सर्व जमीनदाऱ्या व त्यातील गावे जप्त केली. परंतु त्यांच्यासारख्या शूरवीराला कामठ्याच्या किल्ल्यात कैद करुन ठेवणे हे इंग्रजांना धोक्याचे वाटत होते. तसेच पूर्वी चिमणा बहादूरच्या अधिकारक्षेत्राखाली असलेले प्रदेश आता इंग्रजांच्या अधिपत्याखाली आल्यामुळे तेथे पूर्ण शांतता प्रस्थापित होण्यासाठी आणि नवी प्रशासकीय व्यवस्था स्थापित करण्यासाठी काही कालावधी लागणे आवश्यक होते. अत: इ.स.१८१८ पासून इ.स.१८२१ पर्यंत कॅप्टन विल्किन्सन हा कामठ्यात भरपूर लष्करासह मुक्काम करुन होता. या सुमारे तीन वर्षाच्या काळात कामठा नगरीला लष्करी छावणीचे स्वरुप प्राप्त झाले होते. सर्वत्र दहशतीचे वातावरण पसरले होते.

## २. तलवारीच्या छायेत चिमणा बहादूर

चिमणा बहादूर हे उमद्या स्वभावाचे शासक होते. कामठा जमीनदारीला वैभवाच्या अत्युच्च शिखरावर नेण्याच्या कामगिरीत त्यांचा मोलाचा वाटा होता. युद्धामुळे त्यांची राजधानी असलेले कामठा आणि तेथील मुलकी व लष्करी प्रशासन पूर्णत: उध्वस्त झाले होते. भारतीयांनाच भारतात शासन करण्याचा अधिकार आहे, असे वयात येताच ज्यांना वाटत होते त्याच चिमणा बहादूरवर कालांतराने पिंजऱ्यातील बंदीस्त सिंहासारखे गुलामीचे जीवन जगण्याची पाळी आली. चिमणा बहादूर यांचा हा दैवदुर्विलास, एखाद्या परिकथेतील करुण दृश्यासारखा दु:खदायी होता.

चिमणा बहादूर हे कैदेत असतांना इंग्रजांनी नर्मद पाटील यांना कामठा जमीनदारीचे व्यवस्थापक घोषित केले. ज्या कामठ्याच्या राजवाड्यात बसून चिमणा बहादूर हे कामठा व त्या अंतर्गत असलेल्या विविध उप-जमीनदारींची सत्ता संचालित करीत होते, त्याच राजवाड्याच्या राजसिंहासनावर इंग्रजांनी वराडच्या त्या जमीनदाराला व्यवस्थापक म्हणून बसविले, ज्याच्या जमीनदारीवर काही महिन्यापूर्वी चिमणा बहादूर यांनी आक्रमण केले होते आणि ज्याने या

आक्रमणाचा पुरेपूर बदला घेण्यासाठी युद्धात इंग्रजांना तन-मन-धनाने साथ दिलेली होती. अशाप्रकारे कामठ्याचे सत्ताकेंद्र चिमणा बहादूर यांच्याकडून नर्मद पाटील यांच्याकडे सरकले. कामठ्याच्या किल्ल्यातच चिमणा बहादूर हे कैदेत असून त्या किल्ल्याच्या आतच राजवाडा असल्यामुळे हे सर्व सत्तांतर चिमणा बहादूर यांच्या डोळ्यांदेखत घडले. चिमणा बहादूर यांचा, युद्धाच्या सारीपाटात पासा उलटा पडल्यामुळे त्यांना हे विदारक दृश्य आपल्या छातीवर दगड ठेवून पाहावे लागले.

इंग्रजांनी कामठ्याची सत्तासूत्रे ज्यावेळी मोठ्या हर्षोल्लासाने वराडचे जमीनदार नर्मद पाटील यांच्या स्वाधीन केली, त्यावेळी एखाद्या व्यक्तीच्या जखमांवर मीठ चोळल्यास त्याला जेवढ्या असह्य वेदना होवू शकतात तेवढ्या असह्य वेदना चिमणा बहादूर यांनाही झाल्या असतील. पण अशा दुर्दैवी क्षणातही, आपण आपल्या मायभूमीच्या स्वातंत्र्यासाठी लढलो, मायभूमीप्रती पूर्ण निष्ठावान असलेल्या तिच्या पुत्राची ही सत्त्वपरीक्षा आहे, भारतातील प्रत्येक व्यक्तीच्या व शासकाच्या सत्त्वपरीक्षेच्या काळाची ही सुरुवात आहे. असा पावन, पवित्र व सत्य विचार त्यांच्या धीरोदात्त मनात वारंवार उचंबळून येत असावा, म्हणून त्या विपरीत क्षणीदेखील त्यांच्या मुखमंडळावर कर्तव्यपालनाचे समाधान होते आणि त्यांचा भालचंद्र स्वभिमानाने चमकत होता.

## ३. 'पॅरोल'वर सुटका

चिमणा बहादूर हे कैदेत असतांना विधीच्या अशा अनाकलनीय विधानावर विचार करता-करता त्यांच्या मनात दु:खाचा आवेग उचंबळून येत असे. अशावेळी ते स्वत:ला सावरुन घेण्याचा प्रयत्न करीत असत आणि ''इंग्रजांसमोर मी नमणार नाही, त्यांच्या समोर क्षमायाचना करणार नाही आणि स्वातंत्र्याच्या यज्ञकुंडात प्राणाची आहूती पडल्याशिवाय मी शांत बसणार नाही.'' असा संकल्प मनोमन रटत असत. स्वराज्याचे रक्षण करण्यात आपण अपयशी ठरलो आणि प्रजेच्या गुलामगिरीला कारणीभूत झालो, या दु:खदायी विचारातून उत्पन्न होणाऱ्या मानसिक क्लेशामुळे त्यांचे स्वास्थ्य मात्र दिवसेंदिवस ढासळू लागले. अन्नपाणीवरुन त्यांचे चित्त उडाले. त्यांची बलाढ्य शरीरयष्टी दिवसेंदिवस अधिकाधिक कमजोर होवू लागली.

इंग्रजांच्या कैदेत असतांना त्यांच्या मगरमिठीतून सुटका कशी करुन घेता येईल. हा विचार चिमणा बहादूर यांच्या मनात सातत्याने घोळत होता. यातून

चिमणा बहादूरच्या पदरी मनस्तापाशिवाय जास्त काहीच पडू शकले नाही. दुसरीकडे कॅप्टन विल्सन हा चिमणा बहादूरने इंग्रजांसमोर शरणागती पत्करावी व झालेल्या कृत्याबाबत क्षमायाचना करावी, यासाठी प्रयत्नशील होता. पण सतत दोन वर्षे कारावासाच्या यातना सहन करुनही चिमणा बहादूरचे मनोबल तुटले नाही आणि कॅप्टन विल्सनचे प्रयत्न फलद्रूप झाले नाही. चिमणा बहादूरच्या सुटकेचा गुंता कायम असतांना कॅप्टन विल्सनने त्यांची पॅरोलवर सुटका केली. पॅरोलवर असतांना चिमणा बहादूर यांचे वास्तव्य नवरगाव व झिलमिली येथील त्यांच्याच घराण्यातील लोकांकडे असले तरी त्यांची स्थिती नजरकैदेत असलेल्या व्यक्तीसारखी होती.

## ४. इंग्रजांसमोरील तीन पर्याय

इंग्रज हे भारतीयांत त्यांच्याविरुद्ध असलेला रोष पराकोटीला पोहचू नये यासाठी युद्धाच्या प्रसंगी भारतीय शासकाचा एकाएकी वध करीत नसत. त्यांनी भारतीय शासकांना फंदफितुरीने अथवा अन्य कोणत्याही प्रकारे जीवंत पकडून, कैद करुन व शरणागती स्वीकारायला भाग पाडण्याचे धोरण स्वीकारले होते. या धोरणानुसार त्यांनी फंदफितुरीने चिमणा बहादूर यांना पकडून कैद केले होते. यानंतर त्यांच्यासंबंधी काय निर्णय घ्यावा, हा एक यक्षप्रश्न इंग्रजांसमोर उपस्थित होता. याबाबतीत, इंग्रजांसमोर तीन पर्याय उपलब्ध होते. प्रथम, चिमणा बहादूर जर इंग्रजांची शरणागती स्वीकारत असेल तर त्याला उदरनिर्वाहासाठी एखादी लहान-सहान जमीनदारी बहाल करावी. द्वितीय, चिमणा बहादूरला नेहमीसाठी कैदेत ठेवावे व इंग्रजांविरुद्ध केलेल्या दु:साहसाचे फळ त्याला भोगायला लावावे. तृतीय, चिमणा बहादूरला फाशी देवून त्याचा प्रश्न कायमचा मिटवायचा.

भारतीय इतिहासात इंग्रजांच्या धोरणासंबंधी अशी तिन्ही प्रकारची उदाहरणे भरपूर प्रमाणात उपलब्ध आहेत.

## ५. कॅप्टन विल्सनचा प्रस्ताव

चिमणा बहादूर हे दोन वर्षेपर्यंत इंग्रजांच्या कैदेत असतांना कॅप्टन विल्सनने, त्यांनी इंग्रजांची शरणागती पत्करावी व पुढचे आयुष्य सुखात घालवावे या दिशेने भरपूर प्रयत्न केले. परंतु या प्रयत्नात त्याला यश न मिळाल्यामुळे चिमणा बहादूर हे इ.स. १८२० मध्ये जेव्हा पॅरोलवर होते तेव्हा त्याने किरणापूरची जमीनदारी, त्यांना उदरनिर्वाहासाठी देण्याचे मानस बनविले व निर्देश जारी केले. यानंतर, चिमणा बहादूरने शरणागती पत्करुन किरणापूरची जमिनदारी स्वीकारावी असा

प्रस्ताव कॅप्टन विल्किन्सनने चिमणा बहादूरसमक्ष प्रस्तुत केल्याचे दिसते. पण यावेळी चिमणा बहादूरने किरणापूरची जमीनदारी स्वीकारली अथवा नाही, हा एक संशोधनाचा विषय आहे.

## ६. परस्परविरुद्ध माहिती व तिचे परीक्षण

आमगाव जमीनदारवाड्यातून उपलब्ध झालेल्या कोलुबापूंच्या वंशावलीत किरणापूरची जमीनदारी इ.स.१८१८ नंतरच्या काळात कोंडुबापू यांच्या नावाने दर्शविलेली आहे. पण मि. लॉरेन्सने प्रस्तुत केलेल्या बंदोबस्त अहवालात ''युद्धोपरांत दोन वर्षांनंतर किरणापूरची जमीनदारी कॅप्टन विल्सनने चिमणा बहादूर यांना बहाल केली.'' (After two years captain Wilson granted him the Zamindari of Kirnapur, now in Balaghat, which had been a part of his former possessions.)[1] अशी नोंद आहे. तात्पर्य, बंदोबस्त अहवालानुसार किरणापूरची जमीनदारी युद्धोपरांत चिमणा बहादूर यांना देण्यात आली. पण कोलुबापूंच्या वंशावलीनुसार ही जमीनदारी चिमणा बहादूरला नव्हें तर कोंडुबापूला बहाल करण्यात आली, असे दिसून येते. अशाप्रकारे हे दोन्ही स्त्रोत (Sources) परस्परविरुद्ध असल्यामुळे त्यांच्या विश्वसनीयतेचे परीक्षण करण्यासाठी जे मुद्दे व परिस्थितीजन्य पुरावे विचारार्थ घेण्यात आले ते खाली देत आहे–

**६.१.** कायदेशीर दृष्टीकोनातून तंतोतंत विचार केला तर चिमणा बहादूरला किरणापूरची जमीनदारी दिली (Granted) याचा अर्थ चिमणा बहादूरने त्या जमीनदारीची सत्तासूत्रे आपल्या हाती घेतली व त्यांनी त्या सत्तेचा वापर केला असा अजिबात होत नाही.तसेच चिमणा बहादूर यांच्या वारसानाचे वंशज किरणापूरला नसून लिंगा येथे आहेत.त्यामुळे १८१८ च्या युद्धानंतर चिमणा बहादूर हे किरणापूरचे जमीनदार होते, ही बाब ग्राह्य करता येत नाही.

**६.२.** कोलुबापुंच्या वंशावलीत बहेकार घराण्यातील सर्व जमीनदारांची नावे असून त्या नावाखाली त्रोटक स्वरुपाच्या नोंदी आहेत. त्यांचे सूक्ष्म अध्ययन केले तर स्पष्ट होते की, १८१८ च्या वेळी पुनाबापू हे हट्टयाचे व्यवस्थापक होते व त्याचवेळी ते लिंगा व किरणापूरचे जमीनदारही होते. या वंशावलीतून हेही स्पष्ट होते की, मराठा शासनाने चिमणा बहादूरचा दत्तक पुत्र रामाबापू याला किरणापूरची जमीनदारी देण्याचे ठरविले होते.

पण १८१८ चे युद्ध घडून आले व त्यानंतर इंग्रजांचे शासन अस्तित्वात आल्यामुळे ही जमीनदारी रामाबापूला प्राप्त झाली नाही. कोलुबापुंच्या वंशवलीतील

1. The description is taken from Bhandara District Gazetteer.

या सर्व नोंदी ग्राह्य करण्यासारख्या आहेत. त्यामुळे संशोधकाने या नोंदी खऱ्या मानून मान्य केलेल्या आहेत.

**६.३.** उपरोक्त वंशावलीत चिमणा बहादूरचा दत्तकपुत्र रामाबापू याच्या नावाने कोणतीही जमीनदारी दर्शविलेली नाही. रामाबापूचा मुलगा पांडुबापू याला लिंग्याची जमीनदारी प्राप्त झाली, असे दर्शविलेले आहे. प्रस्तुत संशोधकाला लिंगा जमीनदारीची जी सनद (इ.स.१८६४) उपलब्ध झालेली आहे, त्यातून वंशावलीतील ही नोंद प्रमाणित होते. तसेच, पांडुबापूंचे वंशज आजही लिंगा या गावी आहेत, यावरुनही वंशावलीत असलेली पांडुबापूसंबंधी नोंद अक्षरश: खरी आहे हे सिद्ध होते.

**६.४.** वंशावलीत किरणापूरची जमीनदारी युद्धोपरांत कोंडुबापूच्या नावाने दर्शविलेली असून आजही त्यांचे वंशज किरणापूरला आहेत. येथे सध्या जे त्यांचे वंशज आहेत ते स्वातंत्र्य लढ्यानंतर किरणापूरची जमीनदारी कोंडुबापुंना मिळाली असे सांगतात. युद्धोपरांत ही जमीनदारी चिमणा बहादूरला प्राप्त झाली, ही बाब ते विश्वासपूर्वक नाकारतात. परंतु प्रस्तुत संशोधकाला कोंडुबापूंची जी सनद (इ.स. १८४६) उपलब्ध झालेली आहे, त्यातून स्पष्ट होते की, १८१८ नंतर ही जमीनदारी पुनाबापुंच्या अधिकारात होती. पुनाबापुंच्या विनंतीनुसार इ.स. १८४६ मध्ये ही जमीनदारी इंग्रजांनी कोंडुबापूंना बहाल केली. या सनदेमुळे कोलुबापुंच्या वंशावलीत दिलेली कोंडुबापू संबंधीची नोंद आणि किरणापूरला सध्या कोंडुबापुंचे जे वंशज आहेत त्यांची धारणा, या दोन्हीं बाबी इतिहास लेखन करण्याच्या दृष्टीने किती भ्रामक आहेत, याची जाणीव होते. संशोधकाला कोंडुबापुंची सनद उपलब्ध झाल्यामुळे संबंधीत वंशावलीत असलेली किरणापूर जमीनदारीसंबंधीची चुकीची असलेली नोंद उजागर झालेली आहे, आणि या सनदेमुळे जमीनदारीचा खरा इतिहास प्रकाशमान होण्यास फार मोलाची मदत झालेली आहे. सर्व ऐतिहासिक स्त्रोतांच्या समीक्षात्मक अध्ययनातून आपण या निष्कर्षावर पोहचतो की, युद्धोपरांत १८४६ पर्यंत किरणापूर जमीनदारी पुनाबापुंच्या अखत्यारीत होती. या जमीनदारीच्या संचालनात पुनाबापू यांना त्यांचे लहान भाऊ कोंडुबापू यांचे सहकार्य लाभले. पुढे पुनाबापू यांच्या विनंतीनुसार इंग्रजांनी ही जमीनदारी कोंडुबापुंना बहाल केली. कोंडुबापुंचा किरणापूर येथील शासनकाळ १८४६ ते १८६२ असा आहे.

**६.५.** कोलुबापुंची वंशावली ही मल्हारराव विरुद्ध मार्तंडराव या दाव्यात सादर करण्यात आली होती. 'म्यूटेशन ऑफ आमगाव जमीनदारी' संबंधी या

दाव्यात ॲड. पंडित आणि ॲड. जकातदार या विद्वान वकीलांनी बंदोबस्त अहवालातील संबंधीत तपशीलही जसाचा तसा दिलेला आहे. यातून हा दिवाणी दावा काळजीपूर्वक, अभ्यासपूर्वक आणि बिनचूकपणे तयार केलेला होता ही बाब स्पष्ट होते. म्हणून त्यात सादर केलेली वंशावली व तिच्यात नमूद केलेल्या नोंदी चिकित्सकपणे केलेल्या अध्ययनात बहुतांश खऱ्या आढळतात.

**६.६.** बंदोबस्त अहवालातून चिमणा बहादूरसंबंधी एक दुसरी नोंद बालाघाट जिल्हा गॅझेटियरमध्ये नमूद करण्यात आली आहे. ही नोंद अशी – ''युद्धोपरांत काही महीने ते कामठ्याच्या किल्ल्यात कैद होते. त्यानंतर दोन वर्षे पॅरोलवर होते. यानंतर त्यांनी कॅप्टन विल्किन्सनकडून किरणापूर जमीनदारी संपादित केली.'' (At the expiration of that period he acquired from captain Wilkinson the superintendent of the affairs of Chanda, the zamindari of Kirnarpur)[1] सकृतदर्शनी ही नोंद भंडारा जिल्हा गॅझेटियरमधील "Wilson granted him the Zamindari of Kirnapur." या नोंदीला जास्त बळकटी प्रदान करणारी आहे, असे वाटते. परंतु पॅरोलची अवधी संपल्यानंतर चिमणा बहादूर हे किरणापूरला किती वर्षे जमीनदार होते, याबाबतीत ही नोंद पूर्णत: मौन आहे. अत: ही नोंद म्हणजे इंग्रजांनी चिमणा बहादूर यांच्या ताटात 'बोलाची भाकर व बोलाचीच कढी' बळपूर्वक वाढण्यासारखी आहे. युद्धोपरांत चिमणा बहादूर यांनी किरणापूरला काही काळ जमीनदार या नात्याने वहिवाट केली, हे या नोंदीच्या आधारे सिद्ध होत नाही. असे असूनही या दिग्भ्रमित करणाऱ्या नोंदीच्या आधारे युद्धोपरांत चिमणा बहादूर यांनी इंग्रजांकडून किरणापूरची जमीनदारी स्वीकारली किंबहुना इंग्रजांना ते शरण गेले, असे गृहीत धरणे म्हणजे विवेक गहाण ठेवून, आक्रामक साम्राज्यवादामुळे घडून आलेल्या रक्तपाताने रक्तबंबाळ झालेल्या इंग्रजांच्या हातून लिहिल्या गेलेल्या लिखाणावर आंधळेपणाने विश्वास करण्यासारखे गैरकृत्य असून मानसिक गुलामगिरीचे द्योतक आहे.

**६.७.** इंग्रजांच्या कागदपत्रांची अथवा नोंदींची विश्वसनीयता तपासतांना एक घटना सहज मनात डोकावते, ती घटना अशी– ''आप्पासाहेबांनी १ फेब्रुवारी १८१९ ला पचमढीहून अशिरगडच्या दिशेने प्रयाण केले. त्यामुळे ते अशिरगडला आश्रय घेतील असे इंग्रजांना वाटत होते. अत: त्यांनी अशिरगडला वेढा घातला. यावेळी अशिरगड हा शिद्यांच्या ताब्यात असून यशवंतराव लाड हा तेथे किल्लेदार होता. अशिरगड इंग्रजांच्या ताब्यात द्यावा अशी शिद्यांची

**1.** Balaghat District Gazetteer, P.55

परवानगी रेसिडेंटने यशवंतरावला आणून दिली. तरी त्याने किल्ला इंग्रजांना दिला नाही. शेवटी, लढाई करुन इंग्रजांना हा किल्ला जिंकावा लागला. माळव्यातील इंग्रज प्रमुख मालकम याने पुढे यशवंतरावला विचारले की, शिद्यांचा हुकूम असतांनाही 'तू' किल्ला का सोडला नाहीस? यावर त्याने सांगितले की पत्रावर व हुकूमावर किला सोडण्याची आमची रीत अथवा प्रथा नाही. कारण अशी पत्रे अथवा हुकूम पुष्कळदा मालकाच्या मर्जीविरुद्ध निघत असल्याचे त्याने दाखवून दिले.''[1]

वरील घटनेतील यशवंतरावाचे उत्तर फारच उद्‌बोधक आहे. इंग्रज हे स्वार्थ सिद्धीसाठी आपल्या मनमर्जीप्रमाणे कागदपत्रे बनवायलाही मागेपुढे पाहत नसत. साम्राज्यावादी आकांक्षा पूर्ण करण्यासाठी ते त्याकाळी कितीही खालच्या स्तरापर्यंत जाऊ शकत, ही बाब त्यातून अधोरेखित होते. असे असतांना चिमणा बहादूरसारख्या कट्टर शत्रुचे उज्ज्वल चरित्र डागाळण्यासाठी युद्धोपरांत त्यांनी किरणापूरची जमीनदारी संपादित केली, असे संभ्रमित करणारे कागदपत्र इंग्रजांनी तयार केले नसतील ही बाब भाबडेपणाने स्वीकृत तरी कशी करायची, हा ज्वलंत प्रश्न मनासमोर उपस्थित होतो. अत: १८१८ च्या युद्धानंतर चिमणा बहादूर यांनी इंग्रजांसमोर शरणागती पत्करुन किरणापूरची जमीनदारी स्वीकारली, ही बाब इंग्रजांच्या नोंदीशिवाय अन्य परिस्थितीजन्य अथवा सबळ पुराव्यांच्या अभावी ग्राह्य करता येत नाही.

६.८. कोंडुबापू यांना इ.स. १८४६ मध्ये प्राप्त झालेल्या किरणापूरच्या सनदेत ***''ऐसांजे तालुके मजकूर येथील जमीनदारी सरकारातून चिमणा पाटील याजकडेस चालत होती. नंतर याचा काळ जालियावर पुना पाटील मजकुराचा भाऊ यांनी वहिवाट साल गुदस्ता पावेतो केली. साल मजकुरास पुना पाटील यानी येऊन सरकारात अर्ज केला की सांप्रत माझा वृद्धापकाळ सबब मेहनत होत नाही. याजकरिता कोंडु पाटील हा आमचा साक्षात धाकटा बंधू हा वहिवाट करुनच आहे. परंतु याचे नावे तालुके मजकुरचा पट्टा करुन द्यावा याजकरितां तालुके मजकुर येथील जमीनदारी तुजकडेस मुकरर करण्यात आली आहे.''*** असा मजकुर नमूद असून यातील सुरुवातीच्या दोन ओळी किंबहुना त्यातील 'याचा काळ जालियावर' हे शब्द संशोधनाच्या दृष्टीने खूप महत्त्वपूर्ण आहेत. यातून ''किरणापूर जमीनदारी मराठा शासनकाळात चिमणा बहादूर यांच्या

1. पूर्वोक्त, डॉ.कोलारकर आणि पुरंदरे, पृष्ठ क्र. २३४-२३९

अखत्यारीत होती. त्यांचा शासनकाळ संपुष्टात येताच इंग्रजांच्यावतीने पुनाबापू हे किरणापूरचे जमीनदार झाले.'' ही बाब प्रकर्षाने स्पष्ट होते आणि त्याचबरोबर, भारतातील पराभूत राज्यकर्त्यांप्रती इंग्रज हे किती उदात्त धोरण बाळगतात हे सकळ भारतीयांना दाखविण्यासाठी व भारतीय जनमानस दिग्भ्रमित करण्यासाठी त्यांनी हेतुपुरस्सर करुन ठेवलेल्या नोंदीतून उत्पन्न होणारा गैरसमज आपोआपच नाहीसा होतो.

**६.९.** चिमणा बहादूरच्या कृतीतून इ.स.१८१८ च्या स्वातंत्र्य लढ्याच्या प्रसंगी जे गुण, कर्म व स्वभाव प्रगट झालेले आहेत त्यातून सिंहासारखा आत्मविश्वास, ठामपणा, नेतृत्वक्षमता व स्वाभिमान हे गुण त्यांच्यात होते ही बाब प्रकर्षाने जाणवते. या स्वातंत्र्य लढ्यात सहभागी झालेले आप्पासाहेब भोसले, हरईचा राजा चैनशहा, पचमढीचा ठाकूर मोहनसिंग इ. कोणीच लढाईत पराजय झाल्यानंतर याचक बनून इंग्रजांसमोर उभे राहिले नाहीत व दानस्वरुपात त्यांनी इंग्रजांकडून कोणतीच अपेक्षा केली नाही. असे असतांना चिमणा बहादूरसारखा सिंहप्रकृतीचा शासक, पराजित झाल्यानंतर इंग्रजांकडून किरणापूरसारख्या एखाद्या जमीनदारीची याचना करेल व दानस्वरुपात ती जमीनदारी हासिल करुन उर्वरित आयुष्य शांतपणे जगण्यात धन्यता मानेल, हे स्वप्नातही खरे मानून घेण्यासारखे नाही. भारतीय शूरवीरांच्या इतिहासास विकृत करण्याच्या प्रवृत्तीतून चिमणा बहादूरने युद्धोपरांत किरणापूरची जमीनदारी स्वीकारली अथवा संपादित केली, ही बाब प्रक्षिप्त (Interpolate) करण्याचा इंग्रजांनी हेतुपुरस्सर प्रयत्न केलेला आहे असे दिसते.

उपरोक्त विवेचनातून स्पष्ट होते की, कॅप्टन विल्सनने किरणापूरची जमीनदारी चिमणा बहादूरला देण्याची प्रक्रिया, ते नजरकैदेत असतांना त्यांना जबरदस्तीने मारुन मुटकून कागदोपत्री पार पाडली असेल. पण, ही जमीनदारी स्वीकारण्याचे चिमणा बहादूरने नाकारले. त्यामुळे त्यांनी ही जमीनदारी पुनाबापूकडे वळविली. म्हणूनच बंदोबस्त अहवालामध्ये Wilson granted him the zamindari of Kirnapur असे नमूद असले तरी, After the war of 1818, the Zamindari of Kirnapur was never in the possession of Chimna Bahaddur. ही सत्यता असून कोलुबापूंच्या वंशावलीतील नोंदी या बहुतांशी विश्वसनीय आहेत. अत: कॅप्टन विल्सनने चिमणा बहादूरला किरणापूरची जमीनदारी कागदोपत्री बहाल केली, पण स्वत: चिमणा बहादूर यांनी मात्र इंग्रजांकडून दानस्वरुपात कोणतीही जमीनदारी स्वीकारण्यास स्पष्ट नकार दिला, असा निष्कर्ष प्राप्त होतो.

## ७. इंग्रजांची कूटनीती

चिमणा बहादूरवर विजय मिळविताच, इंग्रजांनी त्यांच्या अधिकार क्षेत्राखालील सर्व जमीनदाऱ्या ताब्यात घेतल्या व त्यांची सर्व मालमत्ता जब्त (Seize) केली. यानंतर त्यांनी 'फूट पाडा व राज्य करा' या धोरणाचा अवलंब करीत कामठा, हट्टा व फुलचूर या जमीनदारींचे राज्यकारभार युद्धात मदतगार झालेल्या व्यक्तींच्या हाती सोपविले. यावेळी त्यांनी बहेकार घराण्यात फूट पाडण्यासाठीही कारगर उपाय योजिले. युद्धाच्या वेळी हट्टा, लिंगा व किरणापूर या तीन जमीनदारीचे राज्यकारभार पुनाबापू बहेकार यांच्या हाती होते. युद्धानंतर इंग्रजांनी त्यांच्या हातून हट्टा जमीनदारी काढून टाकली. किरणापूर व लिंगा या दोन जमीनदाऱ्या मात्र त्यांच्याकडे कायम ठेवण्यात आल्या. आमगावला युद्धाच्या वेळी सोनाबापू बहेकार हे जमीनदार होते. इ.स.१८१९ मध्ये त्यांचे निधन झाले. सोनाबापू नंतर इंग्रजांनी आमगावची जमीनदारी सोनाबापूचा पुतण्या तान्याबापू यांना बहाल केली. अशाप्रकारे इंग्रज हे बहेकार घराण्यातील काही व्यक्तींना आपल्याकडे वळविण्यात यशस्वी झाले.

इंग्रजांनी बहेकार घराण्यात यशस्वीपणे फूट पाडल्यानंतर त्यांनी चिमणा बहादूरच्या जखमांवर फुंकर घालण्याचा प्रयत्न सुरु केला. लोकांना इंग्रजांची माणुसकी व दातृत्व दिसावे, इंग्रज करीत असलेल्या अन्याय-अत्याचाराकडे भारतीय लोकांचे दुर्लक्ष व्हावे आणि इंग्रजांसमोर असलेला चिमणा बहादूरचा प्रश्न प्रतिष्ठितपणे सुटावा, अशी विविध उद्दिष्टे दृष्टीसमोर ठेवून कॅप्टन विल्सनने किरणापूरची जमीनदारी चिमणा बहादूरला बहाल करण्याचा मानस बनविला. अत: त्याने चिमणा बहादूरला पॅरोलवर सोडून व त्यांना त्यांच्याच आप्तस्वकीयांच्या माध्यमातून किरणापूरची जमीनदारी देण्याचे आमिष दाखवून, त्यांच्या मनाची बोळवण करण्याचा प्रयत्न सुरु केला. सर्व प्रयत्न निष्फळ झाल्यावर कॅप्टन विल्किन्सनने चिमणा बहादूर समोर किरणापूर जमीनदारीबाबत प्रस्ताव मांडून, त्यांनी ही जमीनदारी स्वीकारावी आणि पुढचे जीवन निमूटपणे जगावे यासाठी प्रचंड दबाव टाकला. पण, ''स्वजनांच्या रक्ताने माखलेल्या भूमीवर जमीनदार म्हणवत जगणे हा जघन्य अपराध, असह्य विश्वासघात आणि शुद्ध कायरता आहे. गुलामगिरी हे माझे खरे शल्य असून त्यावर फूंकर घालून माझे शल्य शांत होवू शकत नाही.'' असे म्हणून त्यांनी ही जमीनदारी नाकारली. त्यामुळे इंग्रजांनी किरणापूरची जमीनदारी पुनाबापूंना बहाल केली.

## ८. कर्मठ योद्ध्याचा करुण अंत

इंग्रजांनी चिमणा बहादूरला देवू केलेली किरणापूरची जमीनदारी त्यांनी निर्भीडपणें नाकारली. त्यामुळे त्यांना इंग्रजांच्या रोषाला बळी पडावे लागले. इंग्रजांच्या कैदेतील यातना त्यांना अविरत सहन कराव्या लागल्या. पराजय, असाहाय्यता आणि एकाकीपणाच्या दु:खावेगाने अत्यंत क्लेशदायक झालेले जीवन चिमणा बहादूरसारख्या शूरवीराच्या वाट्याला आले. त्यामुळे त्यांचे हृदय विदीर्ण झाले. स्वातंत्र्यासाठी जो लढला त्याच्यावरच कारागृहातील सळाखींच्या आत जीवन जगण्याची पाळी आली. चिमणा बहादूरसारख्या स्वातंत्र्याच्या शिलेदाराची नियतीने केलेली ही क्रूर थट्टा होय. कै. या.मा.काळे यांच्या शब्दात, ''लष्करी सामर्थ्यावरच राज्याची मालकी अवलंबून असते. हे तत्त्व जगाच्या आरंभापासून अखेरपर्यंत अबाधित राहत आले व राहणाराच. जगातील सर्व करारमदार, तहनामे आणि कायद्याची व न्यायाची तत्त्वे मनगटाच्या जोरापुढे कुचकामी ठरतात हा सर्वत्र अनुभव आहे.''[1]

चिमणा बहादूरच्या जीवनाची पतंग इंग्रजांच्या क्रूर हातात होती. ही पंतग उडत ठेवणे वा तिचा दोरा कापून टाकणे हे सर्वस्वी इंग्रजांच्या मर्जीवर अवलंबून होते. कैदेत डांबून ठेवलेल्या किती व्यक्तींना इंग्रजांनी फाशी दिली याचा कागदोपत्री पुरावा ते दुसऱ्यांच्या हाती लागू देत नसत. म्हणून इतिहासात अशा घटनांचा थांगपत्ता लागत नाही. नागपूरच्या लढ्यानंतर इंग्रजांनी मनभटला अंबागडच्या किल्ल्यात कैद करुन ठेवले होते. तो तेथेच मरण पावला. इ.स. १८१८च्या स्वातंत्र्य लढ्यात सहभागी झालेल्या व्यक्तींपैकी हरईचा राजा चैनशहा यास चंद्रपूरच्या किल्ल्यात, गणपतराव सुभेदाराला अहमदनगरच्या किल्ल्यात आणि नागोपंताला प्रयागच्या किल्ल्यात कैद करुन ठेवण्यात आले होते. यांच्या जीवनाचा शेवट कसा झाला, हे इतिहासाला अवगत नाही. याचप्रमाणे चिमणा बहादूर यांचा मृत्यू कसा व कुठे झाला, यासंबंधी कोणताही लिखित पुरावा उपलब्ध नाही. पण कामठ्याच्या शिवारात अनेक वर्षापूर्वी तीन चिंचेचे झाड होते. हे तिन्ही झाड एका रांगेत जवळ-जवळ असून जुने व फार मोठे होते. या झाडांना फाशीचे दोरखंड बांधून इंग्रजांनी स्वातंत्र्य लढ्यात सहभागी तीन लोकांना फाशी दिली होती, असे कामठ्यातील व त्या परिसरातील अनेक प्रबुद्ध लोक आजही सांगतात. ही परंपरागत माहिती लक्षात घेतली तर चिमणा

**1**. पूर्वोक्त, डॉ.कोलारकर आणि पुरंदरे, पृष्ठ क्र.२६३

बहादूरसारख्या आपल्या कट्टर शत्रुला प्राणदान देवून इंग्रजांनी त्यांच्या अन्य तीन सहकाऱ्यांना फाशी दिली असेल हे शक्य वाटत नाही, आणि आपण या निष्कर्षावर पोहचतो की यावेळी इंग्रजांनी ज्या तीन लोकांना फाशी दिली त्यात इंग्रजी सत्तेचे कट्टर वैरी असलेल्या चिमणा बहादूरचा आणि त्यांचे निष्ठावंत दिवाण सीताराम पंत यांचा समावेश असावा. अलीकडे दरवर्षी दि. २२ जूनला सार्वजनिक स्वरुपात चिमणा बहादूर यांचा बलिदानदिवस संपन्न केला जातो. कारण दि. २२ जून १८२८ ला चिमणा बहादूरचा अंत झाला, अशी जनतेची मान्यता आहे. या सर्व बाबी लक्षात घेता इंग्रजांनी इ.स.१८२८ मध्ये चिमणा बहादूर यांना फाशी दिली असेल असा अनुमान काढता येतो.

युद्धोपरांत थेट दहा वर्षानंतर चिमणा बहादूरला फाशी दिली गेली, असे म्हटले की मनात थोडीशी शंकेची पाल चुकचुकते. पण, प्रयागच्या किल्ल्यात कैद असलेल्या रामचंद्र वाघ आणि नागोपंत यांचे, नागपूरला आणण्यासंबंधीचे अर्ज इ.स.१८१८ पासून थेट इ.स.१८२४ पर्यंत नागपूर येथील इंग्रज अधिकाऱ्यांना प्राप्त होत होते. पुढे रामचंद्र वाघ यास सोडण्यात आले त्यावेळी नागपूरला त्याच्या घरावर गाढवांचा नांगर फिरविला गेला. नागोपंताचे मात्र पुढे काय झाले, हे अज्ञातच आहे. वानगीदाखल प्रस्तुत केलेल्या या समकालीन उदाहरणांवरुन, दहा वर्षे कैदेतील यातना सहन करायला लावून नंतर इंग्रज हे चिमणा बहादूरला फाशीची शिक्षा ठोठावू शकतात, या गोष्टीवर सहजपणे विश्वास बसतो. तसेच इ.स.१८१८ ते इ.स.१८२८ या प्रदीर्घकाळात आप्पासाहेब भोसले हे इंग्रजांना हुलकावणी देत संपूर्ण उत्तर भारतात फिरुन इंग्रजांच्या विरोधात देशी राजामहाराजांना संघटित करण्यासाठी जीवाचा आटापिटा करीत असल्यामुळे त्यांना पकडण्याकडे इंग्रजांचे संपूर्ण लक्ष वेधले गेले होते. यास्तव त्यांनी स्वत:च्या मार्गात चिमणा बहादूरच्या स्वरुपात असलेला काटा कायमचा काढून टाकण्यासंबंधीचा विषय लांबणीवर टाकला असेल, ही संभावना लक्षात घेतली की मग इंग्रजांनी चिमणा बहादूरला प्रदीर्घ काळ कारागृहात ठेवून फाशीची शिक्षा कशी काय दिली असेल, या मनात डोकावणाऱ्या प्रश्नाचा उलगडा होतो.

चिमणा बहादूरच्या सशक्त पाठिंब्यामुळेच इ.स.१८१८ चे स्वातंत्र्य युद्ध घडून आले. तसेच त्यांनी इंग्रजांच्या लष्करावर जागोजागी हल्ले केले. यामुळे चिमणा बहादूरच्या मनात असलेले इंग्रजांविषयीचे शत्रुत्व जगजाहिर झाले. इंग्रजांनी देवू केलेली किरणापूरची जमीनदारी देखील चिमणा बहादूरने स्वाभिमानाने नाकारली. एवढ्यावरही इंग्रजांनी चिमणा बहादूरवर दया दाखविली असेल व

भोळसुदेपणाने त्यांना कैदेतून मुक्त करुन दिले असेल, असे समजणे म्हणजे त्याकाळी इंग्रजांनी फंदाफितुरी व कुटील कारस्थान करुन राज्य बळकावले आणि विरोधकांशी निर्दयीपणे व्यवहार केला, या वस्तुस्थितीकडे जाणूनसवरुन दुर्लक्ष करणे होय. युद्धोपरांत चिमणा बहादूरने इंग्रजांची शरणगती पत्करुन उदरनिर्वाहासाठी एखादी जमीनदारी अथवा पेंशन स्वीकारली, असेही दिसून येत नाही. अत: कामठा जमीनदारीतील स्फोटक परिस्थिती निवडल्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांचे आदेश मिळताच इंग्रजांनी त्यांना मृत्युदंड दिला व चिमणा बहादूरचा दु:खद शेवट झाला ही गोष्ट निश्चित आहे. शूरवीरांचे अंतही अद्‌भुत, समाजमनाला चटका लावणारे आणि भावी पिढींसाठी प्रेरक असेच असते. चिमणा बहादूरही पराक्रमी व शूरवीर होते. साध्या माणसासारखे मरण त्यांच्या वाट्याला येणे अशक्य होते.

चिमणा बहादूरसाराख्या शूरवीर, तेजस्वी-ओजस्वी आणि गौरवशाली व्यक्तीच्या पावन स्मृती जनमानसाच्या स्मृतिपटलावर रुजू नये, मायभूमीवर प्राणापलिकडचे प्रेम करणाऱ्या त्यांच्यासारख्या प्रेरक व्यक्तीचा खरा इतिहास काळाच्या पडद्याआड विलुप्त व्हावा असा दुष्ट हेतु मनात बाळगून समकालीन इंग्रजांनी त्यांच्याशी सबंधित सर्व घटनांची नोंद मोठ्या चलाखीने करणे तर स्वाभाविक आहेच पण चिमणा बहादूर यांनी पत्करलेल्या वीर मरणाला आणि त्यांच्याप्रती इंग्रजांनी केलेल्या क्रोर्याला भारतीयांनी कायमचे विसरावे यासाठी त्यांनी त्यांचा मृत्यू कसा झाला, याची नोंद देखील कुठेच केलेली नाही. तथापि, हे सर्व करत असतांना शूरवीर हे कधीच मरत नसतात, ते अमर असतात, त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन भावी काळात असंख्य महान पुरुष जन्माला येतात व त्यांच्या विराट प्रयत्नातून अंतत: असत्य ते पराजीत होते आणि सत्य पुन्हा या धरेवर आनंदाने, नव्या जोमाने व नव्या स्वरुपात बहरते हे चिरंतन सत्यदेखील त्याकाळी सत्तेच्या धुंदीत मदमस्त झालेले इंग्रज अधिकारी अजिबात विसरले होते.

मायभूमीच्या स्वातंत्र्यासाठी चिमणा बहादूर यांनी आपल्या प्राणाचा बळी दिला. स्वाभिमान, स्वातंत्र्य आणि अस्मिता ही तीन जीवनमूल्ये त्यांच्या कृतीत प्रकर्षाने झळकली. अत: महान क्रांतिकारक देशभक्तांच्या मालिकेत स्थान देता येईल व त्यांच्या श्रेणीत ज्यांचे नाव समाविष्ट करणे सर्वथा योग्य होईल, असे चिमणा बहादूर यांचे समग्र जीवनकार्य होते यात संशय नाही.

## ९. 'उजेड' हरपला

चिमणा बहादूर म्हणजे दबलेल्या माणसांचा आवाज होता. काळोख्या रात्री लोकांना वाट दाखवू शकेल असा तो उजेड होता. अंधाराशी चाललेल्या लढाईत सामान्यांची ताकद वाढेल असा उजेड समाजाला हवा असतो.--- नागपूर राज्यातील राजकीय क्षितिजावर दाटत असलेल्या निबिड अंधाराशी लढणारा उजेड नागपूर राज्याला हवा होता. --- आप्पासाहेब भोसलेंना हा उजेड हवा होता.--- चिमणा बहादूरच्या रुपात अख्खा नागपूर राज्य हा उजेड पाहत होता.---स्वातंत्र्य लढ्याचे प्रयत्न बहरु लागले होते.---पण त्या प्रयत्नांना निहित स्वार्थाने बरबटलेल्या लोकांची दृष्ट लागली.--- शेवटी चिमणा बहादूरला पराभव, कारावास आणि करुण अंत पत्करावा लागला!

आयुष्यभर घोड्यावर बसून वाऱ्यासारखा फिरणारा हा भव्य उंचीचा माणूस सदैव मातीशी जुडलेला असायचा. वेशांतर करुन तो परगणे कामठ्यातील लोकांच्या समस्या जाणायचा, आणि दु:खी-कष्टी लोकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवायचा. चिमणा बहादूर म्हणजे स्वप्न व वास्तव यांच्या एकत्र नांदणुकीचा जीवंत दृष्टांतच होते. लढाईतील त्यांच्या पराभवामुळे लोकांचे संरक्षण कवच गळून पडले. लढाईतील त्यांच्या पराभवामुळे मुखावरील हास्य हरपले व त्यामुळे स्वातंत्र्याची गाणी देखील हरवली. पण त्या पुण्यवंताच्या पुण्यकर्मांनी त्याचे नाव अजरामर झालेले आहे. आजही त्यांच्या पुरुषार्थाच्या गोष्टी त्यांच्या कर्मभूमीच्या परिसरातील अनेक प्रबुद्ध व सर्वसामान्य लोकांच्या ओठांवर खेळतांना दिसून येतात, ही बाब चिमणा बहादूरच्या पराक्रमाची, कर्तृत्वाची आणि उत्तुंग व्यक्तिमत्त्वाची साक्ष देते.

## १०. कधी न विझणारी 'आग'

इ.स.१८१८ मध्ये चिमणा बहादूरसारख्या शूरवीरांनी स्वातंत्र्य लढ्याच्या रुपात जो वणवा भडकविला तो आपल्या मागे कधी न बुझणारा प्रतीकात्मक निखारा सोडून गेला. या वणव्याला विझविण्याची ताकद इंग्रजांत होती, पण निखाऱ्याला नव्हे. या निखाऱ्याने पुढे देशवासियांना उर्जा व प्रेरणा देत वेगवेगळ्या स्वरुपात स्वातंत्र्याचा वणवा भडकविला. वणवा जेव्हा काळानुरुप व देशव्यापी बनला, तेव्हा मात्र इंग्रजांना त्यापुढे नतमस्तक व्हावे लागले. या दृष्टिकोनातून विचार केला तर भारतात इंग्रजांविरुद्ध स्वातंत्र्य लढ्याची पहिली ठिणगी ज्यांनी पाडली त्यांच्या प्रयासाचे खरे मोल कळते. त्यांच्या अपयशातून भावी यशाचे बी

पेरले गेले. म्हणून इंग्रजांविरुद्ध पहिला स्वातंत्र्य लढा ज्यांनी उभारला होता ते शूरवीर सकळ भारतीयांसाठी वंदनीय आहेत.

## ११. 'त्यांच्या' इतिहासाचे मोल

काळ निघून गेला अन् काळाबरोबर चिमणा बहादूरही निघून गेले. पण अजूनही त्यांचे नाव आणि भारतीय स्वातंत्र्यांचा सुखद अनुभव घेत असलेली भारताची नवी पिढी हयात आहे. चिमणा बहादूरसारख्या धाडसी व्यक्तींचा, पुरुषार्थपूर्ण शौर्याने अलंकृत झालेला इतिहास म्हणजे राष्ट्राची बहुमूल्य संपदा होय. या इतिहासामध्ये भारताच्या नव्या पिढीत नवचैतन्य निर्माण करण्याचे सामर्थ्य दडलेले आहे. त्यांच्या या इतिहासाचे आणि त्यांच्या पावन स्मृतीचे जतन करणे हे सकळ भारतीयांचे कर्तव्य ठरते. इ.स.१८१८ च्या पहिल्या स्वातंत्र्य लढ्यात या कर्मठ योद्ध्याने केलेले त्याग, दाखविलेले साहस व गाजविलेला पराक्रम याबद्दल गहण संवेदना व खरी कृतज्ञता अभिव्यक्त करण्याचा हाच एक सर्वोत्कृष्ट, ऐतिहासिक आणि चिरंतन स्वरुपाचा राजमार्ग आज आपल्यासमोर उपलब्ध आहे.

■ ■ ■

# १२. भारतीय स्वातंत्र्यासाठी आप्पासाहेबांचे प्रयत्न

(इ.स. १८१९– इ.स. १८४०)

## १. आप्पासाहेबांना पकडण्यासाठी मोहीम

**चि**मणा बहादूर हे इ.स.१८१८ च्या स्वातंत्र्यलढ्याचे एक प्रमुख कर्णधार होते. इंग्रजांनी महादेवाच्या डोंगरी भागात सुरु असलेला स्वातंत्र्य लढा दडपून काढल्यानंतर त्यांनी चिमणा बहादूरच्या नेतृत्वाखाली लांजी–कामठा या परिसरात सुरु झालेला स्वातंत्र्य लढादेखील पूर्ण सामर्थ्यानिशी दडपून काढला व चिमणा बहादूरला कैद केले. अशाप्रकारे हा स्वातंत्र्य लढा संपुष्टात आला व इंग्रजांनी निर्विघ्नपणे संपूर्ण नागपूर राज्यावर आपली निरंकुश सत्ता प्रस्थापित केली.

इंग्रजांनी चिमणा बहादूरला कैद केल्यानंतर त्यांनी महादेवाच्या डोंगरात आश्रय घेवून असलेल्या आप्पासाहेबांना पकडण्यासाठी सर्व लष्करी सामर्थ्य पणाला लावून एक जोरदार मोहीम सुरु केली. अत: आप्पासाहेबांना इ.स.१८१९ ते इ.स.१८२८ हा दहा वर्षाचा काळ अज्ञातवासात घालवावा लागला. आप्पासाहेब, चिमणा बहादूर इ. शूरवीरांनी पहिला स्वातंत्र्य लढा कोणत्या उद्देशाने लढला हे जाणून घेण्यासाठी या अज्ञातवासाच्या काळातील आप्पासाहेबांचे प्रयत्न लक्षात घेणे आवश्यक आहे.

## २. आप्पासाहेबांचे उत्तरेकडे प्रयाण

आप्पासाहेब हे गनिमी काव्याच्या युद्धात व इंग्रजांविरुद्ध लष्कर उभारण्याच्या बाबतीत निष्णात होते. इंग्रज हे आप्पासाहेबांना आपल्यापुढील फार मोठे आव्हान समजत होते. म्हणून पश्चिमेकडे पचमढीकडील भागात आणि पूर्वेस कामठ्याकडील भागात इंग्रजांचा जम बसल्यानंतर त्यांनी महादेवाच्या डोंगरात आश्रय घेवून असलेल्या आप्पासाहेबांना पकडण्यासाठी आपले सर्व प्रयत्न पणास लावले. ॲडम्स व मॅकमारिन हे दोन अधिकारी उत्तरेकडून आणि स्कॉट हा इंग्रज अधिकारी दक्षिणेकडून पचमढीच्या डोंगरात शिरले. इंग्रजांच्या सैन्याने प्रत्येक दरीत जाऊन आप्पासाहेबांचा शोध घेणे सुरु केले. पचमढीच्या डोंगरात इंग्रजांसमोर आता आपला निभाव लागणार नाही, याची पुरेपूर कल्पना येताच आप्पासाहेबांनी चित्तु पेंढारी व पाचशे अरबांसह दि.१ फेब्रुवारी १८१९ ला पचमढीचा डोंगर सोडले व ते अशिरगडच्या दिशेने निघून गेले.

## ३. इंग्रज विरुद्ध चैनशहाचा संघर्ष

आप्पासाहेबांनी महादेवाचा डोंगर सोडल्यानंतरही त्या डोंगरी भागात गोंडांनी हार मानली नाही. त्यांनी इंग्रजांना फार त्रास दिला. इंग्रज विरुद्ध चैनशहा असा संघर्ष सुरुच राहिला. हरईचा राजा चैनशहा हा इतका चिवट होता की तो इंग्रजांसमोर हार मानायला अजिबात तयार नव्हता. अखेर इंग्रजांचा सेनापती मेजर ओब्रायनने मोठ्या मुश्किलीने एका खोल दरीत जाऊन त्याला पकडले. त्यानंतर इंग्रजांनी त्याला चंद्रपूरच्या किल्ल्यात ठेवले. इंग्रजांना या दऱ्याखोऱ्यात राज्य करणे कठीण होते. म्हणून त्यांनी हरईचे राज्य चैनशहाचा पुतण्या यशवंतशहा यास दिले.

## ४. चित्तु पेंढाऱ्याचा शेवट

मध्यभारतात चित्तु अथवा छट्टू पेंढारी हा फार प्रसिद्ध होता. त्याचे प्रमुख ठाणे माळव्यात होते. तो महादेवाच्या डोंगरात आप्पासाहेबांना येऊन मिळाला होता. इंग्रजांनी डोंगर पिंजून काढण्यास जेव्हा सुरुवात केली, तेव्हा तोही आप्पासाहेबांसोबत अशिरगडच्या दिशेने निघून गेला. आप्पासाहेबांनी अशिरगडला आश्रय घेताच, छट्टू पेंढारी हा बुऱ्हाणपूरच्या दिशेने निघून गेला. जातांना मार्गातील जंगलात एका वाघाच्या हल्ल्यात तो मारला गेला. त्याचे प्रेत त्याच्या मुलालाच सापडले. म्हणून त्याचा मृत्यू कसा झाला, याबाबत कोणतीही शंका कायम राहिली नाही.

## ५. अशिरगडला इंग्रजांचा वेढा

अशिरगड हा मध्ययुगात अतिशय प्रसिद्ध असा किल्ला होता. त्यावेळी तो शिंद्यांच्या ताब्यात होता. यशवंतराव लाड हा किल्लेदार असून तो आप्पासाहेब आणि बाजीराव पेशवे यांच्याविषयी सहानुभूती बाळगून होता. आप्पासाहेब हे अशिरगडला आश्रय घेतील याची कल्पना इंग्रजांना आलेली होती. म्हणून त्यांनी पचमढीपासून अशिरगडपर्यंत आप्पासाहेबांचा पाठलाग केला. पण त्याचा काहीच उपयोग झाला नाही.

अशीरगडचा किल्ला ६०० मीटर रुंद असून ११०० मीटर लांब आहे. समुद्रसपाटीपासून ७५० फूट उंचीवर हा किल्ला आहे. या किल्ल्याला सुमारे १५० फूट उंच भिंतीची तटबंदी आहे. या किल्ल्याच्या खाली एक किल्ला असून त्याला 'मालीगड' असे म्हणतात. किल्ल्याच्या खाली जी वस्ती आहे तिला 'पेटा' असे म्हणतात. या वस्तीत पण दक्षिणेकडून तटबंदी आहे. या अभेद्य किल्ल्याला

जिंकण्यासाठी इंग्रजांना जास्त लष्कराची व सामग्रीची आवश्यकता होती. अत: खानदेशातून इंग्रज सेनानी डव्हटनला, माळव्यातून इंग्रज अधिकारी जॉन मालकमला, हुशंगाबादहून ॲडॉम्सला, आणि पुण्याहून ले.कर्नल स्मिथला फौजफाटा व तोफखाना घेवून बोलविण्यात आले. आजपर्यंत कधीही जमला नसेल इतक्या प्रचंड सैन्यसागराने अशिरगडला वेढा दिला.

इंग्रजांनी दि. १७ मार्चला रात्री १२ वाजता पेटा वस्तीवर हल्ला सुरु केला. दि. २० मार्चला इंग्रजांनी पेटा वस्ती जिंकली. या हल्ल्यात इंग्रजांकडील प्रमुख सरदार ले.कर्नल फ्रेझर हा कामास आला. इंग्रजांच्या दारुगोळयास आग लागून त्यात इंग्रजांचे दोन लष्करी अधिकारी आणि शंभर शिपाई जळून मेले. दि.३० मार्चला इंग्रजांनी खालचा मालीगड हा किल्ला जिंकला. दि. ३१ मार्चला इंग्रजांच्या अफाट लष्कराने अशीरगडला वेढा दिला. किल्लेदार यशवंतरावाने किल्ल्यातून इंग्रजांवर तोफांचा प्रचंड मारा सुरु केला. मराठा हे वरच्या भागात होते आणि इंग्रज हे खालच्या भागात होते. त्यामुळे मराठ्यांपेक्षा इंग्रजांचे नुकसान दसपटीने होत असे. पण शेवटी दारुगोळा आणि दाणा-वैरण संपत आल्यामुळे आत्यंतिक निराशेने यशवंतरावाने दि.९ एप्रिल १८१९ ला किल्ला इंग्रजांच्या स्वाधीन केला.

आप्पासाहेब हे किल्ल्यात होते. पण इंग्रजांचा वेढा पडल्यानंतर ते वेशांतर करुन वेढ्यातून गुप्तपणे अशिरगडच्या वायव्येस असलेल्या खैरीघाटाजवळील धुळकोट येथे निघून गेले.

## ६. राष्ट्रोद्धारासाठी आप्पासाहेबांचे प्रयत्न

आप्पासाहेब हे धुळकोटहून बऱ्हाणपूरला गेले. येथे इंग्रजांचे सैन्य असल्यामुळे ते एका ब्राम्हणाच्या घरी गुप्तपणे राहिले. यानंतर ते गोसाव्याच्या वेशात नर्मदा पार करुन भोपालकडे गेले. भोपाळच्या नवाबाशी संपर्क साधून त्याला इंग्रजांविरुद्ध मदत मागितली. परंतु त्याने मदत देण्याचे नाकारले. यानंतर आप्पासाहेब हे अनेक ठिकाणी हिंडले आणि त्यांनी इंग्रजांविरुद्ध मदत मागितली. शिंदे, होळकर आणि जयपूर व जोधपूरच्या राजांनी आप्पासाहेबांना इंग्रजांविरुद्ध मदत देण्याचे नाकारले.

आप्पासाहेब हे राजस्थानातून थेट लाहोरला पोहचले. त्यांनी रणजितसिंगाची भेट घेतली. त्यावेळी त्यांनी रणजितसिंगाला एक हत्ती आणि एक उत्तम तलवार नजराणा म्हणून दिले. आप्पासाहेबांना यावेळेपर्यंत नागपूरहून गुप्तरितीने धनाचा पुरवठा होत होता. लाहोरच्या दक्षिणेला सात कोस अंतरावर त्यांनी १ लाख

फौज जमा केली होती. लष्कराचा भोजनखर्च दरबारातून होत असे. ही वार्ता इंग्रजांच्या कानावर जाताच त्यांनी रणजितसिंगाला आपली नाराजी कळविली. त्यामुळे रणजितसिंगाने आप्पासाहेबांना मदत करणे बंद केले.

आप्पासाहेब हे लाहोरहून अमृतसरला व नंतर ते तेथून कांगऱ्याचा राजा संसारचंद्र यास भेटण्यास गेले. कांगऱ्याच्या किल्ल्यात ते दोन वर्ष राहिले. येथून त्यांनी काबूलच्या झामनशहाचा मुलगा हैदर याच्याशी पत्रव्यवहार केला. काबूलची फौज बोलवून त्या फौजेच्या मदतीने दिल्लीपासून कन्याकुमारीपर्यंत मराठी सत्ता पुन: प्रस्थापित करायची आणि सतलजच्या उत्तरेकडील प्रदेश काबूलच्या राजाला द्यावयाचा, अशी ही योजना होती. ही गुप्त योजना उघडकीस येताच संसारचन्द्रने आप्पासाहेबांना कांगऱ्याचा किल्ला सोडून जाण्याची विनंती केली. इ.स.१८२३ मध्ये आप्पासाहेब हे मंडीचा राजा ईश्वरसेन याच्याकडे गेले. पण ईश्वरसेनही इंग्रजांविरुद्ध लढा पुकारण्यासाठी आप्पासाहेबांना मदत करण्यास तयार नव्हता. त्यामुळे त्यांनी ते ठिकाण सोडले. ''आप्पासाहेब हे इ.स.१८२८ पर्यंत पंजाबात हिंडत राहिले व भारतीय राजामहाराजांना इंग्रजांविरुद्ध एकजूट करण्याचा प्रयत्न करत राहिले. पण त्यातून काहीच निष्पन्न झाले नाही.''[1]

इंग्रजांनी आप्पासाहेबांना पकडण्यासाठी सातत्याने प्रयत्न केला. पण त्यात त्यांना यश आले नाही. भारताच्या कोणत्याही शासकाने आप्पासाहेबांना सहकार्य करु नये, असा प्रयत्नही इंग्रज सरकार सातत्याने करीत होते. त्यांचे हे प्रयत्न मात्र कामी आले व ते आप्पासाहेबांना एकटे पाडण्यात यशस्वी झाले. आप्पासाहेब हे इंग्रजांविरुध्द नवे संकट उपस्थित करु शकतात, अशी भीती इ.स.१८२८ पर्यंत इंग्रजांच्या मनात होती. यानंतर त्यांची ती भीती नाहीशी झाली. आप्पासाहेबांनी आपले प्रयत्न मात्र सोडले नाही. पंजाबहून ते टेहरी, गढवाल आणि नेपाळपर्यंत गेले. पण इंग्रजांविरुद्ध संघटित होण्याची कुणीच हिम्मत केली नाही. शेवटी, ''आप्पासाहेब हे मारवाडमधील नागोर येथे आले व तेथून ते जोधपूर संस्थानात गेले.''[2]

आप्पासाहेब हे जोधपूर येथे एका मंदिरात गोसाव्याच्या वेषात राहत असत. इ.स.१८२८ मध्ये इंग्रजांना याची माहिती मिळताच ते त्यांना पकडण्यासाठी आले असता आप्पासाहेब हे जोधूपर येथील मानमंदिरात (गुरुद्वारा) पळून गेले व तेथे त्यांनी आश्रय घेतला. त्यामुळे इंग्रजांचा नाईलाज झाला. यानंतर आप्पासाहेब

---

**1**. शिखांचा स्फूर्तिदायक इतिहास, शं.पु. जोशी, पृष्ठ क्र.१२०

**2.** Report of the Political Agent of Ajmer 3.6.1829

हे जोधपूर राजाच्या संरक्षणात व नजरकैदेत राहिले. ''आप्पासाहेब हे मानमंदिरात असतांना सदरलैंड हा दिल्ली सरकारचा अधिकृत वकील इंग्रजांच्यावतीने तेथे आला होता व त्याने वर्षासन स्वीकारुन उर्वरित आयुष्य सुखात काढावे अशी त्यांना विनंती केली होती. त्यावर, भिकाऱ्यासारखे जगणे आणि मरणे मी पसंत करीन पण माझ्या राज्याधिकाराच्या अधिकाराच्या आड येणाऱ्या इंग्रजांच्या कोणत्याही अटी स्वीकारणार नाही, असे बाणेदारपणे आप्पासाहेबांनी त्याला उत्तर दिले होते.''[1] आप्पासाहेबांच्या स्वाभिमानाचे, देशाभिमानाचे आणि राष्ट्राभिमानाचे हे एक ज्वलंत उदाहरण आहे.

आप्पासाहेब हे जोधपूरला नजरकैदेत असतांनाच बऱ्याच कालावधीनंतर दि.१५ जुलै १८४० रोजी मृत्यू पावले. त्यावेळी त्यांचे वय ४४ वर्षाचे होते.

## ७. इ.स.१८१८ च्या युद्धामागील मनोभाव

आप्पासाहेबांनी इंग्रजांविरुद्ध दोन युद्ध लढले. प्रथम, नागपूरचे युद्ध आणि दुसरे, पचमढीच्या डोंगरी भागात आश्रय घेवून लढलेले युद्ध. यापैकी पहिले युद्ध हे नागपूर राज्याच्या राज्यकारभारात इंग्रजांकडून होणारा हस्तक्षेप झुगारुन देण्यासाठी लढले गेले. या युद्धात परास्त झाल्यामुळे आप्पासाहेबांना इंग्रजांनी अपमानास्पद वागणूक दिली. त्यामुळे आप्पासाहेबांचा स्वाभिमान दुखावला, त्यांची राष्ट्रीय अस्मिता जागृत झाली आणि त्यांच्या मनात, सातासमुद्रापलिकडून आलेल्या गोऱ्या लोकांना भारताच्या कोणत्याही भूभागावर आपली गुलामगिरी लादण्याचा अधिकार नाही, हा भाव प्रबळ झाला. आप्पासाहेबांच्या मनात उत्पन्न झालेला हा भाव म्हणजेच राष्ट्रोद्धाराचा, मायभूवरील प्रेमाचा व स्वातंत्र्याचा भाव होय. आप्पासाहेबांनी इंग्रजांविरुद्ध पुकारलेले दुसरे युद्ध (इ.स.१८१८-१९) याच उदात्त व व्यापक भावनेने लढले गेले असून हे युद्ध खऱ्या अर्थाने स्वांतत्र्य युद्धच होते, असे प्रस्तुत संशोधकाचे स्पष्ट मत आहे. या मताच्या समर्थनार्थ वस्तुस्थिती खाली देत आहे-

१. आप्पासाहेबांनी सुरु केलेला दुसरा लढा कमजोर पडताच इंग्रजांच्या अनेक पलटणींनी त्यांना पकडण्यासाठी महादेवाच्या डोंगराभोवती गराडा घातला. अत: दि.१ फेब्रुवारी १८१८ ला आप्पासाहेबांनी पचमढीचे डोंगर सोडले व येथून ते इंग्रजांना झुकांड्या देत उत्तरेकडे निघून गेले. यापुढील आपल्या १० वर्षाच्या अज्ञातवासात (इ.स.१८२८ पर्यंत)

1. Imperial Record Dept-Govt.of of India Letter No.144

त्यांनी भारतीय राजामहाराजांना इंग्रजांविरुद्ध संघटित करण्यासाठी अथक परिश्रम केले. आप्पासाहेबांच्या त्या प्रयत्नात व तळमळीत इंग्रज हे परकीय असून, त्यांना भारताच्या कोणत्याही भूप्रदेशावर सत्ता गाजविण्याचा अधिकार नाही, हा त्यांच्या अंतर्मनातील भाव प्रतिबिंबित झालेला आहे. यातून आप्पासाहेबांनी इ.स.१८१८ मध्ये पचमढी आणि कामठ्याला केंद्र बनवून इंग्रजांविरुद्ध लढलेला लढा हा याच राष्ट्रोद्धाराच्या भावनेतून लढला गेला आणि हा खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य लढाच होता ही बाब सूर्यप्रकाशासारखी स्पष्ट होते.

२. आप्पासाहेब हे भारतमातेच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या अंतिम श्वासापर्यंत तळमळत राहिले आणि विनाशकाळाच्या त्या अंधकारातही राष्ट्रोद्धाराच्या तेजस्वी बाण्याने चमकत राहिले. त्यांच्या उर्वरित जीवनातील या घटनाक्रमातून त्यांच्या अंतर्मनाचे दर्शन आपणास घडते. यातून इ.स. १८१८ मध्ये त्यांनी इंग्रजांविरुद्ध उभारलेल्या युद्धाच्या मागे 'स्वदेशप्रेम' हीच त्यांची प्रेरणा होती याची साक्ष पटते, आणि त्यांनी इंग्रजांविरुद्ध उभारलेला दुसरा लढा हा स्वातंत्र्य लढाच होता ही बाब प्रमाणित होते.

३. उदात्त व व्यापक ध्येयाने सुरु केलेल्या कार्यात व्यापक जनसहयोग मिळवून देण्याचे आणि हातून विलक्षण कार्य घडवून आणण्याचे सामर्थ्य असते. आप्पासाहेबांनी इंग्रजांविरुद्ध लढलेला दुसरा लढा हा त्यांनी सत्तेचा मोह झुगारुन राष्ट्रोद्धाराच्या उदात्त भावनेने लढला. हाच भाव त्यांनी या युद्धाच्या सुरुवातीला आपल्या सहकाऱ्यांत जागविला होता. म्हणूनच हा दुसरा लढा नागपूरच्या लढ्यापेक्षा जास्त व्यापक बनला व त्यापेक्षा जास्त काळ लढला गेला. तसेच नागपूर युद्धाच्या वेळी आप्पासाहेबांच्या कृतीत जे धरसोडपणाचे दर्शन घडले, ते या दुसऱ्या लढ्याच्या प्रसंगी घडले नाही. याउलट त्यांनी अविस्मरणीय साहस व पराक्रमाचा परिचय घडवत इंग्रजांना आपल्या पाठीमागे सतत आठ महिने झुलवत ठेवले. यातूनही आप्पासाहेबांनी इंग्रजांविरुद्ध लढलेला दुसरा लढा हा राष्ट्रोद्धाराच्या भावनेने लढलेला असून याला स्वातंत्र्य लढा असे संबोधित करणे सर्वथा योग्य आहे, ही बाब प्रकर्षाने स्पष्ट होते.

## ८. अभिमानास्पद वारसा

इ.स.१८१८ च्या स्वातंत्र्य लढ्याच्या प्रसंगी जे शूरवीर राष्ट्रोद्धाराच्या तेजस्वी बाण्याने चमकले त्यांनी या लढ्यातून स्वातंत्र्याचा उद्‌घोष केला आणि संपूर्ण भारताला नव्या युगाचा नवा मंत्र दिला. हा मंत्र होता स्वातंत्र्याचा---हा मंत्र होता शौर्याचा--- हा मंत्र होता राष्ट्रोद्धाराचा--- म्हणूनच त्यांचा काळ हा मध्ययुग व आधुनिक युगाचा संधीकाळ म्हणूनही जाणला जातो. परंतु वाळूतील रेघोट्या जशा पुसल्या जातात तसा या पहिल्या स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास जनमानसाच्या स्मृतीतून पुसला जात आहे. पण, इतिहास विसरणाऱ्या आणि अर्धवट इतिहास अभ्यासणाऱ्या देशाला भवितव्य नसते. ही बाब लक्षात घेता पहिल्या स्वातंत्र्य लढ्यापासून फारकत घेत भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास प्रस्थापित करण्याचा कुणी आग्रह धरीत असेल तर त्याला माफ करणे कदापि शक्य नाही. इ.स.१८१८ च्या स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास हा संपूर्ण भारतासाठी अभिमानास्पद वारसा आहे.

## ९. विचारांचे बीजारोपण

आप्पासाहेब आणि चिमणा बहादूर यांच्या नेतृत्वाखाली ज्यावेळी स्वातंत्र्य लढा सुरु होता त्यावेळी पेशवा बाजीराव द्वितीय यांनी गंगाकिनारी ब्रम्हावर्त येथे शांतपणे जीवनयापन करणे सुरु केले होते. आप्पासाहेबांच्या असामान्य साहसाची माहिती क्वचित प्रसंगी त्यांना मिळत होती. या स्वातंत्र्य लढ्यात सहभागी शूरवीरांचे धाडस आणि त्यांचे मायभूमीवरील प्रेम या दोन गोष्टींमुळे ते प्रभावित झाले. त्यामुळे त्यांच्या मनात स्वातंत्र्याची ज्वाला पुन: धगधगू लागली.

बाजीराव द्वितीय हे जेव्हा मराठा साम्राज्याचे पेशवा होते तेव्हा त्यांचा जसा दबदबा सर्व संस्थानिकात कायम होता तो त्यांनी पेशवे पद गमावल्यानंतर व इंग्रजांकडून निवृत्तिवेतन स्वीकारणे सुरु केल्यानंतर तसाच कायम राहिला नाही. इंग्रजांच्या भाकरीच्या तुकड्यांवर जगणाऱ्यासमोर आपण दबकून का वागायचे, हा भाव स्वाभिमानी भारतीय संस्थानिकांत उत्पन्न होवून बाजीराव हे त्यांच्या उपहासाचे पात्र झाले. वेळोवेळी सोसाव्या लागणाऱ्या या उपहासामुळे ते पश्चातापदग्ध झाले आणि त्यांच्या मनात पूर्वीच धगधगत असलेली स्वातंत्र्याची ज्वाला अधिक प्रखर बनली. परिणामस्वरुप, आपण आपल्या हयातीत जे करु शकलो नाही ते नवीन पिढीने तरी करावे, अशी हळहळ त्यांच्या मनात सुरु झाली. यामुळे त्यांनी मोरोपंताची मुलगी मणिकर्णिका, तात्या टोपे व नानासाहेब

यांना मराठ्यांचा, राजपुतांचा व शिखांचा ओजस्वी इतिहास जाणून घेण्याची आणि भारत मातेच्या स्वातंत्र्यासाठी लढण्याची प्रेरणा दिली. अशाप्रकारे इ.स.१८१८ च्या स्वातंत्र्य लढ्यामुळे इ.स.१८५७ च्या स्वातंत्र्य लढ्याचे बी पेरले गेले.

## १०. दोन स्वातंत्र्ययुद्धांची तुलना

एकोणिसाव्या शतकात इंग्रजांविरुद्ध भारतात दोन स्वातंत्र्य युद्ध घडून आले. यापैकी पहिले स्वातंत्र्य युद्ध इ.स.१८१८ मध्ये आणि दुसरे स्वातंत्र्य युद्ध इ.१८५७ मध्ये घडून आले. या दोन्ही स्वातंत्र्य युद्धातील साम्य आणि भेद खालीलप्रमाणे आहेत–

### १०.०१ स्वातंत्र्य युद्धातील साम्य

हे दोन्ही स्वातंत्र्य युद्ध ब्रिटिश इस्ट इंडिया कंपनीच्या साम्राज्यवादाविरुद्ध, भारतीय शासकांनी राष्ट्रोद्धाराच्या भावनेने लढलेले असून त्यात स्थानिक लोकांचा देखील सहभाग होता. या दोन्ही स्वातंत्र्य युद्धामुळे भावी काळात भारतीयांना ब्रिटिश सरकारच्या जुलमी राजवटीविरुद्ध लढण्याची प्रेरणा मिळाली.

### १०.०२ स्वातंत्र्य युद्धातील भेद

या दोन्ही स्वातंत्र्य युद्धाच्या स्वरुपात असलेली भिन्नता खालीलप्रमाणे अधोरेखित करता येईल–

**अ) वेगवेगळे धोरण कारणीभूत**

इंग्रजांनी भारतात साम्राज्यविस्तार करण्यासाठी वेळोवेळी परिस्थितीनुसार वेगवेगळे धोरण आखले. गव्हर्नर जनरल वेलस्लीने आखलेले तैनाती फौजेचे धोरण हे प्रथम स्वातंत्र्य युद्धाला कारणीभूत होते, तर गव्हर्नर जनरल लॉर्ड डलहौसीने लागू केलेले भारतीय संस्थाने खालसा करुन त्यांना इंग्रजी साम्राज्यात विलीन करण्याचे धोरण हे दुसऱ्या स्वातंत्र्य युद्धाला कारणीभूत होते.

**ब) तात्कालिक कारणासंबंधी भेद**

नागपूरच्या युद्धात (इ.स.१८१७) आप्पासाहेब परास्त झाल्यामुळे रेसिडेंट जेन्किन्सने त्यांना कैद केले व अपमानास्पद वागणूक दिली. त्यामुळे आप्पासाहेबांचा स्वाभिमान दुखावला, हे इ.स.१८१८च्या प्रथम स्वातंत्र्य लढ्याचे तात्कालिक कारण होय. काडतूस प्रकरणामुळे इंग्रजांच्या फौजेतील भारतीय हिंदू व मुसलमान सैनिकांच्या धार्मिक भावना दुखावल्या,

हे इ.स.१८५७ च्या दुसऱ्या स्वातंत्र्ययुद्धाचे तात्कालिक कारण होय.

**क) नेतृत्वाच्या बाबतीत भिन्नता**

प्रथम स्वातंत्र्य युद्ध हे आप्पासाहेब भोसले, कामठा व लांजीचे मनसबदार चिमणा बहादूर, हरईचा गोंड राजा चैनशहा, पचमढीचा ठाकूर मोहनसिंग, चित्तु पेंढारी इत्यादींच्या पुढाकाराने घडून आला होता. द्वितीय स्वातंत्र्य युद्ध हे झाशीची राणी लक्ष्मीबाई, तात्या टोपे, फैजाबादचा मौलवी अहमदउल्ला, दुसऱ्या बाजीरावांचा दत्तक पुत्र पेशवा नानासाहेब, दिल्लीचा बादशहा बहादुरशहा, बेगम हजरंत महल, मोगल सेनापती बख्तखान, पश्चिम बिहारमधील जगदीशपूरचे जमीनदार कुवरसिंग इत्यादींच्या नेतृत्वात घडून आला.

पहिल्या स्वातंत्र्य लढ्यामुळे वीर राजे चिमणा बहादूर यांचे नाव अजरामर झाले. द्वितीय स्वातंत्र्य लढ्यामुळे महाराणी लक्ष्मीबाई आणि तात्या टोपे यांचे नाव लोकांच्या ओठांवर खेळू लागले.

**ड) व्याप्तीसंबंधी तफावत**

प्रथम स्वातंत्र्य युद्ध हे मध्यभारतात घडून आले. हे युद्ध उत्तरेकडील सागर, जबलपूर, पचमढीपासून दक्षिणेकडील चंद्रपूरपर्यंत आणि पश्चिमेकडील मेळघाटपासून पूर्वेकडील लांजी-कामठा एवढ्या व्यापक प्रदेशात लढले गेले. द्वितीय स्वातंत्र्य युद्ध हे दिल्ली, झाशी, ग्वाल्हेर, लखनौ, कानपूर व अयोध्यापासून संपूर्ण राजपूताना पर्यंत आणि मध्यभारत, बुंदेलखंड व बिहार एवढ्या अफाट प्रदेशात पसरले होते. दुसऱ्या स्वातंत्र्य युद्धाचे लोण दक्षिण भारतातही पोहचले होते. यावेळी नागपूर, सातारा, कोल्हापूर, नरगुंद अशा ठिकाणीदेखील इंग्रजांविरुद्ध उठाव झाले होते.

**इ) लोकसहभागाविषयी अंतर**

पहिल्या स्वातंत्र्य युद्धात काही अंशी स्थानिक नागरिकांचा आणि शिवणी व मेळघाट या भागातील आदिवासी-वनवासींचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता. या स्वातंत्र्य युद्धात महिलांचा प्रत्यक्ष सहभाग नव्हता. द्वितीय स्वातंत्र्य युद्धात आदिवासी, वनवासी, स्थानिक नागरिक, इंग्रजी फौजेतील भारतीय शिपाई आणि भारतीय महिलांचा देखील सहभाग होता. दुसऱ्या स्वातंत्र्य युद्धाला राष्ट्रीय स्वरुप प्राप्त झाले होते.

## ११. आप्पासाहेबांच्या प्रयत्नाचे मोल

भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासात इ.स.१८१८ च्या पहिल्या स्वातंत्र्य लढ्याला एक वेगळे महत्त्व आहे. कारण येथूनच इंग्रजांविरुद्ध भारतीयांच्या उठावाची श्रृंखला सुरु झालेली आहे. यानंतरच्या काळात येथे शेतकरी, आदिवासी आणि वनवासी लोकांचे इ.स.१८२६, २७, ३१, ३३, ४४, ४५ मध्ये उठाव झाले. महाराष्ट्रात उमाजी नाईकाच्या नेतृत्वाखाली झालेला रामोशांचा उठाव हा सुप्रसिद्ध आहे. त्याने एक जाहिरनामा काढून इंग्रजांविरुद्ध लढा देण्याचे व कंपनी सरकारची सत्ता झुगारुन देण्याचे आवाहन केले होते. इ.स.१८३२ मध्ये त्याला फाशी देण्यात आली.

आधुनिक काळात आंदोलनामुळे लोकजागृती घडून येते, त्याचप्रमाणे त्याकाळी उठावांमुळे लोकजागृती घडून आली. इंग्रजी शासनाविरुद्ध पूर्वी जे-जे उद्रेक झाले त्यांचीच परिणती पुढे इ.स. १८५७ च्या स्वातंत्र्य युद्धात झाली. भारताचा हा दुसरा स्वातंत्र्य लढा एकाएकी झालेला नव्हता. त्यामागे मागील प्रयत्नांची किंबहुना इ.स. १८१८ च्या पहिल्या स्वातंत्र्य युद्धाची प्रेरणा कारणीभूत होती. यातच पहिल्या स्वातंत्र्य युद्धाचे आणि चिमणा बहादूर व आप्पासाहेबसारख्या शूरवीरांचे मोल सामावलेले आहे. आप्पासाहेबांच्या निधनानंतर अवध्या सतराव्या वर्षी भारताचा दुसरा स्वातंत्र्य लढा घडून आला, ही बाब लक्षात घेतली की मग आप्पासाहेब, चिमणा बहादूर, हरईचा राजा चैनशहा आणि पचमढीचा ठाकूर मोहनसिंग यांच्या कार्याचे मोल जास्त खुलून दिसते.

■ ■ ■

# १३. चिमणा बहादूर : इतिहासात स्थान व महत्त्व

## १. संशोधनाची फलश्रुती

**वी**र राजे चिमणा बहादूर, कामठा जमीनदारी आणि कामठा परगणा यासंबंधी उपलब्ध जुने ऐतिहासिक तथ्य, नवीन उपलब्ध झालेले ऐतिहासिक तथ्य आणि त्यांचे अध्ययन-विश्लेषण-टीकात्मक परीक्षण यातून चिमणा बहादूरच्या इतिहासाचे खरे चित्र स्पष्ट झालेले आहे. हीच या संशोधनाची फलश्रुती आहे. प्रस्तुत संशोधनाची निष्पत्ती, निष्कर्ष आणि तत्संबंधी सूचना (Findings, Conclusion and Suggestions) संक्षिप्त स्वरुपात खाली देत आहे.

## २. अद्वितीय जमीनदारी

कामठा जमीनदारी ही नागपूर राज्यातील एक निष्ठावंत, ऐश्वर्यसंपन्न व शक्तिशाली जमीनदारी होती. नागपूरचे राजे रघूजी प्रथम यांनी ज्याप्रमाणे संपूर्ण मराठा साम्राज्यात नागपूर राज्याला गौरवपूर्ण स्थान प्राप्त करुन दिले होते, त्याचप्रमाणे कामठ्याच्या जमीनदारांनी नागपूर राज्यात कामठा जमीनदारीला महत्त्वपूर्ण स्थान मिळवून दिले होते. रघूजी प्रथम यांनी नागपूर राज्यात शेतीचा विकास घडवून आणला. यासाठी त्यांनी पश्चिम महाराष्ट्रातून अनेक कुनबी अथवा शेतकरी कुटुंबाना आणून नागपूर राज्यात वसविले. विणकर अथवा कोष्टी समाजातील लोकांना नागपूर राज्यात वसविण्याचे श्रेय देखील रघूजी प्रथम यांनाच आहे. विकासाच्या बाबतीत कामठ्याच्या जमीनदारांनी राजे रघूजी प्रथम यांचाच आदर्श आपल्या दृष्टीसमोर ठेवला व त्यांचेच अनुसरण केले. जमीनदारांच्या प्रोत्साहनामुळेच कामठ्यात त्याकाळी अडकित्ते बनविणे आणि चामड्याचे जोडे तयार करणे असे दोन उद्योग प्रसिद्धीस आले. उद्योगधंदयांच्या भरभराटीमुळे कामठा या गावाला नगरीचे स्वरुप प्राप्त झाले.

कोलुबापू हे कामठा जमीनदारीचे संस्थापक होत. त्यांनी या जमीनदारीचा पाया रचला. सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यासाठी उप-जमीनदाऱ्या व शिकमी जमीनदाऱ्या स्थापन केल्या. प्रशासनाची घडी नीट बसवून त्यांनी आपल्या अधिकारक्षेत्राखालील प्रदेशाला परगण्याचा दर्जा प्राप्त करवून घेतला. त्यांनीच कामठा परगण्याच्या भावी प्रगतीचे बीजारोपण केले. गोंदिबापू यांनी कामठा परगण्याला वैभवाच्या अत्युच्च शिखरावर पोहचविले. चिमणा बहादूर यांनी या परगण्याला एक दृढ व शक्तिशाली परगणा म्हणून पुणे पासून इंदौर-ग्वाल्हेरपर्यंत पसरलेल्या मराठा साम्राज्यात ओळख मिळवून दिली.

कामठा येथील वरील तिन्ही जमीनदारांनी कर्तव्यनिष्ठेने, दूरदृष्टीने आणि जनकल्याणाच्या उदात्त भावनेने अविरत कार्य करुन या जमीनदारीचा आणि परगण्याचा उत्कर्ष घडवून आणला. हे तिन्ही जमीनदार नागपूर राज्यातील समकालीन जमीनदारांत पहिल्या क्रमांकाचे स्थान प्राप्त करुन जगले आणि भोसले राजवंशातील राजांच्या गळ्यातील ताइत बनून सन्मानाने सर्वत्र वावरले.

## ३. लढ्याचा निर्णय पूर्णत: योग्य!

चिमणा बहादूर आणि गोंदिबापू यांच्या व्यक्तिमत्त्वाबाबत मि. लॉरेन्सने बंदोबस्त अहवालात ‘Vigorous’ हा सूचक शब्द वापरला आहे. व्यक्तिमत्त्वाच्या वेगवेगळ्या छटा एकवटलेला हा शब्द असून तो गोंदिबापू आणि चिमणा बहादूरच्या व्यक्तिमत्त्वाबाबत थोडक्यात बरेच काही सांगून जातो. हे दोन्ही जमीनदार उत्साही (energetic) आणि शक्तिशाली (forcible) होते. त्यांचे व्यक्तिमत्त्व परिणामकारक (effective) होते. ही बाब मि. लॉरेन्सच्या उपर्युक्त शब्दप्रयोगातून प्रमाणित होते.

नागपूरला स्थाई रुपाने वास्तव्य करीत असलेला इंग्रज अधिकारी रेसिडेंट जेन्किन्स हा चिमणा बहादूरला चांगल्याप्रकारे ओळखत होता. भोसले राजवटीतील नारायण पंडितसारखे राजकारणी लोक रेसिडेंट जेन्किन्ससमोर चिमणा बहादूरची मुक्तकंठाने प्रशंसा करीत असत. पण इंग्रजांनी नागपूर राज्यावर आपली पकड मजबूत करणे सुरु करताच कामठ्याचे जमीनदार चिमणा बहादूर यांची झोप उडाली आणि त्यांचा ओजस्वी इतिहास झपाट्याने पुढे सरकू लागला. अंतत: चिमणा बहादूरने इंग्रजांविरुद्ध स्वातंत्र्य लढ्याचे रणसिंग फुंकले.

स्वातंत्र्यासाठी प्रत्येक व्यक्ती, समाज व राष्ट्र निरंतर धडपडत असतो. म्हणूनच सृष्टीच्या पाठीवर गुलामगिरीच्या बेड्या झुगारुन देण्यासाठी आजपर्यंत अनेक युद्ध लढले गेले व असख्य लोकांनी बलिदान दिले. चिमणा बहादूरने इंग्रजांविरुद्ध पुकारलेले युद्ध अशाच स्वरुपाचे होते. यातून त्यांनी घेतलेला युद्धविषयक निर्णय सार्थक सिद्ध होतो.

या स्वातंत्र्य लढ्यासंबंधी एखाद्याच्या मनात असा विचार उद्‌भवू शकतो की चिमणा बहादूरला इंग्रजांच्या प्रबळ लष्करी सामर्थ्याची पुरेपूर कल्पना नसल्यामुळे कदाचित् त्यांनी त्यांच्याविरुद्ध लढण्याचा निर्णय घेतला असेल. यावर संशोधकाचे म्हणणे असे की, नागपूरच्या लढ्यात इंग्रजांनी मराठ्यांना पराभूत करुन तेथील राजवाड्यावर आपला युनियन जॅक फडकविला व राजधानीवर कब्जा केला. या

ऐतिहासिक घटनेनंतरही चिमणा बहादूर हे इंग्रजांच्या प्रबळ लष्करी सामर्थ्याविषयी अनभिज्ञ राहिले असतील, असा विचार मनात उद्भवणे हे केवळ शंकाखोर मनाचे व्यर्थ सुरु असलेले उपद्व्याप नव्हे काय?

स्वातंत्र्य लढ्याबाबत कोणी असेही म्हणून शकतो की, इंग्रजांचे लष्करी सामर्थ्य जास्त असतांना त्यांच्याविरुद्ध लढा पुकारणे हे चिमणा बहादूरच्या फाजील आत्मविश्वासाचे, अनावश्यक धीटपणा आणि अविचाराचे लक्षण आहे. यावर संशोधकाचे उत्तर असे की, स्वाभिमान हेच शूरवीरांचे भूषण आहे आणि शूरवीराला आपले शौर्य सत्कारणी लावण्यासाठी अफाट लष्कराच्या मदतीची नव्हे तर सुयोग्य प्रसंग उपलब्ध होण्याची आवश्यकता असते. चिमणा बहादूर यांच्या समोर अन्यायाचा प्रतिकार करण्याची योग्य वेळ उपस्थित होताच ते शत्रुच्या विरोधात उभे राहिले व आपल्या पूर्ण सामर्थ्यानिशी लढले. यामुळेच ते शूरवीरांच्या परंपरेत आपले नाव स्वर्णाक्षरांनी अंकित करु शकले. अन्यथा त्यांचे नाव एकतर काळाच्या खोल खाईतील काळ्याकुट्ट अंधारात गडप झाले असते अथवा त्यांचे नाव 'भ्याड' लोकांच्या पंक्तीत काळया अक्षरांनी लिहिले गेले असते. तात्पर्य, चिमणा बहादूर यांनी मायभूच्या स्वातंत्र्यासाठी इंग्रजांविरुध्द स्वातंत्र्य लढा पुकारला, हा त्यांचा निर्णय अविचारपूर्ण नव्हे तर त्यांच्या पुरुषार्थपूर्ण जीवनाला सुसंगत व सर्वथा योग्य होता.

चिमणा बहादूर यांनी इंग्रजांविरुद्ध पुकारलेला लढा हा अस्मिता, स्वाभिमान आणि संस्कृतीच्या रक्षणासाठी होता. पेशवा बाजीराव आणि आप्पासाहेब भोसले यांना कशाप्रकारे राजत्याग करावा लागला हे त्यांना अवगत होते. स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी मराठ्यांना बलिदान देतांना त्यांनी पाहिले होते. म्हणून इंग्रजांविरुद्ध लढण्याची धुंद त्यांना चढली होती. युद्धाचे वाटेल ते परिणाम भोगण्याची त्यांची तयारी होती व त्यासाठी वाटेल ते स्वार्थत्याग करण्याएवढा साहस चिमणा बहादूरमध्ये होता. म्हणून त्यावेळी त्यांच्या कृतीतून, इंग्रजांविरुद्ध जनमानसात व्याप्त असलेला शत्रुत्वाचा भाव मुक्तपणे ओसंडून वाहू लागला. त्यांचा हा लढा केवळ एक साधारण लढा नसून सुदूर भविष्यातील भारतीय इतिहासाची ती नांदी होती. त्यांनी पत्करलेल्या मार्गाचे भविष्यात कोणत्या-ना-कोणत्या स्वरुपात, कधी-ना-कधी सकळ भारतीयांना अवलंब करावे लागेल हे विधिलिखित विधान त्यावेळी काळाच्या गर्भात दडलेले होते. भारताचा इतिहास साक्षी आहे की, काळाची पावले चिमणा बहादूरने उचललेल्या त्या पावलांच्या दिशेनेच सुदूर भविष्यात पुढे पडली. चिमणा बहादूरचा दृष्टेपणा जगाला कळावा यासाठी याशिवाय ज्वलंत विश्लेषण काय असणार?

## ४. नियती जिंकली

सबळ आत्मविश्वास व पर्याप्त सामर्थ्य असूनही अत्यंत विपरीत परिस्थिती उद्‌भवल्यास कितीही केले तरी शेवटी पराजयच पदरी पडत असते, माणूस नियतीचा शिकार होतो, ही बाब चिमणा बहादूरच्या इतिहासातून अधोरेखीत होते. चिमणा बहादूर हे देखील नियतीचे शिकार झाले. पण विपरीत परिस्थितीसमोर गुडघे न टेकता अस्मिता, स्वाभिमान व स्वातंत्र्य या मूल्यांच्या रक्षणासाठी सर्वस्व पणाला लावण्यासाठी तत्पर असणे हेच मानवाचे खरे धर्म होय, आणि या धर्माचे निर्वाह करण्याचे कार्य चिमणा बहादूर यांनी पूर्ण निष्ठा, साहस आणि क्षमतेनिशी केले. योग्य वेळी योग्य निर्णय घेतल्यामुळे त्यांचे जीवन हे दीपस्तंभाप्रमाणें भावी पिढीचे सदैव पथ प्रदर्शित करत राहील. त्यांचे जीवन नव्या पिढीला हिम्मत व बहादुरीने पुरुषार्थपूर्ण जीवन जगण्याची, मायभूमीच्या स्वातंत्र्यासाठी सतत जागरुक राहण्याची आणि स्वातंत्र्य रक्षणासाठी सर्वस्व पणाला लावण्याची प्रेरणा देत राहील.

## ५. चिमणा बहादूरचे वेगळेपण

राजे चिमणा बहादूर हे आत्मविश्वास, स्वाभिमान, ठामपणा आणि नेतृत्व क्षमता हे सिंहाचे चार स्वाभाविक गुण अंगभूत असल्यामुळे १८१८ चा स्वातंत्र्य लढा शौर्याने लढले. इंग्रजांविरुद्ध स्वातंत्र्य लढा उभारण्याचे साहस करुन त्यात पूर्ण सामर्थ्यानिशी पराक्रम गाजविल्यामुळे शूरवीरांच्या परंपरेत त्यांचे नाव कोरले गेले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या संदर्भात मि. लॉरेन्स या इंग्रज अधिकाऱ्याने बंदोबस्त अहवालात नमूद केलेला ‘Vigorous’ हा शब्द सहजासहजी त्याच्या लेखणीतून उतरलेला नसून तो शब्द, चिमणा बहादूरने स्वातंत्र्य लढ्यात इंग्रजांना ‘लोखंडाचे चणे चावायला भाग पाडले’ याची लेखी साक्ष देतो. तसेच हा शब्द त्यांच्या नावासोबत लावलेले ‘वीर राजे’ आणि ‘बहादूर’ हे दोन्ही विशेषण कधीकाळी लोकांद्वारे पूर्ण समंजसपणे लावले गेले आहेत, हेही प्रमाणित करतो. म्हणून मराठ्यांच्या इतिहासात अद्‌भुत कृत्ये करणारे जे काही थोडे पुरुष उदयास आले त्यातच वीर राजे चिमणा बहादूर यांची गणना करावी लागेल.

भारतीय इतिहासाच्या संदर्भात विचार केला तर भारतावरील परकियांची आक्रमणे रोखण्यासाठी, परकीय राजवटीतून भारतीय भूप्रदेश मुक्त करण्यासाठी आणि स्वराज्याची मशाल तेवत ठेवण्यासाठी प्राचीन काळापासून आजपर्यंत ज्या असंख्य लोकांनी व राजामहाराजांनी रणभूमीत पराक्रम गाजविला, अपार हालअपेष्टा

भोगल्या व सर्वस्वाचा त्याग केला अशाच पराक्रमी लोकांच्या मालिकेत कामठ्याचे जमीनदार 'वीर राजे चिमणा बहादूर' यांचे स्थान अढळ आहे.

## ६. पहिल्या प्रयत्नाचे मोल

इ.स.१८१७ मध्ये पेशवा बाजीराव द्वितीय आणि आप्पासाहेब भोसले यांचे राज्य त्यांच्या हातून निघून गेल्यानंतरही इंग्रजांविरुद्ध निर्णायक लढा पुन्हा एकदा सुरु करण्याविषयी या दोन्ही शासकांत गुप्तपणे प्रयत्न सुरु होते. पण ते प्रयत्न फिस्कटले. बाजीराव द्वितीय यांनी निवृत्तिवेतन घेवून ब्रम्हावर्तास राहणे स्वीकारले. आप्पासाहेबांनी मात्र स्वातंत्र्य लढ्याची सुरुवात केली. पुढे याच ब्रम्हावर्तातील टोलेगंज वाड्यात, बाजीरावांच्या सान्निध्यात झाशीची राणी लक्ष्मीबाई यांचे बालपण घडले. लक्ष्मीबाईंचे कार्य–कर्तृत्व व पराक्रम आठवले की १८१८ च्या व १८५७ च्या स्वातंत्र्य युद्धात एक नाजूक धागा जुडलेला दिसू लागतो, आणि १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्याचा प्रेरणास्त्रोत १८१८ च्या स्वातंत्र्य लढ्यात असलेला जाणवतो. पहिल्या स्वातंत्र्य लढ्यात जे लक्ष्य आप्पासाहेब व चिमणा बहादूर यांना साध्य झाले नाही तेच लक्ष्य दुसऱ्या स्वातंत्र्य लढ्यात पेशवा नानासाहेब, महाराणी लक्ष्मीबाई, तात्या टोपे इत्यादींनी साध्य करण्याचा प्रयत्न केला. यातून चिमणा बहादूर आणि आप्पासाहेब भोसले यांनी पहिल्या स्वातंत्र्य लढ्याच्या स्वरुपात पार पाडलेल्या भूमिकेचे एक वेगळे मोल लक्षात येते.

इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त होण्यासाठी सुरु केलेल्या पण अपयशी ठरलेल्या दोन्ही स्वातंत्र्य लढ्यांपासून धडा घेऊनच भावी काळात हाच प्रयत्न स्वातंत्र्य चळवळीच्या स्वरुपात पुढे आला व अंततः १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाले. या पार्श्वभूमीवर चिमणा बहादूर हे भारतीय स्वातंत्र्यविषयक प्रयत्नांचे एक प्रारंभिक बिंदू ठरतात. त्यांचे वर्तमान भारतीय स्वातंत्र्याशी अतूट नाते आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासाच्या संदर्भात चिमणा बहादूरच्या पहिल्या प्रयत्नाचे मोल अधोरेखित करतांना इंग्रजीतील एक सुविचार आठवतो, तो असा – ''Success is the result of continuous efforts in right direction. The stone is broken by the last stroke. This doesn't mean that the first stroke was useless.''

## ७. वैनगंगेचा खरा सुपुत्र

हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंतचा जो भूप्रदेश प्राचीन काळापासून आजपर्यंत भारत या नावाने जाणला जातो. येथे वास्तव्य करणाऱ्या लोकांची संस्कृती

अथवा जीवनशैली ही जगातील अन्य भूप्रदेशातील लोकांपेक्षा वेगळी आहे. त्यामुळे या भारतभूमीवर आक्रमण करणाऱ्या आक्रात्यांचा वा त्यांनी येथे प्रस्थापित केलेल्या राजवटींचा, सुरुवातीपासून आजपर्यंत भारतातील ज्या-ज्या शासकांनी वा लोकांनी प्राणपणाला लावून विरोध केला, तसेच या भारताची सांस्कृतिक पताका ज्यांनी-ज्यांनी जगाच्या पाठीवर फडकविली त्यांना आपण '**भारत मातेचे सुपुत्र**' म्हणून गौरवान्वित करतो. याच दृष्टीने चिमणा बहादूर यांना '**भारत मातेचा खरा सुपुत्र**' संबोधणे आणि त्यांना '**स्वातंत्र्याचा खरा उपासक**' म्हणून गौरवान्वित करणे सर्वथा न्यायोचित आहे.

वैनगंगेकाठच्या चिमणा बहादूरने अद्भुत साहस पत्करुन इ.स. १८१८ मध्ये इंग्रजांविरुद्ध स्वातंत्र्य लढा उभारला, सर्वस्व पणाला लावले व समाजासमोर एक नवा आदर्श प्रस्तुत केला. म्हणून भारतातील हा वीर पुरुष '**वैनगंगा वीर**' आणि '**वैनगंगेचा खरा सुपुत्र**' म्हणून सदैव आठवला जाईल.

## ८. 'त्यांच्या' शिवाय इतिहास अपूर्ण

इंग्रज विरुद्ध चिमणा बहादूर हा लढा आप्पासाहेब भोसले यांनी पुकारलेल्या स्वातंत्र्य लढ्याचाच एक अविभाज्य अंग होता. म्हणून चिमणा बहादूरशिवाय पहिल्या स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास अपूर्ण आहे. मराठ्यांच्या इतिहासावर ग्रंथरचना करणाऱ्या लेखकांनी या स्वातंत्र्य लढ्यातील चिमणा बहादूरच्या भूमिकेची दखल घ्यायला हवी. १८१८ च्या स्वातंत्र्य लढ्याचे वर्णन करतांना त्यात चिमणा बहादूरने इंग्रजांविरुद्ध केलेल्या लढ्यांचा समावेश केला तर त्यामुळे त्या स्वातंत्र्य लढ्याचे खरे चित्र वाचकांसमोर स्पष्ट होईल व लेखकही या इतिहासाला खरा न्याय देवू शकतील.

इ.स. १८१८ च्या स्वातंत्र्य लढ्यात चिमणा बहादूर हे आप्पासाहेबांचे सर्वात प्रबळ सहकारी होते. त्या रणधुमाळीच्या काळात चिमणा बहादूरसारख्या अनेक बाणेदार व्यक्तींनी खूप पराक्रम गाजविले. त्या सर्वांचे अद्भुत चरित्र बारीक तपशिलांनी सजवून राष्ट्रप्रेमाच्या उदात्त वृत्तीने लिहिले गेले तर आपण त्यांच्या ऋणातून अंशत: उऋण होवू व त्यातून या स्वातंत्र्य लढ्याचा आणि मराठ्यांचा इतिहासही अधिक समृद्ध होईल.

■ ■ ■

## १४. परगणे कामठा : घटनाक्रम

१. इ.स. १७५१– मराठ्यांनी कटक (ओडिशा) जिंकले. कोलुबापू बहेकार यांना राजे रघूजी प्रथमकडून कामठा जमीनदारीची प्राप्ती. कोलुबापूंचा शासन प्रारंभ.

२. इ.स. १७५६– कोलुबापूंचा मोठा मुलगा पांडुबापू याला राजे जानोजीकडून आमगाव जमीनारीची प्राप्ती. आमगावला स्वतंत्र जमीनदारीचा दर्जा प्राप्त.

३. इ.स. १७५१ ते १७८८– हट्टा, लिंगा, किरणापूर व फुलचूर या उप–जमीनदारींची स्थापना. बिंजली व केशोरी (देवरी चिचगड मार्ग) या शिकमी जमीनदारींचा उदय. कामठा जमीनदारीची क्षेत्रवाढ. कामठ्याला परगण्याचा दर्जा प्राप्त.

४. इ.स. १७८८–खांदेपालट. गोंदिबापूंचा जमीनदार या नात्याने राज्यकारभार प्रारंभ.

५. इ.स. १७९६– आमगाव जमीनदारीची नवीन सनद राजे रघूजी द्वितीयकडून चिमणा बहादूरने मिळवली. सोनाबापू (चिमणा बहादूरचा चुलत भाऊ/पांडुबापूंचा मुलगा) चा आमगावला राज्याभिषेक. आमगाव जमीनदारी ही कामठा जमीनदारीचा अंग बनली. तिचा स्वतंत्र दर्जा समाप्त.

६. इ.स. १७८८ ते १८१६– घनदाट अरण्याने व्याप्त भूमी लागवडीखाली आणण्याच्या कार्याला गती. गोंदिबापूंद्वारे चिमणा बहादूरकडे राज्यकारभारविषयक आंशिक जबाबदारीचे हस्तांतरण. लांजी ते शिरपूरपर्यंतच्या घनदाट अरण्याने व्याप्त प्रदेशाचा कायापालट. नवीन गावांची स्थापना. शेती उद्योगाचा विकास. धनसुआ शिकमी जमीनदारीची स्थापना. पठाण जमीनदाराकडे धनसुआच्या शासनाची धुरा. खैरागड व गढा–मंडल्याच्या सीमा विवादात गोंदिबापुंची मध्यस्थी. समस्येची सोडवणूक. सुवर्णकाळाची गुंज.

७. इ.स.१८१६– पुन: सत्तांतर. चिमणा बहादूरचा शासन प्रारंभ. आप्पासाहेब भोसलेकडून चिमणा बहादूरला परगणे कामठ्याची नवीन सनद प्राप्त. लांजी जमीनदारी चिमणा बहादूरच्या अखत्यारीत.

८. इ.स. १८१६ते १८१८–गोंदिबापूंनी सुरु केलेल्या कामांना गती. नागपूरमधील राजकीय घडामोडीमुळे चिमणा बहादूरचे राजधानी नागपूरशी

सतत संपर्क. नागपूरवर इंग्रजांचे संकट. चिमणा बहादूरला भावी संकटाची चाहूल. इंग्रजांविरुद्ध आप्पासाहेबांना पाठिंबा. पूर्वेकडील लांजीपासून पश्चिमेकडील वैनगंगेपर्यंत सर्व जमीनदारांचे संघटन, कमाविसदाराच्या फितुरीमुळे लांजीवर इंग्रजांचा ताबा.

९. जून, जुलै, ऑगष्ट १८१८– पचमढीला केंद्र बनवून आप्पासाहेबांनी सुरु केलेल्या स्वातंत्र्य लढ्यात चिमणा बहादूरचा सहभाग. चिमणा बहादूरचे वराडवर दोनदा आक्रमण. लांजीत इंग्रजांविरुद्ध उठाव (Lanji revolt). गॉर्डनच्या नेतृत्वाखाली इंग्रजांचे सैन्य नागपूरहून कामठ्याकडे रवाना.

१०. सप्टेंबर १८१८– मेजर विल्सनच्या नेतृत्वाखाली इंग्रजांचे दुसरे सैन्य नागपूरहून कामठ्याकडे रवाना. चिमणा बहादूरच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य लढा जोमात प्रारंभ. प्रमुख घटना–वैनगंगेकाठचा संघर्ष, नवरगावची लढाई, झिलमिलीची लढाई, कामठ्याचा रणसंग्राम, अंबागडवर इंग्रजांचा ताबा, पवनीचा लढा. स्वातंत्र्य लढा कोसळला.

११. आक्टोबर १८१८– इंग्रजांना चिमणा बहादूरची हुलकावणी, कॅप्टन गॉर्डनद्वारे कामठ्याच्या किल्ल्याला गराडा, चिमणा बहादूरला कैद.

१२. इ.स. १८१८–१९– भारतावर इंग्रजांचे एकछत्र साम्राज्य, इंग्रजांद्वारे लांजीला जिल्ह्याचा दर्जा प्राप्त.

१३. इ.स. १८२०–२१– जिल्ह्याचे मुख्यालय लांजीवरुन भंडारा येथे स्थानांतररित. याच सुमारास कामठ्याला तालुक्याचा दर्जा प्राप्त. चिमणा बहादूरच्या कैदेमुळे वैनगंगेच्या खोऱ्यात इंग्रजांविरुद्ध वातावरण. किरणापूरची जमीनदारी स्वीकारुन शांतपणे जगावे यासाठी चिमणा बहादूरवर इंग्रजांचे दडपण. भिक्षेच्या स्वरुपात मिळणारी जमीनदारी स्वीकारण्यास चिमणा बहादूरचा नकार. भंडारा जिल्ह्यात शांती प्रस्थापित करण्यासाठी इंग्रजांकडून पायदळ व घोडदळाची एक तुकडी १८२०–२१ पासून १८६० पर्यंत तैनात.

१४. इ.स. १८२१ ते १८२८– चिमणा बहादूरला अविरत कारावासाच्या यातना. राष्ट्रोद्धारासाठी उत्तर भारतात आप्पासाहेबांची तीव्र धडपड. देशी संस्थानिकांना इंग्रजांविरुद्ध संघटित करण्याचे निरंतर प्रयत्न. आप्पासाहेबांचे प्रयत्न १८२८ मध्ये थंडावले. कामठ्यात इंग्रजांद्वारे संभवत: चिमणा बहादूर व त्यांच्या अन्य दोन सहकाऱ्यांना फाशी.

**१५.** इ.स. १८२९ ते १८४०- आप्पासाहेबांनी जोधपूरच्या मानमंदिरात (गुरुद्वारा) आश्रय घेतला. इ.स. १८४० मध्ये त्यांचे निधन. त्यांच्या निधनानंतर अवघ्या सतरा वर्षात १८५७ चा दुसरा स्वातंत्र्य लढा प्रारंभ.

**१६.** इ.स. १८५७- इ.स. १८१८ च्या प्रथम स्वातंत्र्य लढ्यानंतर अवघ्या चाळीस वर्षाच्या आत इ.स.१८५७ मध्ये भारतात राष्ट्रीय स्वरुपाचा स्वातंत्र्य लढा घडून आला. या संपूर्ण चाळीस वर्षाच्या कालखंडात व त्यानंतरही इ.स.१८६० पर्यंत भंडारा जिल्ह्यात शांती प्रस्थापित करण्यासाठी इंग्रजांनी निरंतर आपले लष्कर तैनात ठेवले होते, ही बाब लक्षात घेतली की मग चिमणा बहादूरच्या स्वातंत्र्य लढ्याची दूरगामी परिणामकारकता (far reaching effectuality) सहज नजरेत भरते आणि दुसऱ्या स्वातंत्र्य लढ्याचे बीज १८१८ च्या प्रथम स्वातंत्र्य लढ्यामुळे पेरले गेले हे ठामपणे (Confidently) सिद्ध होते.

■ ■ ■

## **संदर्भ ग्रंथ** (Reference Books)


१. भंडारा जिल्ह्यातील स्वातंत्र्य लढा- प्रा. डॉ. वि. ना. हंडियेकर

२. मराठी रियासत (उत्तर विभाग)- गो. स. सरदेसाई

३. नागपूर राज्याचा अर्वाचीन इतिहास (इ.स. १६९९-१८६०)
– डॉ. शा. गो. कोलारकर आणि गो. मा. पुरंदरे

४. नागपूरकर भोसल्यांचा इतिहास- या. मा. काळे

५. भोसल्यांच्या बंगालवरील स्वाऱ्या- बा. ना. सहस्त्रबुद्धे

६. विदर्भातील ऐतिहासिक लेखसंग्रह १९५९- य. सु. देशपांडे

७. शिखांचा स्फूर्तिदायक इतिहास- शं. पु. जोशी

८. चिमणा सरदार – भवानीशंकर पंडीत, इयत्ता ४ थी-धडा १३ वा, स्वातंत्र्योपरांत जुने मध्यप्रदेश

9. Adventures of Appasaheb (1818-1840)- Govt of Central provinces and Berar

10. Bhonsle Raghuji II of Nagpur (1788-1816) - R. K. Dube

11. Nagpur Residency Record, Vol. I to V - H. N. Sinha

12. Report on the Territories of the Raja of Nagpur 1816, Supplement 1827 - Jenkins Richard

13. Memoir of the operation of the British Army 1817-1819 - Valentine Blacker

14. Nagpur Affairs, Vol. I and II, T. S. Sejvelkar

15. The Private Journal - The Marquess of Hastings

16. History of Orissa - Banerji

17. Tod's Rajasthan Vol. I

18. Report of the Political Agent of Ajmer 3.6.1829

19. First Settlement Report 1867 - Mr. Lawrence

20. Bhandara District Gazetteer, Revised Edition 1978

21. Balaghat District Gazetteer - R. V. Russel

22. Nagpur District Gazetteer (1908-1999)

23. History of the Political and Military Transaction- Prinsap Vol I and II

## आलेख: नागपूरकर भोसले आणि त्यांचा शासनकाळ

देवगड सुभ्यातील परगणे कामठा हा नागपूर राज्याचा एक अभिन्न अंग होता. म्हणून कामठ्याचे जमीनदार व नागपूरकर भोसलेंच्या इतिहासात अन्योन्यसंबंध आहे. अत: या ग्रंथात दिलेला परगणे कामठ्याचा समग्र इतिहास सहजपणे समजण्यासाठी नागपूरकर भोसलेंचा हा आलेख उपयुक्त आहे–

**१. रघूजी प्रथम (जन्म १६८५, मृत्यू १७५५) शासनकाळ–१७२३ ते १७५५.**

रघूजी प्रथम हे एक महान शासक असून त्यांनी १७३७ मध्ये नागपूरला आपली राजधानी बनविले. त्यांच्या काळात रघुजी करांडे हे देवगडचे सुभेदार होते.

↓

**२. जानोजी (जन्म १७३८, मृत्यू १७७२) शासनकाळ–१७५५ ते १७७२.**

जानोजीच्या पत्नीचे नाव दर्याबाई होते. जानोजीला संतानोत्पत्ती न झाल्यामुळे त्यांनी मुधोजी या भावाचा मुलगा रघूजी द्वितीय याला दत्तक घेतले. जानोजींच्या काळात रघुजी करांडे यांच्याकडे वऱ्हाडच्या सुभ्याची जबाबदारी होती.

↓

**३. रघूजी द्वितीय (जन्म १७६१, मृत्यू १८१६) शासनकाळ–१७७२ ते २२ मार्च १८१६.**

रघूजी द्वितीय यांचा मुलगा परसोजी हा अपंग व मंदबुद्धीचा होता. चिमणाजी उर्फ खंडोजी भोसले हा रघूजी द्वितीय यांचा लहान भाऊ होता.

↓

**४. परसोजी (जन्म १७७८,मृत्यू १८१७) शासनकाळ–१४ एप्रिल १८१६ ते १ फेब्रु. १८१७.**

रघूजी द्वितीय नंतर परसोजीची सावत्र आई बाकाबाई व आप्पासाहेब (रघूजी द्वितीय यांचा पुतण्या/व्यंकोजीचा मुलगा) यांच्यात गृहयुद्ध सुरु झाले. गृहयुद्धात यशस्वी झाल्यानंतर आप्पासाहेबांनी परसोजीला गादीवर बसविले व त्याच्या वतीने नागपूर राज्याचा राज्यकारभार करु लागले. गृहयुद्धात कामठा शासनाचा आप्पासाहेबांना पाठिंबा होता.

↓

**५. आप्पासाहेब (१७९६–१८४०) शासनकाळ–२४ नाव्हें. १८१७ ते ३० डिसें. १८१७.**

आप्पासाहेब हे २४ नोव्हें.१८१७ ला नागपूर राज्याचे विधिवत शासक झाले. पण दुसऱ्या दिवसापासूनच इंग्रजांविरुद्ध घडून आलेल्या नागपूरच्या युद्धामुळे ३० डिसें.१८१७ ला भोसल्यांच्या वाड्यावर युनियन जॅक फडकले. आप्पासाहेबांनी पचमढीत आश्रय घेवून इ.स.१८१८ मध्ये इंग्रजांविरुद्ध स्वातंत्र्य लढा पुकारला. या स्वातंत्र्य लढ्यात परगणे कामठा पूर्ण सामर्थ्यानिशी सहभागी होता.

▬ ▬ ▬

<u>बहेकर घराण्याची मूळ वंशावली पृष्ठ क्र. १</u>

## कोलुबापू बहेकार आणि त्यांची मुले

**(कोलुबापू यांना तीन पत्नी होत्या)**

**१. श्रीमती असाई**

- **२. रामा**
- **३. गोंदिबापू**

  गोंदि हा कर्तबगार असल्यामुळे भोसले शासनाने १७८८ मध्ये कामइठी जमीनदारीची सत्ता त्याच्या हाती सोपविली. हट्टा, लिंगा, किरणापूर, बिंजली व केशोरी या जमीनदाऱ्या त्याच्या अधिकारक्षेत्रात आल्या. या सर्व जमीनदारीच्या एकूण प्रदेशाचा विस्तार १००० वर्ग मैल इतका होता.

**२. श्रीमती जानकी**

- १. पांडु बहेकार याला १७५६ मध्ये आमगावची जमीनदारी प्राप्त झाली या जमीनदारीत एकूण ५१ गावे होती. १७९६ मध्ये काही काळपर्यंत या जमीनदारीची सत्ता एका परदेसी जमीनदाराकडे सोपविण्यात आली होती. यावेळी आमगावची जमीनदारी ही स्वतंत्र जमीनदारी होती.
- ४. अर्जा याच्या हाती कुठलीही जमीनदारी नव्हती. हा निपुत्रिक होता.

**३. श्रीमती मनकाई**

- ५. देवू हा १८२१ मध्ये पलखेड्याचा जमीनदार झाला.
- ६. शिवा
  - माधव
    - सकवन
  - धर्मा

**टीप :– कोलुबापू बहेकार यांच्या रामा, गोंदि, पांडु आणि देवू या मुलांच्या वतनदारीचे आणि त्यांच्या वंशावलीचे तक्ते यापुढच्या पानांवर क्रमश: दिलेले आहेत.**

दि. ४ जुलै १९१७


(स्वाक्षरी) ॲड. व्ही. आर. पंडित

(स्वाक्षरी) ॲड. व्ही. एम. जकातदार

<u>बाहेकर घराण्याची मूळ वंशावली पृष्ठ क्र. २</u>

## राम पटेल (कोलुबापुंचा मुलगा) यांचा वंशवृक्ष

**राम पटेल यांना दोन मुले होती**





दि. ४ जुलै १९१७

(स्वाक्षरी) ॲड. व्ही. आर. पंडित
(स्वाक्षरी) ॲड. व्ही. एम. जकातदार

<u>बहेकर घराण्याची मूळ वंशावली पृष्ठ क्र. ३</u>

## कोलुबापूंचा पनतू सित्रुबापू (जमीनदार झिलमिली) यांची वंशवेल

सित्रुबापुंना दोन पत्नी होत्या




(स्वाक्षरी) ॲड. व्ही. आर. पंडित
(स्वाक्षरी) ॲड. व्ही. एस. जकातदार

दि. ४ जुलै १९१७

<u>बहेकर घराण्याची मूळ वंशावली पृष्ठ क्र. ४</u>

## कामठ्याचे द्वितीय जमीनदार गोंदिबापू यांची वंशवेल

### (कामठा, हट्टा, लिंगा, किरणापूर, बिंजली इ. ठिकाणचे जमीनदार )

- १. पुना पटेल, हट्टा जमीनदारीचे व्यवस्थापक, लिंगा व किरणापूर जमीनदारी यांच्याच अखत्यारीत होती.
  किरणापूर जमीनदारी चिमणा बहादूरचे दत्तक पुत्र रामा पटेल यांना बहाल करण्याचे भोसला शासनाने ठरविले होते. पण १८१८ च्या लढ्यामुळे व नंतर पुना पटेलच्या प्रयत्नामुळे ही जमीनदारी त्यांचे लहान भाऊ कोंडुबापू यांना प्राप्त झाली. पुना पटेल हे स्वत: लिंग्याचे जमीनदार राहिले.
  पुना पटेल हे निपुत्रिक होते. त्यांच्या निधनानंतर लिंगा हे गाव चिमणा बहादूरचे दत्तक पुत्र रामा पटेल यांचा मुलगा पांडुबापू यास भरणपोषणासाठी मिळाले.
- २. चिमणा बहादूर (कामठ्याचे जमीनदार) १८१८ मध्ये इंग्रजांविरुद्ध स्वातंत्र्य लढा उभारला व सत्ता गमावली.
  - रामा पटेल (दत्तक पुत्र) पुना पटेलच्या रकान्यात यांची माहिती दिली आहे.
    - पांडु पटेल पुना पटेलच्या निधनानंतर लिंगा हे गांव पांडु पटेल यांना प्राप्त झाले.
      - रामा पटेल (लिंग्याचे जमीनदार झाले)
      - नारायण पटेल (निपुत्रिक होते.)
- ३. मोहना (निपुत्रिक होते)
- ४. कोंडुबापू कामठ्याला राहत होते. १८१८ नंतर पुना पटेल यांच्या प्रयत्नामुळे व नागपूरच्या इंग्रज शासनाच्या आदेशान्वये किरणापूरची जमीनदारी प्राप्त झाली. यांचे निधन १८६२ मध्ये झाले.
  - रामचंद्र किरणापूरची जमीनदारी प्राप्त झाली.
    - हिराभाऊ किरणापूरची जमीनदारी प्राप्त झाली.
      - टिकाराम जमीनदार किरणापूर येथे १९१७ च्या सुमारास यांचे शासन होते.
      - बुधराम
      - पांडु
      - रामचंद्र
    - देवू दुदवा हे गाव उदरनिर्वाहासाठी मिळाले.
    - बाजीराव जाभंडी हे गाव उदरनिर्वाहासाठी मिळाले.
    - विठू कांद्री हे गांव उदरनिर्वाहासाठी मिळाले.
  - लक्ष्मण कांद्री बुजुर्ग व पालडी ही गावे उदरनिर्वाहासाठी प्राप्त झाली. नि:संतान होता.
  - चिमणा नेवरगाव आणि पळ्ळा ही गावे उदरनिर्वाहासाठी प्राप्त झाली.

दि. ४ जुलै १९१७

किरणापूर जमीनदारीसंबंधी संशोधित तथ्य–

१. पुना पटेल यांचा शासन काळ (युध्दोपरांत इ.स. १८४६ पर्यंत)

२. कोंडुबापूंचा शासन काळ (इ.स. १८४६ ते इ.स. १८६२)

(स्वाक्षरी) ॲड. व्ही. आर. पंडित

(स्वाक्षरी) ॲड. व्ही. एम. जकातदार

**<u>बहेकर घराण्याची मूळ वंशावली पृष्ठ क्र. ५</u>**

## पांडुबापू बहेकार–कोलुबापूंचा मोठा मुलगा

**आमगाव जमीनदार (१७५६–१७९६)**

सोनाबापू

आमगावचे जमीनदार (१७९६–१८११)

सोनाबापू यांना १७९६ मध्ये भोसले शासक रघूजी दुसरे यांच्याकडून आमगाव जमीनदारीची नवीन सनद प्राप्त.

जानाबापू

तान्याबापू उर्फ कोलुबापू

आमगावचे जमीनदार (१८११–१८३८)

श्रीमती राजू बाई (पहिली पत्नी)

श्रीमती रेणूका (दुसरी पत्नी)

चिमणाबापू

(पाखरुबाई व नेती बाई अशा दोन पत्नी होत्या)

आमगावचे जमीनदार (१८३८–१८६२)

यांना भजियापार येथील बहेकार घराण्यातून दत्तक घेण्यात आले होते.

राघोबा (पत्नी गंगाबाई)

आमगावचे जमीनदार (१८६२–१८६४)

वयाच्या १४ व्या वर्षीच मरण पावले.

अर्जून (पत्नी कंबळजा)

वडीलांच्या पूर्वीच यांचे निधन झाले.

माधवराव भाऊ (पत्नी श्रीमती मैनाबाई)

आमगावचे जमीनदार (१८६४१९१७)

यांना राजूबाईने पानगावच्या घराण्यातून दत्तक घेतले होते.

मल्हारराव

अर्जदार (Applicant)

मार्तंडराव

गैरअर्जदार (Non-applicant)

**In revenue case no. 1 of 1916-17**
**Subject-Mutation of Amgaon Zamindari**

दि. ४ जुलै १९१७


(स्वाक्षरी) ॲड. व्ही. आर. पंडित

(स्वाक्षरी) ॲड. व्ही. एम. जकातदार

बहेकर घराण्याची मूळ वंशावली पृष्ठ क्र. ६

## देवू पटेल–पलखेड्याचे जमीनदार (इ.स. १८२१)

**(कामठा जमीनदारीचे संस्थापक कोलुबापू यांचा पाचवा मुलगा)**





दि. ४ जुलै १९१७

(स्वाक्षरी) अ‍ॅड. व्ही. आर. पंडित
(स्वाक्षरी) अ‍ॅड. व्ही. एम. जकातदार

# गोंदिया, बालाघाट व भंडारा जिल्ह्याचा नकाशा


## (कामठा परगण्याचा इतिहास समजण्यासाठी उपयुक्त)




टीप– इतिहास हा विषय नवीन राजकीय नकाशाच्या संदर्भात लवकर लक्षात येतो. या दृष्टीने हा नकाशा दिलेला आहे.

## आधुनिक महाराष्ट्र व मध्यप्रदेशाचा नकाशा

**(१८१८ च्या स्वातंत्र्य लढ्याची व्याप्ती लक्षात येण्यासाठी उपयुक्त)**



चिमणा बहादूरवरील एक जुनी दुर्मिळ कविता

( ३७ )

## धडा १३ वा.

### चिमणा सरदार

(चाल-- अजि अंकुर हा...)

" किती सांगु गडे ! तुजसी याच्या खोड्या
आहेत तशा कां थोडया ? ।
जर सांगाया बसेन त्या एकेक
दिवसही पुरेल न एक ।
तिकडूनि रणां जाणें झाले जेव्हा ।
हा सवें निघाला तेव्हा ।
तं सांगितले धाकाने प्रेमाने
परि ऐकेनाची कशाने ।
सवंगडी असे नित्य अता जमवीतो
लुटपुटी लढाई लढतो ।
करिं घेऊनिया काठीची तलवार
दारांवरि करितो वार ।
करितो जरिच्या टोपीची दृढ ढाल
करितात वार वरि बाल ।
ह्या गुडघ्याचा बाळांच्या पाठीचा
त्याअश्व समजुनि हाणितो टाचा ।

( ३८ )


ताईत गळ्यांतिल माझ्या
जीवाचा प्यारा कलिजा
वतनाचा चिमणा राजा
अधि करितो गे ! नरवीरांवर ताण ! ।
बापसे सवाई जाणें ! ।
तिनसांजेला बैसुनि तट्टावरती
फिरण्याला जातो भवती ।
त्या वेळी ज्या खोड्या करितो कांही
नच पुसणें बाई! बाई !
दुरि घालवुनी देतो मोतद्दारा
मग पळतो सैरावैरा ।
परि फांद्यांशी घेतो बाई ! झोंब्या
तोडितो फळें लिंबोण्या ।
टाकतो कधी जाऊनि हत्तीपुढती
नाहीच कशाची भीती ! ।
असले त्याचे बघतां बघतां खेळ
झर झर जातो वेळ ।
गे! सजतो हा पुरापुरा सरदार
डोळ्यास सुखवितो फार
जरि दिसण्याला गुलाम असला छोटा ।
अकलेने आहे मोठा ।

( ३९ )

ताईत गळ्यांतिल माझ्या
जीवाचा प्यारा कलिजा
वतनाचा चिमणा राजा
उरिं धरुनि, जेव्हा दुडुदुडु धावे,
मधु मुके मटामट घ्यावे! ''

भवानीशंकर पंडीत

■ ■ ■




इ.स.१७८८ च्या नकाशातील कामठा (Coomtha) व सभोवतालची गावे दाखविलेला प्रदेश

**(Extract from map of 1788 A.D.)**

(टीप:– कामठयाकडे लक्ष वेषण्यासाठी त्याच्या सभोवताली वर्तुळ केलेला आहे.)

## बहेकार घराणे—रिसामा (आमगाव) शाखेची अलीकडील वंशावली

कोलुबापू (कामठा जमीनदारीचे संस्थापक)

|

देवू पटेल (कोलुबापूंचा पाचवा मुलगा)
(१८२१ मध्ये पलखेडयाचा जमीनदार झाला)

|

टुना पटेल (देवू पटेलचा मोठा मुलगा)
(रिसामा येथे गेला)

|

हिरा पटेल

|

पैकू पटेल

|

राघोबा — पांडु — लक्षी — गोविंदा — शिवा

लक्षी

|

आडकू

|

लहु — सितरु — तुलशीराम

- लहु
  - सोनाबापू
    - ताराचंद
    - रमेश
  - मोहन
    - रामेश्वर
- सितरु
- तुलशीराम
  - प्राचार्य श्यामराव बहेकार (पत्नी सुशीला)
    - सुरेश बहेकार (पत्नी जयश्री)
      - १. सुरभी
      - २. सुजय
    - विजय बहेकार (पत्नी कल्पना)
      - १. समृध्दी
      - २. सृष्टि
    - संजय बहेकार (पत्नी अरुणा)
      - १. कुशल
      - २. पूर्वा